04-11-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

GSS/ 11:00

11-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

GSS/ AKN/ MMP/ 11:00

(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)

(म.वि.स.नियम 97 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करणे बाबत)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, राज्यात घडलेल्या गंभीर घटनेसंदर्भात म.वि.स. नियम 97 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन सदरहू विषयावर चर्चा घेण्यात यावी, अशी आमची मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, गोंदिया येथील सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल हे या सदनाचे ज्येष्ठ सदस्य असून त्यांचा सभागृहातील 25 वर्षापेक्षा अधिक आहे. शनिवार, दिनांक 9 एप्रिल, 2016 रोजी सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल यांनी गोंदिया येथे पत्रकार परिषद बोलाविली होती. पत्रकार परिषदेमध्ये त्यावेळी ते गोंदिया येथील मेडिकल कॉलेज व इतर विकास कामांच्या संदर्भातील माहिती देत असताना भारतीय जनता पक्षाचे एक स्वीकृत नगरसेवक सन्माननीय श्री.शिव शर्माने ..... सदर श्री.शर्मा या व्यक्तीकरिता मी चुकून "सन्माननीय" हा शब्द वापरला त्याबद्दल क्षमा मागतो. सदरहू शब्द कामकाजातून वगळण्यात यावा, अशी माझी विनंती आहे. श्री.शिव शर्मा या स्वीकृत नगरसेवकाने पत्रकार परिषद सुरु असताना सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल यांच्यावर हल्ला केला. पत्रकार परिषद सुरु असून तेथे प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत याची कल्पना होती श्री.शर्मा यास हल्ला करताना होती. सदरहू घटनेचे फुटेज पाहिले तर दिसून येते की, सदरहू श्री.शर्मा या गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीने प्रसार माध्यमांच्या कॅमेऱ्याकडे पाहून आता मी फार मोठी लढाई करण्यासाठी आलो आहे या आविर्भात सन्माननीय सदस्यांवर हल्ला केला. सदर घटना ठरवून झालेली होती. टी.व्हि.च्या फुटेजमध्ये दिसते की, सदरहू गुंड नगरसेवक येतो, त्याच्या सह त्याच्यामागे दोन लोक येतात. माध्यमाकडील चित्रफित पाहून सदर हल्ला कट रचून केला असल्याचे वाटते. आमदार कोणत्या पक्षाचे हे महत्वाचे नसून ते सदनातील एक ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहेत, लोकप्रतिनिधी आहेत. लोकप्रतिनिधीवर भर पत्रकार परिषदेमध्ये कट रचून सर्वांच्या समोर हल्ला करण्याचे धाडस करण्यात येत असेल तर राज्यात कोण सुरक्षित आहे, असा प्रश्न निर्माण होतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष महोदय, सिंधुदूर्ग येथे बांदामध्ये बसणाऱ्या आमदार महोदयांना पोलीस अधिक्षक

.....2

11-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-2

GSS/ AKN/ MMP/ 11:00

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

यांचेकडून मारहाण झाल्याच्या घटनेची जखम अजून ताजी आहे. आमदार महोदय हे साडे तीन लाख लोकांमधून निवडून येतात ते लोकप्रतिनिधी आहेत, ही भावना लक्षात घेतली जात नाही, अशा प्रकारची प्रवृत्ती बळावत आहे. यापध्दतीने राज्यात दिवसाढवळ्या कायदा व सुव्यवस्थेची लक्तरे रोज टांगली जात आहेत. आमदार महोदयांवर झालेल्या हल्ल्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्यात येत नाही, असे प्रकार का घडत आहेत ?

अध्यक्ष महोदय, मागील आठवड्यामध्ये वरिष्ठ सभागृहामध्ये एक मंत्री महोदय सन्माननीय सदस्यांना सांगतात की, "बाहेर या, मी तुम्हाला पाहून घेतो." याप्रकरणामुळे सभागृहात एका ज्येष्ठ मंत्री महोदयांना माफी मागावी लागते. सभागृहातील अशा प्रकारच्या वर्तनामुळे बाहेर कोणता संदेश जात आहे ? अशा प्रकारच्या गुंड प्रवृत्तीचे मनोबल वाढत चालले आहे. अशा प्रकारच्या घटनामुळे श्री.शिव शर्मा सारखे व्यक्ती आमदार महोदयांना मारहाण करण्यास धजावतात.

अध्यक्ष महोदय, सटाणा येथील माजी आमदार महोदय श्री.संजय चव्हाण, नगर अध्यक्ष व त्यांचे कार्यकर्ते पोलीस स्टेशनवर पोलीस निरीक्षक यांचे विरुध्द तक्रार नोंदविण्याकरिता मोर्चा घेऊन गेले असता त्यांना काल पोलिसांनी मारहाण केली. याप्रकरणी मी नाशिक येथील पोलीस अधीक्षक यांचेशी बोललो की, "लोकप्रतिनिधी प्रती तुमच्या संवेदना संपल्या का, त्यांना जनावरापेक्षा जास्त मारहाण का करण्यात येते, यासंदर्भात तुम्हाला वरिष्ठ स्तरावरुन कोणाच्या सूचना आहेत का ?" याबाबत नाशिक येथील पोलीस अधीक्षक यांनी मला सांगितले की, " सदर प्रकरणातील पोलीस इन्स्पेक्टरवर मानसिक परिणाम झालेला आहे." सदर अधिकाऱ्यावर जर मानसिक परिणाम झालेला असून तर त्याला पोलीस स्टेशनला नियुक्ती का दिली, त्याला कन्ट्रोल रुम येथे का ड्युटी दिली नाही ? राज्यात लोकप्रतिनिधींना मारहाण करण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे.

अध्यक्ष महोदय, श्री.शिव शर्माने केलेल्या हल्ल्या संदर्भात तत्काळ कारवाई होणे आवश्यक होते. गोंदिया येथील पोलीस अधीक्षक श्री.मिना आहेत. सदर घटना घडून गेल्यानंतरही एफआयआर दाखल होत नाही. याप्रकरणी राज्यमंत्री महोदय टी.व्हि.वर स्टेटमेंट देतात की, एफआयआर दाखल होऊ द्या. या बातम्या प्रसार माध्यमाद्वारे प्रसारित करण्यात येत आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

11-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-3

GSS/ AKN/ MMP/ 11:00

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

माननीय सर्वोच्च न्यायालय, माननीय उच्च न्यायालयाकडून साध्या पत्रावर दखल घेऊन कार्यवाही करण्यात येते. पोलीस स्टेशनमध्ये "झिरो" क्रमांकाद्वारे कार्यवाही करण्यात येते. परंतु आमदारावर हल्ला झाल्यानंतर एफआयआर दाखल करण्यासाठी कशाची वाट पाहण्यात येते ? आमदार महोदयावर हल्ला झाल्याची घटना घडल्यानंतर कालपर्यंत पालक मंत्री महोदय गांदिया येथे होते, ही सर्वात दुर्दैवाची गोष्ट आहे. कारण त्यांनी आमदार महोदयांना फोन करुन विचारपूस करण्याचे साधे औदार्य दाखविले नाही. आमदार महोदयांवर काही दिवसापूर्वी हृदय शस्त्रक्रिया झालेली आहे. त्यांना मारहाण झाल्यानंतर त्यांना गंभीर दुखापत झाली होती. अशा वेळी त्यांची तब्बेत कशी आहे, हे विचारण्याचे औदार्य पालक मंत्री यांनी दाखविले नाही. पालक मंत्री यांनी पक्षीय राजकारणापलिकडे जाऊन याविषयाकडे पाहणे आवश्यक होते. सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल हे काँग्रेस पक्षाचे आहेत म्हणून नव्हे तर ते सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहेत म्हणून मी त्यांच्यावरील हल्ल्याच्या घटनेचा निषेध करीत आहे. आमदार महोदयांवर हल्ला करणाऱ्या श्री.शिव शर्मा या व्यक्तीवर यापूर्वी खुनाचा व बेकादेशीरपणे शस्त्र बाळगल्याचा गुन्हा दाखल आहे. त्यामुळे त्याच्यावर सदरहू प्रकरणी मोक्कांतर्गत कारवाई करणे आवश्यक होते. सदरहू घटनेतील आरोपी घटनेस 48 उलटूनही पोलिसांच्या ताब्यात नाही, तो फरार आहे, त्याला फरार होऊ देण्यात आले. पालक मंत्री जिल्ह्यात असाताना आमदार महोदयांची विचारपूस करीत नाहीत, याचा अर्थ हा ठरवून केलेला कट होता काय, या प्रकरणामध्ये पालक मंत्री सामील आहेत काय ?

अध्यक्ष महोदय, वरिष्ठ सभागृहामध्ये एक मंत्री महोदय सन्माननीय सदस्यांना म्हणतात, "बाहेर या, मी तुम्हाला पाहून घेतो." या प्रकरणी वरिष्ठ मंत्री महोदयांनी माफी मागणे आम्हाला अपेक्षित नव्हते तर त्या मंत्र्यास मुख्यमंत्री महोदयांकडून तात्काळ बडतर्फ करणे अपेक्षित होते. आपल्याकडे प्रथा आहे की, काहीही घटना घडली की, संबंधितास पक्षाकडून निलंबित करण्यात येते व संबंधितास स्वैराचार, गुंडगिरी करण्यास मोकळीक दिली जाते. अशाच प्रकारचे आपल्या पक्षाचे धोरण आहे काय ? याबाबत आपण श्री.गणेश पांडेच्या प्रकरणाचे उदाहरण घेऊ शकतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

11-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-4

GSS/ AKN/ MMP/ 11:00

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

तसेच, भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष श्री.गणेश ठाकूर यांच्यामुळे प्रा.मल्हारी मस्के यांना नागपूर सोडून जावे लागले. पक्षाकडून लोकांना निलंबित करुन त्यांना मागच्या दाराने संरक्षण दिले जाते.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल यांच्यावरील हल्ल्या प्रकरणी श्री.शिव शर्मा या गुंडास तात्काळ अटक करुन त्यावर मोक्कांतर्गत कारवाई करण्यात यावी. तसेच, गोंदिया जिल्ह्याचे पालक मंत्री यांनी राजकीय अभिनिवेश न दाखवता सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल यांना भेटावयास पाहिजे होते परंतु ते भेटण्यास गेले नाही. याचा अर्थ असा आहे का की, सदरहू प्रकरणातील गुंडास पालक मंत्री महोदयांची फूस होती का, त्यास त्यांनी संरक्षण दिले होते का ? मुख्यमंत्री महोदयांनी पालक मंत्र्यांना देखील सदरहू प्रकरणी बडतर्फ करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर B-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....

पालकमंत्र्यांना माननीय मुख्यमंत्र्यांनी ताबडतोब बडतर्फ करण्याची आवश्यकता आहे आणि माजी आमदार श्री. संजय चव्हाण यांना मारहाण करणाऱ्या पोलिस अधिक्षकाला बडतर्फ केले पाहिजे अशी आमची मागणी आहे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जी उदाहरणे आणि ज्या घटना या ठिकाणी सांगितल्या आहेत त्या पाहिल्यानंतर महाराष्ट्रामध्ये कायदा व सुव्यवस्था कशा पध्दतीने धाब्यावर बसविण्याचे काम चालू आहे. या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल हे पत्रकार परिषद घेत आहेत, कॅमेऱ्यांसमोर आहेत, शहरातील पत्रकार त्या ठिकाणी बसले आहेत, आपल्या मतदार संघासाठी अर्थसंकल्पातून कोणकोणती कामे आली आहेत याचे स्पष्टीकरण आणि माहिती देताना एक शिवशरण शर्मा नावाचा गुंड त्या पत्रकार परिषदेमध्ये घुसतो आणि त्या ठिकाणी मागे वळून कॅमेरा चालू आहे की, नाही हे बघतो, कॅमेऱ्याचे शुटिंग चालू आहे की, नाही याची खात्री करतो आणि सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल यांच्यावर हा उगारतो व बेदम मारहाण करतो. त्यांच्या नाकातून रक्त येते. गोपालदास अग्रवाल रक्तबंबाळ झाले. सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल यांना मारहाण करण्यासाठी ही 4-5 माणसे आत आली आणि ज्या पध्दतीने त्यांनी सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल यांना मारले त्यावरुन किती भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांचे किती धाडस वाढले याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल यांना मारहाण करणारा माणूस हा गोंदिया नगरपालिकेमध्ये नगरसेवक असून यांचे तज्ज्ञ कमी पडल्यामुळे त्यास स्वीकृत तज्ज्ञ म्हणून नगरसेवक केलेले आहे. कोणाला स्वीकृत तज्ज्ञ करावे यासाठी काही नॉर्म्स आहेत. त्याच्यावर किती तरी गुन्हे दाखल असताना एका शहरातील गुंडाला हुडकून त्यास भारतीय जनता पक्षाने स्वीकृत नगसेवक करणे म्हणजे सन्माननीय अटलबिहारी यांचा भारतीय जनता पक्ष कुठे आणि यांचा भारतीय जनता पक्ष कुठे यांचे एक उत्तम उदाहरण आहे. विधिमंडळ सदस्य शांततेच्या मार्गाने पत्रकारांना माहिती देत असताना जर अशी मारहाण होत असेल तर या सभागृहातील कोण सुरक्षित आहे. हा खरा महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतो. या ठिकाणी प्रत्येक आमदाराला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

अशा भिती आणि दहशतीखाली ठेवण्याचा कोणी जर प्रयत्न करीत असेल तर आपण याची गांर्भीयाने दखल घेण्याची गरज आहे. परवा मी सन्माननीय सदस्य श्री गोपालदास अग्रवाल यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला होता तेव्हा त्यांना आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले होते. एवढी गंभीर दुखापत केल्यानंतरही हा शिव शर्मा नावाचा गुंड नगरसेवक आपल्याला स्वीकृत वाटत असेल तर त्याला अद्यापी अटक केलेली नाही. आपण सरकारच्या वागण्याची पध्दत लक्षात घ्यावी. आम्ही या ठिकाणी गणेश पांडे यांचे नाव घेत असताना अद्यापही त्या गणेश पांडे यास अटक केलेली नाही. एखादी महिला एफआयआर दाखल करते तरी आपण अटक करीत नाही.

अध्यक्ष महोदय, या सन्माननीय सभागृहाचे माजी सदस्य श्री. संजय चव्हाण यांच्या पत्नी या ठिकाणी सदस्य म्हणून काम करीत आहेत. सन्माननीय माजी सदस्य श्री. संजय चव्हाण आणि सटाण्याचे दोन वेळा नगराध्यक्ष असणारे आणि ज्यांचे वडील दोन वेळा नगराध्यक्ष होते आणि 25 वर्षे ते या शहराचे नगरसेवक म्हणून काम करीत होते. आपल्या रेस्टॉरन्टसमोर श्री. पंडित धर्मा पाटील यांच्यापासून इतर मान्यवर नेते त्या हॉटेल बाहेरील त्यांच्या अखत्यारीतील जागेमध्ये येऊन बसायचे. अध्यक्ष महोदय, 11 वाजण्यापूर्वी रेस्टॉरन्ट बंद केले, शटर हाफ केले आणि आमचे वाघसाहेब त्यांच्या क्षेत्रफळातील मालकीच्या जागेमध्ये 2-3 जण बसलेले होते. त्या ठिकाणी तेथील पोलिस अधिक्षक पी.टी.पाटील येतो. श्री.वाघ यांना शिवीगाळ करतो, दमदाटी करतो आणि 2-3 लोकांसमोर आपल्या लोकांमधून निवडून गेलेल्या व्यक्तीला जर कोणी विनाकारण आणि कायद्याचे उल्लंघन न करता कोणताही गुन्हा केलेला नसताना जर विनाकारण दमदाटी करीत असेल तर त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी श्री. वाघ यांनी सांगितले की, आपण आपली ड्यूटी करा, आम्ही काहीही केलेले नाही. त्यावर ते म्हणाले की तुला बघून घेतो, अशा वाईट शब्दात ते बोलले आणि घाणेरड्या शब्दात बोलल्यानंतर श्री. वाघ यांची गचोटी धरुन पी.टी.पाटील यांनी त्यांना मारहाण करण्याचा प्रयत्न केला. ही मारहाण करीत असताना वाघ यांची चैन गेली, त्यांचा शर्ट फाटला. यास्तव माजी आमदार श्री. संजय चव्हाण आणि 30-35-40 राष्ट्रवादीचे कार्यकर्ते सटाण्याच्या पोलिस स्टेशनवर गेले. त्या ठिकाणी टोणपे नावाचे दुसरे पी.आय. होते. त्यांच्याकडे रितसर फिर्याद दाखल करण्यासाठी गेले. मागून पी.टी.पाटील आले आणि त्यांनी त्या ठिकाणी पहिल्यांदा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

असा उल्लेख केला की, नगरसेवक आणि माजी आमदार यांना बसायला जागा कोणी दिली असे ते म्हणाले. यांना आधी बाहेर काढा. श्री. टोणपे यांनी महत प्रयासाने त्यांना बाजूच्या खोलीमध्ये जाण्यास सांगितले. पुन्हा पुन्हा हे पोलिस अधिक्षक पी.टी.पाटील त्या ठिकाणी येऊन दमदाटी करीत होते. दरम्यानच्या काळात या पी.टी. पाटील यांनी एसआरपी बोलावली. 30-40 जणांपैकी 20 जणांना बाहेर काढले. 10-15 जण फक्त आत ठेवले. मुख्य कंम्पाऊंडचा दरवाजा बंद केला या फिर्याद दाखल करायला आलेल्या 13-14 नगरसेवक, माजी नगरसेवक, माजी आमदार यांना एस.आर.पी.ने काठीने भयंकर मारहाण केली. मी मघाशी माननीय मुख्यमंत्र्यांना हे सर्व फोटोग्राफ्स सुपूर्द केलेले आहेत. 11.30, 12.00 वाजल्यापासून एक ते दीड वाजेपर्यंत ही मारहाण चालू होती. ही सर्व माणसे मारु नका, मारु नका म्हणून विनंती करीत होते. जे मोटरसायकल घेऊन आले होते त्यापैकी 4 मोटर सायकल्सना या पी.टी.पाटील यांनी आग लावली. 4 सायकली जाळल्या. तहसिलदार यांची गाडी होती. तिची काच फोडली. याबाबतचे रेकॉर्ड काय तयार केले तर या लोकांनी त्या ठिकाणी दहशत निर्माण करुन दंगाधोपा केला. या सर्वांना मारहाण झाली आहे. त्याचे फोटोग्राफ्स आहेत, त्याचबरोबर श्री. विजय वाघ यांना घेऊन हे पी.टी. पाटील गाडीत बसले ज्या हॉटेलच्या समोर हुज्जत झाली होती त्या हॉटेलसमोर दारात नेले. त्यानंतर जवळपास 2 वाजता श्री. विजय वाघ यांना 20-25 पोलिसांनी मधोमध उभे केले आणि सर्वांनी त्याच्या पाठीमागे, पोटावर आणि दिसेल तेथे काठ्या घातल्या. ही मारहाण चालू आहे असे सी.सी.टी.व्ही मध्ये आले आहे. त्यामध्ये हे सर्व रेकॉर्ड झाले आहे. दोन वेळा नगराध्यक्ष असणाऱ्या, नगरसेवक असलेल्या आणि कोणताही गुन्हा न केलेल्या माणसाला रात्री दोन अडीच वाजता मारहाण केली. यामध्ये पोलिसांच्या 2-3 गाड्या दिसतात. पोलिसांच्या 2 व्हॅन दिसत आहेत. हे पोलिस स्वत: उभे आहेत. एक साध्या ड्रेसमधील माणूस आहे त्यालाही बाहेर काढले आणि त्याने यांना बाहेर काढून सर्वांनी रिंगण करुन श्री. विजय वाघ यांना एवढी मारहाण केली की, आम्हाला त्यांना आता जसलोग रुग्णालयात ॲडमिट करावे लागले आहे. श्री. विजय वाघ यांच्या पाठीमागे बघितले तर सर्वत्र फोड आलेले आहेत. सर्व अंग त्यांचे सुजलेले आहे. सर्व अंग सोलून काढले आहे. पोलिस सामान्य माणसाला कसे सोलून काढतात याचा एक आदर्श या पी.टी. पाटील यांनी महाराष्ट्रात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

नव्याने आदर्श घालून दिला आहे. हे सर्व होत असताना आमच्या दिपीका ताईंचे यजमान श्री. संजय चव्हाण हे एस.पी.ंना फोनवर बोलले, आय.जी. यांना फोनवर बोलले. माजी आमदार एसपी आणि आयजी यांच्याशी फोनवर बोलत होते. एस.पी. आणि आयजी. यांना हे माहिती असून त्यांनी हे मान्य केलेले आहे की, हे तो चूक करतो आहे. एस.पी. आणि आयजी. यांना आमचे माजी आमदार श्री. संजय चव्हाण यांनी एकदा नाही तर चार वेळा माहिती दिली.

अध्यक्ष महोदय, एवढ्या ब्रुटली एखाद्या सामान्य कार्यकर्त्यांना मारायचे असेल आणि राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्याला मारुन राष्ट्रवादीला नामोहरम करण्याची भूमिका पोलिसांकरवी कोणी घेत असेल तर राष्ट्रवादीचा कार्यकर्ता अशा कुठल्या लाठीचार्जला बळी पडून घाबरणारा नाही. आमच्या पक्षाला नामोहरम करण्यासाठी पोलिसांचा जाणीवपूर्वक वापर होत आहे अशी आमची भूमिका तयार होत आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रातील आणखी एक उदाहरण सांगतो की, सोलापूरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी अध्यक्ष श्री. मनोहर डोंगरे

C-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

यांना एक तासाभरापूर्वी सोलापूरच्या मंदिरात गेले असताना त्याठिकाणी अज्ञातांनी मारहाण करून प्राणघातक हल्ला झाला. त्यांना हॉस्पीटलमध्ये नेण्याची वेळ आली, हे काय चालले आहे. मनोहर डोंगरेंचे कुणासोबतही वैर नाही. एवढा अजातशत्रू माणूस आहे. पण आज त्यालाही तासाभरापूर्वी मारहाण झाली. त्यांची तब्बेत क्रिटीकल असून डॉक्टर वाचविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. या महाराष्ट्रामध्ये काय चालले आहे. कायदा व सुव्यवस्था ठेवायची नसेल तर किमान पोलीसांना चिथावून अशातऱ्हेने कार्यकर्त्यांना मारु नका. जे आमदारांवर हल्ला करतात, त्याला 24 तास होऊन गेलेले आहेत. परवा संध्याकाळी 7 वाजता घडलेली घटना आहे. सरकारला शिव शर्माला अटक करण्याची जाणीव होत नाही. गणेश पांडेंना अजून अटक झालेली नाही, शिव शर्माला अटक झाली नाही. श्री.पी.टी.पाटील यांना पहिल्यांदा अटक करून ताबडतोब बडतर्फ केले पाहिजे. त्यांचे डोके फिरले आहे असे आयजी आणि एसपीचे मत असेल तर त्याला आज याक्षणी या मजल्यावर बडतर्फ केल्याशिवाय सभागृह पुढे जाऊ शकत नाही. आमची यासाठी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.वैभव नाईक यांना मारहाण झाली, तुम्ही निवेदन केले. सन्माननीय सदस्य श्री.वैभव नाईक यांचा निवेदनामध्ये साधा उल्लेख देखील करण्यात आलेला नाही. पक्ष कोणता आहे हे महत्त्वाचे नाही. परंतु विधानसभेच्या सदस्यांवर हल्ला होतो. सन्माननीय सदस्य श्री.नितेश राणे यांची नामुष्की करण्यात आली हे बरोबर नाही. सन्माननीय सदस्य श्री.वैभव नाईक यांच्यावर लाठीहल्ला झाला. मी परवा सिंधुदूर्गमध्ये होतो. कार्यकर्ते सांगत होते की, ते आमदार आहेत असे सांगत असतानाही एसपीने सन्माननीय सदस्य श्री.वैभव नाईक यांच्यावर लाठीचार्ज केला. विधानसभेचा सदस्य कोणत्यातरी मारामारी, तोडफोडीमध्ये गुंतलेला आहे, मग काहीतरी झाले तर मी समजू शकतो. पण ते सत्याग्रह करायला गेलेले होते. पत्रकारांना आपली बाजू समजावून सांगायला गेलेले आमदार यांना जर महाराष्ट्रात मारहाण होत असेल तर महाराष्ट्रात कोणीही सुरक्षित राहू शकणार नाही. माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस आणि भारतीय जनता पक्षाच्या राज्यात कोणीही सुरक्षित नाही अशी महाराष्ट्रातील सामान्य जनतेची समजूत झालेली आहे. म्हणून आमची मागणी आहे की, माननीय ससंदीय कार्य मंत्री याठिकाणी

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

आहेत. माननीय गृह राज्यमंत्री मागे बसलेले आहेत. एवढा मोठा गंभीर प्रश्न असताना राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये येऊन या चार घटनांच्या बाबतीतील सरकारची भूमिका सांगितली पाहिजे. त्याशिवाय सभागृह पुढे चालणार नाही. या चारही घटनांची बाजू प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर सभागृहामध्ये चर्चा व्हावी अशी आमची मागणी आहे.

श्री.ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 97 अन्वये स्थगन प्रस्ताव आणलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल यांच्यावर गेल्या शनिवारी हल्ला केलेला आहे. या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य यांच्यावर हल्ला केला असल्याने सभागृहापुढील कामकाज स्थगित करून यावर जर चर्चा करणार नसाल तर या सभागृहामध्ये दुसरे कोणते महत्वाचे काम असू शकते. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी ज्या 5-6 घटना याठिकाणी सांगितलेल्या आहेत त्याचा पुनरुच्चार मी करणार नाही. त्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत आणि मागणी केलेली आहे त्याला मी पाठिंबा देणार आहे.

अध्यक्ष महोदय, या निमित्ताने मी दुसरा प्रश्न उपस्थित करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल यांनी जी पत्रकार परिषद घेतली होती, ती कुठल्या कारणासाठी घेतली होती. या सभागृहाचे कामकाज एक महिन्यापासून चालू आहे. या सभागृहामध्ये त्यांनी केलेले कामकाज, सभागृहामध्ये पास झालेले कायदे हे जर त्यांच्या मतदारसंघात समजावून सांगत असतील आणि हल्ला होत असेल तर आपण स्वत: आणि सभागृह हे सहन करणार आहे काय? हा या सभागृहाचा अपमान न होता पोलीस तर कारवाई करतीलच, मी मागणी याठिकाणी केलेली आहे. त्याप्रमाणे पोलीसांनी तातडीने कारवाई केली पाहिजे. या सभागृहातील सन्माननीय सदस्याचा हक्क म्हणून त्यांनी केलेले कामकाजाबाबत त्यांच्या मतदारसंघात सांगत आहेत. या सभागृहामध्ये जे काही कायदे जनतेच्या हिताचे झालेले आहेत, ते मतदारसंघात सांगत असताना त्यांच्यावर हल्ला होत असेल तर हा या सभागृहाचा हक्कभंग झालेला आहे. याबाबत पोलीस कारवाई करतील, पण आपण अध्यक्ष म्हणून पोलिसांना ताबडतोब आदेश दिले पाहिजेत. या सभागृहापुढे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ग.आ.देशमुख .....

त्यांना हजर करुन सभागृहाने जी शिक्षा करायची ती केली पाहिजे अशा तऱ्हेची मागणी मी याठिकाणी करु इच्छितो. जर आपण हे केले नाही तर इतरांना आम्ही काय काम केले हे बोलता येणार नाही. आपण जर यावर कारवाई केली नाही तर अशातऱ्हेचा पायंडा पडेल की, या सभागृहातील सदस्य आणि आपण स्वतः या सभागृहाच्या कामकाजाची माहिती बाहेर दिली आणि त्याच्यावर जर कोणी हल्ला केला तर तो सभागृहाचा हक्कभंग होतो आहे. म्हणून सभागृहाने त्यांच्यावर कारवाई करावी अशातऱ्हेची मी याठिकाणी मागणी करतो. नियम 97 अन्वये जो स्थगन प्रस्ताव आणलेला आहे त्याला पाठिंबा देऊन यावर चर्चा घडवून आणावी अशी विनंती करतो.

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिली. माझी सभागृहाला विनंती आहे की, मी आपले म्हणणे ऐकून घेतलेले आहे. आपण सरकारचे म्हणणे ऐकून घेण्याचे सौजन्य दाखविले पाहिजे. आज सभागृहामध्ये विरोधी पक्षनेते आणि राष्ट्रवादीचे गटनेते, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.ग.आ.देशमुख..... (अडथळा.....)

अध्यक्ष : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. आधी मंत्री महोदयांचे म्हणणे ऐकून घ्या.

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.ग.आ.देशमुख यांनी ज्या भावना मांडल्या आणि प्रसंग सांगितले. यामध्ये या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल यांना जी मारहाण झाली त्याचे कोणीही समर्थन करणार नाही. ज्या पध्दतीने पोलिसांनी ही केस हाताळली. माजी आमदार श्री.चव्हाण असो, सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल असो याचे सरकार कधीही समर्थन करीत नाही. जर बोलूच द्यायचे नसेल तर काय करणार, याबाबत सरकार गंभीर आहे.

अध्यक्ष : मी अर्ध्या तासापासून विरोधी पक्षाचे म्हणणे ऐकून घेत आहे. आता सत्ताधारी पक्षाचे म्हणणे ऐकून घेऊ द्या.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकत्रित बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, मी सरकारच्या वतीने सांगतो हा झालेला प्रकार बरोबर नाही. शासनाने त्याची चौकशी केलेली आहे. एक तासाच्या आत या सर्व घटनांचे निवेदन शासनातर्फे केले जाईल. आपण कामकाज सुरु करावे.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, ही घडलेली घटना गंभीर आहे. या घटनेला 48 तास होऊन गेले आहेत. गोंदिया जिल्हयाचे सरकारी वकील हे गुंडांना संरक्षण देत नाहीत. माननीय पालकमंत्र्यांचे पत्र माझ्याकडे आहे. त्यांनी मागणी केल्यामुळे तेथे श्री.गुप्ता नावाच्या वकीलाला बदलले गेले. नंतर श्री.गणीखान नावाच्या गुंडाला जामीन मिळतो. 48 तास झाल्यानंतर तो गुन्हेगार मिळत नाही. मंत्र्यांनी त्याला बंगल्यात लपवून ठेवले असेल असे आम्ही म्हणायचे का ? महाराष्ट्राच्या सन्माननीय आमदाराला मारहाण केली आहे. तेव्हा हे सभागृह तहकूब करावे.

अध्यक्ष : मी सन्माननीय सदस्या श्रीमती दीपिका चव्हाण यांना बोलण्याची परवानगी दिली आहे. मंत्री महोदयांनी एक तासात निवेदन करतो असे सांगितले आहे.

श्रीमती दीपिका चव्हाण : अध्यक्ष महोदय, गुरुवार, दिनांक 8 एप्रिल, 2016 रोजी सटाणा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.पी.टी.पाटील हे रात्री 11.00 वाजण्याच्या सुमारास विजयराव वाघ यांच्या हॉटेल जवळ गेले. माजी नगराध्यक्ष श्री.विजयराव वाघ यांचे हॉटेल बंद होते. तरी सुध्दा श्री.पी.टी.पाटील यांनी सांगितले की, तुमचे हॉटेल बंद करा. माझे हॉटेल अगोदरच बंद आहे असे त्यांनी सांगितले. तरी सुध्दा श्री.पी.टी.पाटील यांनी त्याना शिवीगाळ करुन मारहाण केली. हे समजल्यानंतर माझे पती श्री.संजय चव्हाण तिथे गेले व त्यांनी समजवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या श्री.पी.टी.पाटीलांनी हे न ऐकता मारहाण केली. मारहाण केल्यानंतर हे सर्व पदाधिकारी पोलीस स्टेशन येथे फिर्याद करण्यासाठी गेले होते. श्री.पी.टी. पाटलांनी त्यांना एक तास बसवून ठेवले. आय.जी. आणि एस.पी. आणि तिथले देवळयाचे पोलीस अधिकारी यांना बोलावून त्यांना मारहाण केली. त्यांनी एकेकाला मध्ये घेऊन दरवाजा बंद करुन इतके भयंकर मारले की, मी सांगू

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दीपिका चव्हाण .....`

सुध्दा शकत नाही. ही लज्जास्पद गोष्ट आहे. श्री.पी.टी. पाटलांविषयी मी वारंवार केली होती. माझ्याकडे काही तक्रारी आल्या त्यानंतर मी त्यांच्या बदलीचे माननीय राज्यमंत्री श्री.राम शिंदे व माननीय मंत्री श्री.गिरीश महाजन यांच्याकडे वारंवार निवेदन दिले. तरी सुध्दा यांची बदली झाली नाही. त्यामुळे त्यांनी खार करुन हे सर्व रचले आहे. मला सांगायला सुध्दा लाच वाटते. माझ्या पतींना कधी मारहाण माहिती नाही. माझे सासुसारे रडले. ही दुर्देवी घटना आहे. मला पती सांगतात येथून पुढे तू राजकारण करु नकोस. माझे पती सुस्वभावी स्वभावाचे आहेत. त्यांच्यावर असा हल्ला होणे चूकीचे आहे.

अध्यक्ष : ताई तुमच्या भावना लक्षात आल्या आहेत.

श्री.जयंत पाटील : या घटना एवढया गंभीर आहेत की, सन्माननीय श्री.गिरीश बापट साहेब म्हणत असले तरी ही घटना आता झालेली नाही. काल परवा झालेली घटना आहे. तरी देखील मुख्यमंत्री महोदयांनी हजर राहून आमचे म्हणणे ऐकायला पाहिजे होते. ते ऐकले नाही. आता एक तासाने निर्णय घेतो म्हणतात. त्या गणेश पांडेच्या बाबतीत आम्हाला हाच अनुभव आला. त्यांनी दिलेला एक तास अजून संपलेला नाही. याला किती तरी दिवस झाले. मी आपला जास्त वेळ घेत नाही. जो पर्यंत या श्री.पी.टी. पाटलांना सस्पेंड करीत नाहीत. जो पर्यंत या शिव शर्माला अटक होत नाही, तो पर्यंत हया सर्व प्रश्नांची चर्चा करावी, नाहीतर त्यांच्यावर ताबडतोब कारवाई करण्याची घोषणा करावी. अन्यथा सभागृहाचे कामकाज चालने अवघड आहे. म्हणून माननीय श्री.गिरीश बापट साहेब कितीही सांगत असले तरी त्यांच्या हातामध्ये काही नाही. माननीय मुख्यमंत्र्यांचा निर्णय महत्वाचा आहे. त्यांनी सभागृहामध्ये येऊन ताबडतोब निर्णय घोषित करावा अन्यथा एवढा अवमान झाल्यावर, महाराष्ट्रात सन्माननीय आमदारांना मारहाण झाल्यावर, लोकप्रतिनिधींना मारहाण झाल्यावर हे सभागृह चालू शकत नाही. हा महाराष्ट्रातील विधानसभा सदस्यांचा अवमान आहे. म्हणून माननीय अध्यक्ष महोदय आपण ताबडतोब कारवाई करण्याचे आदेश द्यावेत.

.....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : एक तासामध्ये त्यांना निवेदन करायला सांगतो आहे. त्यांना निवेदन करायला एक तासाचा वेळ द्यावा. तो पर्यंत कामकाज सुरु करु.

श्री.गिरीश महाजन : अध्यक्ष महोदय, या घडलेल्या घटनांवर जी ॲक्शन घ्यायची आहे, त्याच्या कृतीसह राज्य सरकारतर्फे एक तासाच्या आत निवेदन केले जाईल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत वेलमध्ये उभे राहतात)

अध्यक्ष : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्याने मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 11 वाजून 36 मिनिटांनी 15 मिनिटांकरिता स्थगित झाली)

....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.योगेश सागर)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, (अडथळा)

तालिका सभाध्यक्ष : मी सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांना सांगू इच्छितो की, आपण प्रश्नोत्तरे सुरु करुया. शासनाकडून निवेदन केले जाणार आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत वेलमध्ये येतात)

सन्माननीय सदस्य श्री.अब्दूल सत्तार व श्रीमती दीपिका चव्हाण यांना माझी विनंती आहे की, आपण प्रश्नोत्तरे सुरु करुया. शासनाकडून उत्तर येणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.अस्लम शेख यांनी जागेवर बसावे, त्यांनी येथे अजिबात कागद फाडू नयेत. माझी विनंती आहे की, सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे. आपण प्रश्नोत्तरे सुरु करुया.

अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्याने मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांकरिता स्थागित करतो.

(सभागृहाची बैठक 11 वाजून 52 मिनिटांनी 20 मिनिटांकरिता स्थगित झाली)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सकाळपासून सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यापासून आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत. सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांना मारहाण झाल्यानंतरही सरकारमार्फत या संदर्भातील गंभीर दखल घेतली जात नाही.

अध्यक्ष : या संदर्भात तासाभरामध्ये शासन निवेदन करणार आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, लोणंदला मंत्रीमहोदयांची ज्यावेळी सभा झाली होती, त्यावेळी या सभेमध्ये व्यसन-व्यसनावरुन अशा प्रकारे गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला गेला होता, त्या कारणावरुन ताबडतोब तीन पोलिसांना निलंबित केले गेले होते. आता मात्र ज्येष्ठ आमदारांना मारहाण झाल्यानंतरही 48 तास झाले तरीही आरोपी फरार आहे. कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. जिल्हयाचे पोलीस अधीक्षक घरी झोपा काढत आहेत. याबाबत केवळ पक्षातून निलंबित करण्याबाबतची कारवाई करण्यात आलेली आहे. पक्षातील लोकांना गुन्हे करायला लावायचे आणि नंतर त्यांना निलंबित करावयाचे, ही एक नवीन फॅशन आता सुरु झालेली आहे. ही घटना घडल्यानंतरही सरकारने आतापर्यंत याबाबतचे निवेदन करायला काय हरकत आहे ? माननीय मुख्यमंत्री महोदयांचे याबाबतचे निवेदन येईपर्यंत सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी. सिंधुदूर्ग येथील घटना घडल्यानंतर शुक्रवारी त्याबाबत सोमवारी निवेदन करतो असे माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या माध्यमातून सांगण्यात आले होते. त्यानंतर आपण सरकारला दोन दिवसांमध्ये निवेदन करण्याबाबत निर्देश दिले होते. तरीही त्याबाबतचे निवेदन करण्यास शासनाला पंधरा दिवस लागले होते. आमदारांना मारहाण झाल्यानंतरही शासन काही घेणे देणे नसल्यासारखे गांभीर्य दाखवतच नसेल आणि कधीही निवेदन करु अशी वृत्ती दाखवित असेल तर ते योग्य नाही. या प्रकरणामध्ये आरोपी गुंड आहे. जिल्हयाचे पोलीस अधीक्षक झोपा काढत आहेत. जिल्हयाचे पालकमंत्री महोदय गुंडांना संरक्षण देत आहेत. ही घटना गंभीर आहे. याबाबतचे पुरावे आहेत. गुंडांना जामीन मिळावा म्हणून जिल्हयाच्या पालकमंत्र्यांनी सरकारी वकील बदलण्यात यावा, असे पत्र दिलेले आहे. त्यांच्या पत्रामुळे सरकारी वकील बदलला गेलेला आहे. यामुळे गुंडांना जामीन मिळालेला आहे. 2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : हे सर्व मुद्दे यापूर्वी मांडले गेलेले आहेत.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, ही घटना घडून गेल्यानंतर सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.ग.आ.देशमुख यांनी या संदर्भात हक्कभंग दाखल करण्याबाबतची मागणी केलेली आहे. या प्रकरणाशी संबंधित सर्वांना म्हणजे पोलीस अधीक्षक व इतरांना बोलाविण्यात यावे. माननीय मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन होईपर्यंत सभागृहाची बैठक तहकुब करावी.

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, यापूर्वी मी सभागृहामध्ये सांगितलेले आहे की, सरकारला या विषयाचे गांभीर्य खूप आहे. कृपया यामध्ये राजकारण करु नका. हा विषय सर्व आमदारांशी सहमत आहे. सरकारने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतलेली आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे या संदर्भातील सर्व माहिती आलेली आहे. कॅबिनेटची बैठक संपलेली आहे. सरकार एका तासाच्या आत सभागृहात कृती अहवालासह निवेदन करेल.

अध्यक्ष : सर्वप्रथम कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावीत.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, या सभागृहातील सन्माननीय सदस्यांना मारहाण झालेली आहे. हे प्रकरण गंभीर आहे. ...(अडथळा)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

अध्यक्ष : तुम्ही जागेवर बसलात तर संरक्ष्ज्ञण देईल ना ? मला असे वाटते की, सरकारने निवेदनाकरिता एक तास मागून घेतलेला आहे. त्यापैकी अर्धा तास झालेला आहे. अर्ध्या तासानंतर सरकारच्या माध्यमातून निवेदन येईल.

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, माझे बोलणे अद्यापहि पूर्ण झालेले नाही. तरीही आपण सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना बोलण्याची संधी देत आहात, माझी काही हरकत नाही. एका तासाच्या आत सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री येतील. सरकार यामध्ये कोणालाही पाठीशी घालणार नाही. कामकाज पुढे नेण्यात यावे. नियमाप्रमाणे काम चालू आहे. या घटनेसंदर्भात शासन कोणत्याही प्रकारचे राजकारण करणार नाही. सरकार कोणाचेही समर्थन करणार नाही.

परंतु काहीही ऐकून घ्यायचे नाही, ही भूमिका योग्य नाही. अनेक महत्त्वाचे विषय पूर्ण करावयाचे आहेत. सरकारचे या संदर्भातील निवेदन एक वाजता सभागृहात करण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

अध्यक्ष : आता कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील. 3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहातील सन्माननीय सदस्यांना मारहाण झालेली आहे, प्रकरण गंभीर आहे. यापूर्वी या संदर्भात एक तासाच्या आत सरकारने यासंबंधीचे निवेदन करण्यासंदर्भात मागणी केली असता कॅबिनेट चालू आहे, असे सांगण्यात आले होते. आता कॅबिनेट संपून अर्धा तास झालेला आहे. तरीही शासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतलेली नाही. सभागृहाचे कामकाज माननीय मुख्यमंत्री महोदयांनी याबाबतचे निवेदन करेपर्यंत तहकूब करण्यात यावी. याबाबत माननीय मुख्यमंत्री यांचे निवेदन आल्याशिवाय सभागृहाचे कामकाज पुढे जाणार नाही. या संदर्भात सकाळी 11.00 वाजता सांगण्यात आले होते, आता दुपारचे 12.30 वाजत आलेले आहेत.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन डायसवर जोरजारात थाप मारतात.)

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जामंत्री): अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई उद्वाहन (चौदावी सुधारणा) नियम,2015 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक उअनि,2015/प्र.क्र.6/ऊर्जा-5,दिनांकित 24 नोव्हेंबर,2015 सभागृहासमोर ठेवत आहे.

अध्यक्ष : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

प्रा.राम शिंदे (पणन राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने ***वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे सन २००४-२००५ ते २००८-२००९ या वर्षांचे वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल*** सभागृहासमोर ठेवतो. सदरहू अहवाल व लेखे विधानसभेच्या पटलावर ठेवण्यास झालेल्या विलंबाची कारणे सोबत जोडलेली आहेत.

अध्यक्ष : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

प्रा.राम शिंदे (पणन राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने ***वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचा सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ या वर्षांचा अनुक्रमे एकेचाळीसावा व बेचाळीसावा वार्षिक अहवाल*** सभागृहासमोर ठेवतो.

अध्यक्ष : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात.)

श्री. रवींद्र वायकर (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री): अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने ***संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ*** यांचा ***सन २००८-२००९ ते २०१३-२०१४ या*** वर्षांचा ***अनुक्रमे सव्वीसावा,*** सत्तावीसावा, अठ्ठावीसावा, एकोणतीसावा, तीसावा व ***एकतीसावा वार्षिक अहवाल*** सभागृहासमोर ठेवतो.

अध्यक्ष : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. रवींद्र वायकर : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने ***सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा दहावा वार्षिक अहवाल स***भागृहासमोर ठेवतो.

अध्यक्ष : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. रवींद्र वायकर : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने ***उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा चोवीसावा वार्षिक अहवाल स***भागृहासमोर ठेवतो.

अध्यक्ष : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. रवींद्र वायकर : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने ***कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा वार्षिक अहवाल स***भागृहासमोर ठेवतो.

अध्यक्ष : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. विजय देशमुख (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने ***महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल स***भागृहासमोर ठेवतो.

अध्यक्ष महोदय, सदरहू अहवाल विधानसभेच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विलंबाची कारणे सोबत जोडलेली आहेत.

अध्यक्ष : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

सभागृहात गोंधळसदृश परिस्थती असल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 22 मिनिटांनी 15 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.योगेश सागर)

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महाराज, माझी सभागृहाला विनंती आहे की, मघाशी जो विषय उपस्थित झाला त्यासंदर्भात मुख्यमंत्री महोदय निवेदन करणार आहेत. अधिवेशन सत्राचे दोन तीन दिवस राहिले आहेत. आता आपण सभागृहाच्या कामकाजपत्रिकेवरील लेअिंग व तद्नंतर विधेयके चर्चेल घेऊ.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊ घोषणा देत असतात.)

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी अशा पध्दतीने वागणे संयुक्तिक नाही. आपण संसदीय पध्दत पाळणार नसाल तर हे योग्य नाही. आपण सर्व सन्माननीय सदस्यांनी या सभागृहाचा मान ठेवला पाहिजे. आपल्या पक्षाच्या सन्माननीय नेत्यांनी आपली समजून काढली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील आपण सन्माननीय सदस्यांची समजूत काढावी. सन्माननीय सदस्य आपणही या आसनावर बसला होतात. आपण कृपया सन्माननीय सदस्यांची समजूत काढावी.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

तालिका सभाध्यक्ष : सभागृहाच्या कामकाजपत्रिकेवरील स्थगन प्रस्तावाच्या सूचना, औचित्याचे मुद्दे आणि लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येतील. आता आपण शासकीय विधेयक चर्चेला घेऊ.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक

L.A. BILL NO. XVIII OF 2016.

(A BILL FURTHER TO AMEND CERTAIN TAX LAWS IN OPERATION IN THE STATE OF MAHARASHTRA.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT SELECT COMMITTEE.

श्री.सुधीर मुनगंटीवार (वित्त मंत्री) : अध्यक्ष महाराज, सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 18 महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महाराज, मला या विधेयकामध्ये एक दुरुस्ती सूचवायची आहे. सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये मी टेरीटॉवेल्सवर 5.5 टक्के कर प्रस्तावित केला आहे. त्या अनुषंगाने मूल्यवर्धित कर कायद्याअंतर्गत अधिसूचना जारी करण्यात आली आहे व त्यानुसार दिनांक 1 एप्रिल 2016 पासून टेरीटॉवेल्सवर 5.5 टक्के कराची आकारणी सुरु झाली आहे.

टॅरीटॉवेल्सचे उत्पादन मुख्यत: सोलापूर परिक्षेत्रात असून, यंत्रमागधारक संघाने टेरीटॉवेल्सवर लागू झालेल्या कराने लघु यंत्रमागावर उत्पादित होणाऱ्या टेरीटॉवेल्सवरही कराची आकारणी होऊन त्या उद्योगावर विपरित परिणाम होण्याचे निवेदन दिले आहे व त्याचा रोजगारावरही परिणाम होणार आहे. या संदर्भामध्ये लोकप्रतिनिधी यांनी करमाफी देण्यात यावी असे निवेदन दिले आहे.

शासनाच्या लघुउद्योगांना प्रोत्साहन देण्याचे धोरणातंर्गत सोलापूर क्षेत्रातील रोजगारावर परिणाम होऊ नये यास्तव मी दिनांक 1 एप्रिल 2016 पासून टेरीटॉवेल्सवर लागलेल्या करास माफी देण्याचे प्रस्तावित करीत आहे, मात्र ज्या विक्रेत्याने दरम्यानच्या काळात कर गोळा केला असल्यास त्यांच्याकडून कराचा भरणा करुन घेतला जाईल.

प्रश्न प्रस्तूत झाला.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

यानंतर... I-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य डायसवर तर
काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

तालिका सभाध्यक्ष : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत माननीय विरोधी पक्ष नेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांचा प्रस्ताव आहे, त्यांनी तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

तालिका सभाध्यक्ष : आता मी विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभाध्यक्ष : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधयेक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 22 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 18 सुधारणेसहीत संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

तालिका सभाध्यक्ष : सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 18 संमत झाले आहे.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य डायसवर तर
काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

पृ.शी. : विवादीत थकबाकी तडजोड विधेयक

L.A. BILL NO. XIX OF 2016.

(A BILL TO PROVIDE FOR SETTLEMENT OF ARREARS IN DISPUTE UNDER VARIOUS ACTS ADMINISTERED BY THE SALES TAX DEPARTMENT AND THE MATTERS CONNECTED THERE WITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री. सुधीर मुनगंटीवार (वित्त मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 19 विक्रीकर विभागाकडून अंमलबजावणी केल्या जाणाऱ्या विभिन्न अधिनियमांखालील विवादातील थकबाकीची तडजोड करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभाध्यक्ष : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधयेक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 13 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 19 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

तालिका सभाध्यक्ष : सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 19 संमत झाले आहे.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य डायसवर तर
काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

पृ.शी. : दै. लोकमत या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली बातमी

मु.शी. : दै. लोकमत या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे निवेदन.

डॉ. दीपक सावंत (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य डायसवर तर
काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

तालिका सभाध्यक्ष : सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालेल. तुमच्या पध्दतीने सभागृहाचे कामकाज बिलकुल चालणार नाही, आपण जागेवर बसावे. अशापध्दतीने वागणे बरोबर नाही. आपण जागेवर बसावे. सर्वांना बोलण्याची संधी दिलेली आहे. आपण माझे म्हणणे ऐकावे. आम्हाला, तुम्हाला, सर्वांना या सार्वभौम सभागृहाला दिले आहे. सभागृहाचे कामकाज चालविण्याकरिता नियमावली तयार केलेली आहे. सभागृहाचे कामकाज तुमच्या निर्देशाप्रमाणे चालणार नाही. ... (अडथळा) ...

श्री. एकनाथराव खडसे : : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 20 महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, 1950 आणि महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो...(अडथळा) ...

तालिका सभाध्यक्ष : मी अजून बिल वाचलेले नाही. मी आपल्याला बोलण्याची संधी देतो, आपण आपल्या सन्माननीय सदस्यांना जागेवर बसण्यास सांगावे. सन्माननीय सदस्य जागेवर बसले तरच, बोलण्याची संधी मिळेल. अन्यथा मी बोलण्यास अनुमती देणार नाही. सन्माननीय सदस्य जागेवर बसले तरच आपणांस बोलण्याकरिता संधी मिळेल. सन्माननीय सदस्यांना जागेवर बसवावे. सन्माननीय सदस्य जागेवर बसल्याशिवाय कोणालाही बोलण्याची संधी मिळणार नाही. आपण आपल्या पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना जागेवर बसावावे. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव आपण जागेवर बसावे. आपण मंत्री होता, आपण माझ्याही पेक्षा वरिष्ठ आहात. आपण जागेवर बसून बोलावे. सन्माननीय सदस्यांनी कृपया जागेवर बसावे. मंत्री महोदयांनी मांडलेले बिल मी अजून वाचलेले नाही. मी त्याचा प्रस्ताव वाचतो. आपण माझे म्हणणे ऐकावे. बाकीच्या सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे. सन्माननीय सदस्य जागेवर बसल्याशिवाय मी बोलण्याकरिता बिलकुल अनुमती देणार नाही. अशा पध्दतीने सभागृहाचे कामकाज चालत नाही. सन्माननीय सदस्यांना जागेवर बसवावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला घटना दिली, त्या घटनेमध्ये नियमावली करण्याचा अधिकार आहे. नियमावली केली आहे, आपण नियमाप्रमाणे वागावे. सर्वांना संधी मिळेल. ... (अडथळा) ...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य डायसवर तर
काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, मी मघाशी सांगितले की, मुख्यमंत्री महोदय येऊन निवेदन करणार आहेत. माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांच्या समवेत बोलणे झाले होते. आज कामकाजपत्रिकेवर बिल तसेच लेईंग दाखविलेले आहे. आता माननीय

श्री. एकनाथराव खडसे यांनी बिल मांडलेले आहे. तसेच, सभागृहात निवेदन नक्की होणार आहे. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी अशाप्रकारे डायसवर जाऊन गोंधळ घालू नये. माननीय श्री. एकनाथराव खडसे यांनी बिल मांडलेले आहे. ते बोलण्याकरिता उभे आहेत, त्यांच्यानंतर इतरांना बोलण्याची संधी द्यावी. ... (अडथळा) ...

तालिका सभाध्यक्ष : बिल तरी मांडू द्यावे. आपली कशावर हरकत आहे ?

हरकतीचा मुद्दा

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे कामकाज नियमाने चालावे, अशी आमची अपेक्षा आहे. आपण आजच्या दिवसाची कामकाजपत्रिका पहावी, आज प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर, कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे, त्यानंतर स्थगन प्रस्तावाच्या सूचना, त्यानंतर औचित्याचे मुद्दे व त्यानंतर 5 लक्षवेधी सूचना दर्शविलेल्या आहेत. त्यानंतर आपण पूर:स्थापनार्थ 2 विधेयके दर्शविलेली आहेत. त्यानंतर विधेयक क्रमांक 18 दर्शविलेले आहे.

अध्यक्ष महोदय, त्या आधीचा कामकाजाचा सर्व सिक्वेन्स बाजूला ठेवून आपण अचानक विधेयक क्रमांक 18 चर्चेकरिता घेतले.

तालिका सभाध्यक्ष : आपण खाली बसावे आपल्या हरकतीच्या मुद्यावर मी सांगतो. आपण असे केल्यास आपल्या एकाच सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळेल.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा मांडण्याकरिता मी उभा आहे. आपण माझे म्हणणे पूर्ण होऊ द्यावे. आपण त्यांचे म्हणणे नंतर ऐकावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

मला बोलू द्यावे. अन्यथा आमच्याकडे बाहेर जावून उपोषण करण्याशिवाय दुसरा पर्याय रहाणार नाही. ऑर्डर ऑफ द डे प्रमाणे सभागृहाचे कामकाज चालले पाहीजे. ज्या वेळी माननीय वित्त मंत्री विधेयक क्रमांक 18 मांडत होते, त्यावेळी मी या ठिकाणी उभा होतो. मला हरकतीचा मुद्दा मांडायचा होता. सभागृहामध्ये प्रत्येक विधेयकावर चर्चा झाली पाहीजे. अशी आमची मागणी आहे.

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे कामकाज व्यवस्थित चालू होते. सरकारने वारंवार सांगितले की, आम्ही निवेदन करणार आहोत...(अडथळा)...आपल्याला काय करायचे ते मी ठरविणार नाही. सभागृहाचे कामकाज नियमाने चालू आहे. सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री आलेले आहेत. मी मघापासून सांगितले की, ते एक तासाच्या आत निवेदन करणार आहेत. तोपर्यंत आपले कामकाज चालू आहे. एक बील झाले आहे. सभागृहामध्ये प्रायॉरिटी घेता येते. मान्यता घेता येते. आपण सांगितले त्याप्रमाणे तशी प्रायॉरिटी दिली होती. आता माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये आलेले आहेत. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे हे ऑन लेग होते.

तालिका अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी पॉईंट ऑफ ऑर्डरवरील मांडलेल्या मुद्यावर माझे म्हणणे मांडतो. सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील मी माझे बोलून झाल्यावर आपल्याला संधी देतो. मी त्यांच्या हरकतीच्या मुद्यावर रुलींग देत आहे. माझे झाल्यावर आपल्याला बोलण्याची संधी देतो.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, आपण रुलींग दिल्यावर मला बोलता येणार नाही. कृपया आपण माझे म्हणणे ऐकावे व नंतर रुलींग द्यावे.

अध्यक्ष महोदय, सभागृह दोन वेळेस स्थगित झाल्यावर मी व विरोधी पक्षाचे सर्व नेते अध्यक्ष महोदयांच्या चेंबर मध्ये गेलो होतो. इतर सर्व विषयासंदर्भात चर्चा करीत असताना आम्ही आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये डिस्कशनमध्ये असलेले बील खाली दाखविले असून इतर बिले वर दाखविलेली असल्याचे अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणून दिले. बिलांवर चर्चा झाली पाहीजे, सर्व बाबींवर चर्चा झाली पाहीजे, ही सर्व विरोधी पक्षाची भावना आहे. कामकाज पत्रिकेत काही दाखविलेले असले तरी ज्या बिलावर चर्चा सुरु होती, तेच बील अगोदर चर्चेला घेऊ, असे माननीय अध्यक्षांनी मान्य केले होते. ही बिले सुरु झाल्यानंतर मी आता पुन्हा अध्यक्ष महोदयांना भेटून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

आलो. मी पुन्हा त्यांच्या लक्षात आणून दिले. आपण तालिका अध्यक्ष आहात. यासंदर्भात माननीय अध्यक्षांची काय भावना आहे, ती समजून घ्यावी. कामकाज उरकून घ्यावे, असे जर अध्यक्ष महोदयांनी सांगितले असेल तर आमचे काही म्हणणे नाही. परंतु विद्यापीठासारखे महत्त्वाचे बील आहे, बाकीचीही महत्वाची बिले आहेत आणि दोन, तीन महत्त्वाच्या चर्चा आहेत. त्यामुळे एवढी असहिष्णूता, अख्ख एंटायर ऑपोजिशन बाहेर असताना, आपण या पद्धतीने सभागृहाचे कामकाज पुढे घेऊन जाणे बरोबर नाही.

तालिका सभाध्यक्ष : मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, 18 आणि 19 नंबरचे बील विधानपरिषद सभागृहाकडे पाठवायची आहेत. ही कर विषयक, आर्थिक बाबीसंदर्भातील महत्त्वाची बीले आहेत. त्यामुळे ती वरच्या सभागृहात गेली पाहीजे. लक्षवेधी सूचना, औचित्त्याचे मुद्दे आणि स्थगन प्रस्तावाच्या सूचना पुढे सरकवून बिलांना प्राथमिकता देण्यात यावी, अशा माननीय अध्यक्षांच्या सूचना होत्या. त्याप्रमाणे करण्यात आलेले आहे. त्यामुळे आपले गटनेते श्री. जयंत पाटील यांनी जी हरकत मांडली होती, त्या हरकतीला देखील हेच उत्तर आहे. त्यामुळे मी लक्षवेधी सूचना, औचित्त्याचे मुद्दे आणि स्थगन प्रस्ताव नंतर घेण्यात येणार आहे, त्यापूर्वी बिलास प्राथमिकता द्यावी, असे सांगून माननीय वित्त व नियोजन मंत्री महोयांना संधी दिली. त्यामुळे हा विषय रहात नाही. आता पुढील सर्व बिलावर चर्चा होणार आहे.

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, माननीय अध्यक्षांच्या दालनात बैठक झाली तेव्हा सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांसह सर्व जण उपस्थित होते. विधानपरिषद सभागृहामध्ये काही बिले पाठवायची असल्यामुळे आपण त्यामध्ये प्रायॉरिटीने बदल केला. कामकाज चालू आहे. माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये आलेले आहेत. मी मघापासून सांगत होतो की, माननीय मुख्यमंत्री एका तासामध्ये निवेदन करणार आहेत. सरकार सर्व चर्चेला आणि आपण निर्माण केलेल्या प्रश्नांना उत्तर देण्यास समर्थ आहे. आता माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे ऑन लेग आहेत. त्यांचे बील मांडून झाल्यावर माननीय मुख्यमंत्री निवेदन करतील आणि आपले कामकाज व्यवस्थित चालू राहील. माझी विनंती आहे की, आपण अशा पद्धतीचे टेक्निकल मुद्दे केले तर कसे होईल. मधल्या एका तासाच्या काळामध्ये कामकाज लेईंग करण्याचे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मान्य केले

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश बापट.....

होते. आपला गोंधळ चालू होता, त्याबद्दल आम्हाला काही बोलायचे नाही. परंतु सभागृहात ठरलेले कामकाज नियमाने व्हायला पाहीजे. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे ऑन लेग आहेत. त्यांचे झाल्यावर माननीय मुख्यमंत्री निवेदन करतील व त्यानंतर इतर सन्माननीय सदस्यांना संधी द्यावी, अशी माझी विनंती आहे...(गोंधळ)...

तालिका अध्यक्ष : सभागृहामध्ये मुख्यमंत्री महोदय आलेले आहेत. ते उत्तर देणार आहेत. कृपया आपण शांत बसावे.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी.: कुळवहिवाट व शेतजमीन, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन आणि महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) (दुसरी सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XX OF 2016

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, THE HYDERABAD TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, 1950 AND THE MAHARASHTRA TENANCY AND AGRICULTURAL LANDS (VIDARBHA REGION) ACT.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT SELECT COMMITTEE.

तालिका सभाध्यक्ष : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत माननीय विरोधी पक्ष नेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांचा प्रस्ताव आहे, त्यांनी तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय विरोधी पक्षनेते आपल्याला बिलावर बोलायचे आहे काय. अगोदर बील मांडण्यात यावे.

तालिका सभाध्यक्ष : आता मी विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभाध्यक्ष : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधयेक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 8 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 20 सुधारणेसहीत संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

तालिका सभाध्यक्ष : सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 20 संमत झाले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, विधेयक संमत झाल्यावर आम्हाला बोलायला देत आहात, आता आम्ही बिलावर काय बोलणार.

अध्यक्ष महोदय, आम्ही शांत बसलो आहे. आम्हाला बिलावर बोलायचे असताना आपण ते संमत केले. कोणत्या नियमाने कामकाज चालू आहे. आम्ही सकाळपासून मागणी करीत होतो. माननीय मुख्यमंत्री निवेदन करणार होते. माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन होईपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित ठेवावे, अशी आम्ही विनंती केली होती. ही घटना गंभीर आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. गणपतराव देशमुख यांनी सांगितले की, आपण यासंदर्भात हक्कभंग दाखल केला पाहीजे. आपण याबद्दलही रुलिंग दिले नाही. आपण त्यानंतर गोंधळामध्ये बिले मांडण्यास सुरुवात केली. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी व मी बिलावर बोलायचे असल्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांना जागेवर बसण्याची विनंती केली.

...K/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

अशा वेळी आम्ही सर्वांना खाली बोलाविले होते. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील म्हणाले की, "आम्हाला बोलू देणार नसाल तर आम्ही बाहेर जातो". त्यावर ज्यांच्यावर सभागृह चालविण्याची जबाबदारी आहे ते संसदीय कार्य मंत्री महोदय म्हणतात की, "खुशाल बाहेर जा." त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील उपोषणाला बसले आहेत. माझी सभागृहाच्या नेत्यांना विनंती आहे की, संसदीय कामकाज मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना सभागृहात येण्याची विनंती करावी. या सदनाचे कामकाज अशा पध्दतीने चालणे बरोबर नाही. सदरहू विधेयक विधानपरिषदेमध्ये चर्चेसाठी जाणार आहे याबाबत माननीय अर्थ मंत्री यांनी विनंती केली त्यानुसार कामकाज झाले. परंतु त्यानंतर सदनाचे कामकाम रेटण्याचा प्रयत्न केला गेला आहे हे बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांवर हल्ल्याची गंभीर घटना घडली, आम्ही सकाळपासून सांगण्याचा प्रयत्न केला होता. त्याबाबत मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन येण्याची आम्ही अपेक्षा करीत होतो. मुख्यमंत्री महोदयांनी स्वत: आमदार महोदयांच्या तब्बेतीची चौकशी केली आहे. परंतु कालपर्यंत गोंदिया जिल्ह्याचे पालक मंत्री दुरध्वनीवरुनही सन्माननीय सदस्य श्री.अग्रवाल यांचेशी बोलले नाही. याचा अर्थ आम्ही काय समजावा ? सरकारने लक्ष घातल्यानंतरही आरोपी मिळत नाही, तो फरार आहे, अशा वेळी संरक्षण कोणाकडे मागावयाचे, हा प्रश्न निर्माण होतो. आमची अपेक्षा होती की, मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन झाल्यानंतर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात येत आहे याची सदनाला वस्तुस्थिती समजेल. अशा घाईगर्दीमध्ये शासकीय विधेयकाचे कामकाज घेण्यात आले. आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे, स्थगन प्रस्तावाच्या सूचना, लक्षवेधी, शासकीय विधेयके अशा प्रकारे कामकाज दर्शविण्यात आले आहे.

अध्यक्ष : याबाबत मी आपणास सांगतो.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विविदीत थकबाकी विधेयक व महाराष्ट्र कुळवहिवाट विधेयक गोंधळामध्ये सदनामध्ये मांडण्यात आले आहे. सरकारला गोंधळामध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

विधेयक मंजूर करण्याची एवढी कसली घाई होती. आम्हाला सदरहू विधेयकावर बोलावयचे होते, परंतु आपण ते संमत केले. आता आम्ही त्या विधेयकार कशी चर्चा करणार, याबाबत अध्यक्ष महोदयांनी रुलींग द्यावे, अशी माझी विनंती आहे. सदरहू विधेयक मागे घेऊन त्यावर चर्चा करण्यात यावी, अशी आमची मागणी आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभागृहाचे ज्येष्ठ नेते सन्माननीय सदस्य व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गट नेते श्री.जयंत पाटील हे सदनामधून नाराज होऊन निघून गेले आहेत. ते आमचे मित्र आहेत, ते मला रोज समजावतात की, अलिकडील काळात तुम्ही रोज रागाने बोलता, शांतपणे बोला, रागवणे योग्य नाही व त्यांचा सल्ला आम्ही ऐकतो. परंतु आज सदनामधील परिस्थितीमुळे ते रागावून सदनातून निघून गेले व त्यांनी सांगितले की, मी उपोषणाला जाऊन बसतो. सभागृहाच्या माध्यमातून मी त्यांना आवाहन करतो की, सभागृहात कधी कधी अशी परिस्थिती निर्माण होते अशा वेळी आपण रागाने निर्णय घेतो. परंतु ज्येष्ठ सदस्यांनी अशा प्रकारे निर्णय घेऊन चालणार नाही. हे सभागृह आपल्या सर्वांना घेऊन आम्हाला चालवावयाचे आहे. स्वतः संसदीय कार्य मंत्री महोदय जाऊन सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना सभागृहात येण्यासंदर्भात विनंती करतील व त्यांना सन्मानाने सभागृहात घेऊन येतील.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : श्री.गोपालदास अग्रवाल, माननीय विधानसभा सदस्य यांना झालेली मारहाण

मु. शी. : "श्री.गोपालदास अग्रवाल, माननीय विधानसभा सदस्य यांना झालेली मारहाण " या विषयावर सर्वश्री राधाकृषण विखे-पाटील, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, श्रीमती दिपीका चव्हाण यांनी दिलेली स्थगन प्रस्तावाची सूचना.

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय सर्वश्री राधाकृषण विखे-पाटील, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, श्रीमती दिपीका चव्हाण यांनी "श्री.गोपालदास अग्रवाल, माननीय विधानसभा सदस्य यांना झालेली मारहाण" या विषयावर जी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती, त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मी पुढील निवेदन करीत आहे :-

(**प्रेस** : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सदरहू घटना घडल्यानंतर मी स्वतः सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल यांचेशी दुरध्वनीवरुन संपर्क करुन बोललो आहे. पालक मंत्र्यांच्या संदर्भात सदनामध्ये मुद्या उपस्थित करण्यात आला होता परंतु त्यावेळी नागपूर येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने एक कार्यक्रम सुरु होता तेथे गोंदिया जिल्ह्याचे पालक मंत्री हजर होते. मी स्वतः सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल यांचेशी बोललो आहे. सदर घटनेचा आपण निषेधही केला आहे. मी सभागृहाच्या माध्यमातून सांगतो की, सदरहू प्रकरणी दोषींवर शक्य असेल तेवढी जास्तीत जास्त कडक कारवाई करण्यात येईल.

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : सटाणा जिल्हा नाशिक येथील एका माजी नगराध्यक्ष श्री.विजय वाघ यांना झालेली मारहाण

मु. शी. : "सटाणा जिल्हा नाशिक येथील एका माजी नगराध्यक्ष श्री.विजय वाघ यांना झालेली मारहाण" या विषयावर सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, श्रीमती दिपीका चव्हाण यांनी दिलेली स्थगन प्रस्तावाची सूचना.

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, श्रीमती दिपीका चव्हाण यांनी "सटाणा जिल्हा नाशिक येथील एका माजी नगराध्यक्ष श्री.विजय वाघ यांना झालेली मारहाण" या विषयावर जी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती, त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मी पुढील निवेदन करीत आहे :-

(**प्रेस** : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, या प्रकरणी माजी नगराध्यक्ष श्री.विजय वाघ यांचेकडून घडलेला प्रकार चुकीचा होता. परंतु त्यानंतर झालेल्या पोलीस कारवाईमध्ये पोलीस निरीक्षक श्री.पी.डी.पाटील यांची वागणूक योग्य नव्हती. सदरहू प्रकरणी पोलीस निरीक्षक श्री.पी.डी.पाटील यांनी एक्सेसिव्ह बळाचा वापर केला.

यानंतर L-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

फार मोठ्या प्रमाणात म्हणजे जी कार्यवाही करायला पाहिजे त्यापेक्षा अधिक जाऊन त्या ठिकाणी लाठीचार्ज केला आहे. ते योग्य नाही. म्हणून त्यांना निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अध्यक्ष महोदय, श्री. मनोहर डोंगरे, सोलापूर यांच्यावर झालेल्या हल्ल्यासंदर्भात आज दिनांक 11 एप्रिल 2016 रोजी सकाळी 9.30 ते 10.00 वाजताच्या सुमारास मौजे शेटफळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे श्री. मनोहर डोंगरे हे त्यांच्या अंदाजे 3-4 सहकाऱ्यांसमवेत गावातील सिध्देश्वर मंदिराजवळून जात असताना श्री. भांगे व अन्य अंदाजे 6-7 आरोपींनी तलवार व काठ्यांनी हल्ला करुन श्री. मनोहर डोंगरे यांना जखमी केले. श्री. मनोहर डोंगरे यांचेवर अश्विनी हॉस्पिटल, सोलापूर येथे औषधोपचार सुरू आहेत.

सन 2015 मध्ये गु.र.नं.127/2015 कलम 307 भा.दं.वि.नुसार श्री. मनोहर डोंगरे यांचे मुलाविरुध्द गुन्हा दाखल असून त्यामध्ये श्री. भांगे यांचा मुलगा जखमी झालेला आहे. नमूद गुन्ह्यामध्ये दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आलेले आहे. सदर घटनेबाबत फिर्याद घेऊन गुन्हा दाखल करण्याचे व आरोपींना अटक करण्याची कार्यवाही सुरू आहे.

अध्यक्ष : मघाशी येथे असे सांगितले होते की, सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील आणि माझे बोलणे झाले होते की, दिनदर्शिकेप्रमाणे कामकाज व्हावे. हे खरे होते की, त्यांनी मला निदर्शनास आणून दिले होते की, कंत्राटी कामगारांचे जे बिल आहे त्यावर सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव बोलत आहेत त्यांना बोलण्याची संधी दिली पाहिजे. मी त्यांना म्हणालो होतो की, हरकत नाही. पहिले विषय संपले की, आपण त्यांना स्वाभाविकपणे बोलण्याची संधी देऊ. मागे पुढे करण्याचा अधिकार पिठासीन अधिकारी यांना आहे. त्यामुळे लक्षवेधी सूचना झाल्या असत्या, लेईंग झाले असते किंवा हे पुनःस्थापर्थचे बिलही झाले असते तर कदाचित पिठासीन अधिकारी यांनी त्यांना बोलायलाही दिले असते. पण काही विधेयके ही वरच्या सभागृहात जाण्याची आवश्यकता असल्यामुळे एखादे बिल मागे घेण्यास कुठल्याही प्रकारची हरकत नाही. अनेकवेळा आपण घेतो. तो पिठासीन अधिकारी यांचा अधिकार देखील आहे. त्यामध्ये वेगळे काही नाही. परंतु आधीचे कामकाज जर सरळ झाले असते तर ते बिलही आपण सुरू केले असते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील हे त्यांच्या थोडे मनाविरुध्द झाल्यामुळे सभात्याग करुन उपोषणाला बसले होते. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांची काळजी आहे या सभागृहाला आहे आणि या महाराष्ट्रालाही आहे की, आपण उपोषण वगैरे करु नये आणि सभागृहातील चर्चेमध्ये आपण सहभागी व्हावे. त्यांचे मन मोठे आहेच. पण मी त्यांना बोलताना विनंती केली की, मोठे मन करुन आपण सभागृहात उपस्थित रहावे असे माननीय मुख्यमंत्र्यांचे म्हणणे आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना काही म्हणायचे आहे त्याबद्दल योग्य मार्गाने म्हणणे मांडायची संधी उपलब्ध करुन द्यावी अशी माझी विनंती आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, मी आपल्याला नम्रतापूर्वक एवढेच सांगू इच्छितो की, आपण जो घटनाक्रम सांगितला, तो बरोबर आहे. परंतु आपण ज्यावेळी कामकाजात बदल करीत असतो म्हणजे एखादा आयटेम वरती घेऊन प्राधान्याने चर्चेला घ्यायचा असतो त्यावेळी साधारणपणे सभागृहाचा सेन्स विचारात घेण्याची पध्दत आहे. त्यावेळी जे पिठासीन अधिकारी होते त्यांनी सभागृहाचा सेन्स घेऊन सभागृहाला विश्वासात घेतले असते की, हे अर्थ विषयक विधेयक आहे, याला विधान परिषदेत मंजूर व्हावे लागेल आणि म्हणून याला आपण प्राधान्याने घेत आहोत तर मला वाटते त्याला कोणी हरकत सुध्दा घेतली नसती. एवढेच मला रेकॉर्डवर आणायचे होते आणि या पुढच्या काळामध्ये अशी पध्दत वापरली तर....

अध्यक्ष : विश्वासात घेण्याजागे वातावरणही लागते.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, असे वातावरण होते.

अध्यक्ष : तसे वातावरण नसल्यामुळे ते काय करणार. आता या प्रकरणावर आपण पडदा टाकू या.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी जे निवेदन केले आहे त्या संदर्भात हे जे प्रकार वारंवार घडत आहेत आणि लोकप्रतिनिधींना ज्या पध्दतीने मारण्याचा प्रयत्न होत आहे त्यास अनुसरुन मला एक विनंती करावयाची आहे. जर सरकारी कर्मचाऱ्याला मारहाण झाली तर आपण ताबडतोब सर्व कामकाज बंद करुन 553 कलम दाखल करतो. नॉन बेलेबल ऑफेन्स दाखल करतो. अशा प्रकारचे कोणते संरक्षण आपल्या आमदारांना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....

आहे. मला असे वाटते की, यासंबंधी ॲक्टमध्ये तरतूद करण्याची गरज आहे. लोकप्रतिनिधींना सुध्दा संरक्षण दिले पाहिजे, ही आमची मागणी आहे. यासंबंधी आपल्याला आयपीसीमध्ये काही दुरुस्ती करावी लागेल. पण तशा पध्दतीचे संरक्षण लोकप्रतिनिधींना देण्याची आवश्यकता आहे ही या ठिकाणी मागणी आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या ठिकाणी जो मुद्दा मांडला आहे त्यासंबंधी गटनेत्यांची बैठक बोलावून त्यावर काय तोडगा काढता येईल किंवा काय तरतुदी करता येतील यावर निश्चित चर्चा केली जाईल.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे कामकाज नियमाने चालावे अशी आम्हा सर्वांची इच्छा आहे. सभागृहामध्ये प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर आपण 12 वाजून 10 मिनिटांपर्यंत सभागृह स्थगित केले. त्यानंतर आपल्याला पुन्हा सभागृहात एकदा येऊन सभागृह स्थगित करावे लागले. त्यानंतर पिठासीन अधिकारी आले आणि कामकाज सुरू झाले त्यावेळी अचानकपणाने आपल्या समोरील सर्व कामकाज बाजूला ठेऊन पिठासीन अधिकाऱ्यांनी विधेयक क्रमांक 18 महाराष्ट्र कर विषयक कायदे हे विधेयक घेण्यास सुरूवात केली. त्यावेळी सभागृहात आमच्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आता ज्या विषयाचे निवेदन करण्यात आले त्याचा आग्रह धरण्यासाठी पुढे आले होते. त्यातील बहूतेक सर्व सदस्य मागे गेले होते. मी इथेच उभे राहून सर्वांना मागे घालविले. मी हात वर करुन मला बोलण्याची संधी द्या अशी मागणी करीत असताना त्यावेळच्या पिठासीन अधिकाऱ्यांनी बिल वाचून काढले आणि मंत्री महोदयांनी त्यास उद्देशून जे आवश्यक होते ते बोलले. मी सतत वर हात करुन हरकतीचा मुद्दा घेऊन बोलण्याचा प्रयत्न करीत होतो. माझी इच्छा अशी होती की, एक तर ऑर्डर ऑफ द डे सोडून आपण अचानकपणे 18 क्रमांकाच्या बिलावर गेलात. प्रत्येक सदस्याला या ठिकाणी अभ्यास करुन बोलण्याची संधी असते. त्यांना माहिती असते की, एक तासाने, पाऊण तासाने किंवा किमान हा सिक्वेंस झाल्यानंतर ते बिल येणार आहे. त्यामुळे सदस्य अभ्यास करुन येऊ शकतात. हे सर्व बाजूला ठेऊन 18 क्रमांकाचे बिल केले. त्यासंबंधी ताबडतोब चर्चेलाही आमची तयारी होती. काही अडचण नाही. हे विधेयक वरच्या सभागृहात जाणार आहे हेही आम्हाला माहिती होते आणि म्हणून त्याबद्दलही दुमत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील....

सिक्वेंस सोडून 18 नंबर आल्यानंतर किमान जसे मंत्री महोदयांचे ऐकून घेतले तसे मी माझ्या जागेवर उभे राहून मी सर्व सन्माननीय सदस्यांना मागे जाण्याची विनंती केल्यानंतर सर्व सभासद मागे गेलेले असताना पिठासीन अधिकाऱ्यांनी मला बोलण्याची संधी देणे आवश्यक होते. या विषयीचे माझे जे मुद्दे होते ते ठेवल्यानंतर त्याला मंत्री महोदयांनी उत्तर दिले असते तर काही अडचण आली नसती. यामध्ये आम्हाला दिवस लांबवावयाचा होता आणि दिवस लांबवावयाचा होता किंवा चर्चा जास्त मोठी करावयाची होती असा माझा आणि आमच्या कुणाचाही उद्देश नव्हता. मला हे माहिती आहे आणि जाणीव आहे की, अशा प्रकारचे विधेयक हे वेळेत जाण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे त्यासाठी अडथळा निर्माण करणे अशी आमची कोणाचीही भूमिका नव्हती. आपण मघाशी सभागृहात गोंधळ होता आणि वातावरण नव्हते असे जे म्हटले त्या संदर्भात सर्व सदस्य मागे गेलेले असताना पहिले बिल पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या बिलाला सुरूवात करुन त्यांनाही बोलायला लावणे एवढा अन्याय सभागृहाच्या कामकाजात होत असेल तर आपण सिक्वेंन्सप्रमाणे नाही. माझी विनंती अशी आहे की, पण ज्या विधेयकावर ते ओपन केल्यावर बोलण्याची संधी आम्हाला मिळायला पाहिजे. मी जागेवर उभा आहे. मंत्री महोदयांनी गोंधळामध्ये जे काही वाचले, त्याच गोंधळात माझे म्हणणे ऐकून घ्यायला हरकत नव्हती. दुसरे कोणी बोलण्याच्या मनःस्थितीत नसते तरी मी तरी बोलण्याच्या मनःस्थितीत होतो. सभागृहामध्ये या बाजूच्या काही सदस्यांची आग्रही मागणी ठेवायला पुढे आले नसते तरी मी पुढे यायला तयार होतो. माझे म्हणणे ऐकून घेतल्यावर विधेयकावर मतदान होऊन एकमताने किंवा बहुमताने त्या विधेयकाची प्रोसेस पूर्ण झाली असती.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

अध्यक्ष महोदय, आपण जो महत्वाचा मुद्दा सांगितला आहे तो म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे हे आमचे सदस्य लेगवर उभे होते, ते विधेयक आधी घ्यायला हवे होते. आज तर आपण सिकवेन्सच वेगळा दाखविला आहे. खरे म्हणजे आधी पहिले विधेयक यायला हवे होते. ते विधेयक न घेता आपण कर विषयक विधेयक घेतले. मी आज सभागृहामध्ये 27 वर्षे आहे. मला आज वाईट वाटते की एवढ्या वर्षात कधीही वर जाऊन सन्माननीय पीठासीन अधिकाऱ्यांशी हुज्जत घातलेली नाही. हा माझ्या आयुष्यातील पहिलाच प्रसंग आहे. विनोदाने घेऊ नका हे मी गांभीयाने बोलत आहे. पीठासीन अधिकाऱ्यांनी मला सांगितले तुम्ही जागेवर जा मी तुम्हाला बोलायची संधी देतो. मी त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून याठिकाणी बोलायला येऊन उभा राहिलो. तरी सुध्दा त्यांनी समोरच्या बाजूला बोलायची संधी दिली. एवढी हातचलाखी आणि एखादे विधेयक मंजूर करण्यासाठी सत्तारूढ पक्षाकडून प्रयत्न करण्याची काही गरज नाही, तुमची संख्या जास्त आहे. मी कधीही वर गेलेलो नव्हतो, सन्माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी मी तुम्हाला बोलण्यास परवानगी देतो असे जोरजोरात संगितल्यावर मी खाली आलो. बोलण्यासाठी संधी घ्यायचा प्रयत्न केला तरी मुख्यमंत्री महोदय मला पीठासीन अधिकाऱ्यांनी बोलण्याची संधी दिली नाही. त्यांचा संधी न देता विधेयक पूर्ण करण्याचा प्रयत्न आम्ही सतत या बाजूने बोलत होतो.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय श्री.दिवाकर रावते चेष्टा करु नका. आज मी आहे, उद्या दुसरे कुणीतरी असेल. मी एवढे वर्ष सदस्य असताना आज पीठासीन अधिकाऱ्यांसमोर येण्याचा पहिलाच प्रसंग असल्याने मनाला क्लेश होतो आहे. या सभागृहामध्ये जी भूमिका आपण हक्काने मांडू शकतो, जे मुद्दे मांडू शकतो. ते मुद्दे मांडण्याची बंदी जर कोणी या सभागृहामध्ये करीत असेल तर याची आपण नोंद घेतली पाहिजे. आम्ही विरोध करण्यासाठी नाही तर विधेयक क्रमांक 18 हे पळपुटेपणाने मंजूर केलेले आहे. त्यामुळे सदर विधेयक पुन्हा सादर करा, आम्ही जास्त वेळ घेणार नाही. पण अशी पध्दत बरोबर नाही. दोन्ही बाजूचे काही जण सभागृहामध्ये गोंधळ करीत असतील. पण जो सदस्य विधेयकावर बोलण्याची इच्छा व्यक्त करतो. अचानक विधेयक घेतल्यानंतर सुध्दा त्याला किमान बोलण्याची संधी तरी दिली पाहिजे. लोकशाहीवरील लोकांचा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

11-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) M-2

SSK/ AKN/ MMP/ 13:20

श्री.जयंत पाटील.....

विश्वास उडेल. सभागृहामध्ये लोकांचे तोंड दाबण्याचे काम जर अप्रत्यक्षपणे करायला लागलो तर हा सभासदांवर अन्याय आहे. मी या चिडीने पीठासीन अधिकाऱ्यांच्या जवळ गेलो.

अध्यक्ष महोदय, मी येथे बोलायला लागल्यावर पीठासीन अधिकाऱ्यांनी माझा माईक बंद केला. कदाचित त्यांना दिलेली जबाबदारी ते पार पाडत असतील, त्याला माझे काही म्हणणे नाही. माझे त्यांच्यावर आरोप नाही आणि आपल्यावरही आरोप नाहीत. परंतु विधेयकावर सदस्यांना आपले म्हणणे मांडू द्यायला मंत्री महोदयांना आनंद असायला पाहिजे की, आपल्या विधेयकावर कोणीतरी बोलत आहे. आपण थांबून सांगायला पाहिजे की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील बोला किंवा कोणी सदस्य बोला. तुमचे म्हणणे मांडा मग मी हे विधेयक मताला टाकतो. तशी संवेदनशिलता माननीय मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांच्याकडून मला दिसली नाही. आपण खाली बघून वाचायला जे लागलात, एवढ्या जोरात वाचायला लागला. माननीय मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार आता बाजू मांडायची आवश्यकता नाही. आता माननीय अध्यक्ष निकाल देतील. आपण वर न बघता सतत आपली भूमिका मांडत राहिलात आणि विधेयक मंजूर करून घेतले. माझी एवढीच विनंती आहे की, असा प्रकार पुन्हा होणार नाही याची दखल घ्यावी. माझी कळकळीची विनंती आहे की, विधेयक क्रमांक 18 हे फार महत्वाचे विधेयक नसले तरी ते फार अवघड, क्लीष्ट आणि आम्ही फार तासनतास या विधेयकावर बोलणार आहोत असे नाही. म्हणून सन्माननीय सभागृहाने याबाबत विचार करावा. ऑर्डर ऑफ डे बदलायची असेल तरी पीठासीन अधिकाऱ्यांना सभागृहाची संमती घ्यावी लागते. ऑर्डर ऑफ डे न बदलता एकदम लक्षवेधी सूचना सोडून खालचे विधेयक घेतले जाते. हा सर्व प्रकार समर्थनीय नाही आणि या गोष्टीचे समर्थन होऊ शकत नाही. म्हणून माझी विनंती आहे की, विधेयक क्रमांक 18 सरकारने पुन्हा मांडावे. मान्यता देण्यास आमची तशी तक्रार नाही. असे चुकीच्या पध्दतीने नियम डावलून सभागृहाचे कामकाज चालू राहिले तर या सभागृहामध्ये कायमचा गोंधळ होईल असे मला वाटते.

अध्यक्ष : एखाद्या सदस्याने विधेयकावर बोलण्याची इच्छा व्यक्त केली तर आपण त्याला बोलायला देतो. पीठासीन अधिकाऱ्यांनी आपल्याला बोलू द्यायचे मान्य केले होते तर तुमची मागणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

बरोबर होती. तुम्हाला बोलू द्यायला हवे होते. परंतु आता बील पास झालेले आहे. त्यामुळे ते मागे येणार नाही. म्हणून आपण आजचे दिवसभराचे कामकाज सुरु करु या. 3

11-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) M-3

SSK/ AKN/ MMP/ 13:20

श्री.गिरीष महाजन (जलसंपदा मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन 2013-2014 या कालावधीच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

अध्यक्ष : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. / मु.शी. : स्थगन प्रस्तावाच्या सूचना

अध्यक्ष : आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : औचित्याचे मुद्दे थोडे पुढे ढकलीत आहे. आता लक्षवेधी सूचना सुरु करु या.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझी पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. मला फक्त एवढेच माहिती करुन घ्यायचे आहे. कारण मलाही बाकीच्या विधेयकांवर बोलायचे आहे. आजच्या दिवसभरातील कामकाजाचा क्रम कसा असेल ते आपण जाहीर केले तर बरे होईल.

अध्यक्ष : आता लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. त्यानंतर प्रस्ताव आणि त्यानंतर विधेयक घेण्यात येईल.

श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, आज महात्मा फुलेंची जयंती असताना मीरा-भाईंदर महापालिकेच्या एका नगरसेविकेने महात्मा फुलेंच्या नावाची पाटी बाजूला सारुन आपल्या सासऱ्याचे नाव त्याठिकाणी दिले. मुद्दा एवढाच आहे की, महापुरुषांची नावे आपण रस्त्यांना अथवा महापालिकेच्या शासकीय इमारतींना किंवा वास्तूंना देतो. परंतु ही नावे देत असताना महापालिका प्रशासनाची जबाबदारी असते की, जुन्या एखाद्या राष्ट्रसंताचे, महापुरुषाचे नाव किंवा दिवंगत राजकीय नेत्यांचे नाव असेल तर पालिका प्रशासनाकडे त्याची जबाबदारी असते की, त्यांनी संबंधित लोकप्रतिनिधींना तसे सुचवावे. परंतु मीरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये तसे न होता राष्ट्रपुरुषाची बदनामी झालेली आहे. या अनुषंगाने मी आपणास एक गोष्ट सांगू इच्छितो की, आज महात्मा फुलेंची जयंती आहे. जर एखाद्या दिवंगत व्यक्तीचे नाव जर त्याठिकाणी दिले जात असेल तर निश्चितपणे चुकीचे आहे. नवशक्ती वृत्तपत्रामध्ये पहिल्या पानावर ही बातमी आलेली आहे. आपल्या माध्यमातून शासनाने याबाबत दखल घ्यावी. लोकप्रतिनिधींनी कोणतेही नाव सुचविले तरी पालिका प्रशासनाची ती जबाबदारी असते. पालिका प्रशासनातील ज्या अधिकाऱ्याने हे नाव मंजूर केले त्या अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करावी आणि त्यासंदर्भात शासनाने सभागृहामध्ये निवेदन करावे अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष : शासनाने याची दखल घ्यावी.

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, मघाशी सभागृहामध्ये याबाबत चर्चा झाली याची मला फक्त माहिती हवी आहे. आपण मघाशी आपल्या दालनात सुध्दा सांगितले होते की, कंत्राटी कामगारांचे विधेयक चालू असताना मी त्याठिकाणी ऑन लेग बोलत होतो. पहिल्या प्रथम ते

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे.....

विधेयक घेणे गरजेचे होते. तरी सुध्दा त्यात बदल झाला. त्यासंदर्भात दुसरे विधेयक घेतले असेल, पण आता लक्षवेधी सूचना आणि बाकीचे प्रश्न याठिकाणी स्वीकारले. याचा अर्थ असा होतो की, ते विधेयक घेण्याची आपण घाई केलेली होती. राहिलेल्या विधेयकांची चर्चा सुध्दा लगेच सुरु करायला पाहिजे. आता परत कामकाजामध्ये बदल करण्यात आला. आता कामकाज बदलून लक्षवेधी सूचना घेण्यात आली. आमचा मघापासून हाच प्रश्न होता.

अध्यक्ष : नियम 293 अन्वये दोन प्रस्ताव चर्चेला आहे. मागच्या नियम 293 अन्वयेच्या प्रस्तावावरील उत्तर बाकी आहे. यातून वेळ मिळाला तर विधेयक सुरु करण्यात येईल. आज विधेयक झाले नाही तर उद्या घेता येईल. आता लक्षवेधी सूचनेला सुरुवात करु या.

N-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, आपण असे सांगितले आहे की, हे बिल या संदर्भामध्ये सत्तारूढ पक्षाची आणि बाकीची नियम 293 ची चर्चा झाल्यानंतर वेळ पडली तर बिल घेऊ. बिल ऑनलेग आहे. आम्हाला निदान एवढे तरी कळू द्या की, आज नाही तर उद्या घेणार घेण्याआधी आम्हाला आधी कळले पाहिजे, जेणेकरून आम्हाला भाषण करायला किंवा चर्चेमध्ये भाग घ्यायचा असतो. आम्ही उपस्थित नसायचो आणि आपण बिल उरकून घ्यायचे असे व्हायला नको. म्हणून स्पेसिफिक कळू द्या की, बिल आज घेणार आहात की उद्या घेणार आहात.

अध्यक्ष : याच्यावर चर्चा तुमचे भाषण संपल्याशिवाय पुढे जाणार नाही. आज होणार असो वा उद्या असो.

श्री.सुभाष साबणे : अध्यक्ष महोदय, पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने, सर जे.जे. रुग्णालयाचे अधिष्ठाता आहेत. पद्मश्री तात्याराव लहाने यांचे एका वाक्यात वर्णन करायचे असेल तर असे म्हणता येईल की, त्यांना माणसातला देव ग्रामीण भागातील जनता समजते. एक महत्वाचा विषय मी माडत आहे. मी आपल्या माध्यमातून, सदनाच्या माध्यमातून एका प्रामाणिक आणि सच्या डॉक्टराच्या संदर्भात सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, श्री.तात्याराव लहाने यांनी ज्यावेळेस सर जे.जे. रुगणालयाचा अधिष्ठाता म्हणून पदग्रहण केले. तेव्हा तिथली स्वच्छता असेल, वॉर्डमधील स्वच्छता असेल, रुग्णालयाच्या परिसरातील स्वच्छता असेल ते जी काही सेवा देतात त्या संदर्भात तिथल्या डॉक्टरांनी आणि काही लोकांनी श्री.तात्याराव लहाने यांना हुसकवून लावण्याचा डाव रचला आहे. मी आपल्या माध्यमातून या सदनाला विनंती करणार आहे की, अशा एका प्रामाणिक डॉक्टरच्या मागे हे सदन उभे राहिले पाहिजे, शासन उभे राहिले पाहिजे. गरीबांची खूप सेवा करणारा हा माणूस, माणसातील ज्याला आम्ही देव म्हणतो, आमच्या मराठवाडयातील माणूस आहे. त्यांच्याबद्दल आम्हाला अभिमान आहे, महाराष्ट्राला अभिमान आहे. म्हणून मी आपल्या माध्यमातून सदनाला व शासनाला विनंती करणार आहे की, डॉक्टरांनी संप केला व त्यांच्यावर जे आरोप होऊ लागलेले आहेत. हे आरोप अतिशय चुकीच्या पध्दतीने होऊ लागलेले आहेत. हे सदन आदरणीय पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने यांच्या पाठीमागे खंभीरपणाने उभे आहे. एवढेच मला यामध्यमातून सांगावयाचे आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद सोनावणे : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉरमेशनचा मुद्दा आहे. माझ्या मतदार संघामध्ये जवळजवळ 10 हजार एकर टोमॅटो त्या सिझेनटया कंपनीने बोगस पध्दतीचे बियाने शेतक-यांना वाटून या दुष्काळी परिस्थितीमध्ये जवळपास साडेचार हजार कोटी रुपयांचे शेतक-यांचे नुकसान केले आहे. अतिशय गंभीर परिस्थिती आहे. या कंपनीवर कारवाई करण्यासाठी शासनाला आदेश करावा. सिझेन्टेनच्या बाबतीतमध्ये आजच्या वृत्तपत्रामध्ये सकाळ, नवाकाळ, पुण्य नगरी, लोकमत, पुढारी यांमध्ये गंभीर स्वरुपाचे निवेदन आलेले आहे. मला आपल्या माध्यमातून शासनाला सांगावयाचे आहे की, या कंपनीच्या बाबतीत निश्चित तात्काळ कारवाई करुन शेतक-यांचे कृषिच्या बाबतीत पंचनामे करायला सांगावे, अशी माझी विनंती आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मी नियम 97 अन्वये स्थगन प्रस्ताव दिला होता. उजनी धरणच्या बॅक वॉटरवर ज्या पाणीपुरवठयाच्या योजना आहेत. या योजनांचे पाणी आता फक्त दोन तास चालू केलेले आहे. हा अन्याय आहे. उजनी धरणावरुन ज्या पाणीपुरवठयाच्या योजना अवलंबून आहेत. त्या भागातील लोकांना पिण्याचे पाणी मिळेनासे झाले आहे. म्हणून आम्ही स्थगनची सूचना दिली होती. आज इंदापूरला काही शेतकरी उपोषणाला बसलेले आहेत.

अध्यक्ष : नियम 293 च्या नोटीसवर आपल्याला बोलता येईल.

श्री.जयंत पाटील : हा मुद्दा आम्ही स्थगनच्या माध्यमातून उपस्थित करु इच्छित होतो. यावर आपण कोणतीच घोषणा केली नाही. किंवा दालनात नाकारली. माननीय जलसिंचन मंत्री उपस्थित आहेत. आपण त्यांना जर सांगितले की, दोन तासावर आलेल पाणी किमान सात ते आठ तासावर न्यावे याबाबत मंत्री महोदयांनी त्या भागातील सन्माननीय आमदारांची बैठक घ्यावी व योग्य तो तोडगा काढावा.

अध्यक्ष : माननीय जलसिंचन मंत्री यांनी त्यांच्या दालनात सन्माननीय जयंत पाटील व त्या भागातील सन्माननीय आमदारांना बोलावून समजवून सांगावे.

श्री.गिरीश महाजन : होय.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: तालुकास्तरावरील आमसभांच्या बैठका नियमितपणे होऊन त्यामध्ये विकासकामे मार्गी लागण्याची आवश्यकता

मु.शी.: तालुकास्तरावरील आमसभांच्या बैठका नियमितपणे होऊन त्यामध्ये विकासकामे मार्गी लागण्याची आवश्यकता यासंबंधी सर्वश्री.प्रकाश आबिटकर, वैभव पिचड,सुरेश हाळवणकर, दत्तात्रय भरणे, अमर काळे, डॉ.राहुल पाटील, डॉ.अनिल बोंडे, ॲड.राहुल कुल,वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील मालाड ***(पूर्व)*** रेल्वे स्थानकावरुन कुरार व्हिलेज दिंडोशी व मालाड पूर्व भागात जाण्याकरिता पश्चिम द्रुतगती महामार्गाखालील भुयारी मार्गाचे रुंदीकरण करण्याबाबतचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रस्ताव, मालाड रेल्वे स्थानकातून कुरार व्हिलेज, दिंडोशीकडे जाण्याकरीता लाखो नागरिक, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी या मार्गाचा वापर करीत असून या अरुंद भुयारी मार्गामुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची निर्माण झालेली शक्यता, मालाड ***(पूर्व),*** कुरार व्हिलेजमधील हुमेरा पार्क ते दिंडोशी दरम्यानच्या असलेल्या अरुंद रस्त्यावर मोठ्या प्रमाणात होत असलेली वाहतुक कोंडी, परिणामी परिसरातील नागरीक, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी यांची होत असलेली गैरसोय, हुमेरा पार्क, सुगरा पार्क, पठाणवाडी यांचेमधून वसंत व्हॅली, बी.ई.एस.टी डेपोच्या दिशेने जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग या दरम्यानच्या प्रस्तावित डी.पी.रोडवरील अंदाजे ५०० मीटर लांबीच्या क्षेत्रातील ८२ पात्र झोपड्यांचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत पुनर्वसन करुन वाहतुकीसाठी डी.पी.रोड खुला करुन मुख्य रस्त्यास जोडण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, सदरहू भुयारी मार्गाचे रुंदीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासन, एमएमआरडीए तसेच महापालिकेच्या संबंधित विभागाकडे वारंवार पत्रव्यवहार त्याचप्रमाणे नागरिकांनी देखील अनेक वेळा आंदोलने, निदर्शने करुनही कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे (ग्रामविकास मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

अध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.....5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, आमसभा आणि आसभेच्या विषयाबाबतची ही लक्षवेधी मांडलेली आहे. उत्तरामध्ये ज्या पध्दतीचे मंत्री महोदयांचे निवेदन आहे. त्या निवेदनामध्ये पंचायत राज समितीच्या 8 व्या अहवालातील परिच्छेदाप्रमाणे ही आमसभा अनौपचारीक सभा म्हणून काम करते. या बाबतीतील दोष व दुरुस्त्या, सध्य परिस्थिती या विषयावर ही लक्षवेधी मांडलेली आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले आहे की, दिनांक 5 नोव्हेंबर 1998 च्या शासन परिपत्रकाप्रमाणे निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर बाबीला 17 वर्षापेक्षा अधिक वेळ झाला. अलिकडच्या काळामध्ये आमसभा ही गाव सभेपेक्षा खूपच भयंकर व्हायला लागली आहे. त्यामुळे अधिकारी आमसभा घ्यायला टाळाटाळ करतात. सन्माननीय आमदारांना त्याबाबतचे योग्य पध्दतीचे काम करायला वेळ मिळत नाही, योग्य पध्दतीने नियोजन करता येत नाही, त्याचा परिणाम असा होतो की, आमसभा ही पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायतची सुत्रबध्दता राखून एक चांगल्या पध्दतीचे विकासाचे विधायक व्यासपिठ आहे. याचा उपयोग योग्य पध्दतीने होण्याच्या दृष्टीकोनातून यामध्ये काही दुरुस्ती होणे अपेक्षित आहे. माननीय मंत्री महोदयांनी खूप चांगल्या पध्दतीने सांगितले की, याबाबत समिती घटीत करु, माझी मंत्री महोदयांना आपल्या माध्यमातून विनंती आहे की, या पध्दतीचे आमसभेच्या माध्यमातून आमसभेला फक्त तेथील बी.डी.ओ. असतो तिथला तहसिलदार सुध्दा उपस्थित नसतो, या सभेला जर अतिशय चांगल्या पध्दतीने सुत्र विकासाचे व्यासपिठ करायचे असेल तर कोणत्याही परिस्थितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदेच्या सर्व खात्यांचे प्रमुख अशा पध्दतीने आमदारांच्या अध्यक्षेतेखाली कधीही एखादी आढावा बैठक जिल्हा परिषद पंचायत समितीची होत नाही. जर विकासाचे व्यासपिठ कराचे असेल तर सी.ई.ओ. आणि त्यांचे सर्व अधिकारी, तालुका पंचायत समितीचे सर्व अधिकारी आणि त्याचबरोबर उपविभागीय अधिकारी यांच्या सक्तीच्या उपस्थितीनंतर तात्काळ करण्याबाबत मंत्री महोदय निर्णय घेतील काय ?

.....6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, याबाबत मी उत्तर सकारात्मक दिलेले आहे. ही बाब खरी आहे की, पंचायत राज समितीने सन 1976-77 साली शिफारस केली, सन 1976-77 साली अहवालामध्ये शिफारस करण्यात आली. नंतर 1978 साली आमसभेला सुरुवात झाली. 1998 मध्ये आमसभेच्या बाबतीतील निर्णय निर्गमित झाला. आता 17 वर्षामध्ये याच्या गाईड लाईन्समध्ये कुठलाही बदल केला गेला नाही. यामध्ये जसे ग्रामपंचायतीचे अधिकार वाढलेले आहेत. पंचायत राज समितीचे बळकटीकरणाचे काम मोठया प्रमाणात सुरु झालेले आहे. त्याचप्रमाणे काळाची गरज म्हणून आमसभेलाही बळकटीकरण करण्याच्या संदर्भामध्ये आणि त्याचे जे आतापर्यंतचे निकष आहेत. त्यात बदल करण्याच्या संदर्भामध्ये शासन पॉझिटिव्ह आहे. एक समिती गठीत करुन त्याच्याबद्दलचा निर्णय आम्ही लवकरात लवकर करु

श्री.भिमराव धोंडे : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघात तिन तालुके आहेत. तेथे मी आमसभा दरवर्षी घेतो. पण माझा अनुभव असा आहे की, मिटींगमध्ये बरेचसे उपविभागीय अधिकारी उपस्थित राहत नाहीत. आता ग्रामविकास विभागाचे माननीय मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांना या माध्यमातून मी अशी विनंती करतो की, नवीन समिती गठीत करावी. कारण 17 वर्षात त्यामध्ये कुठलाही बदल केला गेला नाही. आमसभेमध्ये किमान 4000 ते 5000 लोक उपस्थित असतात. महत्वाचा प्रश्न असतो, अनेक गोष्टी दोन्ही बाजूच्या गावातील उपस्थित करता येतात. म्हणून आमदारांची समिती गठीत करुन सरकार याच्यावर सुधारणा करुन पुढच्या वर्षापासून नवीन पध्दतीने आमसभा घेण्याचा प्रयत्न करणार आहे का ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, मी मघाशी सांगितले की, मिटींग घेण्याच्या संदर्भातील निकषामध्ये कोणताही बदल झालेला नाही. याबाबत एक समिती गठीत करुन आवश्यकतेनुसार बदल करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांची मागणी साधी आहे. अधिकाऱ्यांचे याकरिता उत्तरदायित्व असतानाही अधिकारी आमसभेला उपस्थित राहात नाहीत म्हणून सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना दिलेली आहे. अधिकाऱ्यांनी या बैठकीला उपस्थित राहण्याकरिता शासनाकडून परिपत्रक काढून हे करता येईल.

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, या बैठकीकरिता उत्तरदायित्त असलेले अधिकारी उपस्थित रहावेत व नवीन आमसभेचे स्वरूप कसे असावे याबाबत चर्चा होऊन समितीमध्ये निर्णय होईल. आमसभेच्या बाबतीत व आमदारांच्या उपस्थितीबाबतही काय करायचे याचा निर्णय समिती घेईल.

श्री.दिलीप वळसे पाटील : अध्यक्ष महोदय, हा विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून आलेला आहे. हा लक्षवेधी सूचनेचा विषय होऊ शकतो की नाही हे मला माहिती नाही. पण यावर चर्चा सुरु आहे. केवळ सरकारने एक ऑर्डर काढली आहे म्हणून पंचायत समितीच्या आमसभेला आमदारांना निमंत्रित करण्यात येते. पण ती कोणतीही वैधानिक बैठक नाही. अनेकदा पंचायत समितीच्या सदस्यांची अपेक्षा असते की, पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त जिल्हा परिषदेतील व वरिष्ठ सरकारी अधिकारी यांनी पंचायत समितीच्या मासिक बैठकीला उपस्थित राहावे. पण त्या बैठकीला उपस्थित राहण्याचे बंधन या अधिकाऱ्यांवर नाही. म्हणून ही व्यवस्था केली होती की, पंचायत समितीने आमसभा बोलवावी, ही सभा आमदारांच्या अध्यक्षतेखाली घ्यावी, या सभेला सरपंचांना बोलवावे व या सर्वांचे म्हणणे ऐकून घ्यावे. मला सभागृहाच्या ही बाब लक्षात आणून द्यावयाची आहे की, ही आमसभा आमदारांच्या अध्यक्षतेखाली झाली तरी या आमसभेत झालेला कोणताही निर्णय हा वैधानिक नाही किंवा बंधनकारक नाही. ही फक्त आढावा घेण्याकरिता होणारी बैठक आहे. आता लक्षवेधी सूचनेमध्ये नियोजन विभागाबाबतचा विषय आलेला आहे. माननीय नियोजनमंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार सभागृहात उपस्थित आहेत. तालुक्याचे नियोजन करावयाचे असेल तर त्यांनी तालुका समन्वय समिती अधिक स्ट्रॉंग करावी. ते विरोधी पक्षात असताना अशा प्रकारच्या मागण्या करीत होते. त्यांनी अशा प्रकारे तालुका समन्वय समिती जास्त स्ट्रॉंग करावी. ग्रामपंचायतीने व ग्रामसभेने केलेल्या शिफारशी आता पंचायत राज व्यवस्थेमध्ये आपण बंधनकारक केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे पाटील .....

ग्रामसभेने शिफारस केल्याशिवाय त्या तालुक्याच्या डेव्हलपमेंट होण्याच्या संदर्भात कोणतीही बाब पुढे जाऊ नये अशी आपण त्यामध्ये तरतूद करावी व सन्माननीय सदस्यांच्या मागणीप्रमाणे याबाबत त्यांचेही मत विचारात घेतले पाहिजे. बऱ्याचदा आमसभेत विविध पक्षाचे विविध लोक येतात व बिनकामाचा राजकीय हंगामा तेथे होतो. याबाबत मंत्री महोदय मिटींग घेतील. पण माझी माननीय नियोजन मंत्री यांना विनंती आहे की, आपण या दोन विभागाची मिटींग घेऊन हा विषय एकत्रित केला करावा. त्यामध्ये ही सभा चालू ठेवायची, आमदारांच्या अध्यक्षतेखाली घ्यायची, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली घ्यायची, तालुका समन्वय समिती अधिक स्ट्रॉंग करायची, त्यांना अजून काही अधिकार द्यायचे याबाबत निर्णय घेण्यात यावा. मला वाटते की, यातून मार्ग निघेल. एकंदरीत आज अनेक योजना आहेत. केंद्र सरकारचा निधी, राज्य सरकारचा निधी, डीपीसीचा निधी ग्रामपंचायतीकडे जातो. हे सर्व होत असताना नक्की त्याची बांधिलकी कोणावर नाही. गावची पाणीपुरवठा समिती, गावची स्वच्छता समिती याचा आढावा कोठे घ्यायचा व यासाठी सरकारचा आलेला पैसा व टॅक्स पेअरकडून आलेला पैसा योग्य कामासाठी खर्च होतो की नाही हे पाहणे नियोजन विभागाचे काम आहे. सन्माननीय सदस्यांची भावना हीच आहे की, त्यांच्या तालुक्यातील विकास कामांचे नियोजन चांगले व्हावे. त्यासाठी सन्माननीय सदस्यांना ओव्हरेज मिळावे अशी अपेक्षा आहे. याबाबत पीठासीन अधिकाऱ्यांनी सूचित केले व दोन विभागाच्या मंत्री महोदयांनी एकत्र बसून निर्णय घेतला तर तो जास्त परिणामकारक निर्णय होईल असे माझे मत आहे. याबाबत आपण निदेश द्यावेत अशी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष : अनेक वर्षांपासून आमसभा चालू आहे. याकरिता सरकारकडून दिला जाणारा निधी नीट खर्च होत नाही अशी तक्रार सरपंचापासून सर्व जण करीत असतात. या तक्रारीचे पुढे काय होते. तक्रारीचे पुढे काही होत असेल किंवा नसेल, या सभेला वैधानिक दर्जा नसला तरी त्यांचे दायित्व आहे की नाही. मग हे दायित्व कोणी स्वीकारावयाचे ? हे दायित्व स्वीकारले जात नाही. पण तेथे झालेली बडबड लोकांपर्यंत जाते. लोक ऐकून घेतात पण याचे दायित्व कोणी स्वीकारत नाही. हे दायित्व स्वीकारण्याच्या दृष्टीने व्यवस्था झाली पाहिजे. म्हणून त्यादृष्टीने मंत्री महोदयांनी तातडीने निर्णय करावा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष मी मघाशी सांगितले की, याकरिता समिती गठीत केलेली आहे. ही समिती अधिकाऱ्यांना देण्यात येणाऱ्या आदेशाच्या संदर्भात निर्णय घेईल. सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे पंचायत समितीच्या बैठकीला व आमसभेला आमदारांना अध्यक्ष म्हणून बोलावले जाते. याबाबत आमदारांना वैधानिक अधिकार नाही, त्यामुळे त्याला जास्तीत जास्त स्ट्राँग करण्यात यावे अशी आमदारांची अपेक्षा आहे. तो त्या मिटींगचाही अधिकार नाही. आपण सांगितले की, हा विषय आताच्या लक्षवेधी सूचनेतील मर्यादीत विषय आहे. मी सांगितले आहे की, समिती गठीत करुन त्या समितीमध्ये आमदार अध्यक्ष असण्याच्या संदर्भात, अधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याच्या संदर्भात, या बैठकीच्या वैधतेच्या प्रमाणात व या बैठकीत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात विस्तृत चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल.

श्री.सुभाष साबणे : अध्यक्ष महोदय, आमसभा दरवर्षी आमदारांच्या अध्यक्षतेखाली बोलावली जाते. या आमसभेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे पण ते उपस्थित राहात नाहीत. तसेच जिल्हा परिषदेचा एकही विभाग प्रमुख अधिकारी या आमसभेला उपस्थित राहात नाही. आमसभेमध्ये आमदारांना जोडे खाण्याचेच काम असते. सर्व खात्याची उत्तरे आमदारांना द्यावी लागतात. महसूल खात्याचे अधिकारी, जलसंपदा खात्याचे अधिकारी, पोलीस खात्याचे अधिकारी उपस्थित राहात नाहीत. ग्रामीण भागातील लोक, सरपंच हे फक्त आमदारांना प्रश्न विचारतात. त्याचे उत्तरदायित्व स्वीकारण्यास कोणीही राहात नाही. म्हणून मी ग्रामविकास मंत्री यांना विनंती करणार आहे की, या समितीला वैधानिक अधिकार द्यावेत. या समितीची बैठक वर्षातून एकदा होते. ग्रामीण भागातील लोकांना व सरपंचांना बोलण्याचे कोणतेही व्यासपीठ तालुक्याला नाही. आमसभा हेच व्यासपीठ आहे, येथेच त्यांना प्रश्न मांडण्याची संधी मिळते. या बैठकीला व आमसभेला वैधानिक अधिकार देऊन तेथे जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी बैठकीस उपस्थित राहण्यासंदर्भात व तेथील प्रश्न सोडविण्यासंदर्भात सक्त ताकीद ग्रामविकास मंत्री यांनी देणे आवश्यक आहे. यामुळे त्या बैठकीचा व आमसभेचाही मानसन्मान वाढतो. याकरिता आमदारांची समिती करुन तातडीने निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे : मी मघाशी सांगितले की, याकरिता समिती गठीत करून या समितीमध्ये सर्व विषयांच्या अनुषंगाने सर्वांगीण विचार केला जाईल व त्यावर निर्णय घेतला जाईल. समितीला वैधानिक महत्व प्राप्त होण्याकरिता नक्कीच चर्चा करण्यात येईल.

श्री.चरण वाघमारे : अध्यक्ष महोदय, 1976 मध्ये आमसभेचे अध्यक्ष आमदार राहतील असे धोरण निश्चित करण्यात आले होते हे मंत्री महोदयांनी तपासून पाहिले तर त्यांच्या लक्षात येईल. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, 73 वी घटनादुरुस्ती झाली तेव्हा राज्य सरकारच्या 139 योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत झाल्या आहेत. या योजनांचा आढावा घेण्यासाठी आमसभेचा अध्यक्ष आमदार असतो. जिल्हा परिषदेचे खातेप्रमुख आमसभेत उपस्थित राहात नसतील तर हस्तांतरीत केलेल्या योजनांचा आढावा घेणे, खर्चाचा व अनुपालन अहवाल घेणे कठीण जाते म्हणून या बैठकीस उपस्थित राहण्याकरिता आपण सर्व जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांना अनिवार्य करणार आहात का ?

अध्यक्ष : मंत्री महोदयांनी त्याबाबत उत्तर दिलेले आहे.

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, आमसभेचे अध्यक्ष आमदार असतात याबाबत मला पूर्ण कल्पना आहे. पण आमदारांची उपस्थिती हा सध्या अनौपचारीक विषय आहे. त्याला जास्तीत जास्त स्ट्राँग करण्यासाठी समिती नेमली आहे.

यानंतर पी-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे...

या समितीमध्ये जी चर्चा करण्यात येईल, त्यातून सकारात्मक निर्णय घेण्यात येतील.

ॲड.राहुल कुल : अध्यक्ष महोदय, मागील काही वर्षापासून सातत्याने विधानसभा सदस्यांचे अधिकार कमी होत चालल्याचे चित्र दिसत आहे. मागील शासनाने विधानसभा सदस्यांच्या बैठकींना अधिका-यांनी उपस्थित राहणे बंधनकारक नाही, असा जी.आर.काढला होता. नवीन शासनाने जिल्हाधिका-यांकडे यादी द्यावी, ते बैठक घेतील आणि विधानसभा सदस्यांची कामे मार्गी लागतील असे सांगितलेले आहे. हा विषय व्यापक आहे. विधानसभा सदस्यांचे अधिकार काय आहेत, त्यासंदर्भात वारंवार चर्चा झालेली आहे. आमसभा ही वर्षातून एकदाच होते. दर महिन्यातून दोन वेळा तालुक्यातील सर्व अधिका-यांची बैठक घेण्यासंदर्भातील व्यवस्था निर्माण करण्याचा शासन निर्णय घेईल का ? यामुळे मतदारसंघातील विविध विषय मार्गी लागतील.

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, समन्वय समितीचे अध्यक्ष आमदार असतात. समन्वय समितीच्या किती बैठका घ्याव्यात, याचे कोणतेही बंधन नाही. सर्व आमदारांना बैठक घेऊन आपापल्या तालुक्याचा आढावा घेणे आमदाराच्या ॲक्टिव्हिटीवर अवलंबून आहे. आमदाराचे एकूण अधिकार वाढविणे हा विषय लक्षवेधीशी संबंधित नाही. त्यामुळे यावर आता भाष्य करता येत नाही.

अध्यक्ष : जोपर्यंत समिती गठित होत नाही तोपर्यंत समितीला काही सांगता येणार नाही. समिती गठित झाल्यानंतर सर्व पक्षाचे आमदार समितीत राहतील. लवकरात लवकर समिती गठित करण्यासंबंधीचा निर्णय घेण्यात यावा, एवढेच यामध्ये सांगण्यासारखे आहे. यामध्ये वेगळा काही प्रश्न नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: महामंडळांच्या ठेवींमध्ये कोटयवधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार

मु.शी.: महामंडळांच्या ठेवींमध्ये कोटयवधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार यासंबंधी सर्वश्री अतुल भातखळकर, छगन भुजबळ, गुलाबराव पाटील, जितेंद्र आव्हाड, जयंत पाटील, हसन मुश्रीफ, शशिकांत शिंदे, राणाजगजितसिंह पाटील, सरदार तारासिंह, अजय चौधरी, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री प्रकाश आबिटकर, मनोहर भोईर, विजय वडेट्टीवार, वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अतूल भातखळकर (कांदिवली पूर्व) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्य शासनाच्या अखत्यारीतील शासकीय महामंडळाने दलालांमार्फत विविध नामांकित खासगी बँकामध्ये मुदतठेवी (एफडी) मध्ये गुंतविण्यात आलेले कोट्यवधी रुपये, महामंडळाच्या या ठेवीमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये उघडकीस येणे, राज्य शासनाचे विविध महामंडळे आणि प्राधिकरणाच्या जवळपास ३५० कोटी रुपयांच्या देना बँकेतील मुदतठेवीच्या बनावट पावत्या बनवून कोट्यवधी रुपयांचे कॅश क्रेडिट दिले जाणे, या घोटाळ्याची व्याप्ती केवळ महामंडळापुरतीच मर्यादित नसून खाजगी कंपन्या, संस्था आणि व्यक्तींनाही जबर आर्थिक फटका बसलेला असणे, यामध्ये बँकेचे अधिकारी आणि दलालांचे असलेले संगनमत, या गैरव्यवहारात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), महिला आर्थिक विकास महामंडळ, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मकार विकास महामंडळ (लिडकॉम) व पर्यटन विकास महामंडळ अशा दहा महामंडळांचा यात समावेश असणे, यासंदर्भात लोकप्रतिनिधी तसेच ठेवीदारांनी शासनाकडे वारंवार तक्रारी करुनही आवश्यक कार्यवाही करण्यात होत असलेली दिरंगाई, परिणामी ठेवीदारांमध्ये पसरलेला असंतोष, या प्रकरणी शासनाने तातडीने बँक अधिकारी व दलाल यांच्यावर कठोर

....३

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अतूल भातखळकर.....

कारवाई करण्याची तसेच खासगी बँकामधून मुदतठेवी ठेवतांना शासनाची परवानगी न घेणाऱ्या महामंडळांच्या जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावरही कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

अध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, पटलावर ठेवण्यात आलेले लेखी उत्तर अपूर्ण आहे. शासकीय महामंडळांच्या ठेवी राष्ट्रीयकृत बँकेत ठेवल्या गेलेल्या आहेत. त्याच्या आधारावर खोटया रिसीट्स बनवून अन्य लोकांना फायदा दिला गेलेला आहे. उत्तरात म्हटले आहे की, चर्मोद्योग महामंडळाने या संदर्भात तक्रार केली होती. त्या संदर्भातील कारवाई चालू आहे, असे सांगण्यात आलेले आहे. अन्य महामंडळांनीही अशा प्रकारच्या ठेवी ठेवलेल्या आहेत. महामंडळाचे मुख्यालय बीकेसीमध्ये जरी असले तरीही त्यानी ठेवी देना बँकेच्या मलबार हिल येथील शाखेत ठेवलेल्या आहेत. मुख्यालय आणि बँकेची ब्रांच यांचा कुठेही काहीही संबंध नाही. तरीही एकाच शाखेमध्ये अनेक महामंडळांच्या ठेवी ठेवलेल्या आहेत. याचा अर्थ यामध्ये काहीतरी नेक्सस आहे. ज्यांनी या ठेवी राष्ट्रीय कृत बँकेच्या विशिष्ट विशेष ब्रांचमध्ये ठेवल्या त्यांच्यावर शासन कारवाई करते का ? या संपूर्ण प्रकाराची चौकशी करणार आहे का ? शासकीय महामंडळांच्या ठेवी ठेवण्याकरिता दलालाची आवश्यकता आहे का ? याकरिता शासन नवीन निकष निर्माण करणार का ?

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.सुभाष साबणे)

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, हा विषय गृह विभागाशी संबंधित जरी असला तरी वित्त विभाग म्हणून त्याबद्दलची अधिक माहिती माझ्याकडे आहे. माननीय राज्यमंत्री यांनी म्हटले की, ही माहिती सभागृहाला अवगत झाली तर योग्य होईल. यामध्ये महामंडळांचा दोष आहे का हे तपासण्यात आलेले आहे. गुन्हे अन्वेषण शाखेकडे हा तपास देण्यात आला होता. त्यानंतर सीबीआयकडे याबाबतची चौकशी देण्यात आली होती. एमएमआरडीए सारख्या संस्थेने 18000 कोटी रुपयांचे डिपॉझिट आहत. यामध्ये या भामटयाने पहिल्यांदा महामंडळाकडे जाऊन सांगितले की, मी बँकेकडून आलेलो आहे असे सांगून डिपॉझिटच्या संदर्भात आरटीजीएस बँकेत केला. व्याज जास्त देतो असे सांगितले. बँकेला आरटीजीएस केला असल्याने येथे कुठे रोख रकमेला हात घातला नव्हता. बँकेला असे सांगितले की, आम्ही महामंडळाकडून आलेलो आहे. बँकेमध्ये जी रसीद दिली होती. ती रसीद ओरिजनल नव्हती. बँकेमध्ये डुप्लीकेट रसीद देऊन स्वत:कडे ओरिजनल रसीद ठेवली होती. त्याची हुबेबुह डुप्लीकेट रसीद महामंडळातही दिली होती.

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार....

ओरिजनल रसीदवर कर्ज घ्यावयाचे असे सांगितले होते. कर्ज घ्यावयाचे असे सांगून बँकेत अकाऊंट काढले. कर्ज बँकेतील अकाऊंटवर गेले. अकाऊंट काढतांना मात्र खोटया सहया केल्या. त्यातून निघणारा पैसा आपल्या अकाऊंमध्ये आरटीजीएस केला. याची सीबीआय चौकशी चालू आहे. गुन्हे अन्वेषण शाखेने याचा तपास केलेला आहे. याच्याशी संबंधित सर्व लोक व एका बँकेचा मॅनेजरही अटकेत आहे. ज्या महामंडळाच्या माध्यमातून अशा पध्दतीचे एफडीआर काढला गेला. त्या महामंडळाच्या अधिका-यांचीही तपासणी केली गेली त्यांच्याकडून तपासणी केली, त्यांचे टेलिफोन रेकॉर्ड तपासले गेले. त्यांचा या व्यक्तीशी संबंध आहे का हे तपासले गेले. याबाबत संबंध ज्या गुन्हेगाराशी आहे, अशा पध्दतीने ज्याने गुन्हा केला त्याच्याशी नाही. मागील कार्यकाळात गुन्हे सिध्द होत नव्हते. बाकी सर्व आरोपी अटकेत आहेत. अजूनही ते सुटलेले नाहीत.

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, खरे म्हटले तर हा विषय गृह खात्याशी संबंधित आहे. सन्माननीय वित्तमंत्री यांनी यासंबंधी अतिशय विस्तृत उत्तर दिलेले आहे. महानंदा, कृषी उत्पन्न बाजार समित्या अशी अनेक महामंडळे आहेत, एमएमआरडीए आहेत. अनेक लोकांना देना बँकेतील लोकांनी फर्जी केलेली आहे. हे करीत असतांना सीबीआयकडून त्यांच्यावर केस दाखल करण्यात आलेली आहे. त्यांना अटक केलेली आहे. देना बँकेने जे ॲफिडेव्हिट कोर्टात व सीबीआयकडे दाखल केलेले आहे. त्या ॲफिडेव्हिटमध्ये देना बँकेचा यामध्ये कोणताही सबंध नाही. ती जबाबदारी टाळत असल्यामुळे शासनाची कोटयवधी रुपयांची रक्कम बुडेल का अशी शंका आहे. कोर्टामध्ये प्रकरण प्रलंबित आहे. यामध्ये सर्व अधिकारी दोषी असतील किंवा अन्य कोणी असतील त्यांची चौकशी करुन त्याच्यावर कारवाई करावी. दोषी नसेल तर शासनाने क्लॅरिफिकेशन अजूनपर्यंत गेलेले नाही. सीबीआयने त्या अधिका-यांवर आणि बँकेवर गुन्हा दाखल केलेला नाही. त्या प्रकरचे आरोपपत्र दाखल केले नाही, अशी माझी माहिती आहे. या संदर्भातील चौकशी करुन राज्य शासनाने भूमिका घेतलेली नाही. सीबीआय कारवाई करीत आहे. यामध्ये फर्जी करुन खोटया सहया केल्या कर्ज डायव्हर्ट केलेले आहे. या संदर्भात संबंधित दोषींची प्रॉपर्टी जप्त केलेली आहे. शासन यामध्ये भूमिका घेत नाही, सीबीआय कारवाई करीत आहे.

....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे....

या संदर्भात पैसे बुडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संदर्भात शासनाने आपली भूमिका ठाम ठेवून सीबीआय चौकशीमध्ये सीबीआयने त्या पध्दतीने आरोप पत्र दाखल करत असतांना देना बँक किंवा व्यवस्थापन दोषी आहे, असे म्हटले पाहिजे. ते व्यक्तीला ते दोषी ठरवितात त्यामुळे मोठी अडचणी आहेत. शासन पुढाकार घेऊन या सीबीआयला आरोपपत्र दाखल करण्यासंदर्भात बँकेवर आरोप पत्र दाखल करण्यासंदर्भात सूचना करणार आहे का ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, जे नियमाने व कायद्याने शक्य आहे, ती प्रत्येक गोष्ट शासनाच्या माध्यमातून केली जात आहे. हा जो भामटा होता, तो गुंड प्रवृत्तीचा व्यक्ती होता. त्यांनी दोघांनाही चीट केले. बँकेत महामंडळाकडून आलो आहे, असे सांगून गेला. सुट बूट टाय घालून गेला होता. तेथे त्याने सांगितले की, डिपॉझिट आणतो म्हणून सांगितले आणि देना बँकेचे डिपॉझिट घेतले. त्याची सीबीआयने चौकशी केली असता काही बँकेचे अधिकारी आहेत त्याच्यामध्ये जे आहेत असे वाटले ते दीड दोन वर्षापासून जेलमध्ये आहेत. यामध्ये सखोल तपासणीची आवश्यकता वाटत असेल तर सीबीआयला राज्य सरकार ज्या ज्या गोष्टींची व माहितीची आवश्यकता आहे, ती दिली जात आहे. भविष्यातही माहिती दिली जीईल. एक महत्त्वाची गोष्ट माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, सरकारला हे लक्षात आले त्यानंतर ताबडतोब बँकेमध्ये ठेवी ठेवण्याच्या संदर्भातील कोणते निर्बंध आणि नियम नवीन तयार केले. अशी घटना भविष्यात होऊ नये याकरिता केंद्र शासनाकडे काही गोष्टींसाठी पाठपुरावा करीत आहोत. जितक्या रकमेचा अपहार झालेला आहे. त्यापैकी जी रक्कम गुन्हेगाराच्या अकाऊंमध्ये असल्याने ती वसूल होईल, परंतु जेवढी रक्कम त्याने खर्च केली त्याबद्दल कोर्टाच्या निकालाच्या अधीन राहून कारवाई करावी लागेल.

क्यू-1/--

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. केंद्र शासनाने नॅशनलाईज बँकेत डिपॉझिट करण्यासंदर्भातील नियम केलेला आहे. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार बँकेत डिपॉझिट केलेले आहे. त्या ठिकाणी चिटिंग झाली, ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये संबंधित बँकेच्या अधिकाऱ्यांचे संगनमत होते. केंद्र शासनाने राज्य शासनाच्या महामंडळातील कोट्यावधी रुपये बुडू नयेत याकरिता जबाबदारी घेण्याची आवश्यकता आहे. तसेच यासंदर्भात राज्य शासनाची भूमिका देखील ठाम असली पाहिजे. या प्रकरणी सीबीआय आरोपपत्र दाखल केलेले आहे. या प्रकरणी देना बँकेवर जबाबदारी निश्चित करावी लागणार आहे. राज्य शासनाने केंद्र शासनाच्या मदतीने महामंडळातील पैसे परत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील काय ? तसेच अशा प्रकारचे प्रयत्न राज्य शासनाने करावेत, अशी मी मंत्री महोदयांकडे विनंती करीत आहे.

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, यामध्ये बँकेची देखील जबाबदारी होती. कारण स्टॅण्डर्ड प्रोसिजर फॉर ऑपरेशन आहे. बँकेने केवायसीची तपासणी करायला हवी होती. ग्राहकांच्या संदर्भातील सर्व घडामोडी आणि प्रोसिजर्स घडलेल्या असून, त्यामध्ये ब्रीच झालेले आहे. आताच मंत्री महोदयांनी दोन्ही बाजूला कशा प्रकारे खोटारडेपणा केलेला आहे, त्याची माहिती दिलेली आहे. काढताना लेअरींग केलेले आहे. म्हणजे तत्काळ काढले नाहीत. त्यांनी अनेक प्रोसिजर्स लेअर्स केलेल्या आहेत. संबंधितांनी स्वतःचे नाव येऊ नये, याकरिता योग्य ती दक्षता घेतलेली आहे. एमपीआयडीमध्ये सदरहू प्रकरण बसविण्यासाठी प्रयत्न करीत आहोत, हे मी सांगितलेले आहे. कारण We are safegarding depositors intrest. सदरहू प्रकरणी एमपीआयडीअंतर्गत कारवाई करु शकतो काय यासाठी मी संबंधित अधिकाऱ्यांना अभ्यास आणि तपासणी करुन एमपीआयडीच्या ॲम्बिटमध्ये आणण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सीबीआयचे आरोपपत्र लवकरात लवकर दाखल करुन चार्जशीट दाखल करण्याबाबत सूचना केलेली आहे. या प्रकरणी लवकरात लवकर चार्जशीट दाखल करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांच्या विरोधात कारवाई केली जाणार आहे.

.....2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अजय चौधरी : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेला दिलेल्या उत्तरात फेब्रुवारी, 2014 विजयाबॉकेतील लोकखंडवाला शाखेत 9 कोटी रुपये गुंतविले असल्याबाबतची माहिती दिलेली आहे. मार्च, 2014 मध्ये खोट्या बनावट पावत्या तयार करुन कागदपत्रांच्या आधारे 8 कोटी रुपये ओव्हर ड्राफ्ट घेऊन काढलेले आहेत, अशी माहिती उत्तरात दिलेली आहे. याचा अर्थ एका महिन्यामध्ये हे पैसे काढलेले आहेत. या प्रकरणी दिनांक 7-8-2014 मध्ये फिर्याद नोंदविण्यात आली होती. 6 महिन्यानंतर फिर्याद नोंदविण्यात आली असून, एवढा कालावधी का लागला असा माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे. महामंडळात पैसा गुंतविण्यासाठी अधिकारी आणि दलालांचे रॅकेट सक्रीयपणे काम करीत आहेत. अशा संबंधित दोषी अधिकाऱ्यांच्या विरोधात कोणती कारवाई करणार ? संघटित गुन्हेगारी रोखण्यासाठी कडक कायदे केलेले आहेत. अधिकारी आणि दलालांचे रॅकेट सक्रीयपणे काम करीत आहेत. अशा संबंधित दोषी अधिकाऱ्यांच्या आणि दलालांच्या विरोधात कडक कारवाई करण्यासाठी कायद्यात सुधारणा केली जाईल काय ?

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी मूलभूत प्रश्न विचारलेला आहे. संबंधित प्रकरणाची फिर्याद नोंदविण्यासाठी 6 महिन्यांचा विलंब का लागला, असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. याबाबत माहिती घेण्यात आलेली आहे. या प्रकरणी फिर्याद नोंदविण्यास उशीर का झाला, याबाबत देखील माझ्या मनात शंका आलेली होती. प्रिलिमरी इन्क्वायरीसाठी एवढा वेळ का घेतला जात आहे, यासाठी इकोनॉमिक ऑफेन्समध्ये काही स्टॅण्डर्ड प्रोसिजर फॉर ऑपरेशन असायला हवे. कारण यामध्ये पुढे जाऊन असे होते, याचा जो काही इंट्रेस्ट असतो तो डिपॉझिटर्सचा वेव्ह ऑफ करुन चुकीच्या पध्दतीने चालला जाते. आपण ज्यावेळी त्यांची प्रॉपर्टी अटॅच आणि लिक्विडेट करण्यासाठी जातो, त्यावेळी ते मार्ग काढून निघून जातात. म्हणून या प्रकरणामध्ये मी पायलट केस करण्याबाबत संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. यामध्ये स्टॅण्डर्ड प्रोसिजर फॉर ऑपरेशन निश्चित करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. तक्रार आल्यानंतर एफआयआर दाखल करण्यासाठी जी प्रिलिमिनरी इन्क्वायरी असते त्याचा ठराविक कालावधी असला पाहिजे अशी देखील मी संबंधितांना सूचना केलेली आहे. असे केले नाही तर संबंधित दोषी लोक बाहेरच्या देशात निघून जातात. यासाठी पायबंद घालण्यासाठी भविष्यात योग्य ते निदेश संबंधितांना दिले जातील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील.....

अध्यक्ष महोदय, एजन्सीमार्फत काम केले जात होते. अशा एजन्सीने ते काम पुढे जाऊन श्री. शर्मा नावाच्या व्यक्तीला दिले होते. यासंदर्भात जबाबदारी निश्चित करायला हवी. यामध्ये एकूण ती भाग केलेले आहेत. महामंडळ आणि त्यामध्ये येणारी लोक. महामंडळाकडे ॲम्पलप्रमाणात कर्मचारी आहेत. यामध्ये कन्स्लटंन्सी कोणाकडून ही घ्या. परंतू यामध्ये कस्टोडियन आपला कर्मचारी असला पाहिजे. यासाठी कागदपत्रे कोणाच्या हातात द्यायची आणि कोणाच्या हातात द्यायची नाही, याकरिता योग्य ती काळजी घेतली जात आहे. यामध्ये मेमोरंडम ऑफ असोसिएशन, आर्टिकल ऑफ असोसिएशन, मध्ये आवश्यक ते बदल केलेले आहेत. म्हणूनच ते शक्य झाले होते. महामंडळातून त्रयस्थ लोकांकडे पैसा गेलेला आहे. त्यासाठी महामंडळातील संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी योग्य ती कार्यवाही केली जात आहे. रजिस्टर एजन्सीला काम दिले होते. त्यानंतर ते काम संबंधित एजन्टकडे गेले होते. बँकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केवायसी तपासायला हवी होती. या ठिकाणी ब्रीच झालेला असेल तर संबंतिधत बँकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या विरोधात योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी 10 महामंडळात गैरव्यवहार झाला म्हणून लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. या 10 महामंडळापैकी एखादे महामंडळ सोडले तर उर्वरित महामंडळामध्ये गैरव्यवहार झालेला नाही, असे मोघम उत्तर दिलेले आहे. महामंडळातील डिपॉझिटर्सचा पैसा हा एका विशिष्ट बँकेतील शाखेमध्ये गेलेला असेल तर अशा प्रकारे पैसे ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची नावे निष्पन्न झालेली आहेत काय, असल्यास ती नावे सभागृहाच्या पटलावर ठेवली जातील काय याबाबतची माहिती मंत्री महोदयांनी सभागृहाला देण्याची गरज आहे.

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, एमएमआरडीए आणि एमटीडीसीचा उल्लेख केलेला आहे. त्या ठिकाणी देखील अनियमितता झालेली आहे. याबाबत सीबीआयमार्फत तपास सुरु आहे. चार्जशीटसुध्दा दाखल करण्यात आलेली आहे. 3 ते 4 महामंडळातील किंवा सर्व महामंडळातील संबंधित दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नावे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजेंद्र पाटणी : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारला होता. संबंधित बँकेने चुकीच्या व्यक्तीकडे ओव्हर ड्राफ्टच्या माध्यमातून पैसा दिलेला आहे. त्यामुळे या प्रकरणी महामंडळाचा कोणताही दोष नाही. या प्रकरणी संबंधित बँकेची जबाबदारी आहे. यासाठी विशेष सरकारी वकील नेमून, बँकेची आणि संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठर शासनाकडून विशेष काळजी घेईल काय ? यामधील पैसा संबंधित बॅकेकडून वसूल केला पाहिजे. या दृष्टीकोनातून शासनाकडून कोणती कार्यवाही केली जाणार आहे ?

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, आताच मंत्री महोदयांनी विस्तृतपणे माहिती दिलेली आहे. बँकेत पैसे नेत असताना मेमोरंडम ऑफ असोसिएशन आणि आर्टिकल ऑफ असोसिएशन बदलले होते. चुकीची कागदपत्रे दिल्याची माहिती बँकेला नव्हती. संबंधितांनी दोन्ही ठिकाणी खोटी माहिती आणि पत्ता दिलेला आहे. चुकीच्या पत्त्यावर कागदपत्रे गेल्याची माहिती बँकेतील अधिकाऱ्यांना आणि महामंडळाला नव्हती. बँकेतील अधिकाऱ्यांचे केवायसी तपाण्याचे काम असते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील...

त्यांचेवर कारवाई केली जाईल.

श्री.अतुल भातखळकर: अध्यक्ष महाराज, महामंडळाच्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार आहात?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महाराज, मी आधीच सांगितले आहे की, सर्व संबधित महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांची माहिती घेतली जाईल आणि त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री.अतुल भातखळकर : अध्यक्ष महाराज, ज्या महामंडळाच्या अधिकाऱ्यांना असे वाटते की, एखाद्या बँकेत पैसे गुंतविल्यामुळै आपल्याला अधिक इंटरेस्ट मिळू शकतो, त्या अध्‌किाऱ्यांचे नॉलेज एवढे सामान्य आहे? एखाद्या राष्ट्रीयकृत बँकमध्ये पैसे गुंतविल्यामुळे जास्त इंटरेस्ट मिळू शकतो, त्यामुळे यात अधिकाऱ्यांचा सहभाग असू शकतो. त्यांची सखोल चौकशी केली पाहिजे. आतापर्यंत का केली नाही? आता करणार असाल तर किती दिवसात करण्यात येईल?

तालिका सभाध्यक्ष : मंत्री महोदयांनी आताच सांगितले की, ही चोकशी सीबीआयकडे देण्यात येईल. यामध्ये चॉर्जशीट दाखल झालेले आहे.

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महाराज, या सर्व प्रकरणात तीन कळ्या आहेत. पहिली अधिकाऱ्यामार्फत चालू होते. या प्रकरणाशी संबंधित जो डेस्क असेल त्यांची सुध्दा चौकशी केली जाईल.

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

तालिका सभाध्यक्ष : मंत्री महोदय अतिशय समर्पक असे उत्तर देत आहेत. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण कृपया खाली बसावे आणि मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे.

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महाराज, महामंडळाच्या अधिकाऱ्यामार्फत जेथे जास्त व्याज दर मिळू शकतो अशा ठिकाणी पैसे गुंतविले आहे, त्यांना सुध्दा या सर्व प्रकारात संशयीत म्हणून जबाबदार धरण्यात येईल. बँकेच्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना भेटल्यशिवाय संबंधित एजेंटने हे काम केले नसेल. सर्व संबंधित महामंडळाच्या कक्षाशी संबंधित हे काम असेल त्यांची चौकशी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

टाईम बाऊंड कालावधीत केली जाईल. साधारणत: दोन महिन्याच्या आत या प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : मुंबईतील मालाड (पूर्व) रेल्वे स्थानकावरुन कुरार व्हिलेज, दिंडोशी व मालाड (पूर्व) भागात जाण्याकरिता पश्चिम द्रुतगती महामार्गाखालील भूयारी मार्गाचे रुंदीकरणाबाबतचा प्रस्ताव प्रलंबित असणे

मु. शी. : मुंबईतील मालाड (पूर्व) रेल्वे स्थानकावरुन कुरार व्हिलेज, दिंडोशी व मालाड (पूर्व) भागात जाण्याकरिता पश्चिम द्रुतगती महामार्गाखालील भूयारी मार्गाचे रुंदीकरणाबाबतचा प्रस्ताव प्रलंबित असणे
या संबंधी श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील मालाड ***(पूर्व)*** रेल्वे स्थानकावरुन कुरार व्हिलेज दिंडोशी व मालाड पूर्व भागात जाण्याकरिता पश्चिम द्रुतगती महामार्गाखालील भुयारी मार्गाचे रुंदीकरण करण्याबाबतचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रस्ताव, मालाड रेल्वे स्थानकातून कुरार व्हिलेज, दिंडोशीकडे जाण्याकरीता लाखो नागरिक, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी या मार्गाचा वापर करीत असून या अरुंद भुयारी मार्गामुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची निर्माण झालेली शक्यता, मालाड ***(पूर्व),*** कुरार व्हिलेजमधील हुमेरा पार्क ते दिंडोशी दरम्यानच्या असलेल्या अरुंद रस्त्यावर मोठ्या प्रमाणात होत असलेली वाहतुक कोंडी, परिणामी परिसरातील नागरीक, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी यांची होत असलेली गैरसोय, हुमेरा पार्क, सुगरा पार्क, पठाणवाडी यांचेमधून वसंत व्हॅली, बी.ई.एस.टी डेपोच्या दिशेने जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग या दरम्यानच्या प्रस्तावित डी.पी.रोडवरील अंदाजे ५०० मीटर लांबीच्या क्षेत्रातील ८२ पात्र झोपड्यांचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत पुनर्वसन करुन वाहतुकीसाठी डी.पी.रोड खुला करुन मुख्य रस्त्यास जोडण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, सदरहू भुयारी मार्गाचे रुंदीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासन, एमएमआरडीए तसेच महापालिकेच्या संबंधित विभागाकडे वारंवार पत्रव्यवहार त्याचप्रमाणे नागरिकांनी देखील अनेक वेळा आंदोलने, निदर्शने करुनही कोणतीच

....४

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनिल प्रभू.....

कार्यवाही न होणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल प्रभू : अध्यक्ष महाराज, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये दिलेल्या उत्तराशी मी सहमत नाही. माझे स्पेसिफिक दोन प्रश्न आहेत. पश्चिम द्रुतगती महामार्गाखालील भूयारी मार्गाचे रुंदीकरणासाठी मी स्वत: एमएमआरडीएकडे पाठपुरावा करीत आहे. पावसाळ्यात या भूयारी मार्गाचा कदाचित एखादा भाग कोसळून त्या ठिकाणी अपघात होऊ शकतो. अगदी चिंचोळ्या मागाने लोक कुरार गावाकडे जातात, तो मालाड स्टेशनपासूनचा अतिशय महत्वाचा रस्ता आहे. चेंगराचेंगरीमध्ये अपघात होऊ शकतो. अशा परिस्थित्ीत हे काम तत्काळ करणे आवश्यक आहे. हे काम किती दिवसात सुरु होईल आणि किती कालावधीत सदरचे काम पूर्ण होईल, तसेच लोकांसाठी हा भूयारी मार्ग सर्व्हिस रोड म्हणून कधी सुरु होणार आहे? याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मुंबई महानगरपालिका आणि एसआरए प्राधिकरण यांचेशी संबंधित हे काम आहे. या रस्त्यामध्ये असणाऱ्या पीएपी लोकांना खास बाब म्हणून एसआरए आणि महापालिकेने स्थलांतरित करावे. त्या कामासाठी दिरंगाई झालेली आहे म्हणून हा रस्ता अद्यापपर्यंत झाला नाही. हा रस्ता रहदारीच्यादृष्टीने अतिशय महत्वाचा असल्यामुळे विशेष बाब म्हणून या 84 घरांचे स्थलांतर एसआरए आणि मुंबई महानगरपालिका यांनी संगनमताने करावे. हा रस्ता किती दिवसात सुरु करणार आहात, त्याची तारीख कृपया मंत्री महोदयांनी सांगावी. किती कालावधीत वाहतुकीसाठी खुला करणार आहात? गेल्या अनेक दिवसापासून या रस्त्याचे रुंदीकरणासाठी तसेच भूयारीकरणासाठी अनेकवेळा आंदोलने झाली, अनेकवेळा लोकांनी त्या ठिकाणी उपोषण केले, परंतु त्याचा कोठलाही परिणाम झालेला नाही. या दोन्ही प्रश्नांचे माननीय मंत्री महोदयांनी विशेष उत्तर दिले तर खऱ्या अर्थाने जनतेला याचा फायदा होऊ शकेल.

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महाराज, मालाड (पूर्व) ते व्हिलेज दिंडोशी याला जाणाऱ्या वेस्टर्न एक्सप्रेस हायवेच्या आजुबाजूच्या शाळा कॉलेजमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अडीच बाय अडीच फूट भूयारी मार्गातून जावे लागते. बऱ्याचवेळेला बॉटल नेकिंग होते आणि लाकांना त्रास सुध्दा होतो. सन्माननीय सदस्य गेल्या तीन चार वर्षापासून पाठपुरावा करीत आहेत. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, सप्टेंबर 2015 मध्ये या रस्त्याची मागणी झाली, त्यानंतर दिनांक 5/2/2016

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील...

रोजी प्रकल्प सल्लागाराची नेमणुक केलेली आहे. हा प्रकल्प कम्पोझिट कम्बाईन टेक्नोक्रॉफ्टला दिलेला आहे. दिनांक 10/3/2016 रोजी डीपीआर तयार झालेला असून या प्रकल्पाची प्रशासकीय मान्यत, तांत्रिक मान्यता, टेंडर नोटीस ही सर्व प्रोसेस एप्रिल अखेरपर्यंत करुन घेण्यात येईल. येत्या काळामध्ये पंधरा मीटर बाय पंधरा मीटर, चार मीटर हाईटचे दोन ट्रेन्चेस एक जायला वेगळा आणि यायला वेगळा रस्ता करण्यात येईल. साधारणत: एप्रिल महिन्यापर्यंत वर्क ऑर्डर देण्याची तजवीज केली जाईल. जून महिन्यापर्यंत काम सुरु होईल. वर्क ऑर्डर दिल्यानंतर काम सुरु होईल. सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नासंदर्भात मी सांगू इच्छितो की, दिंडोशी ते पठाणवाडी रोड या 500 ते 700 मीटरमध्ये काही स्ट्रक्चरर्स एसआरएचे आहेत. महानगरपालिकेने जानेवारीमध्ये याचा सर्व्हे सुरु केलेला आहे. इन्व्हेटरी करुन, त्याचे ॲनेक्चर तयार करुन, पात्र, अपात्र निश्चित करुन एसआरएला कळविण्यात येईल. त्या 82 स्ट्रक्चरचे एसआरए प्राधिकरण, म्हाडा आणि महापालिका यांनी मिळून विशेष बाब म्हणून पीएपीनां स्थलांतरित करण्यासंदर्भात देण्यासंदर्भात महानगरपालिकेला सांगण्यात येईल. एसआरएला टाईम बाऊंड कालावधीमध्ये हा रस्ता मोकळा करण्यासाठी सांगितले जाईल.

श्री.सुनिल प्रभू : अध्यक्ष महाराज, मंत्री महोदयांनी टाईम बाऊंड कार्यक्रम सांगितला आहे. येणाऱ्या किती दिवसांमध्ये 82 घरे एसआरए मार्फत शिफ्ट केले जातील आणि किती दिवसात रस्ता वाहतुकीसाठी खुला केला जाईल, यासंबंधी मंत्री महोदयांनी कृपया निवेदन करावे.

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महाराज, सर्व्हे जवळपास झालेलाच आहे. त्यामध्ये ॲनेक्श्चर, इन्व्हेंटरी तयार करावे लागतील. साधारणत: तीन महिन्याच्या आत करुन घेऊ.

श्री.सुनिल प्रभू : तीन महिन्यात रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल असे मंत्री महोदय उत्तर देणार आहेत का?

डॉ.रणजित पाटील : डी.पी. प्लॅन, अलाईनमेंट, त्यानंतर मार्कींग करावे लागेल. तीन महिन्यात रस्ता तयार होणार नाही, तो तयार करावा लागेल.

श्री.सुनिल प्रभू : मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिलेले आहे. महानगरपालिका, आणि एसआरए प्राधिकरणाने मनावर घेतले तर लोकांच्या हिताच्या दृष्टीने तीन महिने रात्रंदिवस काम

..7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल प्रभू...

करुन हे काम पूर्ण होऊ शकते, मंत्री महोदयांनी इच्छाशक्ती दाखवून तीन महिन्यात रस्ता पूर्ण करुन वाहतुकीसाठी खुला केला तर जनतेला पासाळ्यात वाहतुकीसाठी फायदा होऊ शकतो.

डॉ.रणजित पाटील : सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू पोटतीडिकीने गेल्या तीन चार वर्षापासून या रस्त्यासाठी पाठपुरावा करीत आहेत. लवकरात लवकर तीन, चार महिन्यात सदरचा रस्ता लोकांसाठी खुला करण्यात येईल.

श्री.अस्लम शेख : अध्यक्ष महाराज, सदरचा प्रश्न मालाड (पूर्व) चा असला तरी त्याच्या बाजूला लागून मालाड (पश्चिम) मार्वे रोड, अंकल किसन जंक्शनवरील एक फ्लॉय ओव्हरचा प्रस्ताव महापालिकेतर्फे तयार करण्यात आला. मी पाठपुरावा केल्यानंतर आयुक्तांकडून असे उत्तर आले की, तेथे मेट्रोचा यॉर्ड होणार आहे या यार्डाची उंचि निश्चित होत नाही तोपर्यंत आम्ही काही करु शकत नाही.

यानंतर S-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अस्लम शेख .....

माझा मंत्री महोदयांना स्पेसिफिक प्रश्न आहे की, मंत्री महोदयांकडे माहिती असल्यास त्यांनी सांगावे की, यार्ड आणखी 10 वर्ष झाले नाही तर ब्रिज होणार नाही काय, या ब्रिजच्या प्रस्तावाचे टेंडर कधी निघणार, तसेच तेथे यार्ड होणार आहे की नाही ?

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न या लक्षवेधी सूचनेच्या विषयाबाहेरील असला तरी, तो सार्वजनिक हिताचा आहे. त्यांनी ज्या फ्लायओव्हर ब्रिजबाबत सांगितले आहे मेट्रो यार्डमुळे त्याच्या हाईटवर रेस्ट्रिक्शन्स आहेत. त्यामुळे आपल्याला ते करता येत नाही. तेथे यार्ड होणार आहे की नाही आणि या फ्लायओव्हरचे पुढे काय होणार, किती वर्षात तो होणार आहे याची माहिती घेतली जाईल आणि सन्माननीय सदस्यांना दिली जाईल.

तालिका सभाध्यक्ष (श्री. सुभाष साबणे) : सन्माननीय सदस्य आपला प्रश्न लक्षवेधी सूचनेच्या विषयाबाहेरील आहे.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न लक्षवेधी सूचनेच्या स्कोपमध्ये नाही. सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू यांनी एका सबवेच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्याचा खुलासा मंत्री महोदयांनी केलेला आहे. मुंबई शहरामध्ये कांदिवली येथील हुतात्मा राजगुरु उड्डाणपूल हायवेला जोडण्यामध्ये 70 ते 80 झोपड्या येतात. बोरिवली येथील शामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपूल वेस्टर्न एक्सप्रेस हायवेला जोडण्यामध्ये तेथील झोपडपट्टया मध्ये येतात. त्यामुळे एस.व्ही. रोड येथे ट्रॅफिकचा मोठा प्रश्न निर्माण होतो. असे जे जे प्रश्न आहेत, ज्यामध्ये एसआरए, एमएमआरडीए व मुंबई महानगरपालिका संबंधित आहेत, तेथे अशा तिन्ही विभागाच्या आयुक्त किंवा अधिकाऱ्यांना घेऊन तसेच एसआरएच्या सीईओंना घेऊन अशा रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित होणाऱ्या एसआरएमुळे रस्ता रुंदीकरण होत नाही अशांची बैठक एक महिन्याच्या आत मुंबई शहराच्या ज्या ज्या उपनगरामध्ये असे प्रश्न आहेत, त्याबाबत तेथील नगरसेवकांनी आपल्याला पत्र दिली आहेत, त्याबाबत मंत्री महोदय त्यांच्या दालनात बैठक घेणार आहेत काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, वेगवेगळ्या उपनगरातील विविध उड्डाणपूलांना घेऊन निश्चितपणे बऱ्याच जागेवर असे आहे की, जेथे, एसआरए, महापालिका व एमएमआरडीए यांच्या को-ऑर्डिनेशनमुळे जेथे जेथे रस्ता रुंदीकरणाचे किंवा उड्डाणपूल किंवा सबवेचे असतील या सर्वांना घेऊन संबंधित जे सन्माननीय सदस्य असतील त्यांचे काही विशिष्ट प्रश्न असतील त्या सर्व प्रश्नांना घेऊन आपण एक बैठक या महिन्याच्या आत माझ्या दालनात लावू.

ॲड. पराग अळवणी : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू यांनी ही लक्षवेधी सूचना मांडताना असे म्हटले आहे की, या अरुंद भुयारी मार्गामुळे भविष्यात मोठ्या दुर्घटना होण्याची शक्यता आहे. तसेच, 82 पात्र झोपड्यांच्या पुनर्वसनाचीसुध्दा आवश्यकता आहे. मुंबईत ठिकठिकाणी अशा पध्दतीचे अनेक प्रकल्प जे अत्यंत आवश्यक आहेत, जेथे दुर्घटना होऊ शकतात, वाहतुकीचा खोळंबा होतो असे अनेक प्रकल्प अशा पध्दतीने पुनर्वसनामुळे अडकून पडले आहेत. स्थानिक ठिकाणी पुनर्वसन झाले तर, अनुभव असा येतो की, ज्या ज्या ठिकाणी एमएमआरडीएने झोपडपट्टीवासींना स्थानिक ठिकाणी पुनर्वसन दिले आहे, त्या ठिकाणी विलंब होत नाही, प्रकल्प लवकर होतो. त्या दृष्टिकोनातून सध्या मुंबई महानगरपालिकेचा नवीन विकास आराखडा तयार होत आहे. नवीन विकास आराखड्यामध्ये अशा पध्दतीचे स्थानिक पुनर्वसन मिळण्याच्यादृष्टीने प्रत्येक ॲडमिनिस्ट्रेटिव्ह वॉर्डवाईज किंवा प्रत्येक उपनगरात पिनकोडवाईज हाऊसिंग फॉर डिसहाऊस प्रकल्पबाधितांसाठी घरे यासाठी आरक्षित भूखंडांची आवश्यक तरतूद विकास आराखड्यामध्ये व्हावी यासाठी महानगरपालिकेला निर्देश दिले जातील काय ?

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. पराग अळवणी यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, अशा बऱ्याच जागेवर पुनर्वसनासाठी काही व्यवस्था नसल्याने बऱ्याचदा हे प्रकल्प रखडतात. त्यामुळे नवीन विकास आराखड्यामध्ये आपल्याला हाऊसिंग फॉर डिसहाऊस यासाठी काही आरक्षण ठेवले जाणार आहे काय, असे त्यांनी विचारलेले आहे. आपल्याला निश्चितपणे आपल्याकडून अशा काही सूचना, अशा गाईडलाईन्स देता आल्या तर निश्चितपणे महापलिकेला आपण याबाबतीतील काही सूचना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील .....

देऊ जेणेकरून यापुढचा विकास आराखडा तयार होत असताना त्यामध्ये हाऊसिंग फॉर डिसहाऊस यांच्यासाठी काही आरक्षणे प्रस्तावित करता आली तर निश्चितपणे मुख्य सचिवांमार्फत त्याला मॉनिटरिंग करता येईल आणि त्यांना तशा सूचनाही देता येतील.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू आपण शेवटचा प्रश्न विचारावा.

श्री. सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी मुख्य सचिवांचा उल्लेख केलेला आहे. मी मुख्यमंत्री महोदयांचे या सदनामध्ये मनापासून आभार व्यक्त करणार आहे, अभिनंदन करणार आहे की, एमएमआरडीएचा भुयारी मार्ग करण्याबाबत स्वतः मुख्यमंत्री महोदयांनी मुख्य सचिवांना दूरध्वनी केला. त्या संदर्भात बैठक झाली, सर्व एजन्सी एकत्र येऊन आज ते काम येथपर्यंत आलेले आहे. आपण सभागृहात असे जाहीर केले की, एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यामध्ये किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यामध्ये हे काम सुरु होईल. हा खरोखरच या सरकारने घेतलेला एक चांगला निर्णय आहे.

आज हुमेरा पार्क ते दिंडोशी या दरम्यानच्या रस्त्याच्या बाबतीत मंत्री महोदयांनी 3 ते 4 महिन्यांत काम पूर्ण होईल असे सांगितलेले आहे. परंतु, हे काम मुंबई महानगरपालिका, एसआरए प्राधिकरण व म्हाडा अशा 3 एजन्सीमार्फत होणार आहे. हा सर्व गुंता सोडविण्यासाठी मी स्वतः आमदार म्हणून वरिष्ठ स्तरावर एसआरए, महापालिका आयुक्त यांच्याकडे बैठका घेतल्या. हे सर्व को-ऑर्डिनेट करण्यासाठी एका वरिष्ठ एजन्सीने त्यांच्यावर मॉनिटरिंग करणे आवश्यक आहे. मंत्री महोदयांनी सकारात्मकदृष्ट्या 4 महिन्यांत हे काम सुरु होईल, लोकांच्या हितासाठी हा रस्ता खुला होईल असे म्हटले आहे. तरीही हे काम होण्यासाठी दर महिन्याला यावर मॉनिटरिंग करण्यासाठी एक वरिष्ठ अशा पध्दतीची यंत्रणा या रस्त्याच्या कामकाजाविषयी माहिती घेण्यासाठी ठेवली तर, अशा अडचणी दूर होतील. अशा पध्दतीची यंत्रणा या संपूर्ण रस्त्याच्या कामाबाबत माहिती घेऊन काम करणार काय, असा माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, ही गोष्ट सत्य आहे. मी याबाबतचे टाईमटेबलच आता दिलेले आहे. या सबवेच्या प्रकल्पाकरिता 5 फेब्रुवारीला प्रकल्प सल्लागाराची नेमणूक केली, 10 मार्चला डीपीआर तयार झाला. मला असे वाटते की, हे काम इतके टाईमबाऊंड होत आहे. तरीही सन्माननीय सदस्यांना शंका असेल की, या सर्व कामामध्ये ....

श्री. सुनील प्रभू : मी असे म्हटले की, सबवे वेगळा आहे आणि हा रस्ता वेगळा आहे. रस्त्याचे काम किचकट आहे. 3 एजन्सी एकत्र येऊन हे काम करणार आहेत. त्यामुळे यावर मॉनिटरिंग करणे आवश्यक आहे. कारण महापालिका आयुक्त व एसआरएचे सीईओ आणि म्हाडाचे सीईओ या 3 एजन्सींनी व्यवस्थित इच्छाशक्तीने काम केले तरच हे काम टाईमबाऊंड पूर्ण होऊ शकते. एकात एक असे सर्व एजन्सीचे अनेक प्रश्न गुंतलेले आहेत, याकरिता यावर मॉनिटरिंग होणे आवश्यक आहे. असे मॉनिटरिंग करण्यासाठी आपण एखादी एजन्सी नियुक्त करणार आहात काय ? आपण अशी एजन्सी नियुक्त केली तर आपण कामासाठी जो टाईमबाऊंड कार्यक्रम दिलेला आहे, त्या काळात हे काम पूर्ण होऊ शकेल.

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या रस्त्याच्या बाबतीत खरोखर एसआरए, महापालिका, एमएमआरडीए अशा मल्टिपल एजन्सी काम करीत आहेत. आपल्याला हे माहीत आहे की, एसआरए किंवा महापालिकेचे जे अनेक्श्चर आहे, तसेच बाकी पात्रता निश्चिती यासाठी एक को-ऑर्डिनेशन झाले पाहिजे. मल्टीपल एजन्सींना घेऊन कोणीतरी को-ऑर्डिनेट करण्यासाठी आपल्याला मुख्य सचिवांमार्फत याचे मॉनिटरिंग करता येईल. शासनातर्फे मुख्य सचिवांनाही तसे निर्देश देण्यात येतील की, या रस्त्यासाठी ज्यामध्ये अर्धा रस्ता आहे, अर्धा रस्ता घ्यायचा आहे, ज्यामध्ये फक्त 84 स्ट्रक्चर आहे, परंतु, ते 4-5 वर्षांपासून होत नाही, कारण त्यामध्ये मल्टीपल एजन्सी इन्व्हॉल्व्ह आहेत, त्यामुळे हे सर्व मॉनिटर करायला आणि को-ऑर्डिनेट करण्याबाबत निश्चितपणे मुख्य सचिवांमार्फत याचे मॉनिटरिंग होईल, या पध्दतीने निदेश देण्यात येतील.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

लक्षवेधी सूचना क्रमांक 3 बाबत

तालिका सभाध्यक्ष : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक 3 पुढे ढकलण्यात आलेली आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, ही लक्षवेधी सूचना चर्चेकरिता कधी घेणार ?

तालिका सभाध्यक्ष : ते अध्यक्ष महोदय ठरवतील.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मी मघाशीही याबाबत ऑब्जेक्शन घेतले होते. आता मी पुन्हा ऑब्जेक्शन घेण्यासाठी उभा राहिलेलो नाही. परंतु, मला आपल्याला फक्त एवढेच सांगावयाचे आहे की, लक्षेवधी सूचनेचा कामकाजपत्रिकेवर सिक्वेन्स दर्शविलेला आहे. मात्र आपण कधी चौथी, कधी दुसरी, कधी पहिली, त्यानंतर तिसरी लक्षवेधी सूचना चर्चेकरिता पुकारली असे दिसते. ज्या सन्माननीय सदस्यांनी या लक्षवेधी सूचना उपस्थित केलेल्या आहेत, ते आमदार सभागृहात उपस्थित आहेत किंवा लक्षवेधी सूचना एकदा सभागृहात मांडल्यानंतर ती सभागृहाची प्रॉपर्टी होते. परंतु, लक्षवेधी सूचनेच्या चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा आहे, अशा आशेने सभागृहात किंवा लॉबीत बसलेल्या सन्माननीय सदस्यांना त्यामध्ये भाग घेता येत नाही.

तालिका सभाध्यक्ष : आपण आजच्या कामकाजपत्रिकेत चौथ्या क्रमांकावर दर्शविलेली लक्षवेधी सूचना प्रथम चर्चेकरिता घेतली कारण, माननीय श्रीमती पंकजा मुंडे यांना विधानपरिषद सभागृहात कामकाजाकरिता जायचे होते.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, कामकाजपत्रिकेतील सिक्वेन्सप्रमाणे आपण ज्यावेळेस ती लक्षवेधी सूचना चर्चेकरिता घेऊ त्यावेळेस मंत्री महोदयांनी विनंती केली तर, आपण आम्हाला सांगू शकता की, मंत्री महोदय आल्यावर ही लक्षवेधी सूचना चर्चेकरिता घेऊ. परंतु, मंत्री महोदय येऊन बसणार व आपण लक्षवेधी सूचना पुकारणार व लगेच प्रश्नोत्तरे सुरु झाल्यास सन्माननीय सदस्यांना हे माहीतच नसते की, मंत्री महोदयांना सोयीचा वेळ कधी आहे ? मंत्री महोदयांच्या सोयीने सभागृह चालते की, सभागृहाच्या सोयीने मंत्री महोदय चालतात, याचे स्पष्टीकरण करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य चौथी लक्षवेधी सूचना आपण याकरिता प्रथम चर्चेकरिता घेतली कारण मंत्री महोदयांचे विधानपरिषद सभागृहात कामकाज होते. सन्माननीय सदस्य डॉ. जयप्रकाश मुंदडा आणि सभागृहाला मी हे सांगू इच्छितो की, माननीय ग्रामविकास मंत्री महोदया श्रीमती पंकजा मुंडे यांना विधानपरिषद सभागृहात जायचे होते.

T-1/....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष.....

इतर सर्व लक्षवेधी क्रमाप्रमाणेच सुरु आहेत. आता आपण तिसरी लक्षवेधी सूचना पुढे ढकलेली आहे. माननीय अध्यक्ष यांच्यासोबत चर्चा करुन ही लक्षवेधी केव्हा घ्यायची हे ठरविले जाईल.

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, चर्चा करीत असताना सोयीने क्रमवारी बदलली जाते. मी मघाशी सांगितले होते. खरे म्हणजे विधिमंडळाच्या सचिवांवर मला हक्कभंग आणावा लागणार आहे. कंत्राटी कामगारांचे बील ऑनलेग असताना ते चौथ्या क्रमांकावर दाखविण्यात आले. इतर दोन बिले केलेली आहेत. मी कायद्याची माहिती घेतो आणि अशा प्रकारे जर कामकाज चालत असेल तर नाईलाजाने विधिमंडळाच्या सचिवावर हक्कभंग किंवा पॉईंट ऑफ प्रोसिजर प्रमाणे कारवाई करण्याबाबत अध्यक्ष महोदयांना न्याय मागावा लागेल. ही कामकाज करण्याची पद्धत नाही. संबंधित मंत्री महोदयांना वेळ नसेल तर कामकाज पत्रिकेवर लक्षवेधी सूचना दाखवायची गरज नव्हती. आपण निदेश द्यावे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आपण मघाशी सांगितले की, माननीय मंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे यांना वरील सभागृहामध्ये कामकाज आहे. त्या येथेच बसलेल्या आहेत.

तालिका सभाध्यक्ष : माननीय मंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे ह्या वरील कामकाज करुनच येथे आल्या आहेत.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे ह्या आता आल्या असल्या तरी त्यांचा त्यावेळी नंबर आलाच असता. त्यामुळे सिकवेन्स बदलताना किती बदलावा याबाबत विचार व्हावा. तसेच सभागृहाला विश्वासात न घेता सिकवेन्स बदलण्याचे काम करणे म्हणजे लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम आज दिवसभर आपण करायचे ठरविले असेल, किंवा सरकारी पक्षाकडून असे काम होणार असेल तर कसे होणार. त्यामुळे आपण मंत्री महोदयांना समज द्यावी.

तालिका अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील मी आपणास सांगू इच्छितो की, लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रश्न येत नाही. आपल्याकडे विधानपरिषद व विधानसभा ही दोन सभागृह आहेत. माननीय मंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे याचा विधानपरिषद सभागृहामध्ये प्रश्न असल्यामुळे आपण प्रथम चौथी लक्षवेधी सूचना पुकारलेली आहे. त्यामुळे आपण पहिली लक्षवेधी सूचना घेतली. आता आपला क्रम चालू आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, माझी पॉईंट ऑफ ईन्फॉर्मेशन आहे. आपल्या माध्यमातून मला सभागृहाला माहिती द्यायची आहे. माझ्या मतदार संघात 15 मिनिटांपूर्वी 9 वर्षाच्या मुलीला पाणी आणण्यासाठी तिच्या आईने बाहेर पाठविले. पाणी आणायला रेल्वे रुळ ओलांडून जावे लागते. पाणी आणायला जाताना ती रेल्वे रुळामध्ये अडकली आणि तिचा मृत्यू झाला. आमच्या येथे पाण्याच्या डिस्ट्रीब्युशनमध्ये इक्वॅलिटी नाही. मी हा मुद्दा सातत्याने सभागृहामध्ये मांडला आहे. एका भागात खूप पाणी जाते तर एका भागत खूप कमी पाणी जाते. आई वडील त्यांच्या मुलांना शाळा बुडवून चार चार किलोमीटर पाणी आणण्यासाठी पाठवितात आणि त्यातच आज हा बळी गेलेला आहे. आता रेल्वे लोकल सुरु झालेल्या आहेत. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. या घटनेची शासनाने गंभीर देखल घ्यावी. हाता, तोंडाला आलेल्या 9 वर्षाच्या मुलीचे पाण्यासाठी दोन तुकडे झाले. आज महाराष्ट्रात महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती साजरी होत असताना पाण्यासाठी मुलीचा मृत्यू झालेला आहे.

तालिका अध्यक्ष : याबाबत सरकारने नोंद घ्यावी.

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, नोंद घेतलेली आहे.

---*---

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : राहुरी (जि.अहमदनगर) नगरपालिकेच्या ग्रामीण रुग्णालयात साधनसामुग्री नसल्यामुळे सध्या या रूग्णालयात रूग्णांना फक्त जुजबी औषधोपचार करण्यात येणे तसेच रूग्णालयाची इमारत धोकादायक असणे

मु. शी. : राहुरी (जि.अहमदनगर) नगरपालिकेच्या ग्रामीण रुग्णालयात साधनसामुग्री नसल्यामुळे सध्या या रूग्णालयात रूग्णांना फक्त जुजबी औषधोपचार करण्यात येणे तसेच रूग्णालयाची इमारत धोकादायक असल्यासंबंधी सर्वश्री जयंत पाटील, हनुमंत डोळस, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, सुरेश लाड वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयंत पाटील (इस्लामपूर) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राहुरी (जि.अहमदनगर) नगरपालिकेच्या रूग्णालयाचे 4 वर्षापूर्वी ग्रामीण रुग्णालयात करण्यात आलेले रुपांतर सध्या या रूग्णालयात रूग्णांना फक्त जुजबी औषधोपचार करून घरी पाठविण्यात येणे, गंभीर रूग्णांना तपासण्यासाठी या रूग्णालयात ईसीजी मशिन, सिटी स्कॅन व इतर मशिन्स उपलब्ध नसणे, त्यामुळे रूग्णांना बाहेरून या तपासण्या कराव्या लागणे, या रूग्णालयात अतिदक्षता विभाग, शस्त्रक्रिया, क्ष-किरण यासारखे स्वतंत्र विभाग नसल्यामुळे रूग्णांची होत असलेली हेळसांड, कोणत्याही प्रकारची साधनसामुग्री या रूग्णालयात नसल्यामुळे तेथील वैद्यकीय अधिकारी कोणत्याही प्रकारची जबाबदारी घेत नसणे, या रूग्णालयाची इमारत धोकादायक असल्यामुळे नगरपालिका प्रशासनाने संबंधितांना इमारत धोकादायक असल्याची नोटीस देणे, रूग्णालयाची इमारत कधीही पडून जिवित हानी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

होण्याचा निर्माण झालेला धोका, या रूग्णालयासाठी लाखो रूपये खर्च करून खरेदी केलेले साहित्य परत पाठवून देण्याची प्रशासनावर आलेली नामुष्की, परिणामी गरीब रुग्णांमध्ये पसरलेला असंतोष, तेथील रूग्णांना योग्य उपचार करून देण्याबाबत व रूग्णालयांची इमारत दुरूस्त करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

प्रा. राम शिंदे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

अध्यक्ष/सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, राहुरी नगरपालिकेने आपली इमारत ग्रामीण रुग्णालयासाठी देऊ केली आणि ती आता पडण्याच्या संकटात आलेली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी 24 ऑगस्ट रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे की, ती इमारत धोकायदायक झालेली आहे. ग्रामीण रुग्णालय सुरु केल्यावर तेथे 3 डॉक्टर्स आहेत. जवळजवळ 19 पदे आहेत. सर्वांचा पगार सुरु आहे. परंतु या ग्रामीण रुग्णालयामध्ये कोणत्याही प्रकारची ऑपरेशन्स होत नाहीत. कोणत्याही प्रकारचे उपचार होत नाहीत. तेथे केवळ ओपीडी सुरु आहे. याचे प्लॅन इस्टीमेंट तयार झालेले आहे. ते आता चीफ इंजिनिअरकडे आलेले आहे. ऑपरेशन कक्ष बंद आहे. आपल्या उत्तरातही आपण म्हटले आहे की, सर्व पेशंटना दुसऱ्या काही रुग्णालयामध्ये रेफर केले जाते. ही इमारत तातडीने उभी करण्याची गरज आहे. याकरिता जागा उपलब्ध करण्यात आलेली आहे. मल्टी स्टोरेज इमारतीचा तयार झालेल्या प्लॅनला तातडीने मान्यता देऊन एका वर्षाच्या आत हे रुग्णालय करण्याचा प्रयत्न करणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे.

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नासंदर्भात मी सांगू इच्छितो की, या संदर्भात निश्चित स्वरुपात 25 पदे बृहत आराखड्यानुसार मंजूर असून त्यापैकी 19 पदे भरलेली आहेत. त्यानुसार बाह्यरुग्ण, आंतररुग्ण, तसेच ज्या ज्या ट्रीटमेंट दिल्या, त्या सर्व सविस्तरपणे लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिलेल्या आहेत. काही गंभीर आजाराचे पेशंट असतील तर त्यामध्ये रेफरन्स देखील केलेले आहे. दिनांक 24.08.2015 रोजी राहुरी नगरपालिकेने सदरील इमारत 70 वर्षापूर्वीची जुनी असल्यामुळे येथे नवीन इमारत प्रस्तावीत करावी, असा ठराव केलेला आहे. त्या दृष्टीकोनातून शासनाने आवश्यक ती कार्यवाही केलेली आहे. यासंदर्भात आराखडा तयार करण्यात आलेला आहे. मुख्य अभियंता, औरंगाबाद यांच्याकडे तांत्रिक मान्यतेसाठी आराखडा दिलेला आहे. ही इमारत टाईप प्लॅन प्रमाणे बांधू शकलो नाही, याचे कारण म्हणजे तेथे जागेची उपलब्धता कमी होती. त्यामुळे मल्टी स्टोरेज बिल्डींग बांधायची असल्याने त्यास वेगळी तांत्रिक मान्यता घेण्याची आवश्यकता भासली. परंतु ही तांत्रिक मान्यता लवकरात लवकर देण्याच्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्याला निर्देश देण्यात येतील. तसेच यासंदर्भात निधीची अडचण नाही. तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यता होईल. परंतु त्याच तत्परतेने त्याला निधी देखील उपलब्ध करुन ही बिल्डींग बाधण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही शासन करेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, हा नगर जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयासंदर्भातील प्रश्न आहे. यासंदर्भात जागेची कमतरता असल्यामुळे तेथे विशेष बाब म्हणून मल्टी स्टोरेज बिल्डींग बांधणार आहात, हा मंत्री महोदयांनी धोरणात्मक निर्णय घेतला. माझ्या मतदार संघातील मल्हारपेठ येथील ग्रामीण रुग्णालय जागा नसल्यामुळे गेली पाच वर्षापासून थांबलेले आहे. तेथे देखील मल्टी स्टोरेज करण्याची गरज आहे. ते ग्रामीण रुग्णालय मंजूर आहे. अधिकारी सांगतात की, मल्टी स्टोरेजची मान्यता नाही. राहुरी येथील रुग्णालयाकरिता लावलेला नियम व केलेले धोरण याप्रमाणे मल्हारपेठला कमी जागेमध्ये मल्टीस्टोरेज बसवून ते काम चालू करणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे.

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, होय.

श्री. समिर कुणावार : अध्यक्ष महोदय, हा विषय अत्यंत महत्वाचा असून ग्रामीण आरोग्याशी निगडीत आहे. हा प्रश्न राहुरी पुरता मर्यादित असला तरी आमच्या भागात असाच प्रश्न आहे. माझ्या भागात पाच वर्षापूर्वी ट्रामा केअर युनिटकरिता पाच कोटी रुपये खर्च करुन इमारत बांधण्यात आलेली आहे. परंतु ते अजूनपर्यंत सुरु झालेले नाही. माझे गाव हायवेवर आहे. तेथे दररोज अपघात होतात. आतापर्यंत शेकडो लोकांचा मृत्यू झालेला आहे. अपघात झाल्यास त्यांना 60, 70 किलोमीटर अंतरावर शिफ्टींग करावे लागते. याकरिता मी खूप प्रयत्न करीत आहे. आपणास विनंती आहे की, हे ट्रामा केअर युनिट लवकरात लवकर सुरु करण्यात यावे. तसेच ग्रामीण भागातील अनेक पदे रिक्त आहेत. याकरिताही आम्ही खूप पाठपुरावा करीत आहोत. ही पदे तातडीने भरण्याची आवश्यकता आहे. ही पदे केव्हा भरण्यात येणार आहे, हा माझा दुसरा प्रश्न आहे. तसेच टीएचओ म्हणजेच तालुका हेल्थ ऑफीसर हे मुळात डॉक्टर आहेत. डॉक्टर असूनही त्यांच्याकडे केवळ कागदोपत्री काम करण्याची जबाबदारी आहे. संपूर्ण महाराष्ट्रात साधारणत: 250 टीएचओ असतील. त्यांना तेथून काढल्यास त्यांच्यामार्फत महाराष्ट्रातील 250 डॉक्टरांचे काम केले जाऊ शकते. त्यामुळे 250 डॉक्टरांचे काम कमी होईल. त्यामुळे या टीएचओ यांना डॉक्टर पदी नियुक्ती देणार आहात काय, हा माझा तिसरा प्रश्न आहे. मंत्री महोदयांकडून योग्य उत्तराची अपेक्षा आहे. धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. समिर कुणावार यांनी सांगितले की, त्यांच्या भागात ट्रामा केअर युनिट उभे आहे परंतु सुरु झालेले नाही. परंतु ते कशामुळे सुरु झालेले नाही, याबाबत काही प्रश्न उपस्थित केला नाही. ही लक्षवेधी राहुरी नगरपालिकेच्या ग्रामीण रुग्णालयासंदर्भातील आहे. त्यांच्या प्रश्नांसंदर्भात सन्माननीय सदस्य ज्या अडचणी देतील त्यासंदर्भात विशेष लक्ष घालून त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने विभागाला निदेश देण्यात येतील. तसेच त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील रिक्त पदासंदर्भात प्रश्न उपस्थित केला. वेगवेगळे निर्णय आपण या आरोग्य विभागाच्या माध्यमातून इतर कोणत्याही विभागामध्ये घेतले नाही. सातत्याने डॉक्टरांची कमतरता भासते, त्यामुळे वेगवेगळे निर्णय घेतले, ते आपण वेळोवेळी जाहीर केलेले आहेत. त्यांनी टीएचओ डॉक्टर असतात आणि ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ऑफिसर म्हणून काम करतात असे सांगितले. ते कागदोपत्री काम करीत असतात असे त्यांनी सांगितले. ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ऑफिसर आणि डॉक्टर या दोन्ही बाबी करीत असल्यामुळे तालुका हेल्थ ऑफिसर ते काम करीत असतो. ट्रामा केअर, रिक्त पदे आणि टीएचओ यांच्या संदर्भात त्यांनी काही सजेशन किंवा ॲप्लीकेशन दिल्यास त्याबाबत निश्चितपणे सकारात्मक दृष्टीकोनातून विचार करण्यात येईल.

...U/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी लक्षवेधीस सकारात्मक उत्तर दिले आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2003 मध्ये सदरहू ग्रामीण रुग्णालयास मंजूरी मिळालेली असून ते सन 2004 मध्ये नगरपालिकेच्या इमारतीमध्ये सुरु करण्यात आले होते. सदरहू रुग्णालयातील बरीचशी उपकरणे नादुरुस्त आहेत. सदरहू रुग्णालयाची इमारत लवकर बांधण्यात यावी, हा लक्षवेधी मांडण्याचा उद्देश आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम प्रशासकीय कामामुळे बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित आहे. सदरहू रुग्णालयाची इमारत बांधण्याकरिता वर्ष ते दीड वर्षाचा कालावधी लागेल हे मी समजू शकतो. परंतु सदरहू इमारतीस प्रशासकीय मान्यता देऊन टेंडर काढण्याची प्रोसेस 6 महिन्यांच्या आत करण्याचे आश्वासन मंत्री महोदय देतील काय ?

श्री.राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी प्रश्न उपस्थित करीत असताना दिनांक 24 ऑगस्ट, 2015 रोजीच्या ठरावाबाबत सांगितले. सदरहू रुग्णालयाचा ठराव करुन आठ महिन्यांचा कालखंड झालेला आहे. या कालावधीमध्ये इमारतीच्या नकाशांचे कामकाज करण्यात आले असून सदरहू प्रकरणी इस्टिमेट तयार करुन मुख्य अभियंता यांचेकडे पाठविण्यात आले आहे. सदरहू इमारत टाईप प्लॅननुसार असती तर हा मुद्दा उपस्थित झाला नसता. परंतु सदरहू इमारत ही टाईप प्लॅन मध्ये नसून ती मल्टीस्टोरेज बांधावयाची हे व कमी क्षेत्रामध्ये सर्व स्ट्रक्चर अकोमोडेट करावयाचे आहे. त्याकरिता नवीन डिझाईन सँक्शन करण्याचा प्रयत्न आहे. सन्माननीय सदस्यांच्या मागणीनुसार सदरहू इमारतीच्या कामास 6 महिन्यांच्या आत सुरुवात करण्यासंदर्भात आवश्यक त्या अधिकाऱ्यांना व विभागांना सूचना देण्यात येतील.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XXI OF 2016.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHYAT SAMITIS ACT, 1961.)

श्रीमती पंकजा मुंडे (ग्रामविकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 21 (महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 यात आणखी सुधारणा करण्यासाठी) मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागते.

प्रश्न प्रस्तुत झाला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभाध्यक्ष (श्री.सुभाष साबणे) : अनुमती देण्यात आली आहे.

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 21 मांडते.

तालिका सभाध्यक्ष : विधेयक मांडण्यात आले आहे.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : योग व निसर्गोपचार विधेयक

L.A. BILL NO. XXII OF 2016.

(A BILL TO PROVIDE FOR THE DEVELOPMENT OF YOGA AND NATUROPATHY BY REGULATEING THE TEACHING AND PRACTICE THEREOF AND TO DEAL WITH CERTAIN OTHER MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.विनोद तावडे (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 2 (योग व निसर्गोपचार यांच्या अध्यापनाचे आणि त्यांच्या व्यवसायाचे विनियमन करुन त्याद्वारे त्यांचा विकास करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक इतर विवक्षित बाबींच्या संबंधात तरतूद करण्याकरिता) मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभाध्यक्ष (श्री.सुभाष साबणे) : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 21 मांडतो.

तालिका सभाध्यक्ष : विधेयक मांडण्यात आले आहे.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, यापूर्वी अध्यक्ष महोदयांनी तालिकेवरुन कोणती घोषणा केली हे पीठासीन अधिकारी यांनी तालिका सभाध्यक्षांना सांगितले पाहिजे. विधानसभा अध्यक्षांनी यापूर्वी सांगितले आहे त्याबाबत पीठासीन अधिकारी यांनी तालिका सभाध्यक्षांना ब्रीफ करावे.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील उपोषणाहून आल्यानंतर म्हणाले होते की, कार्यक्रम पत्रिकेमध्ये दर्शविल्याप्रमाणे कामकाज घ्यावे. आता आपण त्याप्रमाणे कामकाज करु या.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, यापूर्वी विधासभा अध्यक्ष यांनी सांगितले आहे की, लक्षवेधीचे कामकाज झाल्यानंतर नियम 293 अन्वये उपस्थित प्रस्तावावर मंत्री महोदयांच्या उत्तराने सुरुवात करण्यात येईल व उर्वरित प्रस्तावार आज चर्चा करु, त्यानंतर पुढील कामकाजाबाबत विचार करु. सदरहू भाष्य विधानसभा अध्यक्षांनी सभागृहामध्ये केले` व दालनामध्येही केले आहे.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर यांना बोलण्यास अनुमती देण्यात येत आहे.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, विधानसभा अध्यक्ष महोदयांनी सांगितलेली माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. सदरहू बाब रेकॉर्डवरुन तपासून घेण्यात यावी. अशा प्रकारचा विषय सदनामध्ये झाला असेल तर त्याबाबत सेक्रेटरीएट डिपार्टमेंटला विचारणा करण्यात यावी. या सभागृहामध्ये सर्व सन्माननीय सदस्य निवडून येतात. वरिष्ठ सन्माननीय सदस्यांकडे कदाचित अधिकची माहिती असेल परंतु थोडीशी माहिती नवीन सन्माननीय सदस्यांनाही असते. सभागृहातील कामकाजासंदर्भात माझा एकाधिकार आहे, असे कोणाच्या मनामध्ये ठसवून देण्याची आवश्यकता नाही.

तालिका सभाध्यक्ष : कामकाज पत्रिकेनुसार म.वि.स.नियम 293 अन्वये प्रस्तावावरील चर्चेस मंत्री महोदयांकडून उत्तर देण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुलाबराव पाटील यांनी आपल्या आसनावर बसावे. सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर यांना बोलण्यास परवानगी देण्यात येत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, आपण विधानसभा अध्यक्ष महोदयांचे म्हणणे कामकाजातून तपासून पहावे. सदरहू मुद्यासंदर्भात माननीय विधानसभा अध्यक्षांनी काही सांगितले असेल तर तो त्यांचा अधिकार आहे, त्यानुसार आपण त्याचे पालन केले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर असा आहे की, सदरहू बिल पुढे चर्चेला येणार आहे हे कार्यक्रम पत्रिकेवर छापण्यात आले आहे. परंतु अध्यक्ष स्थानी जे कोणी बसले असतील व त्यांनी जे निर्देश दिले असतील ते सभागृहातील सर्वांना बंधनकारक आहेत. माननीय विधानसभा अध्यक्षांचे म्हणणे असेल की संबंधित बिल ऑन लेग आहे तर त्यावरील कामकाज प्रथम करण्यात यावे. सदरहू मुद्दा प्रोसिडींगमध्ये असल्यास त्याबाबतची माहिती सेक्रेटरीएट डिपार्टमेंटकडून घ्यावी व त्यानुसार कामकाज करावे. अन्यथा कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेल्या विधेयक क्रमांक 16 वरील कामकाज घेण्यात यावे, असा माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये नियमाप्रमाणे विधेयके दाखविलेली आहेत. त्यामध्ये कंत्राटी कामगारांचे विधेयक पहिले दर्शवावयास पाहिजे होते, ज्या विधेयकावर चर्चा सुरु आहे, ज्यावर सन्माननीय सदस्य ऑन लेग आहेत ते विधेयक चौथ्या क्रमांकावर दाखविण्यात आले व त्याआधी तीन विधेयके दाखविण्यात आली आहेत, ही बाब मी सभागृहाचे कामकाज सुरु झाले त्यावेळी निदर्शनास आणून दिली होती. कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेल्या दोन वित्त विषयक विधेयकासंदर्भात माझे काही म्हणणे नाही.

यानंतर V-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझे म्हणणे एवढेच आहे की, ज्यावेळी या संदर्भात आम्ही आमच्या भावना माननीय अध्यक्षांच्या चेंबरमध्ये जाऊन व्यक्त केल्या त्यावेळी माननीय अध्यक्षांनी त्यास सहमती दर्शविली होती. केवळ चेंबरमध्ये सहमती दर्शविली असे नाही तर मघाशी या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील बोलले, माननीय मुख्यमंत्री बोलले अनेक सन्माननीय सदस्य बोलले आणि त्यानंतर कामकाज सुरू झाले. त्यावेळी मी स्पेसिफिक विचारले होते की, आजची कामकाज पत्रिका पुढे कशा पध्दतीने राहणार आहे. त्यावेळी सन्माननीय अध्यक्षांनी सांगितले की, या लक्षवेधी सूचना झाल्यानंतर आपण पहिल्यांदा आधी झालेल्या चर्चेवरील उत्तर आपण पूर्ण करु आणि मग उरलेल्या दोन चर्चा एकत्रित करुन त्यावर चर्चा करु आणि त्यानंतर आपण बिलावर चर्चेला सुरूवात करु हे अध्यक्ष महोदय बोलले आहेत. आम्ही बोललेल्या गोष्टींवर आपला भरवसा नसेल तर विधानमंडळ सचिवालयाने सांगायला पाहिजे, नसेल तर आपण रेकॉर्ड तपासून घ्यावे किंवा माननीय अध्यक्षांना विचारुन घ्या की, आम्ही सांगतो ते चुकीचे आहे की, बरोबर आहे.

तालिका सभाध्यक्ष : आजच्या कामकाज पत्रिकेनुसार आपल्याला कामकाज करायचे आहे. आजच्या कामकाज पत्रिकेवरील विधानसभा विधेयक क्रमांक 16 हे विधेयक आपण घेऊ. त्यानंतर कंत्राटी कामगारांच्या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव ऑनलेग आहेत ते विधेयक घेऊन त्यानंतर माननीय मुख्यमंत्री नियम 293 च्या प्रस्तावाला उत्तर देणार आहेत.

श्री. शशिकांत शिंदे : आपण हे तपासण्यासाठी सभागृह 10 मिनिटे तहकूब करावे.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे साहेब सभागृह तहकूब करण्याची आवश्यकता नाही असे मला वाटत नाही.

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, माझी सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील साहेबांना विनंती आहे की, मघाशी माननीय अध्यक्षांनी ज्या गोष्टी मांडल्या त्या आम्ही ऐकल्या अशा पध्दतीचे आमच्या लक्षात आलेले नाही. उलट मला वरच्या सभागृहामध्ये असताना आपले बिल मांडावयाचे असल्यामुळे खालच्या सभागृहात यावे अशा पध्दतीचा निरोप आला. तरीही पुढे जाऊन माझे असे म्हणणे आहे की, सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार म्हणाले की, या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील यांना या विधेयकावर बोलावयाचे आहे. मागच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे.....

अधिवेशनात सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील नव्हते त्यामुळे त्यावेळी आपण हे विधेयक घेतले नाही. आपल्या सर्वांचा आग्रह होता, सर्व सन्माननीय सदस्य म्हणत होते की, हे बिल पारीत झाले नाही तर सर्व विद्यापीठांच्या बॉडी्ज या रिकाम्या राहतील. त्यामुळे आपण ते लवकर केले पाहिजे आणि हे या अधिवेशनात करावयाचे असेल तर आज या ठिकाणी पारीत झाले तर उद्या वरच्या सभागृहात जाऊन पारीत होईल. अन्यथा सप्टेबरपर्यंत विद्यापीठामध्ये विद्यापीठ कार्यकारिणी नाही, सिनेट नाही असे केवळ आपल्यामुळे घडणार असल्यामुळे माझी केवळ आपल्याला विनंती आहे की, माननीय अध्यक्ष काही बोलले असतील तर ते बोलले असतील. पण सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील साहेब आपणही उच्च शिक्षण मंत्री म्हणून काम केलेले आहे. माझी आपल्याला एवढी विनंती आहे की, आपण या बिलावर सूचना कराव्यात. कारण आपल्या सूचना या आमच्यासाठी अतिशय महत्वाच्या आहेत. त्या अर्थाने ती चर्चा सुरू करावी अशी मी विनंती करतो.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील साहेब आपण विधेयक क्रमांक 16 या बिलावर चर्चेला सुरूवात करावी.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, ठीक आहे. आता आपल्याला सभागृह तहकूब करावे लागेल किंवा त्यावर दुसरा पर्याय ठेवावा लागेल. मी आपल्याला एवढेच सांगतो की, कोणताही कामकाजाचा भाग किंवा क्रम कसा ठरवावयाचा हा संपूर्णपणे अध्यक्षांचा अधिकार आहे. अध्यक्षांनी सांगितले असेल तर आपण बिलावर आधी चर्चा करावी, माझे काही म्हणणे नाही. त्यांनी सांगितले की, विधेयक आधी घ्यावे तर माझे काही म्हणणे नाही. त्यांनी सांगितले, विद्यापीठ विधेयक आधी घ्या तर माझी त्याला काही अडचण नाही. परंतु जे सन्माननीय अध्यक्षांनी या सभागृहात सांगितले असेल त्याची नोंद कुठे तरी विधानमंडळ सचिवालयाकडे असायला पाहिजे. विधानमंडळाने पिठासीन अधिकाऱ्यांना तसे सांगायला पाहिजे. आपण आम्हाला सांगा की, मघाशी माननीय अध्यक्षांनी बिले घ्यायची असे सांगितले असेल तर माझी काही हरकत नाही.

तालिका सभाध्यक्ष : मी सन्माननीय सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या मिळून दोन नियम 293 च्या चर्चा आहे. विरोधी पक्षाच्या चर्चेला माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत. सत्ताधारी पक्षाकडून आलेला नियम 293 चा प्रस्ताव

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष....

अतिशय महत्वाचा आहे. माझी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील यांना विनंती आहे की, आपण नियमाप्रमाणे गेलो तर आपण विधेयक घेऊन त्यावर चर्चा करु आणि तोपर्यंत अध्यक्षांचा निर्णय येईपर्यंत या विधेयकावर चर्चा करु. आपण विधानसभा विधेयक क्रमांक 16 आपण घेऊ आणि त्यानंतर लेगवरचे कंत्राटी कामगारांच्या संदर्भातील विधेयक आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील आणि श्री. जयंत पाटील यांना या विधेयक क्रमांक 16 वर बोलावयाचे आहे. त्यासाठी माननीय मंत्री महोदय आपले म्हणणे ऐकण्यासाठी वरच्या सभागृहातून खाली आलेले आहेत. (अडथळा...) एका बाजूला आपण सांगता की आपल्याला कामकाज पत्रिकेनुसार चालायचे आहे तर.... (अडथळा...)

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, महत्वाचा प्रश्न हा आहे की, माननीय अध्यक्षांनी या सभागृहामध्ये निर्देश दिलेले आहेत आणि जो कार्यक्रम जाहीर केलेला आहे त्याच्या विपरीत उलटा कार्यक्रम आपण या ठिकाणी करायला लागलो आहे. त्यामुळे आपल्याला समोरील अधिकाऱ्यांनी माहिती दिली पाहिजे की, अध्यक्षांच्या तोंडातून कोणता अनुक्रम सांगण्यात आला. त्याच्या विरोधी करायचे असेल तर आमची हरकत नाही. मग सभागृह थांबावा, अध्यक्षांना विनंती करा आणि कार्यक्रम दुरुस्त करतो असे सांगा, त्यांची अनुमती घ्या, काही तरी सोपस्कर करावेत. माननीय अध्यक्षांचे एवढेही ऐकायचे नाही म्हटल्यावर काय बोलायचे. सभागृहामध्ये संपूर्ण चर्चा करण्याची आमची तयारी आहे. पण सकाळपासून सिक्वेंन्सने कार्यक्रम चाललेलाच नाही. मनाला जे येईल आणि पाहिजे ते सोयीचे घ्यायचे. या संदर्भात माझे जे उपोषण झाले ते त्याच प्रश्नावर झाले. त्यानंतरही सुधारणा होत नाही म्हणून या ठिकाणी बोलण्याची पाळी येते.

तालिका सभाध्यक्ष : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आता आपण हे विधेयक घेऊ. पुढे मराठवाड्यावरील चर्चा आहे. सभागृह गंभीर करणे एवढा काही गंभीर विषय नाही. मराठवाड्याचा हा प्रस्ताव आपण मागील 3 दिवसापासून पुढे ढकलत आहोत.

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, माझा पॉईन्ट ऑफ प्रोसिजर आहे. अध्यक्ष महोदय, आपण तालिका सभाध्यक्ष म्हणून नाही तर या ठिकाणी सदस्य म्हणून उपस्थित होतात. मराठवाड्याविषयी सदस्य गैरहजर आहेत म्ळणून आपण विनंती केली होती की, संध्याकाळची चर्चा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे.....

न घेता आपण ही चर्चा सकाळी घ्यावी. दोन वेळा आपण ही चर्चा सकाळी घ्यायला लावली. मघाशी माननीय अध्यक्षांनी तसेच रुलिंग दिलेले आहे. ही दोन विधेयके झालेली आहेत त्यानंतर मराठवाड्याची चर्चा आणि ही चर्चा अशा दोन्ही चर्चा क्लब करुन एकत्रित चर्चा करुन त्याचे उत्तर दिले जाईल असे सूचित केलेले आहे. माननीय अध्यक्षांनी असे सूचित केल्यानंतर आणि पुढील बिले आपणास विचारुन घेतो असे नमूद केले असताना असे असेल तर त्यानुसार निर्णय घ्यावा.

तालिका सभाध्यक्ष : आता आपण सत्तारुढ पक्षाच्या नियम 293 च्या प्रस्तावावर चर्चेला सुरूवात करु. सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत बंब आपण प्रस्तावावर विचार मांडावेत.

W-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, पॉईंट ऑफ इन्फॉरमेशन अशी आहे की, पोलीस निरीक्षक, नांदूरा यांनी श्री.प्रदीप रामभाऊ हाताळकर यांना आता नोटीस पाठविली आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची निवडणूक गावात काढायची नाही. चार वर्षे त्यांना परवानगीच दिलेली नाही. ग्रामसभेने ठराव केलेला आहे की, जी काही मिरवणूक काढायची ती फक्त बौध्द वाड्यात काढायची, बौध्द वाड्याच्या बाहेर यायचे नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकराची जयंती तीन दिवसांवर आलेली असल्याने सरकारने यावर तातडीने कारवाई करावी. यामुळे महाराष्ट्रात हल्लाबोल माजेल. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना दाबण्याचा प्रयत्न करीत आहात ही गोष्ट वेगळी, संविधानात बदल करण्याचा प्रयत्न करीत आहात ही गोष्ट वेगळी, पण आता जर मिरवणूकांवरही बंदी आणायला लागला तर मग हद्दच झाली. पोलीस स्टेशन, नांदूरा येथील इनस्पेक्टरची त्वरित बदली व्हायला पाहिजे. यावर त्वरित कारवाई व्हायला हवी, कारण महाराष्ट्रात यामुळे गोंधळ निर्माण होईल.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी दिलेल्या सूचनेची दखल घेतली जाईल. मी माननीय अध्यक्षांचा अवमान करीत नाही. मी सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांना विनंती करतो की, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे लेगवर असताना माननीय अध्यक्षांनी सांगितले की, मंत्र्यांना विचारून आपण हे विधेयक घेऊ. ज्याप्रमाणे माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांनी सांगितले आणि आपणही दोन दिवसांपूर्वी सांगितले की, विद्यापीठाचे विधेयक फार महत्वाचे आहे. अनेक लोक यामध्ये बोलणार आहेत. एका दिवसात बोलून होणार नाही. पण सभागृहाला असे वाटत असेल की, मराठवाड्यावरही चर्चा होईल आणि विधेयकही होईल तर न्याय द्यायच्या पध्दतीने सोयीस्कररित्या सभागृह चालेल.

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी विनंती केलेली आहे. परंतु या विधेयकावर बऱ्याच लोकांना बोलायचे आहे. यावर चर्चा होणार आहे. त्यामुळे हे विधेयक उद्या घेण्यात यावे अशी विनंती आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : मराठवाड्याच्या विकासासाठी मागील अनेक वर्षांपासून अर्थसंकल्पात माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार निधीची तरतूद करण्यात येऊनही प्रत्यक्षात हा निधी खर्च न होणे

मु.शी. : मराठवाड्याच्या विकासासाठी मागील अनेक वर्षांपासून अर्थसंकल्पात माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार निधीची तरतूद करण्यात येऊनही प्रत्यक्षात हा निधी खर्च न होणे, या विषयासंबंधी सर्वश्री प्रशांत बंब, अर्जुन खोतकर, अतुल सावे, डॉ.जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री सुधाकर भालेराव, सुभाष साबणे, संभाजी पाटील निलंगेकर, ज्ञानराज चौगुले, संतोष दानवे, हेमंत पाटील, प्रा.संगीता ठोंबरे, डॉ.राहुल पाटील, सर्वश्री लक्ष्मण पवार, आ.टी.देशमुख, भिमराव धोंडे, नारायण कुचे, तानाजी मुटकुळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम 293 अन्वये प्रस्ताव.

"मराठवाडा विभागाच्या विकासासाठी मागील अनेक वर्षांपासून राज्याच्या अर्थसंकल्पात मा.राज्यपालांच्या निर्देशानुसार निधीची तरतूद करण्यात येऊनही प्रत्यक्षात हा निधी खर्च होत नसल्याचे स्पष्ट होणे, मराठवाड्यातील सिंचन, पिण्याचे पाणी इत्यादी क्षेत्रातील मागासलेपणात वर्षागणिक होत असलेली वाढ, राज्याचे अनेक वर्षे नेतृत्व करण्याची संधी मिळूनही मराठवाड्यात अद्यापही दुष्काळ, गरिबी, दारिद्र्य व अज्ञान असणे, शासनाने केलेल्या तरतुदी प्रत्यक्षात खर्च करण्यात न आल्याने वर्षानुवर्षे मराठवाड्यासाठीचा निधी अन्यत्र वळविला जात असल्याचे स्पष्ट होणे, सिंचन सुविधांअभावी तसेच समन्यायी पाणी वाटपाअभावी शेती तसेच पिण्याच्या पाण्याच्या समस्या कायम असणे, गोदावरी खोऱ्यात उपलब्ध असलेल्या १८ अब्ज घनफूट पाणी वापराचे प्रकल्प हाती घेण्यासाठी आवश्यक तरतुदींसह प्रस्ताव मा.राज्यपालांकडे मान्यतेसाठी सादर करण्याची आवश्यकता, कृष्णा, मराठवाडा प्रकल्प व लेंडी प्रकल्पाला केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाची मान्यता/सूट मिळाल्यामुळे जनतेच्या मनामध्ये सदर प्रकल्प लवकर मार्गी लावण्याची वाढलेली अपेक्षा, राज्य शासनाकडून विकासकामांच्या घोषणा होऊनही निधी अभावी मराठवाडा आजपर्यंत उपेक्षित, दुर्लक्षित, तहानलेला, कोरडा राहिल्याचे दिसून येणे, राज्य शासनाने मागील एक वर्षाच्या कालावधीत हाती घेतलेल्या विकासाच्या विविध योजना पूर्णत्वास जात असल्याचे दिसून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आल्यामुळे जनतेमध्ये शासनाविषयी विश्वासाचे वातावरण निर्माण होणे, शासनाने मराठवाडयाच्या विकासाचा विषय गांभीर्याने घेतल्याचे दिसून येणे, मात्र निधीचा वापर न होण्याची कारणे शोधून एक पारदर्शक व व्यवहार्य योजना राबविण्याची आवश्यकता आणि मराठवाडयासाठी मागील अनेक वर्षांमध्ये करण्यात आलेल्या निधीच्या तरतुदीमधुन प्रत्यक्षात किती विकास झाला हे स्पष्ट होण्याची व प्रकल्पांसाठी भरीव निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, राज्य शासनाने या संदर्भात करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विधानसभा नियम 293 अन्वये प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे. आज मराठवाड्याची चर्चा आहे. राज्यामध्ये सतत पडणाऱ्या दुष्काळाबाबत ही चर्चा आहे. दुष्काळ हा सतत एकाच भागात पडत असल्याने विशेषत: मराठवाड्यामध्येच जास्त प्रमाणात पडतो. महाराष्ट्रातील इतर भागातही दुष्काळ नक्कीच आहे. परंतु मराठवाड्यामध्ये सतत 4 वर्षापासून दुष्काळाची तीव्रता टप्प्याटप्प्याने वाढत आहे. ही चर्चा करीत असताना सर्वांचे असे मत बनत आहे की, पाऊस पडत नाही म्हणून मराठवाड्यामध्ये सतत दुष्काळ पडतो असा लोकांचा समज आहे. माझे असे ठाम मत आहे. ज्या प्रदेशामध्ये पाऊस पडत नाही, त्या प्रदेशामध्ये दुष्काळ असतो असे असायचे काहीच कारण नाही. कारण राज्य चालवितांना आपल्या राज्यातील राज्यकर्त्यांनी विविध भागांचा विकास करताना आपला देश, आपले राज्य हे कशावर अवलंबून आहे. जास्तीत जास्त राज्य चालविताना आपल्या जनतेला कोणत्या भागाचा विकास झाला तर राज्याचा आणि देशाचा विकास होईल हे बघून आपले राज्य चालवायचे आहे. जगात वेगवेगळे देश आहेत. त्यामध्ये काही औद्योगिकरणावर चालतात, काही पर्यटनावर चालतात. भारत हा शेती प्रधान देश आहे. तसाच महाराष्ट्र सुध्दा जास्तीत जास्त जवळपास 70 टक्के आपली आर्थिक बाजू किंवा आपले राज्य हे शेतीवर अवलंबून आहे. असे असताना सुध्दा राज्यामध्ये विशिष्ट ठिकाणी दुष्काळ पडण्याचे एकमेव कारण जे काही असेल तर आपला गेल्या 40 ते 50 वर्षापासून काही बाबींकडे होत असलेले दुर्लक्ष हे आहे.

अध्यक्ष महोदय, हे दुर्लक्ष साधेसुधे नसून आपल्याला जर आपले राज्य चालवायचे असेल तर शेतीवर संपूर्णत: दुर्लक्ष करुन किंवा शेतीवरच पूर्ण लक्ष केंद्रीत केले तरच आपले चालू शकते. जर आपली शेती सुधारली, शेतकरी सुधारली तरच आपले उद्योगधंदे, त्याच्यावर अवलंबून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रशांत बंब.....

असणारी नोकरी, शेतीवर अवलंबून असणारी शेती प्रक्रिया उद्योग हे वाढीस लागू शकतात आणि नंतर राज्यामध्ये आर्थिक सुबत्ता येऊ शकते. प्रामुख्याने गेल्या कित्येक वर्षापासून मराठवाड्यामध्ये दुष्काळ पडतो आहे. त्याची कारणमिमांसा करता करता 2-3 बाबींचा ऊहापोह करायचा आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे आपला देश आणि राज्य चालविताना प्रामुख्याने आपल्याकडे असलेली नैसर्गिक साधन संपदा जी असते त्याचे समन्यायी वाटप केले पाहिजे आणि नंतर त्याच्यावर शेती, उद्योगधंदे उभारु शकलो तरच राज्य पुढे जाऊ शकते ही सर्वात महत्त्वाची बाब राज्यकर्त्यांनी लक्षात घ्यायला पाहिजे. परंतु दुर्दैवाने गेल्या 40 ते 50 वर्षामध्ये आपल्या नैसर्गिक साधन संपदेचा समन्यायी वाटप न झाल्यामुळे उदाहरणार्थ पडणारे पाणी देशात आणि राज्यात एका विशिष्ट भागातच जास्त पडत असले तरी ते पाणी ज्याठिकाणी पाणी पडत नाही त्याठिकाणावर नेण्याकरिता स्वातंत्र्यांच्या नंतरच्या ज्या पंचवार्षिक योजना झाल्या होत्या त्यात सर्वात महत्त्वाचे निर्णय घेतले गेले होते. सर्वात अगोदर वाटप झाले तर आपला देश पुढे जाऊ शकतो. त्या हिशोबाने कामे सुरु झाली होती. धरणांची कामे सुरु झाली. अध्यक्ष महोदय, देशामध्ये जिथे पाणी जास्त पडते, त्या भागातून ज्या ठिकाणी पाणी कमी पडते, ज्याठकाणी अवर्षण प्रवण क्षेत्र आहे. त्याठिकाणी धरणांची बांधकामे जास्त सुरु झाली आणि कॅनॉलद्वारे पाणी नेण्याचे काम सुरु झाले. जर राज्याचा विचार केला तर यामध्ये आपल्याला प्रत्येक शेतकऱ्याच्या बांध्यापर्यंत पाणी नेऊन देण्याचे काम राज्यकर्त्यांचे आहे. बाकीच्या सगळ्या गोष्टी त्याच्यानंतर आपोआप होणार आहे आणि हे करण्यामध्ये आपल्याला लक्ष द्यावे लागेल. या सर्व महत्त्वाच्या गोष्टी मी सभागृहाच्या लक्षात आणून देत आहे.

अध्यक्ष महोदय, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये 4-5 प्रकारचे खोरे आहेत. गोदावरी, कावेरी, कृष्णा, तापी, नर्मदा असे पाच खोरे आहेत. या राज्यामध्ये कोकणचा भाग आहे. ज्याठिकाणावर जास्तीत जास्त पाणी पडते आणि ते आपल्या राज्यामध्ये आणले गेले पाहिजे होते. गोदावरी खोऱ्याचा विचार केला तर मराठवाड्यातून ही नदी जाऊन त्र्यंबकेश्वर येथून सुरु होते. पश्चिम बंगालच्या उपसागरामध्ये जाऊन ही नदी लोप पावते. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये साडेएकोनपन्नास टक्के हा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रशांत बंब.....

गोदावरी खोऱ्याचा भाग आहे. कृष्णा खोऱ्याचा 23 टक्के, तापी खोऱ्याचा 17 टक्के, कोकणामध्ये 11 टक्के आणि नर्मदेचा 1 टक्का आहे. या अनुषंगाने गोदावरी खोऱ्यावर जास्तीत जास्त लक्ष दिले तर अर्धा महाराष्ट्र त्या खोऱ्यावर अवलंबून असल्यामुळे त्या खोऱ्यात इतर भागांतून पाणी आणण्याचे काम आपल्या राज्याने प्रथम हाती घ्यायला पाहिजे होते. जे स्वातंत्र्यानंतर 20 वर्षे घेतले होते. धरणांची कामे सुध्दा सुरु झाली होती. या सर्वांमध्ये दोन तीन गोष्टींकडे प्रामुख्याने लक्ष दिले पाहिजे. संपूर्ण राज्याला जवळपास 2800 ते 3000 टीएमसी पाणी दर वर्षाला लागते.

X-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रशांत बंब .....

राज्याचे पूर्ण भौगोलिक क्षेत्र पाहिले तर पश्चिम महाराष्ट्रामध्ये जवळपास 3300.71 टी.एम.सी. उपलब्ध आहे आणि विदर्भामध्ये 970 आणि मराठवाडयामध्ये 306 टी.एम.सी. असे एकूण पाणी 4500 टी.एम.सी.च्या आसपास असून आपल्याला लागणारे पाणी, ज्या ठिकाणी जास्त पाऊस पडतो त्या ठिकाणाहून ज्या ठिकाणी पाणी नाही आहे. त्या ठिकाणी आणण्याच्या योजना आखल्या पाहिजे होत्या. आणि आखण्यात आल्या होत्या. परंतु गेल्या 25 ते 30 वर्षामध्ये याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे मराठवाडा आणि महाराष्ट्राच्या काही भागामध्ये तीव्र दुष्काळ जाणवतो आहे. आपल्या राज्याचे भौगोलिक क्षेत्र पाहिले तर ते जवळपास सव्वातीन कोटी हेक्टर एवढी जमिन उपलब्ध आहे. त्यापैकी दोन कोटी पंचवीस लक्ष हेक्टर जमिनीवर पिके घेऊ शकतो. परंतु दुर्देवाने आजपर्यंत फक्त 18 टक्के भूभागावर सिंचन उपलब्ध करु शकलो. ही आपल्या राज्याकरिता अत्यंत दुर्देवी गोष्ट आहे. यासंदर्भात फार मोठे काम करण्याची गरज आहे. गेल्या 30 वर्षामध्ये ज्या गोष्टीकडे सातत्याने लक्ष द्यायला पाहिजे होते ते न दिल्यामुळे भयावह परिस्थित निर्माण झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, याबाबत आम्हाला लाज वाटते, शरम वाटते, वेदना होतात, आमच्या भागातून मोठे मंत्री, मुख्यमंत्री होऊन गेले. सगळे असताना सुध्दा पोलीसांच्या यंत्रणेमध्ये पाणी घ्यावे लागते. ही सर्व विभागामध्ये सर्वात दुर्देवाची आणि लाज, शरम वाटणारी गोष्ट आहे. असे होऊ शकत नाही का ? राज्यामध्ये एकही आत्महत्या झाली नाही पाहिजे. त्याचे समर्थन कोणीही करणार नाही. परंतु एका विशिष्ट भागामध्ये 1200 लोकांच्या आत्महत्या झाल्या. पण बाकीच्या भागात त्या आत्महत्या झाल्या नाही पाहिजेत आणि जिथे जिथे आत्महत्या होतात तिथेही आत्महत्या झाल्या नाही पाहिजेत. ज्यावेळी सिंचन करण्याची गोष्ट आली 20 वर्षापुर्वी जेव्हा या सर्व गोष्टीला विशिष्ट प्रकारच्या राजकारण्यांची इंट्री झाल्यामुळे ही गोष्ट मी मागे सुध्दा सांगितलेली आहे. जो पर्यंत त्या भागामध्ये लक्ष देणार नाही. तोपर्यंत राज्यामध्ये आत्महत्या वाढत राहणार. आपण फक्त मजाकमध्ये हाऊस चालवत राहिलो, दुर्देवाने ज्या गोष्टी घडू नयेत, त्या गोष्टींवर लक्ष देत राहिलो तर या आत्महत्या कमी होणार नाही तर वाढतील. एक दिवस असा येईल, लोक स्वतः शस्त्र हातात घेतील आणि राज्यकर्त्यांना त्याला जबाबदार धरले जाईल. या गोष्टींना थांबू शकता येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रशांत बंब.....

या गोष्टीला समन्यायी पाण्याच्या वाटपा पासून थांबवू शकतो. दोन गोष्टीकडे सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. सिंचनामध्ये जेव्हा राजकारणी काम करतात, तेव्हा जनतेला ज्या गोष्टी द्यायला पाहिजे, त्या देताना त्यांची आंतरभावना असायला पाहिजे, ज्यावेळेला राजकारणी या गोष्टीमधून मला पैसा कसा मिळेल ? मला याच्यामधून जास्तीत जास्त भ्रष्टाचार कसा करता येईल ? दुर्देवाने या जर गोष्टी त्यांच्या डोक्यात घुसल्या तर काय स्थिती होऊ शकते हे गेल्या 25 वर्षापासून पाहतो आहे. तीच स्थिती राज्यामध्ये उद्‌भवलेली आहे. आपण पूर्ण मराठवाडयाचा विचार केला तर जेव्हा सिंचनाची कामे सुरु झाली. त्यावेळेला बरेच प्रकल्प हातात घेण्यात आले. राज्य चालविताना सुरुवातीला काही गोष्टी करायला पाहिजे होत्या त्या जरी नाही झाल्या. तरी सिंचनाचे प्रोजेक्ट हाती घेऊन कशा प्रकारे पैशांचा अपव्यय झाला हे सर्व आपल्या सरकारला किंवा आपल्या हाऊसला माहिती आहे.

अध्यक्ष महोदय, गोदावरी खो-यातून त्र्यंबकेश्वर पासून जायकवाडी पर्यंत मी पूर्वीही बोललो आहे 21776 स्के.किलोमीटर हा भूभाग आहे. या भूभागामध्ये त्र्यंबकेश्वर पासून जायकवाडी पर्यंत लवादाने 196 टी.एम.सी. पाऊस पडेल असे मागच्या शेकडो वर्षाच्या अभ्यासावरुन काढलेले आहे. उर्ध्व भागात 115 टी.एम.सी. पाणी वापरावे आणि जायकवाडीने 81 टि.एम.सी. पाणी वापरावे यामध्ये कोणाचे दुमत नाही. दोन्हीकडील विभागांना ही गोष्ट मान्य आहे. परंतु जेव्हा पाऊस पडतो, मराठवाडा हा अवर्षणप्रवण क्षेत्र आहे. त्या ठिकाणी 300 ते 700 एम.एम.च्या वर पाऊस पडत नाही. जेथून गोदावरी नदी सुरु होते. त्या खो-यांमध्ये त्या विभागामध्ये किमान 800 एम.एम. तर जास्तीत जास्त काही ठिकाणी 4000 किंबहूना एक दोन ठिकाणी 6000 एम.एम. पाऊस पडतो. ॲव्हरेज जर पाहिले तर 2000 ते 3000 एम.एम. पाऊस पडतो, हेच पाणी राज्यात असे नाही की, ज्या भागात पाणी पडेल हा त्यांचा पूर्ण हक्क होईल, कोणी याला मान्यता दिलेली नाही व कोणी मान्यही करत नाही. परंतु मराठवाडयाच्या जायकवाडी धरणामध्ये पाणी येताना वरच्या धरणांमध्ये पाणी कोणत्या कोणत्या वेळेला सोडले पाहिजे याची सर्व नियमावली तयार झालेली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रशांत बंब.....

आहे. त्याकरिता एमडब्ल्यूआरए चा ॲक्ट तयार झालेला आहे. मी याबाबत सभागृहाचे लक्षवेधू इच्छितो की, समन्यायी पाण्याचे वाटप फक्त न झाल्यामुळे हा फार महत्वाचा मुद्दा आहे. विनाकारण आपल्याला सुप्रिम कोर्टात आणि उच्च न्यायालयामध्ये जावे लागते. शासनाने जर या बाबतीमध्ये फक्त दोन तास सर्व आमदारांची गोष्ट समजवून घेऊन समन्यायी पाण्याचे वाटप जर या वर्षापासून झाले तर शेतकऱ्यांच्या आत्महत्येमध्ये मोठी घट झालेली असेल. कारण फक्त समन्यायी पाण्याचे वाटप न झाल्यामुळे ज्या भागात पाणी गेले नाही त्या भागांमध्ये या आत्महत्या जास्त आहेत. मी मंत्री महोदयांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करेन की, त्यांनी या वर्षी ते जेव्हा मंत्री महोदय झाले तेव्हा त्यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये पाण्याचे समन्यायी वाटप एमडब्ल्यूआरए ने ठरवून दिले होते किंवा जे एमआयडीसी ने ठरवून दिले होते. ते करण्याकरिता त्यांच्यावर प्रचंड दबाव होता. ते ज्या भागाचे पालकमंत्री होते त्यांना त्या भागामधील लोकांचा सुध्दा फार दबाव होता. परंतु त्यांनी सत्यतेची बाजू लावून धरली. जे कायदेशिर आहे त्या बाजूने ते राहिले त्याच्यामुळे मराठवाडयातील जायकवाडी धरणात 6 ते 7 टी.एम.सी. पाणी येऊ शकले. अजून समन्यायी पाण्याची पध्दत समजून घेतलेली नाही. ती पध्दत कशी आहे. समजा 186 टी.एम.सी. पाऊस नाही पडला 140 टी.एम.सी. पडला तर त्या त्या विभागाने ती तुट समन्यायी पध्दतीने वाटून घ्यायची आहे. म्हणजे ती तुट दोघांना त्यांच्या त्यांच्या रेशिओ प्रमाणे होईल. हे सुध्दा कायद्याने ठरवून दिलेले आहे. कायदा स्पष्ट सांगातो, जर एका विभागाला एका वर्षी पाणी कमी दिले गेले तर एखाद्या वर्षी तुम्हाला पाणी कमी मिळाले किंवा उर्ध्व भागाला त्याची तुट आर्थिक दुष्टया किंवा कोणत्या ना कोणत्या पर्यायाने सरकारने त्याची भरपाई करुन दिली पाहिजे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, या वर्षी सन 2005 पासून 2015 पर्यंत समन्यायी पाण्याचे इक्वीटेबल डिस्ट्रीब्युशन होते. कायदा सांगतो आहे, ज्या समन्यायी पध्दतीने मराठवाडयाला पाणी कमी मिळाले असेल, आपल्याकडे आकडे उपलब्ध आहेत. गेल्या 10 वर्षामध्ये मराठवाडयाला पाणी कमी मिळाले आहे. त्याची तूट पुढच्या वर्षामध्ये भरुन काढायची आहे असे कायद्याने नमूद केलेले आहे. प्रत्येक वेळस काय होते ? समज असा आहे की, जर समजा पावसाळयामध्ये जर मराठवाडयाला पाणी सोडणे सुरु केले नंतर जर उर्ध्व भागामध्ये पाऊस नाही पडला तर पाणी उलटे जाईल का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रशांत बंब .....

असे होऊच शकत नाही. कारण उर्ध्व भागाला एक वर्षभर पिण्याकरिता व एमआयडीसीकरिता 28 टीएमसी पाण्याचे एक आवर्तन लागते. एकदा 40 टक्के पाणी उर्ध्व भागात आले तर जायकवाडीमध्ये 25 टक्के पाणी येईपर्यंत ते अडवायचे नाही हे अधिकाऱ्यांनीही संगितले आहे. विभागाकडून वेळोवेळी सांगितले जाते की आम्ही वरुन पाणी सोडत आहोत पण ते रास्त खोटे आहे. पाणी अडविले नाही तर पाणी सोडण्याचा प्रश्नच येणार नाही. 40 टक्के पाणी उर्ध्व भागात विविध धरणात जमा झाले तर जायकवाडीमध्ये 25 टक्के म्हणजे 20 टीएमसी पाणी होईल. 40 टक्के म्हणजे जवळपास 35 टीएमसी पाणी वर राहील. 15 टक्के पाणी उर्ध्व भागामध्ये जास्त असू द्यावे. कारण नंतर पुन्हा पाऊस पडेल व जास्त पाणी येईल. उर्ध्व भागामध्ये 60 ते 70 टक्के पाणी होऊ द्यावे. त्यावेळी जायकवाडीमध्ये 50 टक्के पाणी होऊ द्यावे. मी आता टक्केवारीवर बोलतो, टीएमसीवर बोलत नाही. पाऊस पडला नाही तर 15 ते 20 टक्के पाणी उर्ध्व भागामध्ये जास्त राहिल. या पाण्याचे आक्टोबरला कॅलक्युलेशन करुन त्या त्या एरियाचे कायद्याप्रमाणे लवादाने ठरवून दिल्यानुसार डिस्ट्रीब्युशन केले पाहिजे. मराठवाडयामध्ये गेल्या 500 वर्षामध्ये पोस्ट मान्सून 3 ते 7 टीएमसीच्या वर गलेला नाही. तरीही 15 ते 20 टीएमसी पाणी उर्ध्व भागात राहू द्यावे. कारण वरच्या भागात पाऊस झाला नाही तर आपण पाणी उलटे नेऊ शकत नाही. त्यामुळे तेवढे पाणी मेंटेन करण्यास काही हरकत नाही. यामध्ये खरीप व रब्बी हे दोन्ही पिके शेतकरी घेऊ शकतील. या वर्षी उर्ध्व भाग म्हणजे मराठवाडयाचा समन्यायी पाणी वाटपाकरिता मर्यादीत क्षेत्रासाठी विचार केला तर मराठवाडयात खरीपाकरिता एक थेंबही पाणी मिळालेले नाही. पण उर्ध्व भागात खरीपाची पिके 100 टक्के घेतली गेली आहेत. ते देखील आमचेच बंधू आहेत. पण एक भाकर असल्यानंतर ठरवून प्रत्येकाला चतकोर चतकोर खायची आहे. कारण दुष्काळ आहे. पाऊस कमी पडला आहे. इतरही काही कारणे असतील कारण सर्वांनी दुष्काळाचा सामना करावयाचा आहे. असे नाही की एका विशिष्ट भागाने 100 टक्के पूर्ण सांभाळावयाचे व दुसऱ्याने त्यामध्ये काहीच वाटा घ्यायचा नाही. हे मी नवीन मांडत नाही. लवाद, जागतिक पॉलीसी, भारताची व राज्याची जलनिती, याकरिता तयार केलेले कायदे हीच गोष्ट सांगतात. फक्त आपण एकत्र बसून

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रशांत बंब .....

त्यावर मार्ग काढण्याची गरज आहे याबाबत मंत्री महोदय उत्तरामध्ये सांगतील. मंत्री महोदयांनी याचे देखील उत्तर दिले पाहिजे की, मराठवाडयात आपण मागील 10 वर्षात समन्यायी पाण्याचे वाटप का करु शकलो नाही ? तसेच एमडब्ल्यूआरआरए, संबंधित आमदार, मंत्री यांना बरोबर घेऊन पाण्याचे समन्यायी वाटप करावे. आज जे पाणी उपलब्ध आहे त्याचे समन्यायी वाटप करावे. आजच्या चर्चेचा महत्वाचा गाभा आहे की, राज्यकर्त्यांनी 40 वर्षापूर्वी असे करायला पाहिजे होते. जगात, भारतात केवळ महाराष्ट्र असा आहे की, आपणास जेवढी पाणी वापरण्याची परवानगी आहे त्याच्या 60 टक्केही पाणी आपण उचलत नाही. आपणास पाणी लागणाऱ्या क्षमतेपेक्षा अडीच तीन पट अधिक पाऊस पडतो. ही बाब खरी आहे की, तो वेगवेगळया भागात पडतो तो एका विशिष्ट भागात पडत नाही. हे भाग आज तयार झालेले नाहीत ते शेकडो वर्षांपासून ठरलेले असून ते अवर्षणप्रवण क्षेत्र आहे. राज्यकर्त्यांचे काम होते की, कोकणात वाहून जाणारे पाणी टर्न करुन कृष्णा खोऱ्यामध्ये किंवा गोदावरी खोऱ्यामध्ये आणले पाहिजे होते. पण हे पाणी आपण आणले नाही. आज जे पाणी उपलब्ध आहे त्याचे आपणास अगोदर समान हिस्से करावे लागतील व ते द्यावे लागेल. उदाहरणार्थ आपण म्हटले की, मराठवाडयाला 200 टीएमसी पाणी पाहिजे. पण हे 200 टीएमसी पाणी आपण दुसरीकडून आणून डायरेक्ट देणार नाही. सर्वात अगोदर जे पाणी आहे त्याचे आपणास समन्यायी वाटप करावे लागेल. इतर भागाकडून आपण जे पाणी आणू त्या पाण्याचे आपणास त्याप्रमाणे वाटप करावे लागेल याला आपण समन्यायी पाण्याचे वाटप म्हणू. नाही तर मराठवाडयाला 600 टीएमसी पाणी लागते, आज 200 टीएमसी उपलब्ध आहे, आपण 400 टीएमसी बाहेरुन आणून देऊ. 400 टीएमसी आणू तेव्हा पुन्हा वाटून घेऊ. पण आज जे पाणी आहे त्याचे इक्वीटेबल डिस्ट्रीब्युशन अगोदर झाले पाहिजे. आपण जे पाणी इतर ठिकाणावरुन आणणार आहोत त्याचेही समन्यायी वाटप केले पाहिजे. आपण हे केले आहे काय ? महाराष्ट्राची स्थापना झाली तेव्हा हे ठरले गेलेले आहे. कृष्णा खोऱ्यात 23 टीएमसी पाणी अडविण्याची योजना सुरु झाली होती. कृष्णा खोऱ्यात दोन बॅरेजेस बांधून भीमा नदीतून हे पाणी उजनी धरणात नेण्यास केंद्र सरकारने व राज्य सरकाने मान्यता दिलेली आहे. याबाबत सर्व झालेले आहे. उजनी धरणातून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रशांत बंब .....

उस्मानाबादकरिता 10.41 टीएमसी पाणी, लातूरला 7.27 टीएमसी पाणी, बीडला 5.68 टीएमसी पाणी जाईल. हे सहज शक्य होते. पण राजकारण्यांनी हे काम करणाऱ्यापेक्षा क्रीकेट, तेलगी इत्यादी प्रकरणात ते घुसले. ते रिकाम्या लफडयात गेले आहेत. मला दुर्दैवाने सांगावे लागते की, 40 वर्षात राजकारण्यांना पैसे कमविण्याचा मानसिक आजार झालेला आहे. त्यांना किती पैसा लागणार आहे हे सुध्दा कळाले नाही. त्यांना या पैशाचे काय करायचे हे समजले नाही. 1200 शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात हे आपले दुर्दैव आहे. अशा शेतकऱ्यांच्या मुलीमुलींना शिक्षणसुध्दा घेता येत नाही. हे राजकारणी लोक पैशाचे काय करणार होते हे देखील येथे सांगितले पाहिजे होते.

अध्यक्ष महोदय, माझी विनंती आहे की, अँटी करप्शन ब्युरो, ई.डी. यांचे काय करायचे ? आपल्यासमोर सर्व कागद आहेत. आपण अजून कित्येक प्रोजेक्टच्या चौकशा लावलेल्या नाहीत. आपण यांच्या चौकशा का लावत नाहीत ? कारण जनतेच्या पैशाचा प्रश्न आहे. हे लोक जेलमध्ये जातील, सडतील, नाही सडतील याच्याशी आम्हाला काही घेणे-देणे नाही. पण हा पैसा वसूल झाला पाहिजे. यांचे पासपोर्ट व पैसे जप्त करुन शासनाच्या तिजोरीत तुम्ही जोपर्यंत आणणार नाही तोपर्यंत यांची सवय बंद होणार नाही. आपल्यासमोर सर्व कागदपत्रे आहेत. आपण चौकशी सुरु करणार आहात का ? कित्येक प्रोजेक्ट असे आहेत की, ज्याची माहिती अँटी करप्शन ब्युरोकडे, ई.डी. कडे व ई.ओ.डब्ल्यू. कडे नाही. सिंचनाच्या बाबतीत आपल्याकडे सर्व जंत्री आहे.

अध्यक्ष महोदय, यांनी मराठवाडयात 251 मोठे प्रकल्प मंजूर केले आहेत. 200 कोटीचा प्रोजेक्ट तयार करावयाचा असेल तर टेंडर काढताना लोकमत, हितवाद, पुण्यनगरी, नॅशनल हेरॉल्ड अशा वर्तमानपत्रात जाहिराती दिलेल्या दाखविल्या. उदा.12 डिसेंबरला जाहिरात द्यावयाची आहे असे दाखविले. सामान्य प्रशासन विभागाला पाठवून दिले की, आमच्या जाहिराती 12 डिसेंबरला छापाव्यात. त्या दिवसाच्या वर्तमानपत्राच्या 10-10 प्रती यांनी विकत घेतल्या. त्या वर्तमानपत्रात ज्या ठिकाणी आपल्या इच्छित साईजची जाहिरात आहे तेथे विभागाच्या टेंडरची जाहिरात पेस्ट केली. त्या प्रती फाईलला लावल्या व बाहेर सांगितले की, आम्ही सिंचन विभागाच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

11-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) Y-4

PNG/ MMP/ AKN/ 15:20

श्री.प्रशांत बंब .....

जाहिराती दिलेल्या आहेत. ही गोष्ट खरी असेल तर ज्यांनी हे कृत्य केले त्यांच्यावर मंत्री महोदयांना या प्रकरणी एफआयआर करावा लागणार नाही का ? असे 200 कोटी, 500 कोटीपासून 2000 कोटीपर्यंतचे प्रोजेक्ट आहेत की, अशा प्रोजेक्टच्या टेंडरची जाहिरात दिलेली नाही. म्हणजेच तुम्ही अगोदर कॉम्पीटीशन संपवून टाकली आहे. वर्तमानपत्रात जाहिरात न देता त्यांनी फक्त फाईलला दाखविले की आम्ही जाहिराती दिलेल्या आहेत. हे सर्व टेंडर 72 टक्क्यांपर्यंत अबाऊ गेलेले आहेत. 200 कोटीचे प्रोजेक्ट असतील तर ते 28 ते 70 टक्क्यापर्यंत अबाऊ गेलेले आहेत. 200 कोटीमध्ये 40 टक्के अबाऊ असेल म्हणजे 80 कोटी रुपये जास्त आहेत.

यानंतर Z-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रशांत बंब....

अर्धे तुझे आणि अर्धे माझे. आता 40 कोटी रुपये काढावयाचे कसे? यासाठी सरकारच्या तिजोरीतून यांच्याकडून ॲडव्हान्स देण्यात आला आहे. आणि पैसे वाटून घेतलेले आहेत. 200 कोटी रुपयांचा प्रकल्प चालू करण्याकरिता आवश्यक असलेली औपचारिकता केली. मी आता त्यामध्ये जास्त वेळ घेत नाही. त्याकरिता लागणारे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ॲप्रुव्हल आणि टेक्निकल सँक्शन घेतले गेले नाही. याकरिता लागणा-या आवश्यक इतर फॉर्मेलिटीज पूर्ण न करता सिंचनासाठी प्रकल्पामधील केवळ पैसे काढले गेलेले आहेत. ते प्रकल्प पूर्ण केले गेलेले नाहीत. 200 कोटी रुपयामधील 80 कोटी रुपये काढले तर काम चालू करावे लागेल. यापुढे पैसे देता येणार नाही. पैसे काढले तर काम पुढे दाखवावे लागेल म्हणून यापुढील पैसे काढले गेलेच नाहीत. हे प्रकल्प केवळ कागदावरच आहेत. प्रत्यक्षात प्रकल्पाच्या जागेवर कुदळही मारली नव्हती. लागलीच त्यानंतर 700 कोटी रुपयाच्या दुस-या सिंचन प्रकल्पातही अशाच प्रकारच्या भानगडी केल्या गेल्या. असे करता करता सिंचन प्रकल्पांच्या 1,10,000 कोटी रुपयांच्या कामांना मान्यता देऊन टाकली. 5-10 हजार कोटी रुपये खर्च करतो, एवढया मोठया प्रकल्पांना मान्यता कशा दिल्या गेल्या ? श्वेत पत्रिका काढण्याच्या नावावर जे प्रकल्प पाणी देत नाहीत, ते श्वेत पत्रिकेमध्ये घेतले गेले नाहीत. श्वेतपत्रिका बनविताना देखील लबाडी करण्यात आली. त्यानंतर नवीन प्रकल्पांनाही मान्यता देण्यात आलेल्या आहेत. जुने प्रकल्प 200 कोटी रुपयांचे घेतले गेले होते. पाच वर्षानंतर पुन्हा पैसे कमवायचे आहेत, नवीन प्रकल्पांना जागा नाही. अशा वेळी काय करायचे ? जुन्या 200 कोटी रुपयांच्या प्रकल्पांना पुन्हा सुप्रमा देऊन रेट एस्कलेशन करण्यात आले. प्रत्यक्षात तेथे कामही झालेले नाही. तरीही रेट एस्कलेशन दाखविण्यात आलेले आहे. अशा 50 बिंदूमधून सिंचनामध्ये केवळ पैसे काढण्याचे काम झालेले आहे. मराठवाडयात हे असे काम मोठया प्रमाणात झाल्यामुळे आज आपल्याला दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे.

अध्यक्ष महोदय, ज्याप्रमाणे शरीराचे वेगवेगळे भाग असतात, ते सर्वच महत्त्वाचे असतात. त्याचप्रमाणे शेतक-याचे हात आणि पाय म्हणजे वीज, पाणी, सहकारी बँका आणि रस्ते होय. ही सर्व त्याची साधनसंपत्ती आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रशांत बंब....

एक एक करुन सहकारी बँकांचेही पंख छाटण्यात आले. सिंचनाची वाताहत झाली. हे सर्व गेले कोठे ? हे सर्व काही कागदावर आहे. तरीही कारवाई केली नाही तर हे सर्व तसच चालत राहील. या सर्व प्रक्रिया थांबू शकत नाहीत. दुष्काळ थांबू शकत नाही. सर्व गोष्टी आवाक्याच्या बाहेर जात आहेत. बजेट कमी असतो आणि खर्च जास्त असतो. उत्पन्नावर लक्ष दिले नाही. ज्या ठिकाणी शासकीय तिजोरीमध्ये 15 लाख कोटी रुपये रिझर्व्ह असणे आवश्यक आहे, तेथे पावणे चार लाख कोटी रुपयांचे कर्ज राज्यावर आहे.

अध्यक्ष महोदय, मराठवाडयात कृष्णा खो-यामून 23 टीएमसी पाणी आणण्यासंदर्भात जाहीर केले पाहिजे. त्याकरिता 7.5 टीएमसी पाण्याकरिता शासनाने परवानगी मिळविलेली आहे. त्याकरिता टाईमबाऊंड प्रोग्रॅम असणे आवश्यक आहे. त्याकरिता नवीन शासनाने 7.5 टीएमसीची परवानगी मिळविलेली आहे, मी नवीन शासनाला मन:पूर्वक धन्यवाद देतो. शासनाने अशाच प्रकारे पुढील परवानग्याही घ्याव्यात. मंत्री महोदयांनी एक शब्द दिला होता की, केंद्र शासनाकडून किंवा कोणत्याही शासनाकडून कमीत कमी वार्षिक व्याजामध्ये पैसे उपलब्ध करुन मराठवाडयतील सर्व प्रकल्प त्वरित सुरु करण्यात येतील. याबाबत कालबध्द कार्यक्रम मंत्री महोदयांनी जाहीर करावा. कृष्णा खो-याचे इतर ठिकाणचे पाणी आपल्याकडे येणे अशक्य आहे. कृष्णा खो-यातील 23 टीएमसी पाणी आपल्याकडे येणे शक्य आहे, तसेच वैनगंगा पैनगंगामधून देखील 10 टीएमसी पाणी गोदावरील खो-यामध्ये येऊ शकते. याची देखील अगोदर परवानगी देण्यात आलेली आहे. ते प्रकल्प देखील अपुरे आहेत. याबाबत मी खोल बोलत नाही. याबबत मंत्री महोदयांनी चर्चा करुन बेठक घ्यावी. वैनगंगा व पैनगंगा या ठिकाणावरुन आपल्याकडे पाणी येऊ शकते. ते दहा टीएमसी व 23 टीमएसी पाणी जर कमी खर्चात आणता आले तर बरे होईल. मला हे माहिती आहे की, बरेच डोंगरे कोकणातील अशी आहेत की, 2000 मीटर व 1500 मीटर खोलीवर आहेत. 230 मीटरपर्यंत व काही ठिकाणी त्यापेक्षा जास्त पुढेही जाता येते. तितके पाणी आणले तर आणि काही बोगदे केले तर जवळपास 400-450 टीएमसी राज्याला अधिक मिळेल. मागील शासनाने नाही केले म्हणून आपण नाही करायचे, हे योग्य नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रशांत बंब....

पैशांचा प्रॉब्लेम आहे मला माहिती आहे. नवीन शासनाने हे करावे. गोदावरी खो-यामध्ये जवळपास 3.5 हजार टीएमसी पाणी उपलब्ध आहे. आपल्या भौगोलिक क्षेत्रानुसार आपल्याला 2100 टीएमसी पाणी मिळायला पाहिजे. 1,089 टीएमसी पाण्याची परवानगी दिलेली आहे. केंद्रीय लवादाकडून ही परवानगी मिळालेली आहे. गोदावरी खो-यातील आपले पाणी हक्काचे आहे. देशामध्ये ज्या भागातून जे खोरे जाते, त्याचा अभ्यास करुन हे कसे केले ? कशी त्यांना परवानगी दिली ? हे सर्व राज्यकर्त्यांचे जर मी सांगत बसलो तर मुख्य विषय बाजूला राहील. आजही गोदावरी खो-याचे दुस-या राज्यांना पाणी जाते, ते आपल्या राज्याचे पाणी आहे. गोदावरी खो-यातून जे 1100 टीएमसी पाणी आपल्याला उपलब्ध होऊ शकते त्यावर देखील मंत्री महोदयांनी लक्ष दिले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, सिंचन शेतीकरिता टॉनिक व ऑक्सिजन आहे. सहकार खाते व रस्त्यासंदर्भातही मराठवाडयावर प्रचंड अन्याय झालेला आहे. रस्ते आणि बीओटी यामध्ये सर्वात जास्त लॉस मराठवाडयात झालेला आहे. पैसे आणि कामाची प्रक्रिया केवळ कागदावरच दाखविले जातात. कामाकरिता असलेले पैसे ॲक्च्युअल लॅण्ड होत नाहीत हे दु:ख आहे. सरकारच्या तिजोरीत जेवढा पैसा आहे, तेवढाच आपण वापरु शकणार हे मान्य आहे. पैसा गेला पण पैसा तेथे लॅण्ड झाला नाही. पैसे दाखविले जातात, ते कसे काढले जातात. रस्त्यांच्या संदर्भातील हे देखील एक कारण आहे. शेतक-यांचा ज्यावेळी माल खेडयापाडयातून मुख्य रस्त्यापर्यंत जाण्याकरिता वाहने व रस्ते नसतात. रस्त्यावरच्या कामांचे पैसे उचलले गेलेले आहेत. परंतु रस्त्याची कामे अपूर्ण आहेत, हे दुख आहे. तसेच, बीओटीसंदर्भात राज्याचा नकाशा घेतला तर टोल नाके कुठे आहेत, यावर बिंदू केले तर राज्यामध्ये जास्तीत जास्त टोलनाके हे मराठवाडयात आहेत. सर्वात जास्त खराब रस्ते मराठवाडयात आहेत. ही जी प्रक्रिया झालेली आहे, यामध्ये देखील मंत्रिमहोदयानी लक्ष दिले पाहिजे, माननीय मंत्री महोदयांच्या या बाबत बोलतांना मी 4-5 बाबी लक्षात आणून देईल. गेल्या पंधरा वर्षांपासून सिंचनासंदर्भात 70,000 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. आजही माझ्या माहिती प्रमाणे 31 हजार कोटी रुपये सिंचनाचे आपल्याला अजून देणे बाकी आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रशांत बंब....

याबाबत उद्या कोर्टबाजी झाल्यावर न्याय प्रक्रिया सुरु झाल्यावर पैशांची देणे दारी सरकारवर येऊन ठेपेल. म्हणून शासनाने संबंधितांकडून पैसे वसूल करण्याची प्रक्रिया त्वरित सुरु केली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, रस्त्याच्या बाबत पाच वर्षात मराठवाडयात 21524 कोटी रुपयांची कामे झालेली आहेत. आणि संपूर्ण राज्यामध्ये गेल्या पंधरा वर्षात जवळपास 2.5-3.15 लाख कोटी रुपयांची कामे झाली. मी दाव्याने सांगू शकतो की, मराठवाडयात सर्वात जास्त भ्रष्टाचार झाला. इतर ठिकाणी देखील भ्रष्टाचार झाला. मरठवाडयातील भ्रष्टाचार विचार करुन भ्रष्टाचार झालेला आहे. बैठक घेऊन अक्षरश: एका इंजिनियरला गट-अ मध्ये 3 कोटीची परवानगी असेल नियमबाहय पध्दतीने पंधरा कोटीचे खड्डे भरण्याचे जॉब नंबर दिले गेले गेलेले आहेत. कामे केलेली नाहीत. 31 मार्च च्या वेळी दरवर्षी गट अ पासून एसआर ते ॲक्चुअल आलेल्या रस्त्यांमध्ये मोठया प्रमाणात त्यांनी कशी पध्दत अवलंबिली आहे ?

एए-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रशांत बंब.....

एस्टिमेट बनविले जाते. आयआरसीच्या माध्यमातून रस्ते बनविले जातात. मी दुष्काळी भागातील रस्त्यांच्या संदर्भातील माहिती देणार आहे. शासनाने कोट्यावधी रुपये रस्त्यांच्या कामासाठी खर्च केलेले आहेत. तसेच शेतातील रस्ते दाखवून पैसे कसे उचलले आहेत, त्याची माहिती देणार आहे. आयआरसीची हाय्येस्ट स्पेसिफिकेशन वापरली जाते. 5 कोटी रुपयांच्या रस्त्याला ॲडमिनिस्ट्रीव्ह अप्रुव्ह मिळाल्यानंतर रस्ता न करता दुसराच रस्ता केलेला आहे. टेक्निकल सँक्शन ॲथोरिटीने दुसऱ्या रस्त्याच्या कामाला परवानगी दिल्यानंतर तिसऱ्याच ठिकाणी काम केल्याचा प्रकार झालेला आहे. अशा प्रकारे 700 ते 800 रस्त्यांची कामे झालेली आहेत. यामध्ये हजारो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. मी रस्त्यांच्या बाबतीत इथ्यंभूत माहिती देऊ शकतो. रस्त्यांच्या बाबतीत गेल्या 15 वर्षात 90 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. मी हे सर्व सिध्द करुन दाखवू शकतो. बीओटी आणि रस्त्यांमध्ये 90 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला असून, तो मी सिध्द करुन दाखवू शकतो. अशा प्रकारे गेल्या 15 वर्षामध्ये रस्त्यांच्या कामात भ्रष्टाचार झालेला आहे. म्हणून आमच्या मनात चीड निर्माण झालेली आहे. 5 कोटी रुपयांच्या रस्त्यांच्या कामासाठी साडेतीन कोटी रुपयांची तांत्रिक मान्यता देऊन दीड कोटी रुपये बाजूला ठेवण्याचा प्रकार झालेला आहे. अशा प्रकारे आपल्या राज्यात रस्ता आणि बीओटीच्या कामासाठी 90 हजार कोटी रुपये खर्च केले आहेत.

अध्यक्ष महोदय, एखाद्या ठिकाणी टोलनाका देण्यासाठी ट्रॅफिक किती आहे, पीसीए किती आहे वगैरे बाबींची तपासणी केली जाते. पीसीए 15 हजार ते 25 हजारपर्यंत असेल तर अशा ठिकाणी टोलनाका मंजूर केला जातो. काही ठिकाणी पीसीए 5 हजार ते 10 हजार आहेत, अशा ठिकाणी टोलनाके दिलेले आहेत.

(माननीय अध्यक्ष भाषण संपल्याबाबतची बेल वाजवितात.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रशांत बंब.....

अध्यक्ष महोदय, मी काही गंभीर बाबी सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी प्रयत्न करीत आहे. माझ्यासारख्या सदस्याचे म्हणणे गांभीर्यपूर्वक ऐकून घेतले तर खूप बरे होणार आहे. आपण केवळ चर्चा करुन उत्तर घेतले तर काहीही होणार नाही. मी भ्रष्टाचाराचे जे आरोप करीत आहेत, ते खोडून दाखविले पाहिजे. माझ्या भागातील 8 सन्माननीय सदस्यांकडे 200 रस्ते दिले तर कशी जगलेरी झालेली आहे, ते मी दाखवून देऊ शकतो. भ्रष्टाचार ताबडतोब थांबला पाहिजे, हा आमचा मुख्य हेतू आहे. आजपासून हे सर्व थांबले पाहिजे, अशी आमची भावना आहे. रस्त्यांच्या कामांमध्ये भ्रष्टाचाराचा पैसा अडकलेला आहे, असा पैसा आपल्या तिजोरीत आला नाही तर त्याला कन्ट्यीन्युटी राहील. यामध्ये अधिकाऱ्यांचा फार मोठा रोल असतो. काही अधिकारी राजकारण्यांना बळी न पडता रस्त्यांच्या कामांमध्ये भानगडी करीत असतात आणि अशा भानगडी आपल्याला कळत देखील नाही. त्यामुळे आपल्या राज्यावर एवढे कर्ज कसे झाले, हे आपल्याला समजून नाही.

अध्यक्ष महोदय, बीओटीसाठी 40 टक्के खर्च संबंधित व्यावसायीक, 40 टक्के केंद्र शासनाकडून येणारा व्हीजीएफ आणि 20 टक्के बँकेकडून लोन घ्यावे लागते. मराठवाड्यातील अनेक प्रकल्पांसाठी व्हीजीएफ घेतलेला आहे. प्रत्यक्षात रस्त्यांची कामे झालेली नाहीत. टोलनाक्यासाठी आलेला पैसा विशिष्ट ठिकाणी वापरलेला आहे. यामध्ये एफआयआर दाखल करण्याच्या पलीकडे दुसरी कोणतीही कारवाई केलेली नाही.

अध्यक्ष महोदय, आज राज्यातील किंवा मराठवाड्यातील अर्धे टोलनाके हे रफनेस इंडेक्स बरोबर नसल्यामुळे त्वरित बंद करु शकतो. यासाठी शासनावर कोणताही भार येणार नाही. ज्यावेळी टोलनाक्यावरील रस्त्यांवरुन एखादे वाहन जाते त्यावेळी एंडयुलन्स किती यावे, हे समजण्यासाठी एक मिटर असते. हे मिटर 2 हजार ते 2500 च्या आत असणे अपेक्षित आहे. ही नेरीकडील मशीन आहे. अशी मशीन प्रत्येक टोलनाक्यावर दर 3 महिन्याला तपासणी करण्यासाठी फिरली पाहिजे. पण अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे आजपर्यंत तरी आमच्या निदर्शनास आलेले नाही. नेरीकडील मशीन सर्व टोलनाक्यांवर फिरविल्या तर रफनेस इंडेक्स 5 हजार ते 10

.....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रशांत बंब.....

हजारपर्यंत असल्याचे दिसून येईल. करारामध्ये रफनेस इंडेक्स जास्त गेला तर संबंधित टोलनाक्याची ती सर्वस्वी जबाबदारी असणार अशी अट आहे. संबंधितांनी तो रस्ता बनवून तो रफनेस इंडेक्स मेंटन करावा अशी अट टाकलेली आहे. आम्ही रस्त्यावरून वाहने नेत असताना आमचा पैसा वाचला पाहिजे, वेळ वाचला पाहिजे, प्रदूषण कमी झाले पाहिजे, म्हणून टोलनाक्यावर पैसा भरत असतो. आपण रफनेस इंडेक्स मेंटेन न केल्यामुळे राज्यातील अर्धे टोलनाके बंद करु शकतो.

अध्यक्ष महोदय, मराठवाड्यातील सहकार क्षेत्राबाबत माझे विचार व्यक्त करणार आहे. राज्यातील काही विशिष्ट ठिकाणी पाण्याचा अतिउपयोग केलेला आहे. ज्या ठिकाणी क्रॉपिंग पॅटर्न असायला हवे आहेत, अशा ठिकाणी ती घेतलेली नाहीत. ऊसासारखी पिके घेतलेली आहेत. ही पिके बंद करण्याबाबत आपल्याला ताबडतोब निर्णय घेता येणे शक्य नाही. ज्या देशांमध्ये 9 महिने पाऊस पडतो, त्याच ठिकाणी ऊसाचे पीक घेण्याकरिता जगाने परवानगी दिलेली आहे. आपल्याकडे सर्वत्र पाणी दिले असते तर क्रॉपिंग पॅटर्न राबविणे भाग पडले असते. अशा वेळी मराठवाड्यात देखील क्रॉपिंग पॅटर्न लावले पाहिजे, असे वाटले होते. परंतु, मराठवाड्यातील ज्या ठिकाणी शक्य आहे, अशा ठिकाणी ऊसकारखाने उभे राहिले आहेत. ऊसपाळीसाठी एक इंच पाण्याची आवश्यकता असेल तर संबंधित शेतकरी सकाळी मोटार सुरु केल्यानंतर 6 ते 8 तास शेतामध्ये येत नाही. 6 ते 8 तासानंतर संबंधित शेतकरी शेतात येऊन दगड मारल्यानंतर डुबूक आवाज आल्यानंतर पाण्याची मोटार बंद करीत असतो. अशा प्रकारे ठिबक पध्दत सुरु न करता डुबूक पध्दत सुरु झालेली आहे. त्यामुळे अतिरिक्त पाणी वापरल्यामुळे जमिनी खराब झालेल्या आहेत. या सर्व गोष्टींचा विपरित परिणाम राज्यात विशेषकरून मराठवाड्यामध्ये झालेला आहे. मंत्री महोदयांनी येत्या तीन वर्षामध्ये टप्याटप्यात 33 टक्के क्षेत्रावर ऊसाचे 100 टक्के क्षेत्र ड्रीपवार आणण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी, अशी माझी त्यांना विनंती आहे. हे आपण एकदम बंद करु शकणार नाही. परंतु, शासनाने ड्रीपचा वापर त्वरित सुरु करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रशांत बंब.....

या माध्यमातून ऊसाचे क्षेत्र हळुहळु कमी करुन क्रॉपिंग पॅटर्न विशेषकरुन मराठवाड्यात वापरण्यास मदत होणार आहे. सभागृहात या विषयावर अनेक वेळा चर्चा झालेल्या आहेत. अशा वेळी 15 वर्षापूर्वी काय केले आणि आता तुम्ही काय करणार असे दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांकडून सांगितले जाते. असे प्रश्न उपस्थित झाल्यानंतर मागचा धागा येतोच. अशा वेळी मागे काय झाले ते सांगावे लागते. मागे झालेल्या चुकीमुळे आज ते घडत आहे. एका माणसाचे शरीर म्हणून जमीनला धरले, एका हाताला सहकार धरले, दुसऱ्या हाता रस्ते, वीज धरले, पायाला महामंडळ धरले तर ज्यांनी 15 वर्षे सत्ता उपभोगली आहे, अशा सत्ताधारी पक्षाने मनुष्याच्या शरीरातील प्रत्येक भागाचे तुकडे करुन ठेवलेले आहेत.

BB-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रशांत बंब....

धड आणि डोके ठेवले मग सांगतात की, इतक्या आत्महत्या यावर्षी कशा झाल्या? हे अचानक झालेले नाही. या सभागृहात सांगितले जाते की, मलम लावा म्हणजे सर्वच्या सर्व हातपाय येतील. आपल्याला यासाठी एक विशिष्ट कालावधी द्यावा लागेल. हे सरकार काम करीत असताना समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांनी आक्षेप घ्यायला नको. सल्ला द्या फक्त असे करा, आम्ही चुकलो म्हणून तुम्ही आक्षेप घेतले तर 40-45 वर्षे जे राज्य करीत आहेत, त्याचीच फळे आम्ही भोगत आहोत. मला कोणाला जास्त हिनवायचे नाही, परंतु ज्या गोष्टी त्यांनी केल्या त्या मन:पूर्वक स्वीकारल्या पाहिजेत. अशाप्रकारे ज्या ज्या गोष्टी या राज्यामध्ये झाल्या, त्यावर आपण अभ्यास केला नाही तर पुढील पिढ्या आपल्याला माफ करणार नाहीत....(अडथळा)...

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.प्रशांत बंब आपणाला 50 मिनिटे झालेली आहेत. दोन तीन मिनिटात आपले भाषण संपवा. पूर्ण वेळ आपल्याला देता येणार नाही.

श्री.प्रशांत बंब : अध्यक्ष महाराज, मराठवाड्याची आणि कोकणची चर्चा आपण क्लब केलेली आहे.

अध्यक्ष : उर्वरित सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळणार नाही, माझी काही अडचण नाही. आज आपण दोन चर्चा एकत्रित घेत आहोत. मराठवाड्याची चर्चा सुरु झालेली आहे, त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कोकणासंबंधीची चर्चा मांडतील. ती क्लब करुन दोन्हीचा वेळ मिळून मंत्री महोदयांच्या उत्तरासह पाच तासाचा वेळ राहिल.

श्री.प्रशांत बंब : अध्यक्ष महाराज, आपले अधिवेशन सुरु झाले ते मराठवाड्याच्या चर्चेपासून सुरु झालेले आहे. मराठवाड्यावर चर्चा करताना मला आपल्याला काही गोष्टी निदर्शनास आणून द्यावयाच्या आहेत. भारतात मानव विकास निर्देशांकाच्या बाबतीत एक सर्व्हे करण्यात आला. भारतातील वेगवेगळ्यात राज्यात वेगवेगळे प्रदेश आहेत. उत्तर प्रदेश राज्यात वेगवेगळे प्रदेश आहेत. महाराष्ट्र राज्यात पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, खानदेश अशा प्रदेशांचाही सर्व्हे करण्यात आला. मानव विकास निर्देशंकाच्या अहवालानुसार सर्वात दारिद्रय रेषेखालील गरीब लोक मराठवाड्यात आहेत. याकरिता काही बाबी मला सभागृहात मांडणे क्रमप्राप्त आहेत. मी आतापर्यंत बघितले आहे जे सन्माननीय सदस्य प्रस्तावावर सुरुवात करतात, ते दोन तास पूर्ण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रशांत बंब....

होईपर्यंत थांबत नाहीत. मी आपल्या भावनेचा आदर करून लवकरात लवकर माझे भाषण संपविन.

अध्यक्ष महाराज, मराठवाड्यात दरडोई उत्पन्नामध्ये राज्यातील सर्वात खाली मराठवाडा आहे. बालविवाहाचे सर्वात जास्त प्रमाण 32 टक्के मराठवाड्यात आहे. शिक्षणाचा ड्रॉप्टआऊट रेट हा मराठवाड्यात जास्त आहे. एखादा मुलगा बालवाडीत गेला तर मॅट्रीकपर्यंत जास्तीत जास्त कमी होणारी संख्या मराठवाड्यात आहे. मॅट्रीक ते पदवीधर, पदवीधर ते पोस्ट ग्रज्युएट पर्यंतची सर्वात जास्त गळती मराठवाड्यात आहे. ट्रॅक्टरच्या बाबतीत दर शेकडा संख्या सर्वात कमी मराठवाड्यात आहे. आरोग्याच्या बाबतीत 50 हजार खाटा सर्वात कमी मराठवाड्यात आहेत. या सर्व गोष्टींची तपासणी केली तर त्याची कारणमिंमासा आपल्याला स्पष्ट करावी लागेल. या सर्व गोष्टी आपणही जाणून आहात. मंत्री महोदय 50 हजार कोटी रुपये तिजोरित कसे आणाल, हे बघितले पाहिजे. पैसे आले आपले घेऊन गेले, दादागिरी संस्कृती, मफलर संस्कृती या संस्कृत्यांनी येऊन आपला ऱ्हास केला. यांना उचलून फेकले नाही तर आपल्याला कोणीही माफ करणार नाही. सात कोटी रुपयांचे सात आठ वर्षात 2700 कोटी रुपये, इतके एक नंबरमध्ये केले. आपण हे शेतकऱ्यांना सांगायला पाहिजे होते की, माझ्याकडे सात वर्षापूर्वी सात कोटी रुपये होते, ते मी आठ वर्षात 2700 कोटी रुपये केले. आमच्या भागात दुष्काळ आला नसता. नव तरुण हे शिकले असते, पण हरकत नाही, कोण किती वर्षे कोठे राहतो हा त्यांचा कर्माचा भाग आहे. आम्ही त्यामध्ये खुशी नाही. पैसे कमविण्याच्या मानसिक बिमाऱ्या यांना झाल्या होत्या. त्यांना कळत नव्हते की, या पैशांचे काय करायचे? आज तुमची काय व्हॅल्यू राहिली? किती हजारो कोटी रुपये तुमच्याकडे असतील, परंतु तुम्हाला वापरण्याची हिंमत नाही. लोक कोणी चांगल्या नजरेने बघत नाहीत. हा दुष्काळ आला, त्याची कारणे मी सांगत आहे. आमचा पैसा फक्त लिमिटेड लोकांच्या हातात गेला आहे. या सभागृहात आव आणून गोड बोलून सांगायचे, वेगवेगळ्या ॲक्टींगमध्ये बोलायचे, इतक्या वेड्यात जर आमच्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी काढले असेल तर आम्ही बोलायचे नाही का ? 50 हजार कोटी रुपये, 20 हजार कोटी रुपये, यांना आकडे म्हणजे काहीच वाटत नाही. एका मंत्री महोदयांनी तीन इंडस्ट्रीज फॉरेनमध्ये घेतल्या असतील तर दुसरे मंत्री महोदयांची पाच इंडस्ट्रीची तयारी, मी त्याच्या दहा कशा तयार करु

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रशांत बंब....

याप्रमाणे यांनी अंगाला सर्व जीर्ण करुन टाकले. सर्व हातभाय तोडून टाकले. सर्व बोटे तोडून टाकले, फक्त धड ठेवले. या स्पर्धेमुळे हा मराठवाड्यातील शेतकरी दोन तीन वर्षाच्या दुष्काळामुळे आत्महत्येवर आलेला नसून गेल्या पंधरा वर्षापूवी त्यांच्याकडे संपत्ती होती, त्यांच्यावर कर्ज नव्हते.

अध्यक्ष महाराज, आमच्या मराठवाड्यात या सहकारी बँका एकरी दहा हजार रुपये, वीस हजार रुपये कर्ज देतात त्यामुळे या शेतकऱ्यांना खाजगी सावकारांकडून कर्ज घ्यावे लागले. गेल्या दहा ते पंधरा वर्षात त्यांची मालमत्ता एका बाजूला आणि त्यांचे कर्ज एका बाजूला अशी त्यांची स्थिती झालेली आहे. त्यांचे हात पाय काम करीत नसत त्याचे कारण असे की, मराठवाड्यात वीज नव्हती. मागील कालावधीतील मराठवाड्याची परिस्थिती बघितली तर विजेचे पोल, मोटारी, विजेच्या तारा या अतिशय लो क्वॉलिटीच्या आहेत. ज्या डेन्सिटीची ऑर्डर दिली होती, त्या डेन्सिटीमध्ये आम्हाला वीज उपलब्ध झाली नाही. एकेकाळी पाणी होते, परंतु विजेअभावी ते वापरता आले नाही. एकप्रकारे विशिष्ट प्लॅनिंग करुन हा पैसा हडप केला. वीज, पाणी यामुळे शेतकऱ्याला दुष्काळातून वर येता आले नाही. सहकारी साखर कारखान्यांमध्ये शेतकऱ्यांना गेल्या सरकारने गुलाम बनवून टाकले. जेव्हा सरकारी साखर कारखाना होता तेव्हा तो विक्रीला काढला, तुम्हीच विकत घेतला तेव्हा तो चांगले चालायला लागला. बिचारा शेतकरी जो त्या कारखान्याचा मालक होता, त्याला तुम्ही मजूर बनवून टाकले. आता आपण सांगत आहात की, आमचे मागचे काढू नका. पूर्ण शरिराची छल्ली विछल्ली करुन टाकली आहे.

आम्ही या गोष्टी एकदा, दोनदा, पाचदा या सभागृहात मांडणार, परंतु आम्हाला असे वाटले की, या सभागृहात मांडून त्यातून काही निकालच येत नाही तर आम्ही सुध्दा दुसरा पर्याय अवलंबिल्याशिवाय राहणार नाही. आम्हाला अन्य मार्ग अवलंबवावे लागतील जे शेतकऱ्यांच्या हिताचे परंतु लोकशाही पध्दतीने असतील. एसीबीला काही मर्यादेपर्यंतच अधिकार आहेत. श्वेतपत्रिका काही मर्यादित गोष्टीवर काढलेली आहे. आपण बरोबर मार्ग काढला नाही तर त्यामुळे लोकांना उच्च न्यायालयात जावे लागते. आपण या गोष्टीमध्ये गांभीर्याने लक्ष देऊन टाईम बाऊंड कार्यक्रम आखून जास्त पैसे तिजोरित कसे येतील, हे बघितले पाहिजे.

यानंतर CC-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रशांत बंब ....

अध्यक्ष महोदय, हे पळणार आहेत, यांचा पासपोर्ट जप्त करावा. तुम्हाला मी हे सांगतो की, हे पळून जाणार आहेत. तुम्हाला लोक सोडणार नाहीत. आपण जर याची दखल घेतली नाही तर जनहित याचिकेमध्ये लोकांना जावे लागते. तेथून मग एसआयटी करा, हे करा, ते करा अशा ऑर्डर्स निघतात. ढळढळीत आपल्या समोर 5 हजार कोटी रुपये ज्या प्रकल्पावर खर्च झाले परंतु, प्रत्यक्षात तेथेच मातीचे ढेकूळही काढण्यात आले नाही, कॅनॉल नाही, 5-5 हजार कोटी रुपये त्यातून काढण्यात आले, तरीही आपण ॲक्शन घेणार नसू तर आपल्यासारखे दुर्दैवी कोणी असणार नाही.

अध्यक्ष महोदय, प्रत्येक बाबतीत मराठवाड्यावर अन्याय होताना या बाबींनी त्यावर कसा इफेक्ट केला, हे मला सांगायचे होते. या अनुषंगाने मला काही सोल्युशन्स सांगावयाच्या आहेत.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य आपण आता 3 मिनिटांत आपले भाषण पूर्ण करावे. आपल्याला बोलण्याकरिता 1 तासभर वेळ दिलेला आहे. त्यापेक्षा अधिक वेळ आपल्याला देता येणार नाही. आपण नंतर मंत्रालयात भेटून सांगावे.

श्री. प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, मग आपणच मला म्हणाल की, तुम्ही सभागृहात का बोलला नाहीत ? ठीक आहे. वेळेच्या अभावी मी कमीत कमी शब्दांत माझे म्हणणे मांडण्याचा प्रयत्न करतो. सर्वात अगोदर जे फक्त मिटिंग घेऊन करणे शक्य आहे, त्याबाबत मी सांगतो. यावर्षी पाण्याचे समन्यायी वाटप झाले पाहिजे. त्याकरिता असलेल्या कायद्याची आपल्याला अंमलबजावणी करावयाची आहे. आपल्याला असे वाटत असेल की, कायदा बरोबर नाही तर आपण अमेंडमेंट आणली पाहिजे. परंतु, जोपर्यंत आपण अमेंडमेंट करीत नाही तोपर्यंत जो कायदा आहे, तो आपल्याला मान्यच करावा लागेल, त्याची अंमलबजावणी करावी लागेल. पाण्याचे समन्याची वाटप करताना त्र्यंबकेश्वर पासून ते जायकवाडी पर्यंतच्या भूभागात पडणाऱ्या पाण्याची टक्केवारी जवळपास 59 आणि 41 टक्के अशी दिलेली आहे. त्याची सुरुवात पाण्याच्या साठ्याप्रमाणे करताना मंत्री महोदय एक गोष्ट व्यवस्थित समजून घेतली पाहिजे की, मी साठ्याप्रमाणे म्हणत आहे की, एकदम 50-50 टक्के देऊन टाका असे म्हणत नाही. परंतु, 15-20 टक्के पाणी विशिष्ट कालावधीत वरती जास्त ठेवून ते पाणी खरिपापासून सुरुवात केली तर, मराठवाड्यामध्ये तुम्हाला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रशांत बंब ....

ताबडतोब निर्णय मिळेल. येणाऱ्या पावसाळ्यापासूनच त्या पाण्यामुळे लोकांना शाश्वत पाणी मिळण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. ते पाणी त्यांना मिळत आहे. आपण पाण्याचे समन्यायी वाटप करावे, याकरिता आपण बैठक घेतली तरी चालेल. परंतु, येणाऱ्या पावसाळ्यापासूनच पाणी साठ्याप्रमाणे आपण पाण्याचे समन्यायी वाटप करावे.

कृष्णा, भीमा याबाबतीत आपल्याला जी परवानगी आहे ती आणि आणखी परवानगी घेऊन भीमा नदीचे पाणी उजनीमध्ये टाकून उस्मानाबाद, लातूर व बीड यांना त्यांच्या हिश्श्याचे पाणी आणण्याची प्रक्रिया त्वरित सुरु करावी. तसेच, उत्तरामध्ये कृपया टाईमबाऊंड प्रोग्राम आपण सभागृहाला कळविल्यास बरे होईल.

अध्यक्ष महोदय, वैनगंगा, पैनगंगा या नदीतून आपण 10 टीएमसी पाणी आणू शकतो. तशी परवानगी आपल्याकडे आहे, त्याची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. ते 10 टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यामध्ये आणावे. जायकवाडीच्या पुढे आपल्याला पाणी वापरण्याची परवानगी नाही. ते पाणी वापरण्याची परवानगी आपण घेऊ शकतो. ती परवानगी आपण घ्यावी.

सिध्देश्वर, देऊळगावराजा, जालना याद्वारे परभणीकडे पूर्णा नदी जाते, त्याच्या उर्ध्व भागातही पाणी वापरण्याची परवानगी नाही. ती परवानगीसुध्दा आपण घेतली पाहिजे. आपल्या राज्यातून गोदावरी नदी जाते. गोदावरी खोऱ्याचा साडेएकोणपन्नास टक्के भूभाग महाराष्ट्रातून जातो. मराठवाड्यात त्या गोदावरी खोऱ्याचा 89 टक्के भाग आहे. त्या गोदावरी खोऱ्यातून इतर राज्यांना जास्तीचे पाणी दिले आहे. कायदेशीररित्या ते पाणी वापरण्याची परवानगी आपल्याला मिळू शकते. लवादाकडून जाऊन त्याची प्रक्रिया सुरु करावी. आवश्यकता वाटल्यास मराठवाडा व उर्ध्व भागातील आमदारांची आपण एक संयुक्त बैठक घेतली तर, आपल्याला त्यावर जास्त उहापोह करता येईल. जादा 1024 टीएमसी पाणी वापरण्याकरिता लवादाची परवानगी मिळू शकते, ती आपण घ्यावी.

अध्यक्ष महोदय, वैतरणा डॅम व उर्ध्व वैतरणा डॅम या दोन्ही डॅमच्यामध्ये एक सॅडल डॅम तयार करुन वैतरणाचे जे पाणी समुद्रात वाहून जाते ते पाणी जर आपण आणले तर, जवळपास 22 टीएमसी पाणी आपण गोदावरी खोऱ्यात आणू शकतो. हा कमी खर्चाचा भाग आहे, याबाबतीतही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रशांत बंब ....

आपण बैठक घेतली तर, चांगली चर्चा करून त्यातून मार्ग निघू शकतो. त्यामुळे उर्ध्व वैतरणा व वैतरणा यामध्ये जो खोलगट भाग आहे तेथे आपण सॅडल डॅम बनविला तर, ते पाणीही आपल्याकडे येऊ शकते.

अध्यक्ष महोदय, 18 टीएमसी पाणी वापरण्याच्या मराठवाड्याच्या परवानगीबाबतचा प्रस्ताव एक तर राज्यपाल महोदयांकडे गेला आहे किंवा तो प्रस्ताव त्यांच्याकडे पाठवून 18 टीएमसी पाणी वापरण्याची परवानगी आपण आपल्या उत्तरामध्ये द्यावी, असे मला प्रमुखपणे नमूद करावयाचे होते.

अध्यक्ष महोदय, शेवटचे सांगतो की, इन्फ्रास्ट्रक्चरबाबत खरे म्हणजे रस्ते आणि बीओटी या विषयावर एक सेपरेट चर्चा घेण्यात आली तर, राज्यातील सर्व रस्ते व बीओटीच्या विषयावर आपल्याला चर्चा करता येईल. या रस्त्यांच्या बाबतीत मराठवाड्यात शेतीकरिता जे रस्ते लागतात ते आणि बीओटीचे जे टोलनाके बंद होऊ शकतात ते टोलनाके त्वरित बंद केले कारण शेतकऱ्यांवर त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या परिणाम होत असतो.

अध्यक्ष महोदय, माझी शेवटची विनंती पुन्हा एकदा आहे की, मला माहीत आहे व मंत्री महोदय आपल्यालाही माहीत आहे की, कशा कशा पध्दतीने हा भ्रष्टाचार झालेला आहे. आम्ही येथे बोलण्याची हिंमत करतो, आमचा जीव जळतो की, 5-5 कोटी रुपयांचे रस्ते जर घ्यायचे असतील तर, आम्हाला 25 चकरा माराव्या लागतात आणि येथे तिजोरीतील हजारो कोटी रुपयांचा असा अपव्यय होतो, तो पैसा आपण पुन्हा आणावा आणि योग्य ती दखल घेऊन शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करावा. मराठवाड्यामध्ये पुढच्या वर्षी एकही आत्महत्या होणार नाही, असा प्लान आपण तयार करावा, याची सुरुवात समन्यायी पाण्यापासून करावी आणि राहिलेल्या धरणांचे काम पैसे देऊन आपण सुरु करावे, एवढे बोलून थांबतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

.....

अध्यक्ष : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, म.वि.स. नियम 293 अन्वयेच्या दुसऱ्या प्रस्तावावरील चर्चेला सन्माननीय सदस्य श्री. जयदत्त क्षीरसागर सुरुवात करतील. त्यानंतर दोन्ही प्रस्तावांवर एकत्रित चर्चा सुरु होईल. दोन्ही प्रस्तावांना मिळून 5 तास इतका वेळ असेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : यावर्षी अवर्षणामुळे संपूर्ण राज्यात पडलेला भीषण दुष्काळ, परिणामी पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या चाऱ्याचा निर्माण झालेला प्रश्न आणि शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोयी उपलब्ध न झाल्याने शेतकरी आत्महत्यांमध्ये झालेली वाढ

मु.शी. : यावर्षी अवर्षणामुळे संपूर्ण राज्यात पडलेला भीषण दुष्काळ, परिणामी पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या चाऱ्याचा निर्माण झालेला प्रश्न आणि शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोयी उपलब्ध न झाल्याने शेतकरी आत्महत्यांमध्ये झालेली वाढ या विषयाबाबत सर्वश्री अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, गणपतराव देशमुख, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, जयदत्त क्षीरसागर, डॉ.पतंगराव कदम, सर्वश्री भास्कर जाधव, विजय वडेट्टीवार, बबनराव शिंदे, बाळासाहेब थोरात, राहुल मोटे, अब्दुल सत्तार, हसन मुश्रीफ, प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री दत्तात्रय भरणे, सुनिल केदार, बाळासाहेब पाटील, गोपालदास अग्रवाल, संग्राम जगताप, मो.आरीफ नसीम खान, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री अमित देशमुख, हनुमंत डोळस, ॲड.यशोमती ठाकूर, सर्वश्री विजय भांबळे, जयकुमार गोरे, वैभव पिचड, भाऊसाहेब कांबळे, दिपक चव्हाण, डी.एस.अहिरे, संजय कदम, डी.पी.सावंत, राहुल जगताप, मधुकरराव चव्हाण, नरहरी झिरवाळ, कालिदास कोळंबकर, बसवराज पाटील, वसंतराव चव्हाण, अमीन पटेल, ॲड.के.सी.पाडवी, सर्वश्री कुणाल पाटील, काशिराम पावरा, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, सुभाष ऊर्फ पंडितशेठ पाटील, अमर काळे, अमित झनक, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ.संतोष टारफे, श्री.शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावीत, श्री.अस्लम शेख, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री संग्राम थोपटे, त्र्यंबक भिसे, कु.प्रणिती शिंदे, सर्वश्री सिद्धाराम म्हेत्रे, भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

श्री. जयदत्त क्षीरसागर (बीड) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम 293 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"यावर्षी अवर्षणामुळे संपूर्ण राज्यात पडलेला भीषण दुष्काळ, परिणामी पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या चाऱ्यांचा निर्माण झालेला प्रश्न, शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत कमी भाव मिळणे, अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तुंचे व पालेभाज्यांचे दर 40 ते 60 टक्क्याने

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर .....

वाढणे, रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे उपलब्ध असतानाही शासनाने ती सुरु न केल्यामुळे तसेच पाणीटंचाई, चाराटंचाई यामुळे ग्रामीण भागातील हजारो कुटूंबांनी उदरनिर्वाहासाठी केलेले स्थलांतर,

परिणामी ग्रामीण भागातील गावच्या गावे ओस पडणे, कर्जबाजारीपणा, नापिकी इत्यादीमुळेशेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसान व शासनाकडून त्यांना मिळालेले तुटपूंजे अर्थसहाय्य इत्यादीमुळे राज्यात सुमारे 4 हजार शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, राज्यात 16 हजार गावांमध्ये निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई, पाण्याअभावी उद्योगधंदे बंद पडणे, परिणामी 50 हजार मजुरांनी स्थलांतर करणे, तर विद्यार्थी वसतीगृहे, दवाखान्यातील ऑपरेशन थिएटर्स बंद ठेवण्याची निर्माण झालेली परिस्थिती, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबाव्यात म्हणून शेतकऱ्यांना शाश्वत सिंचन उपलब्ध करुन देण्यात आलेले अपयश, सिंचनाचा सर्वाधिक अनुशेष असलेल्या विदर्भात विदर्भ सिंचन महामंडळाचे 4000 कोटी रुपये अखर्चित असणे, वारंवार सुप्रमा, सुतामा, रिक्त पदे भरणे, भूसंपादन यासंबंधात सरकारचे झालेले दुर्लक्ष, गोसेखुर्द, लोअरवर्धा, बेंबळा/कोहळ हे प्रकल्प गेल्या 20 ते 25 वर्षांपासून अपूर्ण असणे, अमरावती विभागाचा 4 लाख हेक्टरचा सिंचन अनुशेष असणे, मा.राज्यपालांनी दिलेल्या निदेशाची अंमलबजावणी होते किंवा नाही ते पाहण्यासाठी दर तीन महिन्यांनी बैठक घेऊन त्यातील समस्यांचे निराकरण करण्याची जबाबदारी पार न पाडणे, त्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोयी उपलब्ध न झाल्याने आत्महत्यांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येणे, राज्यातील शेतकरी व जनतेमध्ये वाढत असलेला मोठ्या प्रमाणात असंतोष व निर्माण होणारी वेगळेपणाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अध्यक्ष महोदय, हे दोन्ही प्रस्ताव मराठवाड्याशी संबंधित असल्याने या दोन्ही प्रस्तावांवर एकत्रित चर्चा करण्याचे आपण सूचित केलेले आहे. एक प्रस्ताव मराठवाड्यातील रखडलेल्या विकासासंबंधीचा आहे तर दुसरा प्रस्ताव अभूतपूर्व अशा दुष्काळामुळे महाराष्ट्र व मराठवाड्यात निर्माण झालेल्या भीषण टंचाईवर शासनाने करावयाच्या उपायोजनेबाबतचा आहे. सरकार त्यामध्ये अपुरे पडत आहे, ही सन्माननीय सदस्यांची भावना असल्यामुळे हा दुसरा प्रस्ताव आम्ही आणलेला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर .....

अध्यक्ष महोदय, राज्यावर गेल्या 3 वर्षांपासून दुष्काळाचे सावट होते. हे चौथे वर्ष आहे. राज्यात अभूतपूर्व असे जलसंकट निर्माण झालेले आहे. सन 1971 चा दुष्काळ या राज्यातील जनतेने पाहिला. त्याकाळात जे सरकार अस्तित्वात होते, त्यांनी त्याला समर्थपणे तोंड दिले. महाराष्ट्रातील, मराठवाड्यातील अनेक तालुक्यांच्या ठिकाणी 1-1 लाख मजूर रोजगार हमीच्या कामावर यायचे, त्यांना वेळेवर काम मिळायचे.

DD-1/-...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर.....

जरी आपत्ती होती तरी त्या आपत्तीचे इष्टापतीत रुपांतर झाले आणि अनेक विकासाची कामे रस्त्यांची कामे, पाझर तलावांची कामे, रोजगार हमीच्या माध्यमातून त्या काळात पूर्ण झाली. माणसे जगली, आत्महत्त्या होऊ दिल्या नाही. परंतु दुर्दैवाने हे सलग चौथे वर्षे दुष्काळाचे आहे. दुष्काळामुळे संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था भरडून चालली आहे. शहरी अर्थकारण उद्धवस्त होत आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई, चाऱ्याची टंचाई, हाताला काम नसणे, हाताला काम नसल्यामुळे स्थलांतरण करण्याची वेळ येणे, गावात पत नाही, घरात पत नाही, मुलीच्या किंवा मुलाच्या लग्नाचा खर्च आहे, शिक्षणाचा खर्च आहे, दवाखान्याचे खर्च आहे. हे सर्व खर्च आणि नापिकी व कर्जबाजारपणामुळे आहे. या सर्व बाबीमध्ये कोंडी झाल्याने मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागात आत्महत्त्या वाढलेल्या आहेत. महाराष्ट्रात गेल्या 16 महिन्यात 4 हजाराच्यावर आत्महत्त्या झाल्या. हे अतिशय लांच्छनास्पद आहे. आत्महत्त्या अगोदर होत नव्हत्या, हे मी म्हणणार नाही. आत्महत्त्या होत होत्या. शेतकरी खचून जायचे. परिस्थितीशी संघर्ष करीत नाऊमेद व्हायचे आणि दुर्दैवाने आत्महत्त्येला कवटाळायचे.

अध्यक्ष महोदय, या वर्षी देखील पाऊस पडणार नाही, हे सरकारच्या लक्षात आले असताना त्वरीत म्हणजेच सप्टेंबर, ऑक्टोबर पासून उपाययोजना करणे आवश्यक होते. त्याबाबतीत सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे. मराठवाड्यात 1200 हून अधिक आत्महत्त्या झाल्या. पूर्ण महाराष्ट्रात 4 हजारच्या वर आत्महत्त्या झाल्या आहेत. टँकरची संख्या वाढलेली आहे. मराठवाड्याचे नाव बदलून स्मशानवाडा आणि टँकरवाडा ठेवावे काय, असे चित्र निर्माण झालेले आहे. महत्त्वाची बाब लक्षात घेणे आवश्यक होते. पिण्याच्या पाण्याकरिताही तिसरे महायुद्ध होईल, अशा प्रकारची चर्चा होत होती. महायुद्ध लांबच राहिले. भविष्याच्या उदरात काय आहे, हे पहाणे लांबच राहिले. परंतु आज पाणी वाटपाकरिता गल्लोगल्लीत, वार्डावार्डामध्ये 144 कलम लावावे लागत आहे. त्यामुळे युद्धाची ठिणगी, ही वार्डावार्डातील आपापसात पाण्याकरिता कलहाची ठिणगी, ग्रामीण अर्थव्यवस्था, शहरी अर्थव्यवस्था तसेच शहरी आणि सामाजिक जीवन उधद्वस्त करु पहाते की, काय अशा प्रकारचे चित्र राज्यात निर्माण झालेले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर.....

अध्यक्ष महोदय, लातूर येथे रेल्वेच्या टँकरने म्हणजेच वाघिनीने मिरज वरुन पाणी नेले जाणार आहे, असे सांगितले जाते. लातूरची पिण्याच्या पाण्याची परिस्थिती एवढी भीषण होईल, हे भविष्यकाराने सरकारला सांगण्याची गरज नव्हती. आजपर्यंत आपण वाट पाहिली. ही परिस्थितीती आपल्या लक्षात अगोदरच आली होती. याबाबतचा आढावा विभागीय पातळीवर, जिल्हापातळीवर अगोदरच घेण्यात आला होता. अशा प्रकारची टंचाई जाणवेल, पिण्याचे पाणी लातूर आणि परभणी व अन्य शहरांमध्ये मिळणार नाही. हे सुर्यप्रकाशाइतके सप्टेंबर महिन्यात स्पष्ट झाले होते. तेव्हा पासून शासन हाताची घडी घालून गप्प बसले होते काय, असा प्रश्न पडतो. ही शासनाची जबाबदारी आहे. नैसर्गिक आपत्ती सांगून किंवा निमंत्रण देऊन येत नाही. दुष्काळ निमंत्रण देऊन येत नाही किंवा सांगून येत नाही. परंतु ज्यावेळी निसर्गाने मारले तर त्यावेळी सरकारने तारावे, ही भूमिका कल्याणकारी राज्याची राहिलेली आहे. तशीच भूमिका सत्तेवर कोणीही असो, इकडचे असो की, तिकडचे असो, त्यांच्याकडून व्हायला पाहीजे होती. तशी आमची सरकारकडून अपेक्षा होती.

अध्यक्ष महोदय, आमचे सरकार सत्तेमध्ये असताना मागील तीन वर्षामध्ये पाण्याचे संकट आले होते. त्यावेळी उस्मानाबाद आणि जालना या दोन्ही जिल्ह्याच्या ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष होते. त्यावेळी आम्ही दोन्ही ठिकाणी 100 कोटी रुपये पाण्याच्या योजनेवर खर्च केले होते. उजनीच्या बॅक वॉटरवरुन उस्मानाबाद शहराची तहान भागविण्याकरिता 100 कोटी रुपयांच्या आसपास निधी खर्च करुन पाण्याची योजना आणली, तेथे पाणी आणले. जालना शहरातील पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी जायकवाडी धरणातील बॅक वॉटरचे पाणी आणले व तेथील पाण्याची टंचाई दूर करण्याचा प्रयत्न केला. या सरकारचे हात कोणी बांधले होते काय. अशा पद्धतीने करु नये, असे या सरकारला कोणी सांगितले होते काय. मराठवाड्यामध्ये, लातूरमध्ये पाणी टंचाई होणार आहे, परभणीला पाणी वाटपामुळे 144 कलम लागणार आहे, याचा अंदाज सरकारला यायला पाहीजे होता. परंतु सरकारने अतिशय ढिलाईने दुष्काळाकडे पाहीले. सरकारला वाटले की, पाऊस पडेल, अवकाळी पाऊस पडेल, गारपीट होईल, लोक विसरतील आणि आपल्याला सहजरित्या वेळ मारुन नेता येईल. परंतु दुर्दैवाने हे चित्र अतिशय भीषण होत चालले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर.....

अध्यक्ष महोदय, रोजगार हमीची कामे, नरेगाची योजना ही पूर्णपणे ठप्प पडलेली आहेत. हे आम्ही बोलत नाही. उच्च न्यायालयाच्या मुख्य बेंचने आणि नागपूरच्या बेंचने सरकारला विचारणा केलेली आहे की, आपण दुष्काळाच्या बाबतीत काय करीत आहात, काय करणार आहात, दुष्काळ निवारण करण्याकरिता आपल्या काय उपाययोजना आहेत. एवढेच नव्हेतर सर्वोच्च न्यायालयात देखील यासंदर्भात याचिका दाखल करण्यात आली आणि त्यामध्ये मराठवाडा, महाराष्ट्र, बुंदेलखंड या भागामध्ये टंचाई दूर करण्याकरिता सरकार काय उपाययोजना करीत आहे, याची विचारणा करण्यात आली. बीबीसी लंडन सारख्या प्रसार या माध्यमाने देखील लातूरमध्ये, मरावाड्यामध्ये, महाराष्ट्रामध्ये एवढी पाणी टंचाई का निर्माण झाली याची दखल घेतली आहे. या सरकारने हाताला काम देण्याच्या बाबतीत, स्थलांतराच्या बाबतीत तात्पुरती उपाययोजना मलमपट्टी केली, तात्पुरते पाणी आणून दिले हे ठीक आहे. त्याने काहीशी पाण्याची गरज भागेल. परंतु या दुष्काळाला सामोरे जाण्याकरिता दिर्घ पल्ल्याच्या उपाययोजना करण्याची गरज आहे. अल्प मुदतीच्या उपाययोजना म्हणजेच मीरज वरुन पाणी आणण्याची बाब ठीक आहे. परंतु दिर्घ मुदतीच्या उपाययोजना करायच्या असतील तर मराठवाडा आणि विदर्भ या दोन्ही प्रदेशातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्याकरिता आपण जाणिवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. याबाबत आपल्या उत्तरात निश्चितच उल्लेख होईल, असे वाटते. आताच सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत बंब यांनी नेहमीप्रमाणे त्यांच्या बंबातून अगोदर 'आ' ओकली नंतर ती विजविण्याकरिता पाणी टाकले. त्यांनी सरकारलाही मार्गदर्शन केले, आपण त्याचा मागोवा घ्यावा. परंतु यासंदर्भातील योजना पूर्ण करण्याकरिता तातडीने पैसा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, आपण अनुशेषाबाबतीत तसेच राज्य एकत्र रहावे, महाराष्ट्र अखंड रहावा, महाराष्ट्राचे तुकडे व्हायला नको. सयुक्त महाराष्ट्राकरिता 105 हुतात्म्यांनी बलिदान दिलेले आहे. त्यांचे बलिदान व्यर्थ जाऊ नये. यासाठी महाराष्ट्रातील सर्व लोकांची भावना जोडलेली आहे की, महाराष्ट्र एकसंघ रहावा. परंतु महाराष्ट्रात विभक्ती करणाची जी बिजे रोवली जातात आणि त्यामागची मानसिकता का निर्माण होते, याच्याही खोलामध्ये सरकारने जाणे आवश्यक आहे. सत्ताधारी पक्षाकडून हा प्रस्ताव आलेला आहे. त्यांनी प्रस्तावामध्ये उल्लेख केलेल्या दोन ओळी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर.....

वाचून दाखविण्याची गरज वाटते. त्या अशा आहे की, राज्य शासनाने मागील एक वर्षाच्या कालावधीत हाती घेतलेल्या विकासाच्या विविध योजना पूर्णत्वास जात असल्याचे दिसून आल्यामुळे जनतेमध्ये शासनाविषयी विश्वासाचे वातावरण निर्माण होणे. सत्ताधारी पक्षाकडून प्रस्ताव असला, तर आपल्या पक्षाची आणि सरकारची भलामन करणे मी समजू शकतो. परंतु आपण एका वर्षात विकासाची कामे केल्यामुळे सरकारवर जनतेचा विश्वास वाढलेला आहे, असे म्हणणे म्हणजे सुर्य झाकण्यासारखी आहे. धादांत खोटे बोलणे आहे. यामध्ये मीच म्हणत नाही, या बाजूचे सदस्य म्हणत नाही, तर सत्ताधारी पक्षामध्ये ज्यांची 50 टक्के भागीदारी आहे, त्या पक्षाचे नेते श्री. उद्धवजी ठाकरे यांनी मुंबई आणि कोल्हापूर येथे झालेल्या कामगार मेळाव्यामध्ये ठासून सांगितले की, या राज्याची अकार्यक्षमता, सरकारची अकार्यक्षमता यामुळे राज्यामध्ये अस्वस्थता आणि बेचैनी आहे आणि हे सरकार कसे नालायक ठरेल, म्हणजे नालायक ठरविण्यापर्यंत सत्तेमध्ये भागिदारी असलेले नेते राज्यात बोलत आहेत. म्हणजे आपलेच प्रतिबिंब आरशात पहाण्यासारखे आहे...(अडथळा)...

अध्यक्ष : शिवसेना कार्याध्यक्ष श्री. उद्धवजी ठाकरे यांच्या तोंडी नालायक हा शब्द कसा येईल.

श्री. जयदत्त क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, वृत्तपत्रामध्ये आहे. आपण नालायक ठरवू.

...EE/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयदत्त क्षीरसागर यांनी श्री.उध्दव साहेबांच्या तोंडी काही शब्द घातले आहेत, त्यांनी सांगितल्याप्रमाणे ते कोठेही बोलले नाही. जर मागच्या सरकारची लोकांना आठवण होत असेल तर हे सरकार कार्यक्षम आहे की नाही, असे श्री.उध्दव साहेब बोलले होते, "नालायक" वगैरे असे ते बोलले नाही. त्यामुळे सदरहू शब्द कामकाजातून काढून टाकण्यात यावेत, अशी माझी विनंती आहे.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्य डॉ.जयप्रकाश मुंदडा यांच्या एक गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो की, सदरहू बातम्या सर्व वर्तमानपत्र व इलेक्ट्रॉनिक मिडियामध्ये आल्या आहेत. तसेच, त्यांच्या पक्षाचे मुखपत्र असलेल्या "सामना" या दैनिकामध्ये देखील सदरहू बातमी छापून आली आहे. त्यावर तरी त्यांचा विश्वास आहे की नाही ? नसेल तर त्यांनी आक्षेप घेतलेले शब्द काढून टाकू.

अध्यक्ष : म.वि.स.नियम 293 वरील प्रस्तावाच्या बाहेर सन्माननीय सदस्यांनी बोलू नये.

श्री.जयदत्त क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, यापूर्वी सभागृहामध्ये तास भर कशा प्रकारचे बोलणे सुरु होते, आम्ही वेगळे काही बोलत नाही.

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, चौकटीच्या बाहेर बोलण्याची आमची इच्छा नाही. परंतु यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.बंब हे म.वि.स.नियम 293 वरील प्रस्तावावर एक तास बोलत होते, ते कोणत्या चौकटीमध्ये बोलत होते, हे आपण आम्हाला सांगावे.

श्री.जयदत्त क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, लोकांचा विश्वास मागील वर्षभर या सरकारने काम केले त्यामुळे वाढला आहे, यावरील माझ्या विधानाला सन्माननीय सदस्यांनी आक्षेप घेतला होता. परंतु त्यासंदर्भातील बातम्या ठिकठिकाणच्या वृत्तपत्रामध्ये छापून आल्या आहेत. सत्ताधारी पक्षातील पक्षाचे नेते श्री.उध्दव ठाकरे यांचे आपल्या सरकारबद्दल काय म्हणणे आहे, हे मी उधृत केले. हे सांगण्यामागे या सरकारचे लक्ष त्यांच्या म्हणण्याकडे आकर्षित करण्याचा माझा उद्देश होता. सरकारमध्ये 50 टक्के भागीदारी असलेल्या पक्षाचे नेते काय बोलतात व त्यांच्या बोलण्याचे गांभीर्य किती घ्यावे, हा माझा ते विधान सांगण्यामागे उद्देश होता.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षीरसागर.....

अध्यक्ष महोदय, आपणही मराठवाड्यातील आहात. मराठवाड्यातील प्रत्येक गावातील लोकांना कामाची नितांत गरज आहे, या माझ्या विधानास सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य सहमत होतील. आज मराठवाड्यातील प्रत्येक गावातील लोकांना कामाची निकड आहे, त्यांच्या हाताला काम नाही, खाण्यासाठी धान्य नाही, पिण्यासाठी पाणी नाही, त्यांच्या ढोरांसाठी चारा नाही. या विवंचनेमध्ये मराठवाड्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था अडकलेली आहे. मराठवाड्यातील शेतकरी व त्याची एक पिढी उद्ध्वस्त होण्याची वेळ आली आहे. नरेगा ही योजना लोकांच्या हाताला काम देणारी योजना नसल्यामुळे आम्ही सरकारला वारंवार विनंती केली की, राज्याची रोजगार हमी योजना सुरु करण्यात यावी. मोठ्या प्रमाणात कामे काढावयाची असतील, प्रत्येक तालुक्यात मागणी व गरजेप्रमाणे काम द्यावयचे असेल, कामाचा मोबदला व मजुरी वेळेवर द्यावयाची असेल तर जुनी रोगार हमी योजना या तीन महिन्यांच्या कालावधीकरिता राबविण्यात यावी. मराठवाडा व विभागातील मिळून 16 जिल्हे दुष्काळग्रस्त जाहीर केले आहेत त्यांच्याकरिता सदरहू योजना तीन महिन्यांकरिता जाहीर करण्यात यावी. आता साखर कारखान्याचे पट्टे पडतील तेथील मजूर परत गावी येतील, त्यांची जनावरे परत येतील, त्यामुळे त्यांच्या हाताला काम देण्याची नितांत आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, दुष्काळामुळे स्थलांतराच्या प्रमाणात वाढ झालेली आहे त्यासंदर्भात एक बातमी आज वर्तमान पत्रामध्ये छापून आली आहे. सदरहू बातमीमध्ये सांगितले आहे की, घाटकोपर भागातील एका मैदानावर मराठवाड्यातून मोठ्याप्रमाणात लोक आले आहेत. ते लोक उपाशी मरत आहेत, त्यांना पिण्याकरिता पाणी नाही, गुंड लोक त्यांच्याकडून राहण्याचा टॅक्स वसुल करीत आहेत, त्यांच्या झोपड्यामध्ये डुकरे शिरुन त्यांचे अन्न उद्ध्वस्त करीत आहेत. अशा प्रकारे स्थलांतर करुन मुंबईत आल्यानंतरही त्यांच्यावर भीषण व दारुन परिस्थिती बितलेली आहे. दुष्काळामुळे होत असलेले लोकांचे स्थलांतर रोखावयाचे असेल तर ग्रामीण भागामध्ये लोकांच्या हाताला काम देणे नरेगा योजनेतून शक्य होणार नाही. या योजनेचे कितीही कौतुक झाले तरी मोठ्या प्रमाणावर नरेगा योजनेच्या माध्यमातून लोकांच्या हाताला काम देणे शक्य होणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षीरसागर.....

त्यामुळे माझी सरकारला आग्रहाची विनंती आहे की, प्रत्येक गावामध्ये जुन्या रोजगार हमी योजनेच्या निकषाप्रमाणे लोकांच्या हाताला काम देण्यात यावे. अशा प्रकारे लोकांच्या हाताला काम दिले तरच दुष्काळी भागातील लोकांचे स्थलांतर रोखणे शक्य होईल. तसेच, यामाध्यमातून लोकांना उत्पन्नाचे व पोट भरण्याचे साधन उपलब्ध करुन दिल्यासारखे होईल. त्यांना दुष्काळाची आणि टंचाईची दाहकता व तीव्रता थोडीशी कमी जाणवेल.

अध्यक्ष महोदय, टंचाईच्या काळामध्ये रोजगार महत्वाचा आहे त्याप्रमाणेच पिण्याचे पाणी देखील महत्वाचे आहे. सदनामध्ये पाणी पुरवठा मंत्री महोदय उपस्थित आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, मागील वर्षभरापासून सर्व नळ पाणी पुरवठा योजना बंद आहेत. त्यासंदर्भात आम्ही त्यांना भेटलो आहोत. राज्यात राष्ट्रीय पेय जल योजना रखडलेली आहे. पाणी पुरवठा मंत्री महोदयांनी सांगितले की, नळ पाणी पुरवठा योजनेकरिता गाव समिती नियुक्त करुन त्यांच्यावर विश्वास टाकण्यात आला होता. सदरहू समित्यांनी पैसे उचलले असल्याने अनेक गावांच्या नळ पाणी पुरवठा योजना रखडलेल्या आहे. सदरहू समितीकडून पैसे वसुलीकरिता जेवढी कठोर कारवाई करावाची आहे ती करावी, परंतु संबंधित गावाला पिण्याच्या पाण्यासाठी शिक्षा देऊ नये. राष्ट्रीय पेय जल योजनेला पैसे देण्याचे केंद्र सरकारने बंद केले आहे. त्यासंदर्भात मंत्रालय व मंत्री कार्यालयाकडून अनेक मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र पाठविण्यात आले आहे की, एक ही नवीन राष्ट्रीय पेय जल योजना मंजूर करु नका. त्यामुळे सदर योजना एक वर्षापासून ठप्प आहेत. याप्रकरणी माझी सूचना आहे की, सदरहू योजनांचा समावेश मुख्यमंत्री ग्रामीण पेय जल योजनेत करण्यात यावा. तसेच, जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व इतर पिण्याच्या पाण्यासंदर्भातील योजना राबविणारे सर्व विभाग एकत्र आणण्यात यावेत. अनेक राज्यांनी पिण्याच्या पाण्याच्या योजना एका छत्राखाली आणल्या आहेत. आपले महाराष्ट्र राज्य हे प्रगत राज्य आहे, आदर्श राज्य आहे. आपल्या राज्यातील अनेक योजनांचा आदर्श इतर राज्ये घेतात. त्यामुळे गावांना पिण्याचे पाणी अग्रहक्काने देण्याकरिता माझी सरकारला सूचना आहे की, पिण्याच्या पाण्याच्या सर्व योजना व त्या राबविणारे विभाग एका छत्राखाली आणण्यात यावेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षीरसागर.....

अध्यक्ष महोदय, पिण्याच्या पाण्याची टंचाई केवळ ग्रामीण भागातच आहे, असे नाही. आम्ही पाडव्याला गावी गेलो असता पाणी टंचाई संदर्भात एक दिवस आढावा घेतला. त्यावेळी ग्रामीण भागात असे चित्र दिसून आले की, टँकरने पुरवठा करण्यात येणाऱ्या 80 टक्के टँकरमधील पाणी पिण्या योग्य नाही. ही बाब मी जबाबदारीने सांगत आहे. सदरहू टँकरमधील पाण्याचा वापर सांडपाण्याकरिता व इतर बाबींसाठी करण्यात येतो. सदरहू टँकरमध्ये ज्या ठिकाणहून पाणी भरण्यात येते तेथील सोर्स गढूळ झालेला आहे, तेथील पाणी खरवडून टँकरमध्ये भरण्यात येते. अशा प्रकारचे अस्वच्छ पाणी मिळण्यासाठी आमच्या गावातील आई-बहिणी व इतर लोक रात्री-अपरात्री तीन-तीन तास लाईन लावून उभ्या असतात. अशा प्रकारचे भीषण व दारुन चित्र निर्माण झाले आहे. ग्रामीण भाग व शहरी भागात स्वच्छ पिण्याचे पाणी स्वच्छ मिळत नसल्याने ते कंपनीकडून विकण्यात येणाऱ्या 20 लिटरच्या जारमधून विकत घेण्यात येत आहे, अशी आज परिस्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यात टँकरने पाणी पुरवठा करण्याकरिता सन 2011 च्या लोकसंख्येचे निकष लावण्यात आले आहेत, ही बाब मी पाणी पुरवठा मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देतो. आज सन 2016 सुरु असून सन 2011 ते 2016 या कालावधीमध्ये राज्याच्या लोकसंख्येमध्ये 20 टक्क्यांची वाढ झालेली आहे. टँकरच्या संख्येसंदर्भात सदरहू प्रकरणी जिल्हाधिकारी यांचेकडे संपर्क केला असता त्यांच्याकडून सांगण्यात येते की, विभागाकडून सन 2011 च्या लोकसंख्येच्या प्रमाणात टँकर सुरु करण्यात यावेत असे आदेश आहेत. टँकरने करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठ्यामध्ये जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याचा अंतर्भाव करण्यात आला नाही. सन 2016 च्या लोकसंख्येवर आधारित टँकरने पाणी पुरवठा सुरु करण्यात यावा व त्यामध्ये जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा समावेश करण्यात यावा. अशा प्रकारची दुरुस्ती करुन शासनाने नवीन आदेश द्यावेत, अशी माझी सरकारला विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, जनावरांसाठी राज्यात छावण्या उघडण्यात आल्या. सुरुवातीला छावण्या सुरु करण्याकरिता लोकांची स्पर्धा होती. आता जनावरांच्या चाऱ्याचे भाव आकाशाशी स्पर्धा करीत

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.योगेश सागर)

श्री.जयदत्त क्षीरसागर.....

आहेत. ऊस संपला आहे, कडब्याचे भाव वाढलेले आहेत, ओला चारा मिळणे मुश्कील झाले आहे. कडब्याच्या भावासाठी मोठ्या जनावरांकरिता 70 रुपये व लहान जनावरांसाठी जी रक्कम देण्याचे निश्चित करण्यात आली आहे त्यामध्ये वाढ करणे गरजेचे आहे. सदरहू कडब्याच्या रक्कमेमध्ये वाढ केली तरच जनावरांच्या छावण्या व्यवस्थीत चालतील, याप्रकरणी सरकारने आदेश द्यावेत अशी माझी सूचना आहे.

अध्यक्ष महोदय, इकॉनॉमिक इन्फ्रास्ट्रक्चर व सोशल इन्फ्रास्ट्रक्चर या दोन्ही बाबी संबंधित भागांच्या विकासासाठी व तेथील गरजा पूर्ण करण्यासाठी महत्वाच्या असतात. जीवनाचा दर्जा वाढवावयाचा असेल तर अन्न व आरोग्य या दोन महत्वाच्या बाबी आहेत. जीवनमाचा दर्जा वाढवावयाचा असेल, विकास करावयाचा असेल तर शेतीला पाणी, सिंचन, वीज आणि कनेक्टीव्हिटी महत्वाची आहे. कनेक्टीव्हिटीच्या संदर्भात सांगू इच्छितो की, राज्य सरकारने राज्यातील रेल्वेचे 5 मार्ग केंद्र शासनाची 50 टक्के व राज्य शासनाची 50 टक्के भागीदारीतून करण्याकरिता निवडले असून त्याबाबत केंद्र शासनास कळविण्यात आले आहे. या 5 रेल्वे मार्गामध्ये परळी-बीड-नगर या मार्गाचा समावेश असून त्याकरिता 50 टक्के भागीदारी देण्याकरिता राज्य शासनाने कबूल केले आहे.

यानंतर FF-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर.....

आता अर्थसंकल्पात या 5 रेल्वेमार्गाकरिता जी तरतूद केली आहे ती अतिशय तोकडी आहे. 68 कोटी रुपयांची आपण फक्त तरतूद केली आहे. परळी-बीड-नगर रेल्वेमार्गाला केंद्र सरकारने हा मागासलेला भाग असल्यामुळे जाणीवपूर्वक हा भाग विकसित झाला पाहिजे. कनेक्टीविटी चांगली यायला पाहिजे यासाठी या वर्षी 250 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. माझी आपल्याला विनंती राहील की, केंद्राने जर 250 कोटी रुपये दिले असतील तर आपण त्याचे मॅचिंग कॉन्ट्रिब्यूशन म्हणून 50 टक्के निधी म्हणून 250 कोटी रुपये द्यावेत. त्यामुळे मराठवाड्याची राहिलेली कनेक्टीव्हीटी लवकरात लवकर पूर्ण होईल आणि तो भाग विकसित होईल. धान्याच्या बाबतीत या ठिकाणी बोलणे आवश्यक आहे. आपण बीपीएलकरिता राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना लागू केली. यामध्ये 2 रुपये किलोमध्ये गहू आणि 3 रुपये किलोमध्ये तांदुळ मिळतो. परंतु आता अशी परिस्थिती आहे की, मराठवाड्यातील शहरामध्ये पाणी नसल्यामुळे सर्वत्र महापालिका आणि नगरपालिकांनी कामे बंद केली असल्यामुळे बांधकाम मजूर अडचणीत आला आहे. विदर्भातही तीच परिस्थिती आहे. त्यामुळे आमची आग्रहाची सूचना राहिल की, राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेमधून आपण जे धान्य वाटप करणार आहात त्यामध्ये जे एपीएलचे कार्डधारक आहेत किंवा या योजनेखाली जे येत नाहीत त्या सर्वांना 2 रुपये किलोमध्ये गहू आणि 3 रुपये किलोमध्ये तांदुळ अशा प्रकारे धान्याचे वाटप व्हावे. शेवटी माणसे जगविणे हे महत्वाचे आहे. आपण विकासाची चर्चा करतो. या ठिकाणी विकासाच्या योजनांवर बोलत असताना आणि त्या दिशेने रोख असताना सभागृहाचा रोख दुसरीकडे वळवावा आणि भावनिक व सांस्कृतिक आणि वेगळ्या अर्थाने गडद वातावरण या राज्यात निर्माण व्हावे त्यासाठी वेगवेगळ्या घोषणा सभागृहात आणि बाहेर दिल्या जातात. आपले मुख्यमंत्री देखील भारत माता की जय, या संदर्भात मुख्यमंत्री पद मी सोडून देण्यास तयार आहे असे म्हटले आहेत. चांगली बाब आहे की, सर्वच आम्ही भारत माता की जय म्हणतो, आपण सर्व भारत मातेचे सुपूत्र आहोत. माननीय मुख्यमंत्री असे जर म्हटले असते की, शेवटच्या माणसाला पिण्याच्या पाण्याचा थेंब मिळाला नाही तर मी मुख्यमंत्री पद सोडेन असे केले असते तर किती उचित राहिले असते. दुष्काळी भागामध्ये पाण्याचा थेंब मिळाला नसल्यामुळे माणसांवर आत्महत्या करण्याची वेळ आली असेल तर मी हे मुख्यमंत्री पद सोडेन असे जर म्हटले

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर.....

असते तर मला वाटते की, शोभून दिसले असते. शेवटी भावनात्मक विषय करुन आणि दुसरीकडे गाडी नेऊन विकासाच्या मुद्यावरुन लक्ष दुसरीकडे करायचे ही अटकळ अनेकांच्या लक्षात आली आहे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी धान्य पुरवठा आणि आत्महत्येच्या बाबतीत बोलत असताना भूसंपादनाकडे देखील थोडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. थकबाकी संपूर्ण मराठवाडा आणि महाराष्ट्रामध्ये आहे. आपण भूसंपादनाचे पैसे देणे आहोत. आज राष्ट्रीय महामार्ग-211 या महामार्गासाठी तीन महिन्यांपासून 400 कोटी रुपये येऊन पडलेले आहेत. त्यापैकी फक्त 70 कोटी रुपये वाटप झाले आहेत. आपली शासकीय यंत्रणा निधी वाटपाच्या बाबतीत वेगवेगळ्या क्लुप्या आणि वेगवेगळे मार्ग अवलंबितात. शेतकऱ्याला पायी भगवान करुन सोडलेले आहे. शेतकरी त्याच्या 80 टक्के जमिनीचे भूसंपादन केल्याशिवाय आणि त्याचा निधी मिळाल्याशिवाय जमिनीचा ताबा देत नाही. परंतु या 211 महामार्गाच्या सर्व लोकांनी जमिनीचा ताबा दिलेला आहे. कामे अगोदर सुरू असे सांगितले आहे. विकासाच्या प्रक्रियेमध्ये आम्ही आडकाठी आणत नाही असे सांगितले आहे. दुर्दैवाने ते झालेले नाही. त्या बाबतीत आपण अग्रक्रमाने लक्ष देणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, दुष्काळासंबंधी प्रश्न सोडवितांना सत्ताधारी पक्षाकडून जो नियम 293 अन्वये प्रस्ताव या ठिकाणी आलेला आहे त्यावरही मला थोडे बोलणे आवश्यक आहे. माननीय वसंतदादा पाटील या राज्याचे मुख्यमंत्री असताना 1983 साली त्यांनी राज्यातील विभागवार अनुशेष काढण्याकरिता दांडेकर समिती नेमली होती. त्यानंतर 1994 मध्ये अनुशेष आणि निर्देशांक समिती म्हणजे ज्याला आपण इंडिकेटर समिती म्हणतो ती नेमली गेली. यामध्ये नागपूर करार आणि कलम 371 (2) अन्वये तीन प्रदेशात निधी वाटपाची सूत्रे कशी ठरवून द्यावयाची या बाबतीत संपूर्ण अहवाल समोर आला. या सर्व तरतुदी झाल्या आणि माननीय राज्यपाल महोदयांना या निधीचे वाटपाचे अधिकार देण्यात आले की, आपण निधीचे वाटप करताना विभागीय समतोल राखावा. दुर्दैवाने राज्य पातळीवर तसे घडले नाही आणि अनेक पातळीवर अनेक बाबी घडत गेल्या अनुशेष कमी होण्याऐवजी भौतिक अनुशेष वाढत गेला. आर्थिक अनुशेष सुध्दा वाढत गेला आणि आता माननीय राज्यपाल महोदयांनी श्री. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली 2009 ला एक समिती

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर.....

नेमली. मला या ठिकाणी मुद्दाम आवर्जून उल्लेख करावयाचा आहे की, जी केळकर समिती नेमली होती त्यांची कार्यकक्षा मर्यादित होती ती म्हणजे भौतिक अनुशेष आणि आर्थिक मूल्यनिश्चिती एवढ्यापुरतीच त्यांची कार्यकक्षा होती. परंतु त्यांनी तेवढ्यापुरते मर्यादित न राहता 13 वर्षाच्या कालावधीकरिता राज्याच्या उत्पन्नाचे वितरण कसे असावे, विभागवार वितरण कसे असावे, अनुशेषाचा तुलनात्मक मापदंड कोणता वापरायचा, त्या करिता जे सूत्र अवलंबिले गेले, 3 प्रदेश स्थूलमानाने त्यासाठी आखले गेले. त्यामध्ये मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्र. त्यांनी त्याला फाटा मारला आहे. जिल्हा, तालुका आणि घटक धरुन अनुशेष काढावा आणि अशा प्रकारचे मानव विकास निर्देशांक हा बेस धरावा. मला वाटते की, ही प्रचलित पध्दती मागास भागावर म्हणजेच मराठवाडा, विदर्भावर अन्याय करणारे आहे. केळकर समितीच्या बाबतीत सरकारचे काय मत आहे आणि सरकार त्या दृष्टीने कोणती पावले उचलणार आहेत हे सभागृहाला समजणे आवश्यक आहे. पाणी वाटपासंबंधी नियंत्रण करणे आवश्यक आहे. यासंबंधी माझ्या अगोदर सन्माननीय सदस्य श्री प्रशांत बंब साहेब या विषयी फार विस्ताराने बोलले असल्यामुळे मी त्यावर अधिक काही बोलणार नाही. परंतु जायकवाडीच्या पाणी वाटपासंबंधी वारंवार कोर्टाचे दरवाजे ठोठावे लागतात. कोर्टाकडून परवानग्या घ्याव्या लागतात आणि वरच्या लोकांनी खालच्या लोकांना पाणी सोडणे म्हणजे फार उपकार केला अशा भावनेतून पाहिले जाते. हा आमचा हक्क आहे आणि त्यानुसार या भूभागाला पाणी मिळणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने राज्य सरकारने महाराष्ट्र एकसंघ राहण्यासाठी आणि राज्यातील एकात्मता टिकविण्यासाठी जरी या छोट्या छोट्या बाबी असल्या तरी महाराष्ट्राला छेद देणाऱ्या बाबींवर लक्ष देणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, मराठवाड्याचे आयआयएम आता विदर्भाकडे गेले आहे. आता साई सेंटर आहे ते पण नागपूरला जात आहे. सत्ता आपल्याकडे आहे आणि सत्तेच्या माध्यमातून अनेक बाबी आपण त्या ठिकाणी करु शकता. परंतु आलेल्या योजना आपल्याकडे घेऊन जायच्या आणि दुसरीकडे मराठवाड्याच्या विकासाकरिता आम्ही कमिटेड आहोत असे बोलायचे हे मात्र कोणत्याही चौकटीत बसत नाही. मराठवाड्यासाठी ज्या योजना देणे आवश्यक आहे, त्या कृपया ओढून घेऊन जाऊ नका. आपल्यासाठी आपण वेगळ्या निर्माण करा आणि त्या माध्यमातून आपल्या गरजा भागवा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर.....

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी सोशल इन्फ्रास्ट्रक्चर आणि इकॉनॉमिक इन्फ्रास्ट्रक्चरच्या बाबतीत पाणी आणि वीज या महत्वाच्या बाबी आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी मेक इन महाराष्ट्राच्या माध्यमातून सांगितले की, मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येणार आहे. आठ लाख कोटी रुपयांचे एम.ओ.यू. झालेले आहेत. महाराष्ट्राबरोबरच मराठवाड्यातही गुंतवणूक येणार आहे. मराठवाड्यात या गुंतवणूकीसाठी अनुकूल वातावरण असणे अभिप्रेत आहे. आज मराठवाड्यातील पाण्याची परिस्थिती आपण पाहतो की, पाण्याच्या टंचाईमुळे अनेक कारखाने बाहेर चालले आहेत आणि त्याचबरोबर वीजेचा फटका मोठ्या प्रमाणात बसतो आहे. वीजेचे दर जर पाहिले तर जालन्याची स्टील इंडस्ट्री पूर्णपणे बंद झाली आहे. प्रत्येक कारखान्याला 9 रुपये प्रति युनिट हा दर प्रत्येक कारखान्यांसाठी आकारला जात आहे. उत्पादनासाठी वीज हा महत्वाचा घटक असून वीजेच्या दरामुळे महाराष्ट्रातील सर्व कारखाने बाहेर जात आहेत. त्यामुळे माझी सूचना राहिल की, वीजेची दरवाढ आता आपण एमईआरसीकडे दरवर्षी 5 टक्के वीज दरवाढ व्हावी असे जे राज्याचे सूत्र ठरले आहे. त्यामुळे या बाबतीत आता 11 टक्के दरवाढ होणार असून ते अन्यायकारक आहे. प्रक्रिया उद्योग कारखानदारी तर बंदच पडली आहे, त्यामध्ये जिनिंग, प्रेसिंग, ऑईल मिल असे कारखाने आहेत.

अध्यक्ष महोदय, जायकवाडी धरणाचे पाणी बिअर आणि दारु उत्पादनाकरिता खूप चांगले आहे. त्यामुळे औरंगाबादला बिअर आणि दारु उत्पादनाचे कारखाने मोठ्या प्रमाणात आहेत. या कारखान्यांसाठी महिन्याला 12 कोटी लिटर्स पाणी लागते. माझी आग्रहाची सूचना अशी आहे की, पाण्याच्या वाटपाचे प्राधान्य माणसाला आणि जनावरांना पिण्यासाठी पाणी देणे यासाठी आहे. त्यामुळे 12 कोटी लिटर्स पाणी ज्या बिअर आणि दारुच्या कारखान्यांसाठी लागते ते कारखाने 3 महिने बंद ठेवले तर काही नुकसान होणार नाही. कारखानदारीचा क्रम नंतरचा ठेवा. कारण पिण्यासाठी पाणी देणे हे महत्वाचे आहे. जायकवाडी धरणाचे पाणी बिअर आणि दारु उत्पादनासाठी चांगले असले तरी 3 महिने बाजूला ठेवले तर मोठ्या प्रमाणात पाण्याची बचत होऊन या तीन महिन्यांमध्ये 36 कोटी लिटर्स पाणी लोकांना मिळेल. त्यामुळे ते बाजूला ठेवावे एवढी आग्रहाची विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षीरसागर.....

म्हणून या पाण्याचा पिण्यासाठी वापर करावा. माझी दुसरी आग्रहाची सूचना आहे की, मुंबईमध्ये जे स्थलांतरित लोक आलेले आहेत त्यांना रेशनकार्ड देण्याची कृपया तरतूद करण्यात यावी. सन 2012 मध्ये मागच्या सरकारने ही तरतूद केली होती. मुंबईमध्ये स्थलांतर करून आलेल्या सर्व लोकांना एकत्रित करून तीन महिन्यांचे तात्पुरते रेशनकार्ड देण्यात आले होते, तसाही प्रयोग करणे आवश्यक आहे. हे केल्याशिवाय स्थलांतरित लोकांना जगणे आणि त्यांच्या हाताला काम मिळणे दुरापास्त होणार आहे. या सर्व बाबी सरकारच्या निती आणि नियतीशी निगडीत आहेत. स्वामीनाथन समितीने अहवाल सादर केला होता. केंद्र आणि राज्य सरकारने सत्तेवर येताना सांगितले होते की, शेतकऱ्याच्या उत्पादन खर्चाच्या दिडपट भाव वाढवून देऊ. सरकारने उत्तरामध्ये सांगावे की कुठे कुणाला दिडपट भाव मिळाला. कुणाला वाढीव उत्पादनाला प्रोत्साहन दिले. नुसत्या घोषणा आणि वल्गना करून पोट भरत नाही. याठिकाणी माणसे जगवणे आणि त्याचे पोट भरणे आणि पुढची पिढी वाचविणे नितांत गरजेचे आहे. आपण आत्महत्या करतो त्याला एक लाख रुपये देतो आणि झाडावरून उडी मारून मेला तर त्याला पाच लाख रुपये देतो, हे कुठले सुत्र आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटूंबियांच्या हातामध्ये 30 हजार रुपये देण्यात येतात आणि 70 हजार रुपये फिक्समध्ये ठेवले जातात ही शेतकऱ्याची चेष्टा आहे. दुष्काळी भागामध्ये ज्यांनी आत्महत्या केल्या त्यांना कमीत कमी पाच लाख रुपयांची मदत देणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, आज नाम फाऊंडेशन, जैन फाऊंडेशनसारख्या संस्था ह्या शिकणारी पिढी आणि लग्नाची जबाबदारी या दोन्ही संस्था घेत आहेत. सरकारला काय भीक लागली. कर्जाचे आपण म्हणता, मागच्या सरकारचे काढता, आपल्याला कर्ज घ्यायला स्कोप आहे तर कर्ज घ्या. परंतु ही माणसे जगवा, ही पिढी जगवा. लेकीबाईंची लग्न तुटायला लागलीत. हे लग्न लावण्याकरिता आणि त्यांना मदत करण्याकरिता, त्यांच्या मुला-मुलींच्या भावी शिक्षणाची तरतूद दुष्काळामध्ये खास बाब म्हणून सरकारने करावी ही आग्रहाची विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष साबणे (देगलूर) : अध्यक्ष महोदय, नियम 293 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.प्रशांत बंब यांनी जो प्रस्ताव मांडला त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. या सदनाचे आदरणीय ज्येष्ठ सदस्य श्री.ग.आ.देशमुख सन 1962 मध्ये पहिल्यांदा या सदनामध्ये आले. सन 2016 पर्यंत या सदनामध्ये मराठवाड्याच्या दुष्काळासंबंधी 18 वर्षात जे घडले त्याचे ते साक्षीदार आहेत. 55 वर्षामध्ये दरवर्षी मराठवाड्याच्या अनुशेषासंबंधी, मराठवाड्यामध्ये पडलेला भीषण दुष्काळ असेल, अशा अनेक वेळा त्यांनी या सभागृहामध्ये चर्चा ऐकलेली आहे. परंतु यावर शासनाकडून उपाययोजना होऊ शकलेल्या नाहीत. मराठवाड्यामध्ये दुष्काळाचे हे चौथे वर्ष आहे. कालच मराठवाड्यातील काही लोक ठाणे जिल्ह्यातील घाटकोपर येथे कामानिमित्त राहायला आले. मराठवाड्यातील हे लोक आपली घरे-दारे उघडी ठेवून ठाणे, मुंबई या परिसरामध्ये पोट भरण्यासाठी आलीत. काल उघडकीस आलेली घटना ही अतिशय भयावह अशी घटना आहे. मानवतेला काळीमा फासणारी घटना आहे. याठिकाणी काही झोपडपट्टीदादांनी मराठवाड्यातून पोट भरण्यासाठी आलेल्या लोकांकडून हप्ता मागणे, झोपण्यासाठी 400 रुपये, पिण्याच्या पाण्यासाठी 300 रुपये अशा पध्दतीचे हप्ते त्या लोकांकडून घेण्यात येत आहेत. जर एखाद्या माणसाने हा भत्ता दिला नाही तर हे गावगुंड कुत्र्याला मारावे त्या पध्दतीने लोकांना याठिकाणी मारले. राज्याचे माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांनी या सर्व लोकांना भेटी दिल्या. त्यांच्या वेदना जाणून घेतल्या. माझी शासनाला विनंती आहे की, मराठवाड्यातून आलेल्या लोकांसमोर खाण्या-पिण्याचा प्रश्न आ-वासून उभा राहिलेला आहे. कुटूंबियांसमवेत ही लोक याठिकाणी राहायला आलेली आहेत. मराठवाड्यातून आलेल्या लोकांसाठी एखादी छावणी उभी करता येईल काय? अशी एखादी छावणी त्याठिकाणी उभी करुन या सर्व लोकांना छावण्यांमध्ये आश्रय देऊन त्यांची खाण्या-पिण्याची, राहण्याची व्यवस्था आपण शासनाच्या माध्यमातून करावी अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, काल जी घटना घडली त्यावेळेस पोलीसांनी जी मदत केली त्याबद्दल मी पोलीस दलातील सर्व अधिकाऱ्यांचे मनापासून कौतुक करणार आहे की, आपण मराठवाड्यातील लोकांसाठी धावून आलात. आयबीएन लोकमत, टीव्ही नाईनवर या बातम्या प्रसारित झाल्यानंतर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष साबणे.....

माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आदेश आणि सूचना दिल्यानंतर त्याठिकाणचे पोलीस मराठवाड्यातील जनतेच्या मदतीला धावून गेले, त्याबद्दल मी त्यांचे सुध्दा मनापासून अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, हा दुष्काळ यावर्षी आला अशातला भाग नाही. याला काही प्रमुख कारणे आहेत. मराठवाड्यामध्ये सिंचनाचा प्रश्न अतिशय गंभीर बनलेला आहे. अनुशेषग्रस्त आहे, मराठवाडा पीपीपीमध्ये आहे, अवर्षणग्रस्त असा हा भाग आहे. मी ज्या तालुक्यातून याठिकाणी येतो. त्या तालुक्यामध्ये महाराष्ट्र आणि तेलंगणाच्या संयुक्त विद्यमाने आंतरराज्यीय लेंडी प्रकल्प होऊ घातलेला आहे. मी याच्या खोलात जाणार नाही. उद्या जर आपल्याला लेंडी प्रकल्पाचे काम सुरु करायचे असेल तर 250 कोटी रुपयांची मागणी जलसंपदा विभागाने शासनाकडे केलेली आहे. हे निकषामध्ये बसणारे धरण आहे. या धरणाचे 90 टक्के काम पूर्ण झालेले आहे. 90 टक्के काम पूर्ण झालेल्या धरणाला जर आपण पैसे देऊ शकत नसाल तर आपल्याही शासनावर लोकांचा विश्वास राहणार नाही. या धरणाला पहिलेच लेंडी नाव दिलेले आहे. मी माननीय मंत्री श्री.गिरीष महाजन यांना विनंती करणार आहे की, आपण आम्हाला सांगितले की काहीही केले तरी कर्जरोखे काढू. पण मराठवाड्यातील प्रत्येक धरणाला पैसे दिल्याशिवाय राहणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष साबणे .....

आपण आम्हाला सांगितले की, काही केले तरी कर्जेरोखे काढू पण मराठवाडयातील प्रत्येक धरणाला पैसे दिल्या शिवाय राहणार नाही. कर्जरोखे काढण्याची गरज पडली तर कर्जरोखे काढा. लेंडी धरणाचे काम 90 टक्के पूर्ण झालेले आहे. लेंढी धरणाचे काम सुरु करावयाचे असेल तर 250 कोटी रुपयांची नितांत आवश्यकता आहे. मी त्या जनतेच्या वतीने मी आपल्याला विनंती करणार आहे. त्या लेंडी धरणासाठी 250 कोटी रुपयांची तरतुद पुरवणी अर्थसंकल्पामध्ये करण्याचे आश्वासन दिले तर लोकांमध्ये विरोध होणार नाही. म्हणून मी आपल्याला विनंती करणार आहे. मी देगलूरमध्ये नव्याने निर्माण झालेल्या मतदार संघामध्ये उभा राहिलो. बिलोली तालुक्यामध्ये तळी म्हणून एक प्रकल्प होऊ घातलेला आहे. त्या प्रकल्पाला चौथ्या दर सूचिला माननीय जलसंपदा मंत्री महोदयांनी मान्यता दिलेली आहे. जलसंपदा विभागाचे मनापासून अभिनंदन करतो. बिलोली तालुक्यातील तळी प्रकल्पाला 60 व्या नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये मंजूरी दिली. त्याबद्दल मी आदरणीय श्री.गिरीश महाजन साहेबांचे आभार व्यक्त करतो. त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त करतो की, त्या बिलोली तालुक्यामध्ये तळी एवढाच मोठा प्रकल्प आहे. त्याच्या कॅनलची कामे झालेली आहे. आणखी यावर्षी पुन्हा दुसरी सुधारीत प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे की, आपण त्या प्रकल्पाला निधी उपलब्ध करुन द्यावा. आदरणीय मराठवाडयाचे सुपुत्र पाणीपुरवठा मंत्री श्री.बबनराव लोणीकर साहेबांचे मनापासून अभिनंदन करतो. त्यांनी या संदर्भामध्ये लघु पाटबंधारेच्या संदर्भामध्ये असेल, 15 वर्षापासून लघु तलाव, साठवण तलाव यांची कामे प्रलंबित होती. ही सर्व कामे स्वतःचा प्रश्न समजून व मराठवाडयामध्ये जन्म घेतला आहे. त्या मराठवाडयाने मला कॅबिनेट पाणीपुरवठा मंत्री केले आहे. या भावनेतून तलावाची कामे केलेली आहेत. पण जमिनीचा मावेजा देण्याच्या संदर्भाने माननीय श्री.गिरीश महाजन साहेबांना विनंती करणार आहे की, मावेजा देण्याच्या संदर्भात न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. 26 शेतक-यांना 15 वर्षापासून मावेजा दिला नसल्यामुळे न्यायालयात गेले होते. न्यायालयाने त्यांना मावेजा देण्यासंदर्भात आदेशही दिले आहेत. त्या मराठवाडयातील 26 शेतक-यांना न्यायालयाने त्यांचा मावेजा मंजूर करण्याच्या संदर्भात सूचना दिल्या आहेत. त्याही संदर्भात आपल्याला विनंती आहे.

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष साबणे.....

अध्यक्ष महोदय, या राज्याचे प्रमुख या सदनाचे नेते, माननीय श्री.देवेंद्र फडणवीस या सदनामध्ये आहेत. स्व.विलासरावजी देशमुख ज्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यावेळेस केंद्र शासनाने लातूर कुरुडवाडी पंढरपूर हा मार्ग ज्यावेळी मंजूर केला होता, त्यावेळी राज्याच्या प्रमुखांनी राज्याच्या रेशिओ आणि रोजगार हमीचा रेशिओ एकत्र केला होता. या राज्याचे प्रमुख माननीय श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांना विनंती करणार आहे. मराठवाडया अनुशेष फार मोठया प्रमाणावर आहे. मराठवाडयामध्ये लघु उद्योग, उद्योग निर्माण होऊ शकत नाही. कारण तेथे दळणवळाची साधने नाहीत.

अध्यक्ष महोदय, रेल्वेच्या संदर्भामध्ये या देशाचे रेल्वे मंत्री आदरणीय श्री.सुरेश प्रभु साहेबांनी काही नवीन रेल्वे मार्गांना सर्व्हेच्या संदर्भामध्ये निधी उपलब्ध करुन दिला, आपल्या राज्यामध्ये विशेषत: मागास भागामध्ये रेल्वेच्या लाईन्स् मंजूर झालेल्या आहेत. सर्व्हे करण्यासाठी जो निधी मंजूर झालेला आहे. त्यासाठी एक सचिव दर्जाचा अधिकारी नेमून राज्यातील जितक्या काही रेल्वे लाईन्स्ना सर्व्हे करण्यासाठी निधी उपलब्ध झालेला आहे. मराठवाडयातील गोधन, लातूर रोड व्हाया मुखेड असेल दुसरा मार्ग नागपूर, लातूर, नांदेड, देगलूर, दिधर, हाजरी मार्ग हे दोन मार्ग हे नांदेड जिल्हयातून जातात. या दोन्ही मार्गाना केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये रेल्वेच्या सर्व्हे संदर्भामध्ये निधी मंजूर झालेला आहे. माझी विनंती आहे की, मराठवाडा हा निजामाच्या राज्यातील आहे. निजामांचे जेव्हा राज्य होते. त्यावेळी सुध्दा या सर्व्हेसाठी निजामांनी सर्व्हेसाठी पैसे उपलब्ध करुन दिले होते. या सदनाच्या माध्यमातून हा जरी केंद्र शासनाचा प्रश्न असला तरी आमचे माननीय मुख्यमंत्री रेल्वेच्या लाईनच्या संदर्भामध्ये अतिशय संवेदनशिल आहेत. निजाम संस्थान भारतामध्ये विलीन होण्याच्या अगोदर त्यांनी सर्व्हेच्या संदर्भातील निधी इंग्रजांकडे वर्ग केला होता. आजही तो पैसा इंग्रजांना अमेरिकेमध्ये ज्या संस्थेला हे काम सोपविले होते. त्या संस्थेच्या खात्यामध्ये ते पैसे आजही जमा आहेत. गोधन तेलंगना, मुखेड, जोखड, लातूर, या मार्गासाठी सर्व्हे असेल लातुर गुलबर्गा कर्नाटक 148 किलोमीटर मार्ग नवीन सर्व्हे मंजूर झालेला

.....3/-

UNCORRECTED COPY // NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष साबणे.....

आहे. यासंदर्भात देखिल निजांमानी निधी इंग्रजांकडे दिला होता. जालना खामगाव असेल, जो काही रेल्वेने मराठवाडयासाठी अर्थसंकल्पामध्ये निधी मंजूर केला आहे, त्याही संदर्भामध्ये राज्याच्या प्रमुखांनी स्वतः लक्ष घालावे.

अध्यक्ष महोदय, नरेगामधून जर पैसा उपलब्ध होत नसेल तर शासनाची स्वतःची रोजगार हमी योजना आहे. या रोजगार हमी योजनेच्या पैशातून नांदेड जिल्हयातील दोन्ही रेल्वे मार्गाना 50 टक्के निधी देण्याचे आश्वासन जर केंद्र शासनाला दिले तर निश्चिपणाने या रेल्वे मार्गाला त्याचा उपयोग होईल.

अध्यक्ष महोदय, बावी बंधारा नांदेड जिल्हयाच्या आणि तेलंगणाच्या सीमेवर आहे. ज्या ज्या वेळेस ऑक्टोबर महिन्यामध्ये सर्वोच्च न्यायालयासमोर ॲग्रीमेंटकरित असताना ऑक्टोबर महिन्यामध्ये दार टाकण्याचे कबूल केलेले आहे. तेथे भयावह परिस्थिती आहे. पिण्याच्या पाण्यासाठी परभणी, लातूर असेल तेथे कलम 144 लावावे लागले. मी मुख्यमंत्री महोदयांना आणि जलसंपदा मंत्री महोदयांना विनंती करणार आहे की, बावी बंधा-याच्या संदर्भामध्ये केंद्र शासनाच्या माध्यमातून सुप्रिम कोर्टाला पुन्हा एकदा समोर जावे लागणार आहे. कारण ऑक्टोबर महिन्यात धरणामध्ये कुठलेही पाणी राहत नाही. जायकवाडीमध्ये पाणी सोडताना आम्हाला किती अडचणी निर्माण झाल्या यासंदर्भात शासनाने विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. मी पहिल्यांदाच सांगितले आहे की, मराठवाडयातून कामाच्या संदर्भात लोक स्तलांतरीत होत आहेत. तेलंगणा राज्यामध्ये गावेच्या गावे कामावर निघतात. आमच्या महाराष्ट्राने जितका नरेगामध्ये पैसा खर्च केला नाही तितका तेलंगणातील एका जिल्हयाने तेवढा पैसा खर्च केला. लोकांना हैद्राबाद येथे स्तलांतरीत होऊ न देता त्यांना त्यांच्या गावामध्ये काम कसे उपलब्ध करुन देता येईल ही योजना तेलंगणा राज्यामध्ये अतिशय प्रभावीपणे राबविली जाते. लोकांना नरेगाच्या कामावर लावले जाते. पूर्ण गाव कामावर जाते. स्वतःच्या शेतातील दगड जरी वेचायची झाली तर नरेगाच्या माध्यमातून वेचले जातात.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष साबणे .....

अध्यक्ष महोदय, एमडीआर, ओडीआर रस्त्यावर तेलंगणामध्ये गिट्टी वेचायची असेल तर नरेगाच्या माध्यमातून ती गिट्टी वेचली जाते. त्या भागातील गावातील लोक स्थलांतरीत होऊ न देता या लोकांना गावामध्येच ठेवण्याचे काम तेथे केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र शासनाने जलयुक्त शिवार योजना मोठया प्रमाणात राज्यात सुरु केलेली आहे. मी मुख्यमंत्री महोदयांना विनंती करणार आहे की, जलयुक्त शिवार योजनेतील कामे आपणास प्रभावीपणे करावयाची असतील तर, या राज्यामध्ये टाटासारख्या मोठया कंपन्या काम करतात त्यांची मदत घ्यावी. आपण उद्योगपतींना विनंती करावी की, 50 टक्के सवलतीच्या दराने जलयुक्त शिवार योजना, नदीपुनर्भरण कार्यक्रम अशा मराठवाडयातील दुष्काळग्रस्त भागातील योजना कराव्यात. कारण जून, जुलैमध्ये पाऊस पडला तर आमच्या गावामध्ये पडलेला प्रत्येक थेंब अडविला पाहिजे. आमच्या घरावर पडलेला प्रत्येक थेंब अडविला पाहिजे. तसेच शिवारात पडलेले पाणी शिवारात अडविण्याची संकल्पना युती शासनाने व मुख्यमंत्री महोदयांनी हाती घेतली आहे. एल अँड टी., टाटा, बिर्ला सारख्या कंपन्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून हे काम करण्यास सांगावे. राज्य दुष्काळात सापडलेले असून या राज्याला मदत करण्याचे आवाहन राज्याच्या प्रमुखांनी व माननीय उद्योग मंत्री यांनी उद्योगपतींना केले तर निश्चितपणे ते हे काम करुन देतील.

अध्यक्ष महोदय, मी माननीय जलसंपदा मंत्री यांचे लक्ष वेधू इच्छितो. महाराष्ट्र व तेलगंणा राज्याच्या हद्दीवर मांजरा नदी वाहत आहे. मांजरा नदी महाराष्ट्राच्या हद्दीमध्ये आहे. तेलंगणा राज्याच्या जलसंपदा विभागाने निजामाबाद जिल्हयातून महाराष्ट्राच्या हद्दीमध्ये घुसखोरी करुन मांजरा नदीवर उपसा जलसिंचन योजना सुरु केलेली आहे. मोठमोठया जॅकवेल खोदल्या आहेत. यातून मांजरा नदीतील आमच्या मराठवाडयाचे व आमच्या जिल्हयाचे हक्काचे पाणी घुसखोरी करुन उपसून घेऊन जात आहेत. तेलंगणामधील मामा तलाव, मालगुजारी तलाव आहेत, त्याचे काम त्यांनी रोजगार हमी योजनेतून अतिशय उत्कृष्टपणे केलेले आहे. यामुळे त्यांच्याकडे पडलेला पावसाचा प्रत्येक थेंब ते अडविल्याशिवाय राहणार नाही. मी माननीय जलसंपदा मंत्री यांना विनंती करणार आहे, आमच्या जिल्हयामध्ये मामा तलावांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. तसेच माझ्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष साबणे .....

देगलूर बिलोली मतदारसंघातही मामा तलावांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. या मामा तलावाचे पुनर्जीवन करण्याचे काम शासनाने हातात घेतले पाहिजे. यामध्ये कोणतेही भूसंपादन करण्याची गरज भासणार नाही. यामध्ये एक पैसाही भूसंपादनासाठी देण्याची गरज नाही. या तलावात साचलेला गाळ काढून त्यातील खुंटे दुरुस्त केले तर पावसाचा प्रत्येक थेंब अडविला जाईल. यातून पिण्याचे पाणी व शेतीच्या पाण्याचा प्रश्न निश्चित स्वरुपात सुटल्याशिवाय राहणार नाही.

अध्यक्ष महोदय, मागील चार वर्षापासून महाराष्ट्रात दुष्काळाच्या छायेमध्ये आहे. आता सातव्या वेतन आयोगाची चर्चा जोरात सुरु आहे. पिण्याच्या पाण्याच्या थेंबासाठील लोक जीव देत आहेत. अन्न मिळत नाही म्हणून लोक आत्महत्या करीत आहेत. मुलीचे लग्न करु शकत नाही म्हणून लोक आत्महत्या करीत आहेत. अशा परिस्थितीत राज्याने सातवा वेतन आयोग देण्याचे ठरविले तर निश्चितपणे आत्महत्या करणाऱ्यांची संख्या वाढेल. म्हणून मी मुख्यमंत्री महोदयांना विनंती करणार आहे की, आपण सातवा वेतन आयोग लागू न करता तोच निधी मराठवाडा व विदर्भातील अनुशेषग्रस्त भागात खर्च केला तर निश्चितपणे त्याचा फायदा झाल्याशिवाय राहणार नाही.

अध्यक्ष महोदय, शासनाने पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना सुरु केलेली आहे. मी माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री श्री.बबनराव लोणीकर यांना विनंती करणार आहे की, मराठवाडयामध्ये पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर आहे, त्यांनी पाणीपुरवठयासाठी 500 कोटीचा निधी ठेवलेला आहे. पण मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेकरिता निधी वाढविणे अत्यंत गरजेचे आहे. मी मुख्यमंत्री महोदयांना विनंती करणार आहे की, एकटया मराठवाडयालाही हे 500 कोटी रुपये पुरणार नाहीत व पाणीपुरवठा योजना पूर्ण होणार नाहीत ही एवढी कमी तरतूद आहे. राष्ट्रीय पेयजल टप्पा क्रमांक 1 मध्ये किंवा टप्पा क्रमांक 2 मध्ये कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे. काही गावामध्ये कामही सुरु झालेले आहे. काही लोकांना वर्क ऑर्डर व कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. पण आता राज्यातील या सर्व योजना ठप्प झालेल्या आहेत. तसेच मराठवाडयातील दुष्काळग्रस्त 8 जिल्हयातही या योजना ठप्प झालेल्या आहेत. मी विनंती

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष साबणे.....

करतो की, या योजनेसाठी 500 कोटी नव्हे तर 1000 ते 1500 कोटी रुपये लागणार आहेत. याकरिता पुरवणी अर्थसंकल्पात आपणास 1000-2000 कोटी रुपये मंजूर करावे लागतील. पण या पाणीपुरवठा योजनेसाठी लागणारा निधी आपण देणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, तेलंगणा छोटे राज्य आहे. जलसंपदा विभागाकरिता मोठा निधी त्या राज्याने राखून ठेवलेला आहे. आपल्या राज्याचे जलसंपदा विभागाचे बजेट पाहिले तर भिती वाटते की, आमच्याकडे 90 टक्के कामे पूर्ण झालेली आहेत पण या बजेटनुसार ती आमची धरणे पूर्ण होणार नाहीत. मराठवाडा व विदर्भ तहानलेला आहे. आम्ही अनुशेषग्रस्त व अत्याचारग्रस्त आहोत. माझी मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, याकरिता पाहिजे तेवढे कर्ज काढण्यात यावे. येथे अनेक प्रश्न आहेत. मोठमोठे उद्योग या भागात आले पाहिजेत. मराठवाडयात भरपूर सुर्यप्रकाश आहे, यावर सौरउर्जेचे प्रकल्प उभे करणे गरजेचे आहे. मराठवाडयातील लेंडी प्रकल्प, बिलोली तालुक्यातील देहीसारखा प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती करतो व मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मनापासून आभार व्यक्त करतो. धन्यवाद.

अध्यक्ष : मुंबई व कोकणाच्या संदर्भात विरोधी पक्षाने मागील आठवडयात उपस्थित केलेल्या नियम 293 अन्वयेच्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्यांची भाषणे संपली होती. त्या चर्चेवरील उत्तर आता मुख्यमंत्री महोदय देणार आहेत. त्यानंतर मराठवाडयासंबंधीच्या नियम 293 अन्वये प्रस्तावावरील चर्चा पुन्हा चालू ठेऊ.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: मुंबई महानगरपालिकेतील उघडकीस आलेली गैरकारभार व भ्रष्टाचाराची प्रकरणे व पेंडसे-केंद्रेकर अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही

मु.शी.: मुंबई महानगरपालिकेतील उघडकीस आलेली गैरकारभार व भ्रष्टाचाराची प्रकरणे व पेंडसे-केंद्रेकर अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही या विषयावर सर्वश्री राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, बाळासाहेब थोरात, भास्कर जाधव, मो. आरिफ नसीम खान, जितेंद्र आव्हाड, गोपालदास अग्रवाल, जयदत्त क्षीरसागर, विजय वडेट्टीवार, हनुमंत डोळस, नितेश राणे, पांडुरंग बरोरा, अब्दुल सत्तार, डॉ. सतीश पाटील, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री नरहरी झिरवाळ, सुनिल केदार, दिपक चव्हाण, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री अस्लम शेख, वसंतराव चव्हाण, डी.पी.सावंत, कालीदास कोळंबकर, मधुकरराव चव्हाण, काशीराम पावरा, अमिन पटेल, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री जयकुमार गोरे, राहुल बोंद्रे, अमित झनक, अमर काळे, ॲड. के. सी. पाडवी, सर्वश्री डी. एस. अहिरे, हर्षवर्धन सपकाळ, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री कुणाल पाटील, शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, ॲड. त्र्यंबक भिसे, सर्वश्री अमित देशमुख, बसवराज पाटील, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुढे सुरु ...

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मुंबई व कोकणाच्या संदर्भात नियम 293 अन्वये प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी मांडला आहे. त्यावर सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, श्री.अस्लम शेख, श्री.राजन साळवी, श्री.धैयशिल पाटील, श्री.संजय कदम, ॲड.पराग अळवणी, श्री.कालिदास कोळंबकर, श्री.वैभव नाईक, श्री.सुभाष पाटील, श्री.नितेश राणे, श्रीमती मनिषा चौधरी, श्रीमती तृप्ती सावंत, श्री.मंगलप्रभात लोढा, श्री.सुनील प्रभू, प्रा.वर्षा गायकवाड, श्री.अमित साटम, श्री.अमिन पटेल, श्री.संजय केळकर, श्री.अमित देशमुख, श्री.सदानंद चव्हाण, श्री.नसीम खान, सरदार तारासिंग, श्री.सुनील शिंदे व माननीय विरोधी पक्ष नेते श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांनी यावर आपले विचार मांडले आहेत. त्यातून बऱ्याच सूचना व तक्रारी येथे आलेल्या आहेत.

यानंतर जेजे-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

मुळात पहिल्यांदा मला असे वाटते की, हा प्रस्ताव कोकणचा वेगळा आणि मुंबईचा वेगळा आला असता तर बरे झाले असते. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव असे सांगत आहेत की, कोकणावर सातत्याने अन्याय होतो. वर्षानुवर्षे कोकणावर चर्चाच होत नाही. त्यांनी मोठया अडचणीत ही चर्चा आणलेली आहे. त्या चर्चेवर मुंबईचेच अतिक्रमण जास्त झालेले आहे. उत्तरामध्ये मी कोकणसंदर्भातील मुद्दयांवर अधिक बोलणार आहे. मुंबईतील प्रश्नांना आणि विषयांना वेगवेगळया माध्यमातून चर्चा होत असते. त्यातील सर्व विषयांवर मी उत्तरात बोलणार नाही. मेट्रो आणि एमएमआरडीए संदर्भात मी याच अधिवेशनात तीन ते चार वेळा उत्तरे दिलेली आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांचा हा प्रस्ताव मांडत असताना सकारात्मक दृष्टीकोन होता. त्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करीत आहे. हा प्रस्ताव मांडत असताना कोठेही टीका किंवा तुम्ही काय केले आणि आम्ही काय केले अशा प्रकारच्या बाबींचा त्यामध्ये समावेश नव्हता. कोकणातील नेमक्या अडचणी काय आहेत, त्या कशा सोडविल्या पाहिजेत, अशा प्रकारचा सकारात्मक विषय त्यांनी यातून मांडलेला आहे. कोकणचा संपूर्ण इतिहास व कोकण कशी नररत्नांची खाण आहे, हे त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे आपल्या भाषणातून मांडलेले आहे. मी त्यांना गांभीर्याने सांगितले की, तुमचे भाषण डॉक्यूमेंटेशन फॉर्ममध्ये छापले पाहिजे इतके समग्र कोकणाबाबत त्यांनी भाषण केलेले आहे. याबाबत मी माझ्या सहका-यांशी चर्चा केलेली आहे. याबाबत जितके जास्तीत जास्त कोकणाकरिता करता येईल,त्याचा विचार या ठिकाणी केलेला आहे. या एकाच भाषणातून कोकणाला सर्व गोष्टी मिळतील असे नाही अशा चर्चा वारंवार उपस्थित करुन कोकणच्या बाबतीत चांगले निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, कोकणचा विचार केला तर पर्यटनाचा विचार मनामध्ये येतो. कोकण आणि गोव्यामध्ये तस काहीच जास्त अंतर नाही. किंबहुना कोकणातील अनेक स्पॉट्स गोव्यापेक्षाही चांगले आणि निसर्गाने नटलेले आहेत. परंतु कोकणामध्ये ज्या प्रमाणात पर्यटनाचा विकास व्हायला पाहिजे होता, त्याप्रमाणात तो होऊ शकलेला नाही. याबाबत राज्य शासनाने काही दिवसांमध्ये विशेषत्त्वाने प्रयत्न केलेले आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

याकरिता शासनाने नवीन पर्यटन धोरण तयार केलेले आहे. या धोरणामध्ये शासनाने विशेषत: सागरी पर्यटन, नौकानयन पर्यटन विकास यावर भर दिलेला आहे. याकरिता शासनाने इन्सेंटिव्ह दिलेले आहेत. यामध्ये कशी गुंतवणूक कशी करता येईल ? याबाबतचे धोरण आखलेले आहे. या पर्यटन धोरणांतर्गत रत्नागिरी येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रादेशिक कार्यालय अधिक चांगल्या प्रकारे चालावे या दृष्टीने भर देण्याचा निर्णय घेतलेला आहे. आज याच्या पलिकडे जाऊन मी असे घोषित करतो की, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ असे ज्यावेळी आपण म्हणतो त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्रातील पर्यटनासंबंधी त्याच्यामध्ये विचार केला जातो. कोकणातील पर्यटनाचा विशेषत: विकास व त्याकरिता विचार करणे आवश्यक आहे. कोकणाकरिता स्वतंत्र अशा प्रकारचे पर्यटन विकास महामंडळ राज्य शासन तयार करेल. केवळ याचा पॅराफर्नेलिया वाढू नये याकरिता सबसिडरी कंपनी म्हणून याकरिता तयार करू. एमएमबी आणि पर्यटन विकास महामंडळ या दोघांनाही यामध्ये इन्व्हॉल्व्ह करण्यात येईल. या दोघांच्या माध्यमातून स्वतंत्र पर्यटन विकास महामंडळ तयार केले जाणार आहे. सागरी पर्यटन, त्याच्या व्यतिरिक्त पर्यटनाच्या संदर्भात उत्तम अशा प्रकारचे कार्य निश्चितपणे करेल. केंद्र शासनाने आपण आता स्वदेश दर्शन कार्यक्रम केंद्राने तयार केला होता त्याअंतर्गत त्यामधील आराखडा आपण पाठविला होता, तो केंद्र शासनाने मंजूर करून 92.17 कोटी रुपये दिनांक 1 मार्च,2016 रोजी दिलेले आहेत. या माध्यमातून मी सिंधुदूर्ग जिल्हयातील विजयदुर्ग, देवगड, मिठबाव, तारकर्ली, तोंडवली, शिरोडा, सागरेश्वर, मोचेमाढ या ठिकाणी पर्यटक निवास, बीच ॲमेनिटीज, बीच फॅसिलिटीज, बीच सेफ्टी असा एकात्मिक आराखडा तयार केला होता. केंद्र शासनाने याकरिता मान्यता देऊन निधी दिलेला आहे. स्वदेश दर्शन अंतर्गतचा पहिला प्रस्ताव सिंधुदूर्ग जिल्हयाला केंद्र शासनाच्या वतीने मिळालेला आहे. यासोबत अतिशय समग्र प्रकारचा सिंधुदूर्ग जिल्हयातील पर्यटन स्थळांचा विकास करण्याचा कार्यक्रम आखलेला आहे. मागील काळात युतीचे सरकार असताना सिंधुदूर्ग जिल्हयाला पर्यटन जिल्हयाचा दर्जा दिला गेला होता. दर्जा दिल्यानंतर त्याप्रकारच्या सोयी देऊ शकलो नाहीत. पर्यटनासाठी पर्यटन जिल्हा म्हणजे काय ?

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

केवळ डेझिग्नेशन मिळाले. जसे नागपूरला केवळ उप राजधानीचा दर्जा मिळाला परंतु उपराजधानी म्हणजे नेमके काय हे कोणालाच समजत नाही. पर्यटनाचा दर्जा म्हणजे नेमके काय हे लक्षात येत नव्हते. आणि त्यामुळे आता जे धोरण आणले आहे, त्यामध्ये पर्यटन जिल्हा म्हण्जे काय आणि पर्यटन जिल्हयाला वेगवेगळे काय कन्सेशन्स असतात, या धोरणामध्ये स्पेसिफाय केलेले आहेत. त्यामुळे येथे गुंतवणक येईल. रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या दोन्ही जिल्हयातील पर्यटन स्थळांचा विकास करण्याकरिता शासनाने 3,055.55 कोटी रुपयांचा आराखडा तयार केलेला आहे. एशियन डेव्हलपमेंट बँकेकडे हा आराखडा सादर केला जाणार आहे. या बँकेच्या मदतीने दोन जिल्हयांच्या पर्यटनाचा 3,055.55 कोटी रुपयांच्या अभुतपूर्व आराखडयास मान्यता देण्यात आलेली आहे. आणि एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या माध्यमातून आराखडा कार्यान्वित करण्यात येणार आहे. मला असे वाटते की, हा ऐतिहासिक निर्णय शासन कोकण पर्यटनासंबंधी घेऊ शकलेले आहे. मेक इन इंडियाअंतर्गत पर्यटन क्षेत्रामध्ये 8 एमओयू केलेले आहेत. त्यापैकी 7 एमओयू शासनाने कोकणातील केलेले आहेत. पुढे मी या एमओयू बाबत माहिती सांगेल. यामुळे येथे मोठया प्रमाणात गुंतवणूक आणि रोजगार तयार होणार आहे. पर्यटनाच्या संदर्भात सीआरझेडच्या अडचणी होत्या. त्या संदर्भात राज्य शासनाने केंद्र शासनाकडे विनंती केलेली आहे. याबाबत शासनाचे माननीय केंद्रीय मंत्री यांच्याशी बोलणी झालेली आहे. त्या माध्यमातून टुरिझमच्या प्रकल्पाला सीआरझेचा क्लियरन्स सोपा किंवा डेलिगेटेड व्हावा, असे प्रयत्न केले जात आहेत. मोठया प्रमाणात शासनाने कार्यवाही सुरु केलेली आहे. निवासी व न्याहारी योजनेला अतिशय उत्तम प्रतिसादर मिळालेला आहे. 2015 मध्ये या योजनेंतर्गत 720 योजना धारकांची नोंदणी झाली होती. आता ही नोंदणी 890 च्या घरात गेलेली आहे. शेवटी जर आपल्याला पर्यटन वाढवायचे असेल तर पर्यटनाचे एक कल्चर तयार करावे लागते. प्रत्येक घरात पर्यटन -मैत्रीपूर्ण वातावरण तयार करणे आवश्यक आहे. जगाने ब्रेड ॲण्ड ब्रेकफास्ट कन्सेप्ट तयार केलेली आहे. याकरिता मिनिमम बेंचमार्क शासन तयार करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

आणि कोणीही व्यक्ती आपल्या घरी बेंचमार्क आधारित एक खोली असेल तर एक खोली, यासाठी हॉटेलचा दर्जा मिळत असतो. अशा प्रकारची एक चांगली योजना मंजूर झालेली आहे आणि लोकांचा देखील चांगला प्रतिसाद मिळत आहे.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी सी-वर्ल्डच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केलेला होता. गेल्या अनेक वर्षापासून सी-वर्ल्ड उभारण्यासाठी चर्चा सुरु आहेत. परंतु, यामध्ये म्हणावी तशी प्रगती होत नव्हती. कारण 1390 एकर जमीन सी-वर्ल्ड प्रकल्पांतर्गत दाखविली होती. कोकणामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर जमीन अधिग्रहीत करणे हे फार कठीण काम आहे. कारण ही छोटी कम्युनिटी आहे. त्यामुळे त्यांच्या मनात एक असुरक्षिततेची भावना निर्माण होते. एवढ्या मोठ्या प्रमाणावर जमीन अधिग्रहीत केल तर आम्ही बेघर होऊ, अशा प्रकारच्या मानसिकतेतून प्रचंड विरोध होत होता. शासनाने कोणत्याही परिस्थितीत सी-वर्ल्ड प्रकल्प उभारण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे. कारण ते एक प्रकारे पर्यटनासाठी न्युक्लिअस म्हणून काम करणार आहे. त्यामुळे शासनाने सदर प्रकल्पाच्या संदर्भातील अभ्यास पुन्हा नव्याने केला आहे. आता 1390 हेक्टरऐवजी केवळ 350 एकरामध्ये सी-वर्ल्ड उभारण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे. या प्रकल्पाचा आराखडा तयार केलेला आहे. जमिनीच्या अधिग्रहणाचे सर्व पेसे म्हणजे जिल्हाधिकारी यांनी जेवढा निधी मागितला तेवढा निधी त्यांच्याकडे वर्ग केलेला आहे. आता निवाड्याच्या संदर्भातील अंतिम निर्णय घ्यावयाचा आहे, असा प्रस्ताव राज्य शासनाकडे आलेला आहे. पुढील 15 दिवसांमध्ये त्या प्रस्तावास मान्यता दिली जाणार आहे. म्हणजे 8 महिन्यांपासून 12 महिन्यांपर्यंतच्या कालावधीत सर्व जमिनी अधिग्रहीत करता येतील आणि सायमल्टेनिअसली आराखड्याची प्रोसेस केली जाणार आहे. म्हणजे ज्यावेळी शासनाच्या ताब्यात 12 महिन्यानंतर जमिनी येतील, त्यावेळी ते ॲक्चुअली टेंडरकरिता येणार आहे. सी-वर्ल्डचा प्रकल्प यशस्वीपणे राबविला तर कोकणातील पर्यटनाला जो न्युक्लिअस हवा आहे, तो न्युक्लिअस या प्रकल्पाने तयार होणार आहे. त्यामुळे त्या ठिकाणी अधिकाअधिक पर्यटक आकर्षित करण्याचा प्रयत्न होणार आहे.

.....2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

अध्यक्ष महोदय, बीच सेफ्टीच्या संदर्भात कार्यवाही सुरु केलेली आहे. बीच सेफ्टी, सागरी सनियंत्रण यंत्रणा उभारण्याचा निर्णय पर्यटन विकास महामंडळाच्या अंतर्गत घेतलेला आहे. यामध्ये पुरेसे जीवन रक्षक, जलद बोटी, आवश्यक ती उपरणे आणि वॉश टॉवर्स असा समग्र कार्यक्रम हातात घेतलेला आहे. यासाठी एक निविदा प्रक्रिया अवलंबिण्यात आली होती. पण त्या क्षेत्रात काम करणारी लोक कमी आहेत, असे लक्षात आल्यानंतर आपण ते कसे तयार करु शकू अशा प्रकारचा प्रयत्न महामंडळाच्या माध्यमातून सुरु केलेला आहे. यासोबत वेगवेगळे महोत्सव केले जातात. एलिफंटा महोत्सवात देखील पर्यटकांची संख्या वाढू लागली आहे. मागील वेळेस 70 हजार पर्यटक आले होते. यावर्षी 1 लाख 25 हजार पर्यटकांनी त्या ठिकाणी भेट दिलेली आहे. शासनाने रायगड महोत्सवाला नव्याने सुरुवात केली होती. 90 हजार पर्यटकांनी रायगड महोत्सवाला हजेरी लावलेली आहे. आंजरले-विळास या ठिकाणी कासव महोत्सव साजरा केला जातो. त्या ठिकाणी 4500 पर्यटकांनी कासव महोत्सवाला हजेरी लावलेली आहे. सिंधुदुर्ग महोत्सव डिसकन्टीन्यू झालेला होता, तो आता पूर्ववत सुरु केलेला आहे. 10 हजार पर्यटकांनी सिंधुदुर्ग महोत्सवाला हजेरी लावलेली आहे. परिणामी विदेशी पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ होऊ लागली आहे. या वर्षी कोकणात 3 लाख 43 हजार पर्यटक आले आहेत आणि मागच्या वर्षीपेक्षा जवळ जवळ 35 हजार पर्यटक जास्तीचे आलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, स्कुबा डायव्हींगचे इन्स्टीट्युट सुरु झालेले आहे, याची सर्व सन्माननीय सदस्यांना माहिती असणार आहे. स्कुबा डायव्हींगच्या संदर्भातील सर्व अडचणी दूर केलेल्या आहेत. यासाठी अतिशय चांगला प्रतिसाद मिळत आहे. वर्षभरामध्ये 1 कोटी रुपयांचा महसूल स्कुबा डायव्हींगच्या इन्स्टीट्युटला मिळाला आहे. देशातील फक्त कोकणामध्ये स्कुबा डायव्हींगचे इन्स्टीट्युट हे एकमेव केंद्र आहे. मी पर्यटनाच्या आकडेवारीच्या खोलात जाणार नाही. अशा प्रकारे पर्यटनाला चालना देण्याचे काम केले जात आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

अध्यक्ष महोदय, एलिफंटा येथील घारापुरी बेटाचा विकास करण्यासाठी पर्यटनदृष्ट्या एकात्मीक योजना आखलेली आहे. एलिफंटा येथील घारापुरी बेट हे जागसिक वारसा स्थळ म्हणून प्रसिध्द असलेले ऐतिहासिक व सांस्कृतीक महत्व व त्या ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या विचारात घेता 7 ते 8 लाख पर्यटक येत असतात. आज त्या ठिकाणी एक जेट्टी आहे. त्याच्या आजुबाजूचा कचऱ्याचे साम्राज्य आहे. संध्याकाळी त्या ठिकाणी कोणी थांबू शकत नाही. हा जागतिक वारसा अनयुटिलाईज्ड आहे. शासनाने त्यासंदर्भातील एक आराखडा तयार केलेला आहे. सदर आरखड्याअंतर्गत जेट्टी, मिनी ट्रेन, पदपथ रेलिंग, रोजगार कुटीर, पर्यटकांच्या निवासाकरिता व्यवस्था, केबल कार, हिलि टुरिझम विकसित केले जाणार आहेत. तसेच उर्वरित जागेत ॲम्युझमेंट ॲक्टिव्हिटी उभारल्या जाऊ शकतात काय, यासंदर्भातील एकात्मीक विकास करीत आहोत. तसेच प्राथमिक उपचार केंद्र आणि किऑस्क वगैरे बाबींचा समावेश केला जात आहे. अशा प्रकारे अधिकच्या जेट्टी तयार करुन त्या ठिकाणी पोहचता येईल काय, अशा प्रकारचा अहवाल शासनाने तयार केलेला आहे. मुंबईत आल्यानंतर प्रत्येक पर्यटकाला एलिफंटाला भेट द्यावी असे वाटत असते. पण त्या ठिकाणी पोहचल्यानंतर आतमधील अवस्था अतिशय गहान असल्याचे आपल्याला दिसून येत असून, ती चांगली करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. पराग अळवणी यांनी पर्यटन सेवा अधिनियम तयार करण्याची मागणी केलेली असून, ती अतिशय चांगली आहे. काही राज्यांनी पर्यटन सेवा अधिनियम तयार केलेला आहे. अशा प्रकारचा अधिनियम तयार करीत असताना यातून नवीन लायसन्स देण्याकरिता सुरुवात तर होणार नाही ना असा मुळ प्रश्न निर्माण झालेला आहे. शासन पर्यटन सेवा अधिनियम तयार करणार आहे. पर्यटन सेवा अधिनियम तयार करीत असताना तो "ease of doing Buiseness" असणार आहे. आज नव्याने पर्यटन संचलनालय तयार केले जाणार आहे. पूर्वी ते नव्हते. आपण पर्यटन विकास महामंडळ ठेवले होते आणि पर्यटन संचलनालय रद्द केले होते. पर्यटन विकास महामंडळ स्वत:चे डेस्टिनेशन त्या ठिकाणी मार्केट करु शकते असे लक्षात आलेले आहे. पण जे त्यांचे डेस्टिनेशन नाही, अशा जागांचे मार्केटिंग, ॲडव्हर्टायजींग करु शकत नाही त्यामुळे ती सरकारी कंपनी असली तर त्यातून "Conflict of Interest" तयार होतो.

.....4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

पर्यटनाचे काम त्यांनी करायचे, पण स्वत:पुरते मर्यादित रहायचे. म्हणून शासनाने नवीन संचलनालय पुन्हा तयार करण्याचा निर्णय केलेला आहे. आता जो कायदा केला जाणार आहे, त्या कायद्याच्या अंतर्गत पर्यटनाशी संबंधित नोडल एजन्सीचा दर्जा पर्यटन विभागाला, संचलनालयाला देण्यासाठी आणि त्या अंतर्गत अशा प्रकारच्या पर्यटनाशी संबंधित एनओसीचा ओव्हर रायडिंग अधिकार हा त्या विभागाशी कॉऑर्डिनेशन करून त्यांना प्राप्त होण्यासाठी कायदा करण्याचे ठरविले आहे. या माध्यमातून पर्यटनाला अधिक चालना देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, काल बोलताना पर्यटनाशी संबंधित ॲडव्हर्टायझिंगच्या बजेटचा मुद्दा उपस्थित केलेला होता. आपले ॲडव्हर्टायझिंग टार्जिंगचे बजेट अतिशय कमी आहे. केरळ राज्याचे 285 कोटी रुपयांचे ॲडव्हर्टायझिंग बजेट आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

मी त्या राज्यांची माहिती घेतली असता केरळच्या तुलनेत आपल्या राज्याचे बजेट कमी आहे. आज केरळ राज्याचे आणि आपले बजेट सारखेच आहे. आपले 40 कोटी रुपये होते ते आपण यावर्षी 65 कोटी रुपये केले आणि केरळचेही 65 कोटी रुपये आहे. केरळ राज्य आपल्या राज्याच्या एक तृत्यांश इतका आहे. त्यामुळे केरळ राज्याची तुलना केली तर जाहिरातीच्या बाबतीत बजेट कमी आहे. सन 2017 हे व्हिजीट महाराष्ट्र वर्ष मागील वर्षी आपण घोषित केलेले आहे. सार्क देशातल्या टुरिझम मिनीस्टरची बैठक आपण घेतली आहे, या सर्व बाबी आपण पूर्ण केलेल्या आहेत. आता जाहिरातीचा ग्रोथ प्लॅन यावर्षी तयार केलेला असून त्या माध्यमातून आपले जे डेस्टीनेशन आहे, ते जास्तीत जास्त मार्केट आपल्याला कसे करता येईल, यासंदर्भात प्रयत्न करीत आहोत. आपण जे एमओयु केलेले आहेत त्यामध्ये यशोमाला फॉर्मिंग ॲण्ड टुरिझम लिमिटेड यांचेशी रायगडकरिता एमओयु केलला आहे. विष्णू ग्रीन प्लॅनेट, एस.के. थीम पार्क, पालघर, ओशन व्ह्यू रिसॉर्टस यांचेशी सिंधुदुर्ग करिता एमआयेयु केला आहे. बीच कॉटेजेस प्रायव्हेट लिमिटेड- सिंधुदुर्ग, ब्ल्यू शाईन हॉस्पिटॅलिटी - सिंधुदुर्ग, इंडियन हॉटेल्स -सिंधुदुर्ग असे वेगवेगळे सात एमओयु केलेले आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणुक येत असून यातून रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत.

अध्यक्ष महाराज, रत्नागिरीचे एअरपोर्ट आणि चिपीच्या एअरपोर्ट संदर्भात अतिशय महत्वपूर्ण मागणी आली आहे. रत्नागिरीचे एअरपोर्ट कोस्ट गार्डकडे आहे. रनवे ॲप्रन एक्सटेन्शन संदर्भात कार्यवाही सुरु केलेली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देऊन त्यांना अतिरिक्त जागा हवी आहे, ती आपण देत आहोत. आमच्याकडे संयुक्त बैठक झाली. त्यामध्ये कोस्ट गार्डने कमर्शियल एअरपोर्ट तयार करण्याच्या संदर्भात मान्यता दिलेली आहे. नाईट लॅण्डींग एअरपोर्ट रत्नागिरी येथे आपण तयार करु शकू. चीपी एअरपोर्टचे काम ज्या वेगाने व्हावयास पाहिजे त्या वेगाने झाले नाही. त्याकरिता निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. तोही एअरपोर्ट वेगाने झाला पाहिजे, अशा प्रकारचा प्रयत्न केला जाईल.

अध्यक्ष महाराज, चांदा ते बांधा ही अतिशय चांगली योजना माननीय वित्त मंत्री आणि माननीय राज्य वित्त मंत्र्यांनी मिळून सुरु केलेली आहे. या योजनेतंर्गत एक पथदर्शी प्रकल्प

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

म्हणून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पश्चिमेकडील भागाची निवड करण्यात आली. मी खूप सविस्तर यामध्ये सांगत नाही, मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. ही सर्वांगीण विकासाची योजना आहे. यात कृषी आणि कृषी संलग्न भात पिकांचे उत्पादन वाढविण्याकरिता एसआरआय सारख्या उपाययोजना करणे, सोलरवर आधारित विशेषत: फळबाग लागवडीचा कार्यक्रम कोकणात घेणार असून त्यासाठी मोठी तरतूद या योजनेतंर्गत केलेली आहे. पशुसंवर्धन, मत्स्य व्यवसाय दुग्धव्यवस्थापन, शेळी-बकरी पालन, मत्स्य शेतीस चालणा देणाऱ्या उपाययोजना यांचा आपण समावेश केला आहे.

अध्यक्ष महाराज, मी पर्यटनासंदर्भात पुन्हा बोलत नाही. खनिजावर आधारित विकास याचा समावेश केलेला आहे. ग्रामविकास अंतर्गत सिंधुदुर्ग आणि चंद्रपूर येथील पाच वर्षात पर कॅपिटल इन्कम दुप्पट करणे हा एकात्मिक विकासाचा कार्यक्रम आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याकरिता भात प्रकल्प, कोकोनेट डेव्हलपमेंटच्या सहकार्याने नारळाच्या पिकाच्या वाढीकरिता उपाययोजना करणे, नारळावर प्रक्रिया करून लघुउद्योगाची निर्मिती, क्वॉयर डेव्हलपमेंट बोर्डाच्या सहाय्याने क्वॉयरवर आधारित उद्योग निर्मिती, केळीचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्याकरिता टीश्यू कल्चर पध्दत विकसित करणे, आंबा, काजू, फणस आणि कोकम इत्यादी फळांच्या विकासाचा कार्यक्रम हातामध्ये घेणे, खेकडे तथा शोभिवंत मत्स्य निर्मिती करणे, भात, मत्स्यपालन करणे, दुग्ध व्यवसाय अशा अनेक गोष्टी यामध्ये घेतलेल्या आहेत. कृषी आणि ग्रामीण पर्यटन हा कोकणातील महत्वाचा कणा आहे. मी सर्व गोष्टींचा उल्लेख येथे करणार नाही. साधारणपणे सन 2016-2017 मध्ये एकूण नियतव्यय 150 कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यावर अतिशय पथदर्शी प्रकल्प निश्चितपणे होणार आहे.

अध्यक्ष महाराज, फ्रुड प्रोसेसिंगच्या बाबतीत आंब्यावर आधारित प्रकल्प तयार व्हावा, अशी मागणी सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव आणि काही सन्माननीय सदस्यांनी केली. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, जैन इरिगेशनचे प्रमुख भवरलाल जैन हे मयत झालेले आहेत, परंतु त्यांनी स्वत: यामध्ये पुढाकार घेतला होता. त्यांचेमार्फत आराखडा तयार करून पाठविला होता. आता त्यांचे सुपूत्र यापुढे लक्ष घालत आहेत. त्यांनी जळगाव मध्ये सुरु केलेला जैन व्हॅली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

प्रकल्प हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा प्रकल्प आहे. त्याच दर्जाचा प्रकल्प कोकणामध्ये करायला ते तयार आहेत. त्यांनी दोन जागा आयडेंटीफॉय केलेल्या असून त्यापैकी एक जागा त्यांना द्यावी लागणार आहे. त्यांची इच्छा आहे की, कोकण विद्यापीठ त्यांचे सोबत आले तर त्यांना घ्यावयाची त्यांची तयारी आहे. त्या माध्यमातून तो प्रकल्प आपण पुढे नेणार आहोत. जळगावमधील प्रकल्प हा दक्षिण राज्यातील हापूस आंब्यावर आधारित प्रकल्प आहे. त्यांनी मला स्वतःला सांगितले की, दक्षिण हापूस आंब्यापेक्षा कोकणातील हापूस आंबा चांगला आहे. आम्ही लवकरात लवकर तो प्रकल्प कसा सुरु होईल त्याकरिता निश्चित प्रयत्न करु. यासोबत कोकणातील आंबा, काजू, वेगवेगळ्या प्रकारचे कोकणातील जी काही उत्पादने आहेत, त्याच्यावर आधारित कोकणात फुड पार्क कोणी तयार करीत असतील तर त्यांना विशेष इन्सेनटिव्ह देण्याची योजना शासन तयार करील. त्यासाठी इतरांपेक्षा जास्त इन्सेनटिव्ह देण्याची शासनाची योजना आहे. आंबा, काजू यांचे काही उपक्रम आपण घेतले आहेत. एमएससी सीडीपी केंद्र उभारण्यासंदर्भात मायक्रो स्मॉल स्केल इंटरप्रायझेच्या माध्यमातून 15 कोटी रुपयांचा प्रकल्प दिलेला असून त्यामध्ये 48 शेतकरी सहभागी झालेले आहेत. ज्यामध्ये असेप्टिक पॅकिंग रिफॉर्मिंग युनिट, ज्युसेसचे टीन फ्लॅटर करुन ते कंटेनरमध्ये नेता येतील, अशा प्रकारची व्यवस्था करणार आहोत. लेबॉरटरी टेस्टिंग, आंबा पोळी, सन ड्राईंग तयार करणे, आर्टीफिशिअल ड्राईंगची व्यवस्था, आपण हे मंजूर केलेले आहे. या व्यतिरिक्त एकात्मिक फुड पार्क कोणी तयार करणार असेल तर त्या फुड पार्कसाठी स्पेशल इन्सेनटिव्ह स्कीम राज्य सरकार तयार करील. आपल्याकडे पाणी आहे, परंतु शेतीवर काही बंधने येतात. भाताच्या पलिकडे फारसे काही होत नाही. छोटे छोटे जमिनीचे तुकडे आहेत म्हणून छोट्या जमिनीच्या तुकडयांमध्ये जर हार्टीकल्चर केले तर ते अधिक प्रभावी होऊ शकते. हॉर्टीकल्चर प्रभावी करायचे असेल तर त्यासाठी प्रोसेसिंग हा त्यावरील उपाय आहे. कोकणाकरिता हा निर्णय राज्य सरकारच्या वतीने घेण्यात आलेला आहे.

यानंतर MM-1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस .....

अध्यक्ष महोदय, मुंबई-गोवा महामार्गाचा विषय येथे सातत्याने मांडण्यात येतो. माननीय श्री. नितीन गडकरी साहेबांनी केंद्रीय मंत्रीपदाची धुरा सांभाळल्यानंतर अतिशय वेगाने हे सर्व काम हातात घेतले. त्यातून पनवेल ते इंदापूर या 84 कि.मी. मार्गाचे काम आता सुरु झालेले आहे. त्यातील 20 कि.मी.चे काम सोडून उर्वरित 64 कि.मी.चे काम दिनांक 31 डिसेंबर, 2016 पर्यंत पूर्ण होईल. हे 20 कि.मी. चे काम कर्नाळा अभयारण्यातून जात होते. परंतु, मला हे देखील सांगण्यास आनंद होतो की, माननीय केंद्रीय मंत्री श्री. प्रकाश जावडेकर यांच्या सहकार्याने आता या 20 कि.मी.च्या कामालाही आपल्याला परवानगी मिळालेली आहे. त्यामुळे आता या संपूर्ण 84 कि.मी.च्या कामाची परवानगी आपल्या हातात आहे. त्यातील 64 कि.मी.चे काम दिनांक 31 डिसेंबर, 2016 पर्यंत आपण पूर्ण करू. दरम्यानच्या काळात या परवानगीच्या बाबतीतील ज्या गोष्टींची पूर्तता करावयाची आहे त्यांची पूर्तता करून हे 20 कि.मी. च्या कामाचे टेंडरही आता आपण काढणार आहोत. अनेक वर्षे मागे राहिलेल्या या विषयाचे महत्त्व असे आहे की, आपला बंदर कनेक्टिव्हिटीचा जो मोठ्या प्रमाणावरील कार्यक्रम आहे, त्यातलाही हा अतिशय महत्त्वाचा रस्ता आहे, त्यामुळे आपण तो रस्ता पूर्ण करणार आहोत.

अध्यक्ष महोदय, इंदापूर ते झाराप हा 366 कि.मी.चा चौपदरीकरणाचा एक स्ट्रेच आहे. त्या स्ट्रेचचे 10 पॅकेजेसमध्ये विभाजन करण्यात आलेले आहे. त्यातील 3 पॅकेजेस 134 कि.मी. चे आहेत. या पॅकेजेसचे आपले अधिग्रहणाचे काम पूर्ण झाले आहे. याचे काम आता निविदास्तरावर आहे. याच्या निविदा फायनल केल्यापासून साधारणपणे दीड ते पावणे दोन वर्षांच्या कालावधीत हे चौपदरीकरणाचे काम पूर्ण होईल. हे 134 कि.मी.चे काम देखील आता आपण लवकरच सुरु करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, उरलेल्या 7 पॅकेजेसमध्ये 231 कि.मी. चा जो रस्ता आहे, त्या संदर्भात आपल्याला भूसंपादन करावयाचे आहे. त्या संदर्भातील काम आता प्रगतीपथावर आहे आणि अतिशय वेगाने ते भूसंपादनाचे कामही आपण सुरु केले आहे. झाराप ते पात्रादेवीचा एक 21 कि.मी. चा छोटासा स्ट्रेच होता, तो आपण मागच्या काळातच ऑलरेडी पूर्ण केलेला आहे. त्यामुळे मला असे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस .....

वाटते की, मुंबई-गोवा महामार्ग देखील माननीय श्री. नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने बऱ्यापैकी मार्गी लागलेला आहे. यातील कामेही मोठ्या प्रमाणात पूर्ण होतील.

अध्यक्ष महोदय, उद्योगाच्या क्षेत्रात देखील आता विशेषत: आपले जे मेक इन इंडिया अभियान झाले त्यामध्ये विशेषत: रायगड, पनवेल हा जो काही कोकणातील भाग आहे, त्या सर्व भागात आपल्याला मोठ्या प्रमाणात इन्व्हेस्टमेंट प्राप्त झालेली आहे. यामध्ये जवळपास 3.45 लाख कोटी रुपयांचे एमओयु या सर्व भागात आपले झालेले आहेत. यातील इंडस्ट्रिअल इन्फ्रास्ट्रक्चर आणि आय.टी. या क्षेत्रात खूप मोठी गुंतवणूक या सर्व भागामध्ये आपल्याला मिळालेली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात त्यातूनही आपल्याला इन्व्हेस्टमेंट मिळेल. तसेच, महाकॉयर वगैरे बाबत मी आधीच सांगितलेले आहे, मी पुन्हा त्या संदर्भात बोलत नाही. परंतु, सिंधुदुर्गमध्ये आपण तीही व्यवस्था केलेली आहे. तसेच, वारलीच्या संदर्भात मी आपल्याला यापूर्वीच माहिती दिलेली आहे की, आपण वारली क्लस्टर त्या ठिकाणी तयार करीत आहोत. त्या सोबत हस्तकला कारागिरांकरिता महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजनेंतर्गत सामुहिक सुविधा केंद्राची उभारणी आपण करीत आहोत. ज्यामध्ये तयार केलेल्या वस्तुंची गुणवत्ता सुधारण्यासाठी उच्च दर्जाची साधनसामुग्री, विपणनाची व्यवस्था वगैरे सर्व गोष्टी मी वाचून दाखवित नाही. परंतु, यामध्ये लाकडी खेळण्यांकरिता सावंतवाडी या ठिकाणी क्लस्टर तयार होत आहे आणि वारलीकरिता डहाणूमध्ये क्लस्टर तयार होत आहे. त्यामुळे मला असे वाटते की, इंडस्ट्रीच्या क्षेत्रात एक मोठे काम होत आहे.

अध्यक्ष महोदय, मला विनंती करण्यात आली की, प्लास्टिकचा पार्क तयार करु नका. खरे म्हणजे तशी घोषणाच नव्हती. त्या घोषणेचा फार विपर्यास झाला. मी नंतर त्याचे क्लॅरिफिकेशनही दिले. केंद्र सरकारने ज्या काही योजना तयार केलेल्या आहेत, त्या योजनांतर्गत जी काही पार्कची योजना आहे ती हे जे आपण रेग्युलर प्लास्टिक म्हणतो तशाप्रकारची ती योजना नाही. परंतु, त्यानंतरच मी हे क्लॅरिफाय केले होते. त्याची घोषणा करतानाच मी हे सांगितले होते की, केंद्र सरकारने कोकणामध्ये अशाप्रकारचा पार्क तयार करण्याची इच्छा दर्शविली आहे. परंतु, त्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस .....

संदर्भातील कोकणातील जनतेचा विचार घेऊनच आम्ही पुढील कारवाई करु, अशी माझी पहिलीच घोषणा होती. त्यामुळे आपण जी काही विनंती केलेली आहे, ती मी त्याच वेळेस मान्य केलेली आहे. त्यामुळे काळजी करण्याचे कारण नाही. त्याच सोबत केंद्र सरकारने ग्रिन रिफायनरी तयार करण्याचा निर्णय केलेला आहे. केंद्र सरकारच्या तिन्ही कंपन्या एकत्रित येऊन देशातील सर्वात मोठी रिफायनरी ज्यामध्ये ही ग्रीन रिफायनरी याकरिता आहे की, या रिफायनरीचा एक भाग म्हणून 5 हजार एकर जमिनीवर ते पूर्णपणे ग्रीन एरिया तयार करणार आहेत. याचा फायदा असा आहे की, यामध्ये जवळजवळ 1 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त इन्व्हेस्टमेंट होईल आणि कोकणातील 1 लाख तरुणांना यामध्ये थेट रोजगार मिळू शकणार आहे. याही संदर्भातील एक अतिशय महत्त्वाचा निर्णय झाला. मला यात याकरिता आनंद आहे की, साधारणपणे सुरुवातीला गुजरात राज्याने केंद्र सरकारला हे प्रपोजल दिले होते की, आपण गुजरातमध्ये रिफायनरी करावी. परंतु, माननीय केंद्रीय मंत्री श्री. धर्मेंद्र प्रधान यांनी हा निर्णय केला की, आम्ही हे महाराष्ट्रामध्ये करु आणि त्यामुळे त्यांचे देखील मी अतिशय मन:पूर्वक आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, विशेषत: कस्तुरीरंगन समितीने जो काही इकोसेन्सेटिव्ह झोनचा प्रश्न तयार केला होता त्यामुळे एक मोठा पट्टा म्हणजे धुळ्यापासून ते कोकणच्या शेवटच्या टोकापर्यंतचा जो सर्व भाग आहे, त्यावर खूप मोठे निर्बंध आले होते. जवळजवळ 12 जिल्ह्यांतील 56 तालुक्यांतील 2133 गावांमध्ये हा इकोसेन्सेटिव्ह झोन तयार झाला होता. त्यामध्ये कोकणातील खूप मेजर पार्ट होता. एकट्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 192 गावे आणि 1979 चौ.कि.मी.चा एरिया म्हणजे अख्खा जिल्हाच याने व्यापला गेला होता. त्यामुळे कोकणामध्ये अशी भावना निर्माण झाली होती, की आमच्यावर खूप मोठा अन्याय होत आहे. या संदर्भात मी आपल्या वन विभागाचे मन:पूर्वक अभिनंदन करीन की, त्यांनी अतिशय चांगली कारवाई यामध्ये केली. साधारणपणे केंद्र सरकारच्या सूचनेनुसार आपण यामध्ये समिती गठित करुन, या परिसंवेदनशील क्षेत्राच्या बाबतीत जनसुनावणी घेऊन व प्रत्यक्ष तपासणी करुन त्याचे चिन्हांकन करुन प्रत्यक्ष तपासणीच्या आधारे गावातील नैसर्गिक जैव विविधतेने समृध्द भूक्षेत्र,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस .....

मानवनिर्मित भू वापर, वनक्षेत्र, तलाव, नदी, नाले, गुरचराईचे क्षेत्र इत्यादींचे आरेखन करुन आणि परिसंवेदनशील क्षेत्रात कोणत्या क्षेत्राचा समावेश करावा, या संदर्भातील अभिप्राय अशाप्रकारचे काम आपण या समितीला दिले. आपल्याला आश्चर्य वाटेल की, एका वर्षाच्या कालावधीमध्ये आपण 2133 गावांमध्ये त्या प्रत्येक गावाचा अशाप्रकारचा नकाशा तयार केला. सॅटेलाईटने सर्व्हे केला, त्याचा स्वतंत्र नकाशा तयार करुन त्यामध्ये ॲक्च्युअल इकोसेन्सेटिव्ह झोन किती आहे तो मॅप केला. उर्वरित झोन हा इकोसेन्सेटिव्ह नाही मग तो कोणता झोन आहे, या संदर्भात त्या गावाची ग्रामसभा घेऊन त्या ग्रामसभेकडून तो नकाशा मंजूर करुन घेतला. अशा 2133 गावांचे स्वतंत्र नकाशे, पूर्ण सर्व्हे करुन त्यांची ग्रामसभा घेऊन याचा एकत्रित नकाशा तयार केला व संपूर्ण ॲक्च्युअल इकोसेन्सेटिव्ह झोन चिन्हांकित करुन केंद्र सरकारच्या मान्यतेकरिता आपण पाठविला.

अध्यक्ष महोदय, मला असे वाटते की, एक वर्षाच्या कालावधीत वन विभागाने केलेले हे काम देशातील अतिशय पथदर्शी अशाप्रकारचे काम झालेले आहे. निश्चितपणे कस्तुरीरंगन समितीला अपेक्षित होते त्याप्रमाणे इकोसेन्सेटिव्ह झोनही यामध्ये वाचणार आहे. त्या सोबतच या इकोसेन्सेटिव्ह झोनमुळे जे गावाच्यागाव विकासापासून वंचित राहिले होते, त्याही संदर्भातील विषय या ठिकाणी निश्चितपणे होणार आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. वैभव नाईक यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 40 हजार हेक्टर जमीन वन संज्ञेतून वगळण्याच्या संदर्भातील विषय मांडला होता. हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. या संदर्भात राज्य सरकारने मागच्याच काळात पूर्ण कारवाई केलेली आहे. ती कारवाई करुन ही वन संज्ञा 42 हजार हेक्टरवरुन 1800 हेक्टरपर्यंत खाली आणण्यासंदर्भात सुप्रीम कोर्टात एक शपथपत्र दाखल केलेले आहे. दुर्दैवाने त्यावर अजून सुप्रीम कोर्टाचा निर्णय झालेला नाही. आज या उत्तराच्या अनुषंगाने मी बैठक घेतली त्यावेळेस मी लॉ अँड ज्युडिशिअरी विभागाला असे निदेश दिलेले आहेत की, जेष्ठतम वकिलांना तातडीने, शक्य असल्यास केंद्रातील ॲटर्नी जनरल यांना उभे करुन ही केस विशेषत्वाने लावून घ्यावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

आपण जे ॲफिडेव्हीट केले आहे, ते सुप्रिम कोर्टाने मान्य करावे, अशा प्रकारचा प्रयत्न या निमित्ताने निश्चितपणे करण्यात येणार आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मत्स्यविज्ञान विद्यापीठासंदर्भातील विषय या ठिकाणी सांगितला. दिनांक 03 डिसेंबर 2000 रोजी माफ्सू युनिव्हर्सिटी तयार झाली. आपले रत्नागिरीचे फिशरीज कॉलेज आहे, ते माफ्सूला नाही, तर ते दापोलीच्या कृषी महाविद्यालयाला ॲफिलेट केलेले आहे. त्यामुळे समजा आपण वेगळी युनिव्हर्सिटी तयार करतो म्हटले तरी दापोली येथील बंद करता येत नाही. त्या ठिकाणचे कार्यक्षेत्र ठरलेले आहे. त्यामुळे आपण येथे आता विद्यापीठ तयार करण्याचा निर्णय केला तर ते एका जिल्ह्यातील एका कॉलेजपुरते ते विद्यापीठ होईल. कारण बाकी सर्वांची सलग्नता दापोलीच्या विद्यापीठाला झालेली आहे. याचसोबत कोकणामध्ये एवढा मोठा समुद्र किनारा आहे. त्यामुळे तेथे काहीतरी झाले पाहीजे, याकरिता मेरिटाईम ट्रेनिंग इन्स्टिट्युट स्थापन करण्याचा निर्णय झालेला आहे. इंडीयन मेरिटाईम युनिव्हर्सिटी आणि जेएसडब्ल्यु जयगड पोर्ट यांच्यात दिनांक 15.02.2016 रोजी म्हणजे आता एक सामंजस्य करार केला आहे. हा करार "मेक इन इंडिया"मध्येच झाला. त्यामध्ये मेरिटाईम ट्रेनिंग इन्स्टिट्युट जेएसडब्ल्यु, जयगड पोर्टने 30 एकर जागा आपल्याला दिलेली आहे. त्यामाध्यमातून आपण कोकणामध्ये मेरिटाईम ट्रेनिंग इन्स्टिट्युट तयार करीत आहोत. मला असे वाटते की, आपण केलेल्या मागणीतील एक भाग हा या माध्यमातून पूर्ण होत आहे.

अध्यक्ष महोदय, सोमवंशी समितीच्या संदर्भातील परसेसिन नेट बाबतचा मुद्दा उपस्थित झाला. राज्य सरकारने निर्णय केला आणि परंपरागत मासेमारी करणाऱ्या आमच्या मासेमार बंधुंकरिता आपण परसेसिन नेटवर बंदी घातली. त्यामुळे त्यांची खूप वर्षाची मागणी मान्य झाली. परसेसिन नेटचे 400 ते 500 लोक तेथे काम करीत होते, त्यांनी देखील सातत्याने आमच्यावर हा अन्याय होत असून आम्हालाही न्याय दिला पाहीजे, अशा प्रकारचे निवेदन दिले. मुळात मत्स्य दुष्काळ का पडतो हे पाहीले पाहीजे. आपण बारा नॉटीकल माईल्सच्या आतमध्ये परसेसिन नेटला परवानगी दिली. त्यामुळे परसेसिन नेटने मासेमारी करीत असताना मत्स्य बीज देखील त्यामध्ये पूर्णपणे किल होते आणि त्यातून मत्स्य दुष्काळ तयार होतो. त्यामुळे परसेसिन नेटचा वापर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

करायचा असेल तर तो 12 नॉटीकल माईलच्या पलिकडे केला पाहीजे, असे अपेक्षित आहे. परंतु आपण त्यावर कशा प्रकारे नियंत्रण ठेवणार हा प्रश्न होता. त्यामुळे राज्य सरकारने त्यांच्याशी चर्चा केली आहे. जीपीएस सिस्टीम लावण्यास ते तयार असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. त्यावर ॲटोमॅटीक मॉनिटरींग आपण करु शकतो. समजा ते 12 नॉटीकलच्या आत आले तर त्यांच्यावर कारवाई करता येऊ शकते आणि 12 नॉटीकलच्या बाहेर मासेमारी केली तर आपल्या परंपरागत मच्छीमारांवरही अन्याय होणार नाही आणि मत्स्य दुष्काळही दूर करता येईल. आम्ही त्यासंदर्भात केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवित आहोत. त्या सिस्टीमला अक्च्युअली जीपीएस सिस्टीम म्हणत नसून ती एक रडार सिस्टीम आहे. मला ती आता आठवत नाही. त्यांनी मान्य केलेली सिस्टीम त्यांनी लावली तर 12 नॉटीकल माईलच्या बाहेर त्यांना तशा प्रकारची परवानगी देण्यात यावी, असा आपण केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवित आहोत. सदरहू प्रस्ताव मंजूर होऊन येईल, असे मला वाटते. त्यामुळे पारंपरिक मच्छिमारांवर अन्याय होणार नाही आणि परसेसिन नेटच्या माध्यमातून होणारी मोठ्या प्रमाणातील निर्यात सुरु ठेवता येणे शक्य होईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. धैर्यशिल पाटील यांनी खाडीतील रासायनिक पाण्यामुळे माशांवर परिणाम होत असल्याबाबतची माहिती दिली. अशा प्रकारचा परिणाम होत आहे काय किंवा कितपत होत आहे याचा अभ्यास करण्यासाठी आपण डॉ. चंद्रप्रकाश, प्रमुख वैज्ञानिक केंद्रीय मत्स्यकी शिक्षा संस्थान केंद्र सरकार, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली आताच म्हणजेच दिनांक 24.02.2016 रोजी एक समिती गठीत केलेली आहे. सदर समितीने सहा महिन्यामध्ये अहवाल द्यावा, असे त्यांना निदेश दिलेले आहेत. तो अहवाल आल्यानंतर अहवालाच्या शिफारसींवर आधारित पुढील कार्यवाही निश्चितपणे केली जाईल.

अध्यक्ष महोदय, सागरमालाच्या संदर्भातील विषय उपस्थित करण्यात आला होता. सागरमालाच्या अंतर्गत पहिल्या टप्प्यात आपण जे काम हातामध्ये घेतले ते दिघी बंदर ते राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 17 असे दोन्ही किनाऱ्यांना जोडणारे रस्ते आहेत. त्यामध्ये हजार कोटी रुपये खर्च करुन 95 किलोमीटरचे रस्ते तयार करण्याचे सागरमालामध्ये आपला प्रोजेक्ट ॲप्रुव्ह झाला आहे. जयगड बंदर ते निवळी असा 42 किलोमीटरचा 450 कोटी रुपये खर्च करुन हा रस्ता मान्य

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

झालेला आहे. जेएनपीटी बंदराला जोडणारा कळंबोली ते मुंब्रा यामध्ये 15 किलोमीटरचा 45 कोटी रुपयांचा रस्ता सागरमालाच्या अंतर्गत मान्य झालेला आहे. याचसोबत आपल्या बंदर विकासाच्या धोरणांतर्गत नवीन धोरण तयार केले. जुन्या धोरणामध्ये ज्या अनोमॉलीज होत्या त्या सर्व दूर केल्या आहेत. त्यामुळे बंदर विकासाच्या या नवीन धोरणातून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आपल्याकडे येत आहे. मॅरेटाईम समीट ही दिनांक 14 एप्रिल 2016 रोजी मुंबई मध्ये होणार आहे आणि दिनांक 15 एप्रिल 2016 रोजी महाराष्ट्राचे सेमिनार असून त्यामध्ये अशा प्रकारचे काही एमओयुज् आपल्याला अपेक्षित आहे आणि यामध्ये मोठी गुंतवणूक होणार आहे.

अध्यक्ष महोदय, त्याचसोबत महाराष्ट्राच्या या सर्व किनारपट्टीमध्ये आपल्याला माहीत आहे की, आपले जेएनपीटी बंदर सर्वात मोठे बंदर आहे. परंतु आपण गेल्या 30 वर्षामध्ये दुसरे मोठे बंदर तयार करु शकलो नाही. अनेक वर्षापासून वाढवण येथे एक बंदर तयार करावे, अशा प्रकारचा विषय होता. परंतु त्याकरिता डहाणूचा फार विरोध होता. कारण डहाणू हा इको सेन्सेटीव्ह झोन आहे. परंतु आपले नवीन सरकार आल्यानंतर सुप्रीम कोर्टाने काही आदेश दिले होते आणि ते इको सेन्सीटीव्ह झोनमधून करता येणार नाही, अशा प्रकारचा सुप्रीम कोर्टाचा आदेश असल्यामुळे 1995 पासून हे काम थांबले होते. वाढवण बंदरामध्ये अशी शक्ती आहे की, ते जेएनपीटीपेक्षा मोठे बंदर होऊ शकते. आज आपला मोठा व्यापार मुंब्रा पोर्टकडे गेला आहे किंवा तर पोर्टस्कडे गेला आहे. तो सर्व आपण पुन्हा परत मिळवू शकतो. आज जेएनपीटीवर एवढे कन्जक्शन होत आहे की, जेएनपीटीचा टर्नराऊंड टाईम कमी झालेला आहे. म्हणजेच तो वाढलेला आहे. त्यामुळे त्यातून खूप अडचणी तयार होत आहेत. त्यामुळे वाढवण येथील पोर्टकरिता त्याबाबत नव्याने अभ्यास केला आणि इको सेन्सेटीव्ह झोनच्या बाहेर याची निर्मिती करता येईल काय, असा अभ्यास केल्यानंतर तशी निर्मिती करता येईल, असे आपल्या लक्षात आले. त्यादृष्टीने आपण केंद्र सरकारसोबत करार केला असून वाढवण बंदराचे काम हातात घेत आहोत. गेल्या 30 वर्षानंतर जेएनपीटीपेक्षा मोठे बंदर तेथे तयार होत होईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मनिषा चौधरी यांनी मांडलेला मुद्दा देखील चुकीचा नाही. वाढवण बंदराच्या बाबतीत तेथील लोकांच्या मनात बऱ्यावशा शंका आहेत. विशेषत:

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

मासेमारी करणाऱ्या लोकांना असे वाटते की, आपल्यावर काही अन्याय होणार आहे काय. आपण अशी सूचना दिली आहे की, अशा प्रकारे ज्या लोकांना भीती वाटते, तसेच या बंदरामुळे पारंपरिक व्यवसाय अडचणीत येईल, असे ज्यांना वाटते, अशा सर्व लोकांसोबत बैठक घेऊन त्यांचे पूर्ण समाधान करुनच आपण कामाची सुरुवात करणार आहोत. मला असे वाटते की, या सर्व लोकांना विश्वासात घेऊन या बंदराचे काम करु शकलो तर जेएनपीटी बंदराने जसे 20, 25 वर्षाचे ग्रोथ दिले त्याप्रमाणेच पुढील 20 वर्षाचे ग्रोथ वाढवण बंदर देऊ शकते. त्यामुळे अतिशय महत्त्वाचे काम या वाढवण बंदराच्या निमित्ताने आपण करु शकलो आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितेश राणे यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 600 कोटी रुपयांची तरतूद आणल्यासंदर्भात पालकमंत्र्यांनी केलेली घोषणा फसवी आहे, असा उल्लेख केला. मी त्यांच्या माहिती करिता सांगू इच्छितो. सद्या ते सभागृहामध्ये उपस्थित दिसत नाहीत. मला वाटते ते कार्यक्रमामुळे नागपूरला गेले असेल...(अडथळा)...आपण त्यांना कळवाल, यात शंकाच नाही. सन 2016-2017 या आर्थिक वर्षामध्ये माननीय पालकमंत्र्यांनी घोषणा केली, त्याप्रमाणे तेथे 600 कोटी रुपयांपेक्षा जास्त तरतूद निश्चितपणे दिलेली आहे. त्यामध्ये जिल्हा वार्षीक विकास योजनेंतर्गत 130 कोटी रुपये, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत 140 कोटी रुपये, सिंचन विभागाच्या माध्यमातून 275 कोटी रुपये, स्वदेश दर्शनांतर्गत 29 कोटी रुपये, चांदा ते बांधा योजनेकरिता 75 कोटी रुपये अशा प्रकारे 600 कोटी रुपयांपेक्षा जास्त योजना या ठिकाणी समाविष्ट आहेत.

...OO/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत कामकाजाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, माननीय पालक मंत्री यांनी केलेली घोषणा हवेत केलेली नसून त्यासंदर्भातील पूर्ण तरतूद अर्थसंकल्पामध्ये अंतर्भूत आहे. कोकण ग्रामीण पर्यटनाच्या मुद्यासंदर्भात मी सांगितले आहे.

अध्यक्ष महोदय, मी सरकारचा आणखी एक महत्वाचा निर्णय सभागृहाला सांगणार आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पितृगाव अंबडवे हे कोकणात असून सदर गावाचा विकास करण्याच्या दृष्टीने 40 कोटी रुपयांचा कार्यक्रम हाती घेतला आहे. अंबडवे येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे घर असून तेथे त्यांचे स्मारक तयार करुन त्याठिकाणी एक थीम ज्याला आपण होलोग्रामवर आधारित थिमॅटिक अशा प्रकारे त्यांचे जीवनकार्य दाखविण्याचा निर्णय केला आहे. सदर ठिकणी जास्तीत जास्त लोकांनी जावे याकरिता श्रध्देसोबतच पर्यटनाचा विकास व्हावा यादृष्टीने हाऊस बोटचे नियोजन करण्यात येणार आहे. त्याकरिता अंबडवे ते हरिहरेश्वर या 19 कि.मी. अंतरासाठी निगडी व हरिहरेश्वर जेट्टीच्या विकासाचे नियोजन करण्यात येत आहे. तसेच, त्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. मुंबई-गोवा या महामार्गापासून 35 कि.मी. अंतरावर अंबडवे गाव असून या गावाला महामार्गाने जोडण्याकरिता एनएचएआय मान्य केले आहे. मुंबई-गोवा महामार्गाचा भाग म्हणून मुंबई-गोवा ते अंबडवे या 35 कि.मी.च्या मार्गाचा विकास एनएचएआयकडून करण्यात येणार आहे. यामाध्यमातून कोकणामध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने एक महत्वपूर्ण निर्णय आपण घेतला आहे.कोकणाच्या संदर्भात अनेक चांगले निर्णय राज्य सरकारने घेतले आहेत. मला विश्वास आहे की, आपणा सर्वांच्या सहकार्याने सदर निर्णय निश्चितपणे अंमलामध्ये आणण्यात येतील व कोकणाच्या विकासाची भूक शमविण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, कोकणाकरिता स्वतंत्र वैधानिक महामंडळाचा मुद्दा सातत्याने सभागृहामध्ये मांडण्यात येतो. यासंदर्भात विधिमंडळाने ठराव करुन केंद्र शासनाकडे पाठविला आहे. त्याबाबत पुन्हा एकदा राज्य सरकारकडून सदर ठरावाचा पाठपुरावा करण्यात येईल. तसेच, सदरहू प्रकरणी

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

केंद्र शासनाला पुन्हा विनंती करण्यात येईल. कोकणाकरिता कॉन्स्टीट्यूशनल अडचणीमुळे वैधानिक महामंडळ तयार करणे शक्य नसेल तर आहे त्या व्यवस्थेत कोकणाला न्याय देण्याकरिता अरेंजमेंट करण्याकरिता सरकारकडून प्रयत्न करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, मुंबईच्या संदर्भात सदनामध्ये काही मुद्दे मांडण्यात आले आहेत. त्यापैकी काही ठळक मुद्यांबाबत मी थोडक्यात माहिती देणार आहे. मुंबईवर चर्चेसाठी अनेक वेळा सभागृहात संधी मिळते. मी राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या उत्तरामध्ये मुंबईच्या संदर्भात उत्तर दिले आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये निर्माण होणारा कचरा, देवनार डम्पींग ग्राऊंड व क्षेपणभूमीचा विषय सध्या गाजत आहे. त्यासंदर्भात मुंबई महानगरपालिकेने एक कालबध्द कार्यक्रम तयार केला आहे. मला वाटते की लवकरच देशात सर्वाधिक कचऱ्यावर प्रक्रिया मुंबई येथे आपण करु शकू अशा प्रकारचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. सध्या देवनार येथे साडे तीन हजार मे.टन कचरा येतो, कांजूर येथे तीन हजार मे.टन कचरा येतो, मुलूंड येथे तीन हजार मे.टन कचरा येतो. सदरहू ठिकाणांपैकी केवळ कांजूर येथे शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे, देवनार व मुंलूंड येथील कचऱ्यावर कोणत्याही प्रकारची शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यात येत नाही. त्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे डोंगर निर्माण होत आहेत.

अध्यक्ष महोदय, प्रस्तावित क्षेपणभूमीसाठी ऐरोली येथे 32 हेक्टर व तळोजा येथे 38 हेक्टर जागांचा आगाऊ ताबा तेथील महानगरपालिकेला राज्य सरकारने दिला आहे. सदरहू जागेपैकी ऐरोली येथील जागेसंदर्भात निविदा प्रकिया सुरु करण्यात आली आहे. याप्रकरणी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, सदहू ठिकाणी डंम्पींग यार्ड होऊ दिले जाणार नाही. महानगरपालिकेला याप्रकरणी स्पष्टपणे सांगण्यात आले आहे की, सदरहू ठिकाणी आलेल्या कचऱ्यावर पूर्णपणे प्रक्रिया झाली पाहिजे. सदरहू भूमी प्रक्रियेची असणार आहे, डंम्पींगची असणार नाही. त्यादृष्टीने महानगरपालिकेने निविदा प्रक्रिया सुरु केली असून काम प्रगतीपथावर आहे.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

अध्यक्ष महोदय, तळोजा येथील क्षेपणभूमीकरिताच्या शासकीय जमिनीवर काही अतिक्रमणे असून ती निष्काषित केली जात आहेत. तसेच, 12.20 हेक्टर जमीन संपादित करण्याकरिता महानगरपालिकेला राज्य सरकार मदत करीत असून सदर जागा क्षेपणभूमीसाठी निश्चितपणे प्राप्त होणार आहे.

अध्यक्ष महोदय, देवनार येथील डम्पींग ग्राऊंडला लागलेल्या आगी प्रकरणी सभागृहात काही गोष्टी सातत्याने सांगण्यात आल्या आहेत. सदरहू आगीमुळे एका 6 महिन्याच्या लहान मुलाचा मृत्यू झाला असेही सांगण्यात आले होते. सदर लहान मुलाचे रिपोर्ट माझ्याकडे असून डम्पींग ग्राऊंडच्या आगीशी त्याचा थेट संबंध नाही. सदरहू बाब अतिशय संवेदनशील असल्याने त्यासंदर्भात मी फार काही सांगणार नाही. देवनार डम्पींग ग्राऊंड येथे आगीची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता काही उपाययोजना हाती घेण्यात आल्या असून तेथे नवीन संरक्षण भींत बांधण्याचे काम सुरु केले जाणार आहे. तसेच, सदरहू ठिकाणच्या सुरक्षा रक्षकांची संख्या वाढविली आहे, तेथे सीसीटीव्हि कॅमेरे लावण्यात आले आहेत. सदर ठिकाणी आयआयटी व निरी यांनी सूचविल्यानुसार स्लोप स्टॅब्यूलायझेस व डेब्रिज अच्छादन टाकण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे. त्यानुसार सदरहू ठिकाणच्या 6 हेक्टर भागात अच्छादन टाकण्यात आले आहे. सदर ठिकाणी रात्रीच्या वेळी घडामोडीवर लक्ष ठेवण्याकरिता 47 नाईट व्हिजन कॅमेरे लावण्यात आले आहेत व सदर क्षेत्र प्रतिबंधित क्षेत्र घोषित करण्यात येणार आहे. तसेच, आग विझविण्याकरिता 4 ते 5 बोअरवेल्स खोदण्यात येत असून तेथे अग्निशमन दलाच्या 10 गाड्यांचे स्टेशन कायमस्वरुपी तयार करण्यात येणार आहे. आपल्याला माहिती आहे की, सदर ठिकाणी मिथेनचा प्रॉब्लेम तयार झाला असून त्यामुळे टेम्प्रेचर वाढल्यानंतर आग लागण्याची संभावना असते. तसेच, अशीहीशंका आहे की, देवनार डम्पींग ग्राऊंडला जाणीवपूर्वक आग लावली जात आहे. यासंदर्भात एक समिती तयार केली होती व त्या समितीने काही प्राथमिक रिपोर्ट दिले आहेत परंतु अंतिम रिपोर्ट प्राप्त झाला नाही. देवनार डम्पींग ग्राऊंडच्या दीर्घकालीन उपाययोजनेकरिता टाटा कन्सल्टन्सीच्या इंजिनिअर्सची नियुक्ती करण्यात आली आहे. डम्पींग ग्राऊंडच्या टेंडर संदर्भात सदनामध्ये मुद्दा उपस्थित करण्यात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

आला होता. त्याबाबत सांगू इच्छितो की, त्याबाबत मागील सरकारने एसआयटी समिती नियुक्त केली होती व त्या समितीने अहवाल सादर केला आहे. त्यामधून काही ॲनॉमॉलिज सरकारच्या लक्षात आल्या. याप्रकरणी माननीय उच्च न्यायालयाने विचारणा केली होती. देवनार व कांजूरमार्ग प्रकल्पासंदर्भातील बिडस् संदर्भात मोठ्या प्रमाणात विसंगतीचे निष्कर्ष होते. सदर प्रकरणी मोठ्या प्रमाणात प्रकल्पाच्या बोली म्हणजे बिडस् अधिक किंमतीच्या आढळून आल्या आहेत. देवनार प्रकल्पाच्या संदर्भात बोलीसाठी एकच बोलीधारक उपलब्ध होता, अशा अनेक गोष्टीं अहवालामध्ये नमूद आहेत, त्या सर्व मी वाचणार नाही. यामुळे हे कंत्राट रद्द केले होते. परंतु त्याच वेळी राज्य सरकारने बिडस् संदर्भात एक भूमिका घेतली होती. एसआयटी अहवालात एक मुद्दा असा होता की, राज्य सरकारची परवानगी न घेता म्हणजे जागेची लीज न घेता पुढील कार्यवाही करण्यात आली. सरकारने एसआयटीचा रिपोर्ट स्वीकारला त्यावेळी यापुढे ज्यावेळी महानगरपालिका टेंडर काढून क्षेपणभूमीचे काम देईल त्यावेळी तिला मागेल त्या क्षणी सरकार जागा लीजवर देईल. अशा प्रकारचा निर्णय सरकारकडून घेण्यात आला आहे. त्यामुळे महानगरपालिकेला लीज संदर्भातील अडचण येण्याचे कारण नाही. सदरहू काम तातडीने झाले पाहिजे यादृष्टीने ते चाललेले आहे.

यानंतर PP-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

त्याचबरोबर आपण मुंबई महापालिकेला महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 154 अन्वये काही निर्देश दिले आहेत. ज्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कचऱ्याची समस्या सोडविण्याकरिता दिनांक 15.2.2016 रोजी आपण हे निर्देश दिले आहेत. त्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेस कचऱ्याचे विकेंद्रीकरण करुन प्रत्येक वॉर्डामध्ये ओला व सुका कचरा वेगवेगळा करुन ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची कार्यवाही बृहन्मुबई महानगरपालिकेने किमान काही वॉर्डामध्ये सुरू करावी. इमारतीची बांधकाम परवानगी देताना त्या इमारतीमधील ओला व सुका कचरा सदर इमारतीमधील रहिवाशांनी वेगळा करुन ओल्या कचऱ्यावर त्याच ठिकाणी in situ प्रक्रिया करावी अशी अट घालण्यात यावी. म्हणजे ज्याला आपण झिरो डिस्चार्ज म्हणतो. तशा प्रकारचे निरीने देखील आमच्यासमोर सादरीकरण केलेले आहे. त्यांनी अशा प्रकारची यंत्रणा निर्माण केली आहे की, कोणत्याही इमारतीमध्ये ती बसविता येते. त्यासाठी त्याला फार जागा लागत नाही आणि तेथील जो काही कचरा आहे त्याचे सेग्रीगेशन करुन त्यावर संपूर्ण प्रक्रिया करण्याचे काम ही मशीन त्या ठिकाणी करते. त्यामुळे झिरो गार्बेज डिस्चार्ज अशा प्रकारच्या इमारती तयार केल्या पाहिजेत अशा प्रकारचा बदल डीसीआरमध्ये करण्याच्या संदर्भातील कलम 154 च्या संदर्भातील निर्देश आपण महानगरपालिकेला दिलेले आहेत. ओल्या कचऱ्यावर त्याच ठिकाणी प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक ती परवानगी देण्यात यावी. एनेब्लींग प्रोव्हीजन त्या संदर्भात करण्यात यावी. 2000 चौ.मी. बांधकामावरील क्षेत्रांना परवानगी देताना त्यामध्ये मनोरंजन मैदानांसाठी काही जागा राखीव ठेवण्यात येतात. त्याचबरोबर ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची परवानगी त्या ठिकाणी देण्यात यावी, अशा प्रकारचे निदेश आपण कलम 154 अंतर्गत दिलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, घनकचऱ्याच्या संदर्भात एक रोडमॅप तयार केला आहे. त्यामध्ये कांजूर भराव भूमीमध्ये 3 हजार मेट्रिक टन कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यात येत आहे. 1 हजार मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करुन खत निर्मितीचा प्रकल्प जानेवारी 2017 साली तयार होणार आहे. साधारणपणे कांजूर भराव भूमी येथे 2019 सालापर्यंत 5000 मेट्रिक टन प्रति दिन एवढ्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करता येईल अशा प्रकारचे फेजिंग करण्यात आले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

मुलूंड क्षेपण भूमीच्या ठिकाणी घनकचऱ्यावर योग्य त्या तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया करुन सायंटिफिक क्लोजर करण्याचा निर्णय करण्यात आला आहे. त्याची निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे आणि सन 2017 पासून तेथे कचरा स्वीकारण्यात येणार नाही. देवनारची जी क्षेपण भूमी आहे त्या ठिकाणी कचऱ्यापासून ऊर्जा निर्मितीचा प्रकल्प सुरू करण्यात येत आहे आणि त्या संदर्भातील एक बृहत रोडमॅप हा आपले केंद्रातील पर्यावरण मंत्री सन्माननीय श्री. प्रकाश जावडेकरजी यांनी एक उच्चस्तरीय समिती तयार करुन तो रोडमॅप तयार करण्यासाठी हातामध्ये घेतला आहे. त्यामध्ये ते देखील आपल्याला मदत करीत आहेत. ऐरोली ब्रीज, मुलूंड येथे 32.77 हेक्टर जागेवर प्रति दिन सुमारे 5 मेट्रिक टन कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्याचा प्रकल्प नियोजित आहे. त्यापैकी 2000 टनाची प्रक्रिया ही कोणत्याही परिस्थितीमध्ये 2019 पर्यंत झाली पाहिजे अशा प्रकारचे नियोजन आपण केलेले आहे. तळोजाच्या बाबतीत मी ऑलरेडी सांगितले आहे, म्हणून मी त्यासंबंधी पुन्हा काही सांगत नाही. या कचऱ्याच्या समस्येकडे राज्य सरकार गांभीर्याने पाहत आहे. राज्य सरकार आणि महानगरपालिका मिळून या संदर्भात एक रोडमॅप तयार केलेला आहे. केंद्र सरकारही त्यात मदत करण्याचा प्रयत्न करीत आहे. यातून आपण निश्चितपणे मार्ग काढण्याचा प्रयत्न करु.

अध्यक्ष महोदय, नाले सफाईच्या बाबतीतील मुद्दा या ठिकाणी सातत्याने मांडण्यात आला आहे. नालेसफाईमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली अशा प्रकारच्या तक्रारी आल्या होत्या. विशेषत: काही अधिकारी आणि काही कंत्राटदारांनी मिळून यामध्ये मोठ्या प्रमाणात पैशाचे सायफनिंग केले आहे, अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. यावर एक समिती नेमण्यात आली होती. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्यात आली आणि या चौकशीमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आल्या आहेत. त्यामध्ये विशेषत: 32 कंत्राटदारांच्या संदर्भात प्राथमिक चौकशीमध्येच 38 कोटी रुपये रकमेची फसवणूक झाल्याचे लक्षात आले आहे. यामध्ये निविदेमधील अटीनुसार डम्पर आवश्यक असताना त्या व्यतिरिक्त हलक्या वाहनांनी गाळ वाहून नेल्याचे दिसून येते. निविदेतील अटीनुसार प्रत्येक वाहनासाठी एक स्वतंत्र लॉकशीटमध्ये माहिती भरुन देणे आवश्यक असताना एकापेक्षा अधिक वाहन फेरीसाठी अधिक लॉकशिट भरुन देण्यात आलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

म्हणजे त्या ठिकाणी दोन फेऱ्या झालेल्या नाहीत. गाळ काढून व वाहून नेणारे वाहन दोन वेगवेगळ्या ठिकाणाहून दोन वेगवेगळ्या ठिकाणांहून सुरू होऊन वेगवगळ्या ठिकाणी गाळ वाहन करीत असल्याचे दिसत आहे. त्यासोबत वाहनाचे आकारमान व निविदेतील परिगणन सूत्र यानुसार झालेले गाळाचे वजन आणि वजनकाटा पावतीमध्ये दर्शविलेले गाळाचे वजन यामध्ये मोठी तफावत आढळून येते. वजन काटा पावतीमध्ये राज्य परिवहन विभागाकडून प्राप्त झालेल्या अभिलेखानुसार वाहनांचे टेअरवेट पेक्षा वजनाचा काटा पावतीमध्ये दाखविलेले टेअरवेट हे भिन्न असल्याचे दिसून येत आहे. राज्य परिवहन विभागाकडून प्राप्त झालेल्या अभिलेखानुसार ग्रॉस वेटमध्ये देखील गडबड झाल्याचे लक्षात येत आहे. रात्रौ 8 ते सकाळी 6 या वेळात गाळाचे वाहन करावयाचे होते तर त्या बाबतीत कुठलीही कागदपत्रे दिसत नाहीत. काही बाबतीत लॉकशीटसोबत वजन काटा पावती व्हीटीएस प्रपत्र सादर झालेले नाहीत. लॉकशीटमधील वाहन क्रमांक आणि लॉकशीटमध्ये सादर केलेल्या व्हीटीएस प्रपत्रातील वाहन क्रमांक यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आढळलेली आहे. काही बाबतीत लॉकशीट क्रमांक आणि वजनकाटा पावतीतील वाहन क्रमांक यांच्यामध्ये तफावत आढळलेली आहे. त्याचप्रमाणे काही कंत्राटदारांनी नालेसफाई दरम्यान काही काढलेला गाळ मौजे जासई, वसई, रायगड येथील क्षेपण भूमीवर टाकण्याकरिता दिलेले ना हरकत प्रमाणपत्र खोटे आहे. ते त्यांना मिळालेलेच नाही आणि त्यावरील सह्या खोट्या आहेत असे तेथील ग्रामपंचायतींनी कळविले आहे. नालेसफाईच्या कामात वापरण्यात आलेल्या व्हीटीएस प्रणालीमधील तांत्रिक बाबी, संबंधित समाधानकारक खुलासा व व्हीटीएस प्रणालीच्या दैनंदिन वापरासंबंधातील तपशील कंत्राटदारामार्फत सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे त्यातही बराच संशय निर्माण झालेला आहे. या प्रकरणी महापालिका आयुक्तांनी 19-9-2015 अन्वये 13 कर्मचाऱ्यांना महापालिका सेवेतून निलंबित केलेले आहे. खात्यांतर्गत सर्वंकष चौकशा सुरू आहेत. त्याचप्रमाणे 32 कंत्राटदारांसंबंधी कर्मचारी आणि अधिकारी यांचा सहभाग निश्चित करुन त्यांच्याविरुध्द कार्यवाही सुरू आहे. त्यामध्ये 24 नालेसफाई कंत्राटदारांसह 2 व्हीटीएस कंत्राटदार 8 वजनकाटा ठेकेदार यांच्याविरुध्द आर्थिक गुन्हे शाखेकडे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. 24 नालेसफाई कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याचे प्रक्रिया अंतर्गत कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

आहे. काही लोकांना यामध्ये अटक देखील करण्यात आली आहे आणि याची पुढील कार्यवाही सुरू आहे. रस्त्यावरील सिग्नल, जंक्शन दुरुस्ती, रस्ते दुरुस्ती, डेब्रीजची विल्हेवाट या संदर्भात देखील एक तक्रार प्राप्त झाली होती. या संदर्भात चौकशी सुरू आहे. चौकशीचा एक प्राथमिक अहवाल निगम आयुक्तांकडे प्राप्त झालेला आहे. शासनाकडे तो अद्यापी आलेला नाही. त्यामध्ये काही अनियमितता कंत्राटदारांनी केलेल्या आहेत हे अतिशय स्पष्ट होत आहे आणि मोठ्या प्रमाणात अनियमितता असून त्या बाबतीतील संपूर्ण माहिती आता माझ्याकडे नसल्यामुळे मी त्या सांगणार नाही. पण या संदर्भात ज्या ज्या लोकांनी अशा प्रकारची अनियमित कार्यवाही केली आहे. त्यांच्यावर कार्यवाही केली आहे त्यांच्यावर कार्यवाही केली जाईल. याची समग्र चौकशी करुन ज्या प्रकारे ही कामे झाली आहेत ती पुन्हा त्यांच्याकडून करुन घेणे आणि त्यासोबत त्यात दिवाणी, फौजदारी ज्या काही इतर कारवाया असतील त्या सर्व करण्याच्या संदर्भात एक अहवाल तयार होत आहे. तो अहवाल महापालिकेच्या बॉडीसमोर जाणार आहे. महापौरांना देखील तो अहवाल सादर होईल आणि राज्य शासन त्यावर उचित कार्यवाही करील. भविष्यात अशा प्रकारे आणि विशेषत: एक बाब लक्षात आली आहे की, काही कंत्राटदारांनी जाणीवपूर्वक जे प्री-कॉलिफिकेशन आहेत त्यांनी ते प्री-कॉलिफिकेशन बदलून घेतले आणि त्यातून स्पर्धा होऊ नये, अशा प्रकारचा प्रयत्न त्यांनी केला आणि त्यांनी स्वत:च ही सर्व कामे घेऊन मोठ्या प्रमाणात अनियमितता केलेली आहे.

QQ-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

भूल यंत्र खरेदीचा विषय याठिकाणी आला. त्यामध्ये मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत कंत्राटदार मेसर्स युनिवर्सल ऑरगॅनिक्स यांच्या विरुध्द आग्रिपाडा पोलीस स्टेशन, मुंबई येथे दिनांक 27.102.15 रोजी एफआयआर नोंद केलेला आहे आणि यामध्ये अनियमितता झाल्याचे लक्षात आलेले आहे. त्याच्यावर कारवाई ही करण्यात आलेली आहे. एक टॅब खरेदीचा विषय याठिकाणी मांडण्यात आला. टॅब खरेदीसंदर्भातील काही तक्रारी मिळाल्या होत्या. या संपूर्ण तक्रारीची चौकशी केलेली आहे आणि टॅब खरेदीमध्ये कुठलीही अनियमितता झालेली नाही असे चौकशीअंती याठिकाणी स्पष्ट झालेले आहे.

अध्यक्ष महोदय, मैदान लिलावाच्या संदर्भातील एक विषय आहे. यासंदर्भात मी यापूर्वी देखील बोललेलो आहे. एवढेच सांगतो की, सद्यःस्थितीत ताब्यात घेतलेले भूखंड महापालिका कर्मचाऱ्यांमार्फत परिरक्षीत करण्यात येत आहेत. तसेच सर्व भूखंड परिरक्षीत करण्याकरिता ठेकेदाराची नेमणूक करण्याकरिता निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. याबाबत ॲड.आशिष शेलार तसेच काही सन्माननीय सदस्यांनी मुद्दा मांडला की, ही जी काही तरतूद आहे ती ऐच्छिक ऐवजी मॅन्डेटरी तरतूद त्याठिकाणी व्हावी. यासाठी राज्य सरकारने मागच्या काळात यालाही मान्यता दिलेली आहे. कायद्यामध्ये जो काही बदल करायचा आहे. जेवढी माहिती आलेली आहे त्याबद्दल मी सांगितलेले आहे. It is in progress. पूर्ण माहिती आल्यानंतर या सभागृहाचा तो अधिकार आहे. त्यामुळे ती सभागृहासमोर मांडलीच जाईल. Your eagerness to know it is understood. त्यामुळे उचित वेळी ते देखील याठिकाणी येईल. एकूणच या मैदानांच्या संदर्भात ती डेव्हलप झाली पाहिजेत, आवश्यकता असेल तर त्यात खाजगी सहभागही आला पाहिजे. मूळ मुंबईची एवढीच मागणी आहे की, प्रत्येक मुंबईकराला त्याचा ॲक्सेस असला पाहिजे. मला असे वाटते की ही मागणी योग्य आहे आणि यासंदर्भातील निर्णय सरकार आणि महानगरपालिका योग्यप्रकारे यानिमित्ताने घेईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना सन 2019 निमित्त सांगणार आहे. उत्तर देत असताना नवी मुंबई विमानतळाबाबत सांगितले होते की, त्याचा आरएफपी लवकरच फायनल करीत आहोत. मला याठिकाणी सांगताना आनंद वाटतो की, आजच

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये आरएफपीला मान्यता दिली. आपण आरएफक्यू केला होता. आरएफक्यूमध्ये एकूण 4 लोक क्लॉलिफायर झाले होते. यामध्ये बाहेरचे लोक येत असल्याने आरएफक्यू करताना केंद्र सरकारने अशी अट ठेवली होती की, यामध्ये सिक्युरिटी क्लीअरन्स घ्यावा लागेल. सिक्युरिटी क्लीअरन्स घेताना 4 पैकी एका कंपनीला सिक्युरिटी क्लीअरन्स दिला नाही तर त्याला बाद केलेले आहे. तीन कंपन्यांना सिक्युरिटी क्लीअन्स दिलेला आहे. त्यातील एका कंपनीला सिक्युरिटी क्लीअरन्स देताना काही अटी त्यांनी टाकल्या होत्या. ज्या अटी आहेत त्या अटींची पूर्तता करुन त्यासंदर्भातील विमानपत्तन प्राधिकरणाची आणि केंद्र सरकारची मान्यता घेऊन आणि ॲडव्होकेट जनरलचे मत घेऊन तीन निविदाकार जे प्री-क्लॉलिफाईड झाले होते, ते आता पात्र झालेले आहेत. आता आरएफक्यू डॉक्युमेंटला याठिकाणी मान्यता दिलेली आहे. हा प्रकल्प खाजगी सहभागातून केला जाईल. सन 2008 मध्ये पीपीपीने करण्याचा निर्णय घेतला होता. यामध्ये सिडकोचा 26 टक्के हिस्सा राहणार आहे. प्रकल्पाचा खर्च 16 हजार कोटी रुपये आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या सर्व जमिनीचे भूसंपादन संमती निवाडे म्हणजे 95 टक्के land acquisition हे consent award ने झाले आहे. उर्वरित 5 टक्क्याचेही लॅन्ड ॲक्वॅझिशनचे ॲवॉर्डसही आता पास झालेले आहेत. यापैकी 80 टक्क्यापेक्षा जास्त जमीन ही सीडकोच्या प्रत्यक्ष ताब्यामध्ये आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासासाठी तीन निविदादारांना निविदा प्रक्रियेत राहण्यास मान्यता दिली असून निविदेची पुढील कार्यवाही सरु करण्यात आली आहे. सदर निविदेचा कालावधी पाच महिन्यांचा आहे. त्यानंतर त्यांना लेटर ऑफ इन्टेंट किंवा वर्क ऑर्डर त्याठिकाणी देण्यात येईल. आता जे शेड्युल आहे त्याप्रमाणे विमानतळाचा पहिला टप्पा जवळ जवळ एक कोटी पॅसेंजर्सना हँडल करु शकेल तो डिसेंबर, 2019 मध्ये कार्यान्वित करण्याचे ठरलेले आहे. त्यासोबत या टेंडरचा एक पार्ट असा आहे की, धावपट्टी लवकर तयार करुन कमी पॅसेंजर हँडेल करण्याची व्यवस्था करुन त्याआधी ते सुरु करु शकतात. कारण एक कोटी काही एका दिवशी येणार नाहीत. ते ग्रॅज्युअली राईज होणार आहेत. ॲप्रन धावपट्टी तर पूर्ण करावी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

लागेल पण पॅसेंजर हँडलिंगची व्यवस्था असेल, टर्मिनल बिल्डींग असतील यात ते फेज आऊट करु शकतात आणि सन 2019 पूर्वी सुरु करायचे असेल तर ते सुरु करु शकतात. अशी व्यवस्था त्यामध्ये ठेवण्यात आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईच्या पूर्व किनारपट्टीवर जलवाहतूक सुरु करण्याच्या संदर्भातील एक निर्णय याठिकाणी घेतला होता. ज्यामध्ये भाऊचा धक्का, मांडवा, नेरुळ दरम्यान प्रवासी जलवाहतूक प्रकल्प मुंबई पोर्ट ट्रस्ट मेरीटाईम बोर्ड आणि सिडको यांच्यामध्ये राबविण्यात येत आहे. भाऊचा धक्का, मांडवा दरम्यान जलवाहतुकीकरिता ब्रेक वॉटर सुविधा व रोरो प्रवासी सुविधा उभारणी शास्त्राने मान्यता दिली आहे. 135 कोटी रुपये याची किंमत आहे. मार्वे, मनोरी, बोरीवली, गोराई, भाईंदर, वसई, रेवस, करंजा आणि मारवपाडा, टेंभीनाका दरम्यान जलवाहतुकीचा सुसाध्य अहवाल तयार करण्यात येत आहे. भाऊचा धक्का ते मांडवा ही निविदा उघडायची तारीख 20 एप्रिल, 2016 म्हणजे याच महिन्यात आहे. कामाचा कालावधी हा 24 महिन्यांचा आहे. साधारणपणे मे महिन्यात त्याची वर्कऑर्डर देण्यात येईल. त्यानंतर 24 महिन्यांमध्ये ब्रेक वॉटर हे सर्व काम करुन जलवाहतूक त्याठिकाणी सुरु करु शकू. इतर जलवाहतूकीचे जे प्रकल्प आहेत त्यामध्ये स्टुप कन्सलटंट यांची नियुक्ती केलेली आहे. याचा प्रकल्प अहवाल दिनांक 21 मे, 2016 रोजी प्राप्त होणार आहे. अहवाल प्राप्त झाल्याबरोबर निविदेची प्रकिया सुरु करणार आहोत. त्यामुळे मुंबई जलवाहतूकीचा पहिला टप्पा दोन वर्षात सुरु करु शकू. अशाप्रकारची व्यवस्था याठिकाणी झालेली आहे. दुसरा टप्पा सुध्दा तीन वर्षात सुरु करु शकू आणि रोरो सारखी सर्विस त्यामध्ये घेतल्यामुळे मोठ्या प्रमाणात अंतर कमी हाईल. कारण रोरो सर्विसमुळे मोठ्या गाड्यासुध्दा त्यामध्ये येतात. आज लोकांना जे फिरुन यावे लागते ते रोरो सर्विसच्या माध्यमातून डायरेक्ट येता येईल. या संदर्भातील कारवाई देखील याठिकाणी झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई पोर्ट ट्रस्ट, मेरीटाईम बोर्ड आणि सिडको अशी एकत्रित केलेली आहे. पूर्वी आपण एमएसआरडीसीला सुध्दा म्हटले होते. पण नंतर नवीन सरकार आल्यानंतर असा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

निर्णय केला की, ज्याची जी कोअर ॲक्टीव्हिटी आहे ती त्याला करु दिली पाहिजे. ही कोअर ॲक्टीव्हिटी मेरीटाईम बोर्डाची असल्यामुळे त्यांनी ते करावे असा निर्णय करण्यात आला. त्यामुळे आता या तीघांना एकत्रित आणून एक स्पेशल परपज व्हेईकल केलेले आहे आणि या माध्यमातून हे काम करीत आहोत. मेट्रो संदर्भात मी पुन्हा सांगत नाही. बऱ्यापैकी यासंदर्भात बोललो आहे.

अध्यक्ष महोदय, प्रत्येक पंपिंग सेक्शनची परिस्थिती काय आहे, ज्याला परवानगी मिळाली नाही ती कधी मिळणार आहे. यासंदर्भातील सर्व माहिती दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.कालिदास कोळंबकर यांनी विचारल्याप्रमाणे त्यांना ती माहिती पुरविण्यात येईल. मला यानिमित्ताने एवढेच सांगायचे आहे की, कोकणाच्या संदर्भात एक सकारात्मक अशी चर्चा या सभागृहामध्ये झालेली आहे. मुंबई टोलच्या संदर्भातील अहवाल सरकारला प्राप्त झालेला आहे. त्याच्या शिफारशींची छाननी अपर सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य सचिव, श्री.सुमित मलिक यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. यासंदर्भात सभागृहाला अवगत केले जाईल. कोकणाच्या संदर्भात ज्या काही बाबी याठिकाणी मांडण्यात आल्या होत्या त्याला समर्थपणे उत्तर देण्याचा प्रयत्न मी केलेला आहे. कोकणाला न्याय मिळावा याकरिता बरेच धोरणात्मक निर्णय राज्य सरकारने घेतले आहेत. मी सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो. कारण कोकणातील दु:ख हे मागास भागासारखेच आहे. त्यामुळे कोकणाच्या विकासाच्या दृष्टीने राज्य सरकार पूर्णपणे कटीबध्द आहे एवढेच मी यानिमित्ताने सांगतो आणि माझे बोलणे संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, कोकणाचा विकास करण्याची भूमिका सरकारच्या वतीने मुख्यमंत्री महोदयांनी व्यक्त केली. कोकणामध्ये गेली काही वर्षापासून जैतापूरचा प्रकल्प करतो आहोत. त्याला काहींचा विरोध आहे. नव्या केंद्र सरकारने देखील तेथे क्षमता वाढविण्याचे धोरण जाहीर केलेले आहे. त्या जैतापूरचा उल्लेख आपल्या उत्तरामध्ये झाला नाही. त्या प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे, प्रगती काय आहे, किती कालावधीमध्ये तो पूर्ण होणार ? याची माहिती मुख्यमंत्री महोदयांनी द्यावी. कोणी विरोधकरित असेल तर त्याबद्दल आपली काय भूमिका आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, जैतापूरचा प्रकल्प हा केंद्र सरकारचा प्रकल्प आहे. त्याची सद्य:स्थिती माहिती माझ्या जवळ नाही. मी ती माहिती केंद्र सरकारकडून मागवतो आणि आपल्याला देतो.

श्री.सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, सविस्तर असे उत्तर माननीय मुख्यमंत्री यांनी दिले. परंतु कोकणामध्ये 65 हजार हेक्टर खार जमिन आहे. खार लॅन्ड विभाग हा जलसंपदा विभागाला सलग्न आहे. जलसंपदा विभागाला 8 हजार कोटी आहेत. आम्हाला 40 कोटी देतात. 40 कोटी पैकी 20 कोटी रुपये पगारावर खर्च होतात. हा मुद्दा मी मांडला होता. त्याचप्रमाणे कोकणामध्ये वणवे लागतात, त्याच्यामुळे वनसंपत्तीचे नुकसान होते. प्राणी जीवनाचा नाश होतो. त्याचा देखिल उल्लेख झालेला नाही. रो-रो वाहतूक आमच्या मांडव्याला जोडली पुढे गेल्यानंतर रस्ते आमचे अरुंद आहेत. आज मांडवा आणि अलिबाग हे दक्षिण मुंबई म्हणून बरेच लोक तिथे जातात. त्यासाठी पुढचे एक्झीट करायला पाहिजे. त्याचाही उल्लेख नाही. तुम्हाला मी जरूर धन्यवाद देईन की, कोकणाकडे ब-याच वर्षानंतर या सरकारचा बघण्याचा दृष्टीकोन चांगला आहे. माझी प्रमुख मागणी आहे. जलसंपदा विभागाने समाधानकारक निधी द्यावा, अशी मी मागणी करतो.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पंडित शेट यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे. त्यासंर्भात मी कल्पना देऊ इच्छितो की, वर्ल्ड बँके सोबत या खार लॅन्ड आणि धूप प्रतिबंधक बंधारे याच्या संदर्भातील एक प्रोग्राम हातामध्ये घेतला आहे. त्याच्यामध्ये मोठया प्रमाणात वर्ल्ड बँक फायनान्स करते आहे. त्याचे टप्पे देखिल ठरविलेले आहेत. ते काम

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

निश्चितपणे हातामध्ये घेऊ. कारण कल्पना आहे की, आपली शेती त्याच्यामुळे मोठया प्रमाणावर अडचणीत येत आहे. तसेच जे एक्झीट पॉईन्ट आणि तेथून मुख्य रस्ता आहे. तिथपर्यंतचे एक्झीट पॉईन्ट रुंद करण्याच्या संदर्भात समावेश केला जाईल.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मी एका गोष्टीसाठी उभा आहे. या सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.भास्करराव जाधव, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आहेत. सर्व सन्माननीय सदस्य आहेत. वरच्या सदनामध्ये मी ज्यावेळेला होतो. त्यावळेला सन्माननीय सदस्य श्री.भास्कररावांना आठवत असेल कोकणाच्या विषयावर आम्ही सातत्याने मागणी केली. सदनाने पाहिले असेल की, एक तासाच्या वर केवळ कोकण विषय घ्या असे उत्तर मुख्यमंत्री महोदयांनी दिले त्याबद्दल धन्यवाद. एवढीच विनंती आहे की, बीचसाठी केंद्र सरकारकडून 80 कोटी रुपयांच्यावर निधी आल्याचे सांगितले आहे. त्यामध्ये बीच सेफ्टीचा उल्लेख केला आहे. मुरुडच्या बाजूला एक घटना झाली. त्यासंदर्भात सी.सी. टी.व्ही. च्या माध्यमातून लोकांची खूप मागणी आली. त्याचाही समावेश असेल अशी अपेक्षा आहे. त्याचा उल्लेख उत्तरामध्ये करावा, अशी विनंती आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सूचना निश्चिपणे मान्य करण्यात येईल.

श्री.भास्करराव जाधव : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांना धन्यवाद देण्याकरिता व विशेष आभार मानण्याकरिता उभा आहे. विशेष धन्यवाद आणि आभार एवढयाकरता की, कधीही कोकणाच्या विकासाच्या संदर्भात स्वतंत्रपणे सभागृहात चर्चा होऊ शकली नाही. हे मी बोललो आणि त्यांनीही सांगितले आहे. मी त्यावेळी असे म्हणालो होतो, आपण मागासवर्गीय आणि अन्यायग्रस्त भागातून येथे आलात. कोकणाची व माझी वैयक्ति अपेक्षा आहे की, कोकणाला न्याय द्यावा. कै.माजी मुख्यमंत्री अंतुले साहेब यांनी कोकणाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. माजी मुख्यमंत्री आदरणीय श्री.पवार साहेबांनी सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून, रत्नागिरी जिल्हा फलोत्पादन म्हणून जाहीर करुन न्याय देण्याचा प्रयत्न केला. आज ज्या पध्दतीने विस्तारपूर्ण, अभ्यासपूर्ण ज्या प्रत्येक योजनेला मुख्यमंत्री महोदयांनी स्पर्श केला त्याबद्दल मी जाहीरपणे आपले अभिनंदन करतो आणि आभार मानतो. कोकणाची अशी एकत्रित माहिती कोठेही नाही. मी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भास्करराव जाधव.....

आपल्याला तीन ते चार वेळा भेटायला गेलो. तीन ते चार वेळा ब्रिफिंग घेता घेता अर्धवट सोडले व कोकणाविषयी तीन ते चार वेळा ब्रिफिंग घेण्याचा प्रयत्न केलात. याचा अर्थ कोकणाच्या संदर्भातील खूप माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केलात. म्हणून आपले पुन्हा पुन्हा आभार याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. मी विरोधी पक्षात आहे. ऐवढे सरळ आभार मानायचे नसतात. परंतु मानायला पाहिजेत. मी प्रस्ताव मांडताना राजकारण केले नाही. त्यामुळे आताही राजकारण करण्याचा माझा हेतू नाही. एकच प्रश्न आहे की, सी.आर.झेड. संदर्भात आपल्याकडून खुलासा स्पष्ट करता करता राहून गेलेला आहे. तो खुलासा झाला तर बरे होईल. आपण या विविध योजना मांडलेल्या आहेत. या कोकणातील योजना पुर्णत्वास नेण्याकरिता एखादा आय.ए.एस. दर्जाचा अधिकारी को-ऑर्डीनेटर समन्वयक म्हणून किंवा तो पाठपुरवा करणारा अधिकारी नेमणार का ? असे माझे दोन प्रश्न आहेत.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्करराव जाधव यांनी अतिशय चांगली सूचना मांडली आहे. एक आय.ए.एस. दर्जाचा अधिकारी, निश्चिपतणे डेझिगनेट केला जाईल. जो कार्यक्रम घोषित केलेला आहे. कालबध्द कार्यक्रम तयार करुन त्याचे मॉनिटरींग करण्याचे सर्व अधिकार त्याला देवू. सी.आर.झेड. च्या संदर्भात आपली अडचण आहे ती योग्य आहे. यामध्ये दोन टप्पे आहेत. एक टप्पा असा आहे की, समग्र सी.आर.झेड. च्या संदर्भात केंद्र सरकारमध्ये नायक कमिटीने रिपोर्ट दिला आहे. आपले जे मुद्दे अडचणीचे आहेत ते सर्व मुद्दे नायक कमिटीने जवळजवळ सोडविलेले आहेत. त्याच्यावर पूर्ण वेळ घ्यायला वेळ लागतो आहे कारण प्रत्येक राज्याचे अभिमत हे केंद्र सरकार घेत आहे. म्हणून केंद्राला विनंती केली की, इंटरिम म्हणून किमान टुरिझमच्या प्रकल्पांना सी.आर.झेड. मधून सुट द्यावी, सुट देता येत नसेल तर पावर डेलिगेट करा. आमच्या राज्यात जरी तुम्ही पावर डेलिगेट केले. त्याच्या अधीन राहून त्याला मान्यता देऊ. त्या संदर्भातील प्रस्ताव केंद्र सरकारकडे विचाराधीन आहे. केंद्रीय मंत्री श्री.जावडेकर साहेबांनी त्याला सकारात्मक उत्तर दिलेले आहे.

....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, मी माझ्या भाषणामध्ये उल्लेख केला होता की, मध्य वैतरणा प्रकल्प आहे. त्या प्रकल्पामध्ये वीज निर्मिती करण्यासाठी एका खाजगी कंपनीशी जो मागच्या सरकारने करार केला तो रद्द झाला का ? महानगरपालिकेच्या वीज निर्मितीच्या कामासंबंधी शासनाने निर्णय घेतला आहे का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले त्याबाबत महानगर पालिकेकडून प्रस्ताव मागितलेला आहे. हा जो मध्य वैतरणा प्रकल्प महानगरपालिकेने करावा अशा प्रकारचा एक विचार समोर आला. दरम्यानच्या काळात महानगरपालिकेने एकदा असा निर्णय केला होता की, हा प्रकल्प करणे आम्हाला परवडणार नाही. मग तो प्रकल्प राज्य सरकार करत होते. महानगरपालिकेला सांगतले की, पुन्हा जर करण्याची इच्छा असेल तर फिझिबिलीटी असेल महानगरपालिकेने आम्हाला तशा प्रकारची विनंती द्यावी. या संदर्भात महानगरपालिकेच्या आयुक्तांशी चर्चा झाली. ते नवीन फिझिबिलीटी रिपोर्ट करुन राज्य शासनाला देत आहेत.

सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

.....

.....5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : मराठवाड्याच्या विकासासाठी मागील अनेक वर्षांपासून अर्थसंकल्पात माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार निधीची तरतूद करण्यात येऊनही प्रत्यक्षात हा निधी खर्च न होणे
मु.शी. : मराठवाड्याच्या विकासासाठी मागील अनेक वर्षांपासून अर्थसंकल्पात माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार निधीची तरतूद करण्यात येऊनही प्रत्यक्षात हा निधी खर्च न होणे, या विषयासंबंधी सर्वश्री प्रशांत बंब, अर्जुन खोतकर, अतुल सावे, डॉ.जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री सुधाकर भालेराव, सुभाष साबणे, संभाजी पाटील निलंगेकर, ज्ञानराज चौगुले, संतोष दानवे, हेमंत पाटील, प्रा.संगीता ठोंबरे, डॉ.राहुल पाटील, सर्वश्री लक्ष्मण पवार, आ.टी.देशमुख, भिमराव धोंडे, नारायण कुचे, तानाजी मुटकुळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम 293 अन्वये प्रस्ताव.

चर्चा पुढे सरु.....

श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) : अध्यक्ष महोदय, नियम 293 मराठवाडयाच्या दुष्काळी चर्चा या ठिकाणी घेतलेली आहे. त्या दुष्काळी परिस्थिती बाबत सन्माननीय दोन सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. मराठवाडयामध्ये सध्याची जी परिस्थिती आहे. ती म्हणजे पिण्याचे पाणी, मजूरांच्या हाताला काम आणि जनावरांना चारा हे प्रामुख्याने तीन प्रश्न आहेत. अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये म्हणून ज्या काही योजना आहेत. त्या योजना कार्यान्वित करण्याकरिता देखील प्रयत्न करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. मराठवाडयामध्ये काम नाही म्हणून अनेक लोक मुंबई, पुणे, नाशिक येथे स्थलांतरीत झाल्याबाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितले. काही ठिकाणी अशा लोकांना मारहाण झाली, वसूली करण्यात आली. त्या लोकांना मदत करण्यासाठी एक निर्वासित छावणी उघडली तर फार चांगले होईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मधुकरराव चव्हाण .....

त्या लोकांना धान्य पुरवठा करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. मी यामध्ये जास्त खोलात जाऊ शकत नाही. यावर काही सन्माननीय सदस्यांनी यावर विचार व्यक्त केले आहेत. खरे म्हणजे पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर आज जी परिस्थिती निर्माण झालेली आहे, त्यावर आम्ही चर्चा केलेली आहे. आपणही तेथे दौरा केलेला आहे. पिण्याच्या पाण्याकरिता योजनांकरिता मंत्री महोदयांशी चर्चा झालेली आहे. त्या योजना पेयजल किंवा एमजेपीच्या असतील. खरे म्हणजे सर्व योजना एकत्रित करून चांगल्या पध्दतीने राबविल्या तर त्याचा निश्चित फायदा होईल. मंत्री महोदयांनी बैठकीमध्ये आश्वासन दिलेले होते व कलेक्टर यांना सांगितले की, या कामाकरिता एका आठवडयात निधी देण्यात यावा व त्यांचा अडलेला हप्ता देऊन टाकावा. तेथील कामे अर्धवट झालेली आहेत. मंत्री महोदयांनी सांगूनही अजूनही तेथील पेयजल योजनेचा निधी मिळालेला नाही. आताही आपण याबाबत माहिती घेऊ शकता. असे केले तर पाण्याचा प्रश्न कसा सुटेल ? पाणी असून दुष्काळ आहे. या विहीरीला पाणी लागले असून एमजेपीच्या योजना निधी अभावी अडलेल्या आहेत. या योजनांची केंद्र सरकारकडून मंजूरी येईल तेव्हा येईल पण काही योजनांच्या वर्क ऑर्डर काढलेल्या आहेत. चार-चार महिन्यापासून तेथे विहीरीची कामे झाली आहेत पण पाईपलाईन व मोटारी बसविल्या नाहीत. म्हणून याकरिता शासनाने परत एकदा या योजना पूर्ण करण्याबाबत आदेश द्यावेत.

अध्यक्ष महोदय, तात्पुरत्या पाणी पुरवठा योजनेच्या बाबतीत सरकारने आदेश काढलेले आहेत. पण या आदेशाची अंमलबजावणी जिल्हाधिकारी यांनी केली नाही. याची अंमलबजावणी कोणत्याही जिल्हयामध्ये झालेली नाही. त्यांना कमी अधिकार होते पण आपण आता 1 कोटीपर्यंतचे अधिकार दिलेले आहेत. 2 किलोमीटर ऐवजी 5 किलोमीटरपर्यंतचे अधिकार आयुक्तांना दिलेले आहेत. पण कोणत्याही अधिकाऱ्यांनी एकही योजना हाती घेतली नाही. पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत अशी अवस्था आहे. रोजगार हमी योजना चांगल्या प्रकारे राबविली असती तर लोकांना स्थलांतर करण्याचे काही कारण नव्हते. लोकांना कोठेही काम करायचे आहे. मुंबईसारख्या शहरात येऊन घाणीच्या साम्राज्यामध्ये राहून काम करण्यापेक्षा गावच्या वातावरण काम केलेले बरे.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मधुकरराव चव्हाण .....

पण गावामध्ये काम नाही. गावातील कामांना मंजूरी मिळत नाही. मंजूरी मिळाली तर त्यांचा पगार वेळेवर होत नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयदत्त क्षीरसागर यांनी सांगितले आहे की, पूर्वीची रोजगार हमी योजना दोन महिन्याकरिता चालू करण्यात यावी. यामुळे लोकांना काम मिळेल.

अध्यक्ष महोदय, माननीय जलसंपदा मंत्री यांना सांगू इच्छितो की, मानव विकास निर्देशांकामध्ये मराठवाडयातील 8 जिल्हे कनिष्ठ पातळीवर आहेत. याबाबत अभ्यास झालेला आहे. मराठवाडयातील 7 जिल्हयामध्ये वेगवेगळया माध्यमातून पाणी येत आहे पण उस्मानाबाद जिल्हा उंचावर आहे. उस्मानाबाद जिल्हयाचा भूभाग हा कृष्णा खोऱ्यामध्ये आहे. याबाबत मी अनेकदा बोललो आहे. 2007 मध्ये स्व.विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना मराठवाडयामध्ये मंत्रिमंडळाची बैठक होत होती. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये हा प्रश्न मांडला होता. मला वैधानिक विकास महामंडळाचा अध्यक्ष म्हणून चर्चेला निमंत्रीत केले होते. त्यावेळी तुटीचे खोरे कोणते व कोठून पाणी आणले पाहिजे यावर चर्चा झाली, आमचा भूभाग कृष्णा खोऱ्यामध्ये असल्यामुळे तेथून आम्हाला पाणी उपलब्ध होऊ शकेल अशी चर्चा झाली. त्यावेळी त्याबाबतचा पूर्ण हिशोब करुन आम्ही दिलेला आहे. त्यावेळी काही लोक 60 टीएमसी म्हणाले पण निदान 40 टीएमसी मिळाले पाहिजे होते. बीड जिल्हयातील एक तालुका व पूर्ण उस्मानाबाद जिल्हा याकरिता 24 टीएमसी पाणी तेव्हा मंजूर करण्यात आले. टप्पा क्रमांक 1, 2 व 3 च्या कामाला सुरुवात झाली व यावर 5 हजार कोटी रुपये खर्च झाले. याची कार्योत्तर मान्यता झाली. याकरिता काही निधी उपलब्ध करुन देण्यात आला. काही कामे चालू झाली. खरे तर उस्मानाबाद जिल्हयात सर्वात जास्त आत्महत्या होत आहेत. कोरडा जिल्हा आहे. येथे पाणी येण्याकरिता मोठी नदी नाही. या जिल्हयामध्ये आमच्या हक्काचे पाणी देण्याकरिता एवढा अवधी लागणे बरोबर नाही. त्या काळात माननीय राज्यपालांनी देखील आदेश काढले पण त्यांच्या आदेशानुसारही निधी मिळाला नाही. तो निधी दुसरीकडे वळविला गेला. त्यामुळे मराठवाडयातील अशी अनेक कामे अर्धवट राहिलेली आहेत. मध्यंतरीच्या काळात काम चालू असताना पर्यावरण खात्याची मंजूरी हवी होती, यामुळे काम बंद पडले. नंतर पर्यावरण खात्याने मंजूरी दिली. मंत्री महोदयांनी सांगितले की, पर्यावरण खात्याची

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मधुकरराव चव्हाण .....

मंजूरी मिळाली आहे आता आपण तरतूद करू पण याकरिता कोणती तरतूद केली हा आमचा मुख्य प्रश्न आहे. खऱ्या अर्थाने दुष्काळ हटवायचा असेल तर 24 टीएमसी पाणी बीड जिल्हयातील आष्टी तालुका व आमचा उस्मानाबाद जिल्हा यांना मिळाले पाहिजे. त्याशिवाय आमच्याकडील दुष्काळ हटणार नाही. हे पाणी मिळाले तर आमची 1 लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे. आम्ही किती दिवस बोलायचे ? आपणही तेच बोलता आम्हीही तेच बोलतो आहे. पण आता या काळामध्ये निधीची तरतूद झाली नसल्यामुळे ते काम बंद आहेत. परवा आमचे पालकमंत्री तेथे आले असताना त्यांना मी बंधारा दाखविला आहे. 7 कोटी रुपये खर्चून बंधारा झाला आहे, मी मंत्री महोदयांना निमंत्रण दिलेले आहे की त्यांनी तो बंधारा पहावा. 50 फूट खोल बंधारा आहे. 7 किलोमीटर पाणी थांबणार आहे. यासाठी अजून 10 कोटी रुपये लागणार आहे. अजून अनेक अशी अर्धवट कामे आहेत. सोलापूर जिल्हयात व तुळजापूरला पाणी आणण्याकरिता बंधारा घातलेला आहे. येथे पाणी अडलेले आहे व कॅनॉलचे काम झालेले आहे. पंपींग हाऊसचे टेंडर झालेले आहे. पैशाअभावी ती कामे बंद पडली आहेत. तुळजापूरच्या पायथ्याशी रामदरा नावाचा मोठा तलाव केलेला आहे. हे सर्व पाणी आले तर आमचा दुष्काळ कायमचा हटेल. आमच्याकडील स्थलांतर थांबेल. पाणी पाणी म्हणून आम्हाला कोठे फिरावे लागणार नाही. शेवटी यामुळे आमच्याकडील मजुरांच्या हातालाही काम मिळेल. खरे तर रोजगार हमी योजना फक्त शेतकरीच राबवू शकतो. चांगला पाऊस झाला तर चांगली पिके येतील.

अध्यक्ष महोदय, आज शेतीवर काम करणाऱ्या मजुरांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. आमच्याकडे नापिकी झालेली आहे. आमच्याकडे वर्षभरात आम्ही 300-300 मजुरांना काम देऊ शकत होतो तेथे आता मालकच मजूर झालेला आहे. तर आता मजुरांना काम कोठून मिळणार ? लोक स्थलांतरीत होत आहेत. हे प्रश्न कायमचे मिटले पाहिजेत. म्हणून आज मराठवाडयाच्या बाबतीत आमची महत्वाची पाण्याची अडचण सोडवावी. मी सांगू इच्छितो की, चारा डेपो उघडावेत. आता चारा छावण्या काढण्यास कोणी तयार नाही. तसेच छावण्यामध्ये कोणी जनावरे ठेवण्यास तयार नाहीत. कारण आता छावणीधारकांनाही परवडत नाही. त्यांनी उद्योग म्हणून हे काम केलेले

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.सुभाष साबणे)

श्री.मधुकरराव चव्हाण .....

नाही. सेवाभावी संस्थांनी सहभाग घेऊन काम चालू केलेले आहे. पण हे नुकसान किती दिवस सहन करणार ? त्यांना पूर्वी 1-2 किलोमीटरवरून पिण्याच्या पाण्याचे टँकर आणावे लागत होते, आता 25 किलोमीटरवरून हे टँकर त्यांना आणावे लागतात. म्हणून चारा छावण्या व चारा डेपो उघडण्याची आम्ही मागणी केलेली आहे पण सरकार ते करीत नाही.

यानंतर T T-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मधुकर चव्हाण....

पुढील काळामध्ये पाऊस पडला आणि त्यावेळी आमच्याकडे जर पशुधन नसले तर शेतीची मशागत बैलाविना अशक्य आहे. जमिनीच्या मशागतीकरिता पशुधन नसेल तर आमची जमीन पडीत होईल. पशुधन जगविण्याकरिता प्रत्येक तालुक्यामध्ये 3-4 ठिकाणी चारा डेपो सुरु करावेत, अशी शासनाला माझी नम्र विनंती आहे. मराठवाडयातील उद्योग पाण्याविना बंद पडत आहेत. पाण्याविना कोणताही उद्योग चालू शकत नाही. दुष्काळामध्ये ऊसाचे पीक घेण्याची गरज काय, अशी चर्चा केली जाते. अनेक दुष्काळी जिल्हयामध्ये 40 साखर कारखाने आहेत, तेथे कोणी काही बोलत नाही. चार-दोन एकरामध्ये मराठवाडयात कॅश क्रॉप घेतले तर काय हरकत आहे ? पाणी आले तर आम्ही दुस-यांच्या बरोबरीने जाऊन चांगल्यांच्या पंक्तीला बसू. मराठवाडयात बंद पडलेले सहकारी साखर कारखाने आहेत, सहकारी सुतगिरण्या आहेत. मराठवाडयात सहकारी बँका देखील बंद आहेत. यामुळे शासनाने दिलेले अनुदान राष्ट्रीयकृत बँकांना जात आहे. अजूनही शेतक-याला त्याकरिता 3-3 महिने हेलपाटे घालूनही अनुदानाचे पैसे मिळत नाहीत. जर आमच्या सहकारी बँका आर्थिकदृष्टया मजबूत असत्या तर शेतक-यांवर अनुदानाकरिता राष्ट्रीयकृत बँकांकडे वणवण करण्याची वेळ आली नसती. काही चालू असलेल्या कारखान्यांमध्ये आजही हजार दीड हजार कामगार काम करीत आहेत. काही सुतगिरण्यांमध्ये 500-1000 कामगार काम करीत आहेत. ही सुशिक्षित बेकारी हटविण्यासाठी बंद पडलेले उद्योग सुरु करण्यात यावेत. यामध्ये ज्यांची चूक असेल, त्यांना क्षमा करु नये. त्यांना जरूर योग्य ती शिक्षा करण्यात यावी. आम्ही बुडवायची आणि शासनाने त्या चालू कराव्यात, असे आमचे म्हणणे नाही. परंतु ज्यांनी या सहकारी संस्था आपले भागभांडवल देऊन उभ्या केल्या त्यांना हे शासन शिक्षा का देत आहे ? मराठवाडयात किती सहकारी बँका चांगल्या चालू आहेत ? किती सहकारी कारखाने चांगले चालू आहेत ? माणगाव येथे 4 सहकारी कारखाने आहेत. लातूरची परिस्थिती सर्वांनी पाहिली आणि ऐकलेली आहे. लातूरच्या पाण्यासंदर्भात बोलले जाते की, 08 वर्षे मुख्यमंत्री पद लातूर जिल्हयाकडे असतानाही एवढी भीषण परिस्थिती कशी काय ? आठ वर्षामध्ये माजी मुख्यमंत्री महोदयांनी सर्व योजना लातूरमध्ये आणल्या होत्या. परंतु निसर्गाच्या कोपापुढे कोणाचेही काही चालत नाही. नैसर्गिक आपत्तीपुढे कोणाचेही काही चालत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मधुकर चव्हाण....

म्हणूनही आज ही अवस्था निर्माण झालेली आहे. मी जे पाण्यासंदर्भात बोललो, त्याबाबत माननीय मंत्र्यांनी नोंद घ्यावी, याबाबत उत्तर द्यावे.

अध्यक्ष महोदय, कृष्णा मराठवाडा प्रकल्प स्वतंत्र होता. त्याची आता सांगड वेगळयाच पध्दतीने घालण्यात आलेली आहे. ज्यावेळी ही योजना मंजूर झाली, त्यावेळचा रेकॉर्ड बघण्यात यावा. ही एक स्वतंत्र योजना होती. त्याची आता वेगळयाच पध्दतीने सांगड घालून ती योजना मिक्स केली गेलेली आहे. परवा सभागृहात सांगितले गेले की, 7 टीएमसी पाणी आता दिले. बाकीचे पाणी आम्हाला मिळणार नाही का ? उर्वरित पाण्यावर आमचा हक्क नाही का ? किती दिवस चर्चा करावयाची ? खरे म्हणजे यापुढे चर्चा करण्यापेक्षा शासनाने कृती केली तर आमच्यावर पुन्हा पुन्हा हे बोलण्याची वेळ येणार नाही. कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प ताबडतोबीने किती वर्षात पूर्ण होणार आहे ? हे माननीय मंत्री यांनी उत्तरामध्ये सांगावे. मराठवाडा विकासासाठी मागील अर्थसंकल्पामध्ये मंजूर झालेला पैसा खर्च करण्यास मिळाला नाही.

अध्यक्ष महोदय, विदर्भामध्ये ज्याप्रमाणे मालगुजारी तलावांकरिता तरतूद केली जाते, त्याचप्रमाणे मराठवाडयात देखील 250-300 एकर जागेला पाणी देणा-या लहान लहान तलावाच्या कामाना मंजूरी देणे आवश्यक आहे, अशी मागणी केली गेली होती.

अध्यक्ष महोदय, आमच्या जिल्हयामध्ये राष्ट्रीय महामार्गाचे काम चालू आहे. सोलापूर-तुळजापूर-धुळे, सोलापूर-हैद्राबाद रोडचे काम चालू आहे. रस्त्याची मोजणी झाली त्याप्रमाणे शेतक-यांना तात्पुरते पैसे मिळालेले आहेत. याकरिता औरंगाबाद खंडपीठाकडे शेतक-यांनी अपील केलेले आहे. चार महिन्यामध्ये 3 आर्बिट्रेटर्स नेमले गेले होते. त्यांनी एकही केस हाती घेतली नाही. या केसेसकरिता शासनाने आर्बिट्रेटर्स किंवा आयएएस दर्जाचा अधिकारी देऊन शेतक-यांचे प्रश्न निकाली काढणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, तुळजापूर तीर्थक्षेत्र आहे. तुळजाभवानीचे दर्शन घेण्याकरिता अनेक भाविक लांबून येतात. सोलापूर-तुळजापूर-बीड-औरंगाबाद या रेल्वे मार्गाची आमची जुनी मागणी आहे. याकरिता शासनाने योग्य ती कार्यवाही करावी. सध्याच्या परिस्थितीवर मात करण्याकरिता शासनाने ताबडतोब योग्य ती मदत करावी, ही विनंती आहे. कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाचे काम शासनाने वेळेवर सुरु करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मधुकर चव्हाण....

इतर जी कामे अर्धवट अवस्थेत आहेत, ती पूर्ण करण्याकरिता निधी द्यावा. तसेच अर्धवट अवस्थेतील तलाव पूर्ण करण्याकरिता कार्यवाही व तरतूद करावी, अर्धवट बॅरेजेसच्या कामांना निधी देऊन तेही काम पूर्ण करण्यात यावे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.देवयानी फरांदे (नाशिक-मध्य): अध्यक्ष महोदय, नियम 293 अन्वये जो प्रस्ताव सभागृहामध्ये मांडलेला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2005 मध्ये पाणी समन्यायी वाटप कायदा मंजूर झाला होता. या कायद्याच्या माध्यमातून गोदावरील खो-याच्या समुहातून जायकवाडी धरणाला पाणीपुरवठा केला जात आहे, त्याबाबत ऊहापोह करण्यासाठी मी उभी आहे. या माध्यमातून मी सरकारचे अनेक विषयांकडे लक्ष वेधणार आहे. मराठवाडा आणि नाशिक जिल्हयाच्या पाणीपुरवठयाचा प्रश्न या माध्यमातून उद्याच्या कालावधीत काही निर्णय घेऊन सोडविता येऊ शकतो. सन 2005 मध्ये पाणी समन्यायी वाटप कायदा मंजूर झाल्यानंतर सन 2012 मध्ये शासनाने मेंढेगिरी समिती गठित केली. त्याचा अहवाल शासनाकडे सादर केला परंतु शासनाने मेंढेगिरी समितीचा अहवाल स्वीकारलेला नाही. अशा प्रकारे शासनाने मेंढेगिरी समितीचा अहवाल स्वीकारलेला नसतानाही एमडब्ल्यूआरआरआयने गोदावरी धरणाच्या समुहातून जायकवाडी धरणाला पाणी दिले. या निर्णयाला सुप्रिम कोर्टामध्ये चॅलेंज केले गेले होते. सुप्रिम कोर्टानेही एमडब्ल्यूआरआरआयने मेंढेगिरी समितीच्या अहवालानुसार पाणी सोडण्याचा निर्णय कायम केला. यामुळे नाशिक जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात नाराजी पसरलेली आहे. या गोष्टीचा खुलासा होणे गरजेचे आहे. एमडब्ल्यूडब्ल्यूआरआरआय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जायकवाडी धरणासाठी गोदावरील धरण समुहातून 10.13 टीएमसी पाणी सोडण्यात आले होते. 10.13 टीएमसी पाण्यातून प्रत्यक्षात जायकवाडी धरणात केवळ 6 टीएमसी पाणी पोहोचलेले आहे. 4 टीएमसी पाण्याचा लॉस झालेला आहे. गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या माध्यमातून जे काही कॅल्क्यूलेशन्स कोर्टापुढे सादर करण्यात आलेले आहे. जवळपास जायकवाडी धरणाचा मृत साठा 26.6 टीएमसी एवढा आहे. त्यातून 14 टीएमसी पाण्याचा हिशेब दाखविण्यात आलेला आहे. त्यामध्ये गोदावरी विकास महामंडळाने असे सांगितले की, बाष्पीभवनाच्या माध्यमातून 7.28 टीएमसी इतके लॉसेस होत आहेत. गंगापूर धरण समुहातून 14 टीएमसी सोडले तर त्यात 7.28 टीएमसी पाणी हे बाष्पीभवन, व्यय होणार होते. 50 टक्के पाणी गोदावरील धरणातून सोडल्यानंतर जायकवाडी धरणामध्ये पोहोचतांना पाण्याचे लॉसेस दाखविण्यात आलेले आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. देवयानी फरांदे.....

जायकवाडी धरणाच्या बाजूला बाष्पीभवनाचा मिटर बसविण्यात आलेला असून, त्या माध्यमातून आकडेवारी दिलेली आहे. गोदावरी धरणातून पाणी सोडले जात आहे. गंगापूर हे सर्वाधिक महत्वाचे धरण आहे. नाशिक जिल्हा पिण्याच्या पाण्यासाठी गंगापूर धरणावर पूर्णपणे अवलंबून आहे. नाशिक शहराला गंगापूर धरणातून पाणी पुरवठा केला जातो. गंगापूर धरणातील बफर्स स्टॉक शून्य आहे. गंगापूर धरणामधील शिल्लक असणारे पाणी हे नाशिक जिल्ह्यापुरते असून, त्याच्या व्यतिरिक्त कोणताही पाणीसाठा शिल्लक नाही. 15 जुलै, 2016 पर्यंत पाऊस पडला नाही किंवा पाऊस उशीरा पडला तर 15 जुलै, 2016 पर्यंत नाशिक जिल्ह्यासाठी पिण्याचे पाणी ठेवलेले आहे. सन 2003 मध्ये गंगापूर धरणामध्ये किती गाळ आहे, याबाबत सर्व्हेक्षण करण्यात आलेले होते. पण त्यानंतर आजतागायत गंगापूर धरणामध्ये किती गाळ आहे, याबाबतचे कोणतेही सर्व्हेक्षण करण्यात आलेले नाही. त्यामुळे पिण्याच्या पाण्याबरोबर गंगापूर धरणात आजमितीस गाळ किती आहे, हे कोणीही सांगू शकत नाही. 15 जुलै, 2016 पर्यंत पाऊस पडला नाही किंवा पाऊस उशीरा पडला तर नाशिक जिल्ह्याला पिण्यासाठी पाणी मिळणार नाही, अशी आजची परिस्थिती आहे. जायकवाडी धरणात 26.6 टीएमसी मृतसाठा आहे. या माध्यमातून औरंगाबाद, जालना, मराठवाड्यातील शहरी आणि ग्रामीण भागासाठी पाणीपुरवठा होऊ शकतो. एवढा बफर्स स्टॉक जायकवाडी धरणात आहे. याऊलट नाशिकमधील गंगापूर धरणामध्ये शून्य बफर्स स्टॉक आहे. सिंचन मंत्री हे नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. ज्यावेळी जायकवाडीला पाणी सोडण्यात आले होते, त्यावेळी खूप मोठ्या प्रमाणात जनक्षोभ ऊसळला होता. त्यावेळी माननीय सिंचन मंत्र्यांची गाडी रोखण्यात आली होती.

श्री. भिमराव धोंडे : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभागृहात मराठवाड्याशी संबंधित असलेल्या प्रस्तावासासंबंधी चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्या प्रा. देवयानी फरांदे या नाशिक जिल्ह्यातील धरणांमध्ये पाण्याचा स्टॉक किती आहे, वगैरे माहिती देत असून, ते सर्व आम्हाला माहीत आहे. मराठवाड्यातील लोकांना पिण्यासाठी पाणी मिळत नसल्यामुळे अनेक लोक स्थलांतरित होऊ लागली आहेत. जनावरे चाऱ्यावाचून मरत आहेत. सद्यःस्थितीत मराठवाड्यातील दोन ते तीन महिन्याच्या दुष्काळी परिस्थितीत शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या जाऊ शकतील याबाबत सन्माननीय सदस्यांनी भाषण करावे, असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

.....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. देवयानी फरांदे : अध्यक्ष महोदय, मी महत्वाची सूचना उपस्थित करण्यासाठी उभी आहे. आपण 10.13 टीएमसी पाणी सोडलेले असताना फक्त 6 टीएमसी त्या ठिकाणी पाणी पोहचले आणि 4 टीएमसी पाण्याचा लॉस झालेला आहे. 6 टीएमसी पाण्यातून तीन ते चार महिन्यात मोठ्या प्रमाणावर इव्हॉप्रेशन लॉसेस होणार आहे. जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून 24 टीएमसी पाणी निर्माण करण्यासाठी शासनाला 1600 कोटी रुपयांचा खर्च आलेला आहे. 24 टीएमसी पाणी धरणाच्या माध्यमातून उभे करायचे म्हटले तर 5 हजार कोटी रुपयांचा खर्च येतो. 6 टीएमसी पाण्याचा लॉस होत असेल तर दरवर्षी शासनाला 1200 कोटी रुपयांचा लॉस होणार आहे. परिणामी राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान होणार आहे. मराठवाड्याला पाणी देण्याबाबत माझा कोणताही विरोध नाही. गोदावरी आणि सर्व उपनद्या नांदुर माध्यमेश्वर उपसा केंद्राच्या ठिकाणी एकत्रितपणे येत आहेत. ब्रिटीश कालीन नांदुर माध्यमेश्वर उपसा केंद्र आहे. नांदुर माध्यमेश्वर उपसा केंद्र ते वैजापूर अशी एक्सप्रेस फिडर लाईन आहे. या माध्यमातून वैजापूरला अनेक वर्षापासून पाणी पुरवठा केला जात आहे. नांदुर माध्यमेश्वर उपसा केंद्र ते जायकवाडीपर्यंत नदीच्या बाजूने थेट पाईपलाईन केली तर गुरुत्वाकर्षाच्या बळावर विनाविज वापरता जायकवाडीला पाणी पुरवठा होऊ शकतो. या कामासाठी सुरुवातील 800 ते 1000 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. पण या पैशातून डिस्ट्रेस ईअरमध्ये मराठवाड्याला चांगल्या पध्दतीने पाणी पुरवठा करु शकतो. आज तेथील 6 टीएमसी पाणी लॉस होत आहे. यामधील 3 टीएमसी पाणी नाशिक जिल्ह्यासाठी आरक्षित करुन उर्वरित 3 टीएमसी पाणी जायकवाडीला थेट पाईपलाईनच्या मदतीने मिळणार आहे. सभागृहात माननीय सिंचन मंत्री उपस्थित आहेत. मी उपस्थित केलेल्या थेट पाईपलाईनच्या बाबतीत मंत्री महोदय कोणता निर्णय घेणार आहेत, त्याची माहिती आम्हाला द्यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, वैतरणा धरणातील बॅक वॉटरच्या माध्यमातून पाण्याचा मोठ्या प्रमाणावर लॉस होत आहे. हे पाणी समुद्राला जाऊन मिळत आहे. यासाठी शासनाने थोडासा खर्च करुन वैतरणा बॅक वॉटरमधील पाणी हे गंगापूर धरणात सोडले तर असे पाणी नांदुर माध्यमेश्वर उपसा केंद्राच्या माध्यमातून जायकवाडीला मिळण्यास मदत होणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. देवयानी फरांदे.....

अध्यक्ष महोदय, मेंढेगिरी समितीचा अहवाल चुकीच्या पध्दतीने बनविण्यात आलेला असल्यामुळे तो फेटाळण्यात यावा अशी माझी मागणी आहे. शासन सिंचनासाठी कोट्यावधी रुपयांचा खर्च करीत आहे. जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून अनेक योजना राबविल्या जात आहेत. जायकवाडीला पाणी देण्याबाबत आमचा विरोध नाही. पण ज्या पध्दतीने पाणी दिले जात आहे, त्यामधून पाण्याचा खूप मोठ्या प्रमाणावर लॉस होत आहे. याबाबत शासनाने विचार करण्याची गरज आहे. सरकारने यासंदर्भात विचार केला नाही तर भविष्यात प्रांतिक वाद ऊफाळून येणार आहे. नाशिक जिल्ह्यासाठी पाण्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. जर नाशिक जिल्ह्याला पाणी मिळाले नाही तर मराठवाड्याला देखील पाणी मिळण्यास कठीण होऊन बसणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी थेट पाईपलाईनच्या प्रस्तावास मंजुरी दिली तर समन्यायी पध्दतीने पाणी मिळण्यास मदत होणार आहे. परिणामी सिंचनाचा कोट्यावधी रुपयांचा खर्च पाण्यात जाणार नाही. मराठवाड्यास पाणी मिळण्यास मदत होणार आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाने मी केलेल्या मागणीचा पूर्णपणे विचार करावा आणि मेंढेगिरी समितीचा जो अहवाल चुकीच्या पध्दतीने बनविण्यात आलेला आहे, तो फेटाळण्यात यावा अशी प्रस्तावाच्या अनुषंगाने मागणी करुन माझे भाषण संपविते. धन्यवाद.

.....4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125व्या जयंती वर्षानिमित्त दिनांक 14-15 एप्रिल, 2016 रोजी दीक्षांत सभागृह, मुंबई विद्यापीठ फोर्ट, मुंबई येथे आंतरराष्ट्रीय परिषदेच्या आयोजनासंबंधी

मु. शी. : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125व्या जयंती वर्षानिमित्त दिनांक 14-15 एप्रिल, 2016 रोजी दीक्षांत सभागृह, मुंबई विद्यापीठ फोर्ट, मुंबई येथे आंतरराष्ट्रीय परिषदेच्या आयोजनासंबंधी माननीय सामाजिक न्यायमंत्र्याचे निवेदन

श्री. राजकुमार बडोले (सामाजिक न्यायमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत पाटील : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्या श्रीमती देवयानी फरांदे यांचे मी मनापासून आभार मानतो. मराठवाड्याच्या प्रश्नांवर अधिवेशनाच्या शेवटी चर्चा लागलेली आहे. किती आपुलकी आहे हे या सभागृहाची उपस्थिती एकंदरितच दर्शविते. सन्माननीय सदस्या श्रीमती देवयानी फरांदे यांनी मराठवाड्यातील जायकवाडी धरणातून पाणी एमडब्ल्यूआरआर च्या आदेशानुसार सोडलेले असून त्यावर न्यायालयाने शिक्कामोर्तब केलेले आहे त्यामुळे या विषयावर सभागृहात चर्चा होऊ शकत नाही. दुसरी बाब अशी आहे की, या सभागृहात कोरम पूर्ण आहे काय, याची कृपया आपण तपासणी करावी.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.जयप्रकाश मुदंडा (वसमत) : अध्यक्ष महाराज, नियम 293 च्या सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. मराठवाड्यामध्ये गेल्या तीन वर्षापासून सतत दुष्काळाचे सवट पसरलेले आहे. सन 1971-1972 मध्ये असाच दुष्काळ महाराष्ट्रामध्ये आला होता. त्यावेळेस योगायोगाने मी एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण केले होते आणि त्यानंतर एक वर्षाचे ट्रेनिंग करीत होतो, त्यासाठी सहा महिने मला कन्नड प्राथमिक आरोग्य केंद्रात नयुक्ती दिली होती. त्यावेळेस मी युनिसेफची गाडी घेऊन जेथे जेथे खडी सेंटर आहे तेथे जाऊन व्हिटॅमिनच्या गोळ्या आणि सुकळी वाटप करीत होतो. त्यावेळी रोजगार हमी योजनेची इतकी कामे सुरु होती की, तुम्ही जिकडे नजर टाकाल तिकडे रोजगाराची कामे करणारे गर्भ श्रीमंत लोक दिसत होती. आज रोजगार हमी योजनेची परिस्थिती अशी झालेली आहे की, अधिकारी लोक ही कामे करायला तयार होत नाहीत. रोजगार हमी योजनेच्या कामासाठी ज्या अटी घातलेल्या आहेत, त्या शिथिल करणे अत्यंत गरजेचे आहे. त्या अटी शिथिल केल्यातरच रोजगार हमी योजनेची कामे मोठ्या प्रमाणावर मराठवाड्यात सुरु होतील आणि मराठवाड्यातील लोकांना काम मिळेल. लोकांच्या हाताला काम मिळाले तर लोकांचे स्थलांतर होणार नाही. मराठवाड्यातील लोक मराठवाडा सोडून मुंबईकडे धाव घेत आहेत. अध्यक्ष महाराज, आपल्या मतदारसंघाचाच विषय आपण घ्यावा. आपल्या मतदारसंघातील जवळपास एक हजार लोक घाटकोपर, मुंबई येथे आले आहेत. त्यांना आश्रय मिळाला नाही म्हणून सन्माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांनी दुष्काळग्रस्तांना संक्रमण छावणी उघडून दिली. त्यांच्या राहण्याची, जेवणाची, त्यांना संरक्षण देण्याची व्यवस्था तसेच प्रत्येक गोष्टींची व्यवस्था मंत्री महोदय श्री.शिंदे साहेबांनी उपलब्ध करुन दिली आहे. एका मतदारसंघातून एक हजार लोकांनी स्थलांतर केलेले आहे तर मे महिन्यात मराठवाड्याची काय परस्थिती होईल, याचा आपल्याला अंदाज करता येणार नाही. अशा परिस्थितीत रोजगार हमी योजनेची कामे लवकरात लवकर सुरु करणे आवश्यक आहे. रोजगार हमी योजनेची कामे सुरु होण्यासाठी त्यातील अटी शिथिल करणे अत्यंत गरजेचे आहे.

अध्यक्ष महाराज, सन 1971 मध्ये महाराष्ट्र राज्यात दुष्काळ पडला होता त्यावेळी मातीच

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.जयप्रकाश मुदंडा...

टोपले उचलून टाका रस्त्यावर, अशी त्यावेळी कामे केली जात होती. परतु आज रोजगार हमीची कामे कोठेही सुरु नाहीत. एखादे रोजगार हमी योजनेचे काम सुरु करण्याचे अधिकाऱ्यांना सांगितले तर त्या रस्त्याचे एस्टिमेस्ट तयार करण्यामध्ये त्यांना एक महिना लागतो. मराठवाड्यातील रोजगार हमी योजनेची कामे लवकरात लवकर जास्त प्रमाणात सुरु केली तरच मराठवाड्यातील जनता जागेवर राहील अन्यथा आपापली गावे सोडून जाण्याच्या परिस्थितीमध्ये आहेत. एकीकडे हाताला काम नाही आणि दुसरीकडे पिण्याचे पाणी नाही. शेतीमध्ये दुसरे काही उत्पन्न नाही. मराठवड्यामध्ये अशी परिस्थिती का निर्माण झाली? मागे इंग्रजांचे राज्य हे मराठवड्याच्या अलिकडेच होते. त्यावेळेस पाण्याचे नियोजन नाशिक मध्ये वरच्या भागामध्ये केले. निजामाच्या राजवटीमध्ये निजाम मराठवाड्यामध्ये गेले तेव्हा निजामांनी आंध्र प्रदेशात वरच्या भागात त्यांनी धरण केले मराठवाड्यात मात्र "ना घर का न घाट का. ना इधर का ना उधर का, बीच में लटकते रहो" अशी परिस्थिती मराठवाड्याची निर्माण झालेली आहे. मागील वर्षात पाण्याचे नियोजन केले नाही. मध्यंतरीच्या काळात आदरणीय श्री.शंकरराव चव्हाण यांनी राज्याचे नेतृत्व केले त्यावेळेस त्यांनी पैठण धरणाची निर्मिती केली. त्यानंतर मराठवाड्याचे अनेक नेते महाराष्ट्राची धुरा सांभाळत होते, परंतु त्यांनी याकडे लक्ष दिले नाही. बीड, उस्मानाबाद आणि लातूर हे नेहमीच अवर्षणग्रस्त जिल्हे राहिलेले आहेत. 28 टीएमसी पाणी कृष्णा खोऱ्यातून मराठवाड्यात आले असते तर बिड, लातूर आणि उस्मानाबादची परिस्थिती आज अशी झाली नसती. मी माननीय जलसंपदा मंत्र्यांना विनंती करणार आहे की, युती सरकारच्या काळामध्ये आपण कृष्णा खोऱ्याचे पाणी अडविण्यासाठी दहा हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले होते. पाणी अडविण्याचा प्रयत्न केला, परंतु त्या पाण्याचा वापर आता व्हायला लागला आहे. आज परिस्थिती अशी आहे की, सरकार नवीन कामांसाठी पैसे देत नाही, त्यासाठी माननीय राज्यपालांची परवानगी लागते. माननीय राज्यपालांचे म्हणणे आहे की, नवीन कामे सुरु करु नका, परंतु माननीय राज्यपालांनी असे म्हटलेले आहे की, जुनी कामे चालू असताना त्या कामावर परिणाम होणार नसेल तर नवीन कामे करावीत. नवीन प्रकल्प हाती घ्यावयाचे असतील तर त्यासाठी नवीन कर्ज काढावे लागणार आहे. आपण नवीन कामांसाठी 50 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढण्याचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.जयप्रकाश मुदंडा...

जाहिर केलेले आहे. नवीन कामे सुरु करण्यासाठी कर्ज काढा. मराठवाड्यात पाणी उपलब्ध असून ते पाणी वर्षानुवर्षे वाया जाते असे मी म्हणणार नाही. ते पाणी आंध्र प्रदेश राज्यात वापरले जाते. मराठवाड्याच्या हिस्याचे पाणी मराठवाड्याला वापरण्यासाठी मिळाले तर या दुष्काळामध्ये मोठ्या प्रमाणात कामे होऊ शकतात. गोदावरी खोऱ्यातील पाणी अडविण्यासाठी पाहिजे तर कर्ज काढा, परंतु गोदावरी खो-यात नवीन कामे सुरु करावीत, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महाराज, मी आज सकाळी मंत्रालयात जलसंपदा विभागात गेलो होतो. मी तेथे अधिकाऱ्यांशी चर्चा केली. माझ्या मतदारसंघात पूर्णा नदीवरील बंधाऱ्याबाबत मी त्यांना वारंवार सांगत असतो. त्यांनी मला सर्व कागदपत्रे दाखविली. सर्व प्रस्ताव तयार आहेत. आता प्रशासकीय मान्यता मिळाल्यावर सेल्फवर प्रस्ताव येण्यासारखी परिस्थिती आहे. त्यांनी इडीला पत्र लिहिले आहे की, प्रस्ताव सर्व बरोबर आहे, परंतु माननीय राज्यपालांची परवानगी दिलेली नाही त्यामुळे तुम्ही परवानगी घ्यावी. माननीय राज्यपालांची परवानगी घेण्याचे काम सरकारचे आहे. माननीय राज्यपालांच्या निदर्शनास आणून द्यायाला पाहिजे की, आम्ही नवीन कामासाठी 50 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढणार असल्यामुळे त्याचा जुन्या कामांवर कसलाही परिणाम होणार नाही. नवीन कामे सुरु करण्याचा प्रस्ताव माननीय राज्यपालांकडे मंत्री महोदयांनी तातडीने पाठवावा, अशी मी विनंती करतो. जुन्या कामांसाठी फक्त पैशांची तरतूद करीत राहिले तर या काळामध्ये नवीन कामे सुरु होणार नाहीत. आता पैशांची तरतूद करणे अत्यंत गरजेचे आहे. महाराष्ट्र शासनाने दुष्काळी परिस्थिती कायमची मिटविण्यासाठी जलयुक्त शिवार योजना चालू केली, याबद्दल मी या सरकारचे अभिनंदन करतो. बीड जिल्ह्यांत मध्यंतरी अवकाळी पाऊस पडला.

यानंतर WW-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. जयप्रकाश मुंदडा ...

हा अवकाळी पाऊस पडल्यानंतर त्या ठिकाणी जलयुक्त शिवार अभियानातून ज्या ज्या ठिकाणी कामे झाली, ज्या ज्या ठिकाणी खोलीकरण, सरळीकरण झाले, बंधारे झाले ते भरुन गेले आणि मधल्या काळात त्या भागातील लोकांना दिलासा मिळाला. हेच काम मागच्या काळातील सरकारने केले असते तर, ही परिस्थिती निर्माण झाली नसती. सन 1971 च्या दुष्काळानंतर ज्या राज्यामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय श्री. नाईक यांनी हरितक्रांती आणली. त्यांनी त्यावेळेस काम केले परंतु, मधला काळ रिकामा गेला. युतीचे सरकार आले आणि कृष्णा खोऱ्याचे पाणी अडविण्यासाठी 10 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढण्यात आले. मधल्या काळात जी कामे झाली त्यातून पाणी अडविले गेले नाही, जिरविले गेले नाही परंतु, 70 हजार कोटी रुपये जिरविले गेले. जर 70 हजार कोटी रुपयांचे काम व्यवस्थित पूर्ण झाले असते तर आज राज्यात व मराठवाड्यात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली नसती.

अध्यक्ष महोदय, आज याठिकाणी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. आज 2-3 दिवसांची सुट्टी मिळाली की, आपण गावामध्ये जातो. गावामध्ये आपण गेलो की, गावातील लोक सांगतात की, आमदार साहेब आमच्या फॉर्मवर सही करा, आम्हाला टँकर पाहिजे. दररोज प्रत्येक गावातील माणूस येऊन असे म्हणतो की, आम्हाला प्यायला पाणी नाही, टँकरची व्यवस्था करावी. मी त्यांना कधी कधी म्हणतो की, टँकरची व्यवस्था करु परंतु, टँकरमध्ये भरायला लागणारे पाणी आणायचे कोठून ? याकरिता ही व्यवस्था आता करणे अत्यंत गरजेचे आहे. मी ताईंना सांगितले आहे की, आमचे नाशिकचे पाणी खाली जाऊ द्यायचे नाही. खरे म्हणजे जलव्यवस्थापनाचा असा नियमच आहे की, कायद्यानेही खालची धरणे भरल्याशिवाय वरची धरणे भरता येत नाहीत. उद्या आम्ही जर कोर्टात गेलो तर नाशिकवाले अडचणीत येतील. मंत्री महोदय अगोदर खालची धरणे भरण्याची व्यवस्था करावी. खालचे धरण भरल्यानंतर वरचे 1-1 धरण भरावे म्हणजे मराठवाड्यात कधीच दुष्काळ येणार नाही, अशी मी तुम्हाला ग्वाही देतो.

अध्यक्ष महोदय, तीच परिस्थिती येलदरी धरणाची झालेली आहे. वर खडकपूर्णा धरण बांधले त्यावेळेस आम्ही विरोध केला होता. परंतु, खडकपूर्णा धरण बांधले आणि आज येलदरी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. जयप्रकाश मुंदडा ...

धरणाची अशी परिस्थिती झाली आहे की, ज्या येलधरी धरणामुळे मराठवाड्यातील काही भागाला भरपूर पाणी मिळत होते, आज तेथेही दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. आज खडकपूर्णा धरणामध्ये पाणी शिल्लक आहे. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, खडकपूर्णा धरणाचे पाणी आपण येलदरी धरणाला सोडावे. येलदरी धरण एकदा भरु द्या, खडकपूर्णा धरणाचे पाणी तुम्हालाही पुरेल एवढे शिल्लक आहे. याकरिता खालच्या लोकांचा त्रास वाचविण्यासाठी आपण खडकपूर्णा धरणाचे पाणी येलदरी धरणाला सोडावे, यामुळे त्या भागातील लोकांची पाण्याची व्यवस्था होणार आहे. मी विनंती करतो की, खालची धरणे भरल्याशिवाय वरची धरणे भरु नका, असे आपण भविष्यात केले तर, मराठवाड्यात पाण्याचा दुष्काळ राहणार नाही, एवढेच मी सांगतो.

अध्यक्ष महोदय, पाण्यासाठी भांडणे, युध्द होतील असे आदरणीय बाळासाहेबांनी 20 वर्षांपूर्वी सांगितले होते. तीच परिस्थिती आज पिण्याच्या पाण्याची झालेली आहे. लातूरमध्ये टँकर आणला तर पोलिसांना उभे राहून लोकांना पाणी द्यावे लागत आहे, ही पिण्याच्या पाण्याची परिस्थिती आहे. आज तरी सरकारने पाण्याची व्यवस्था केलेली आहे. विरोधक ओरडत होते असे मी म्हणत नाही परंतु, ते चर्चा करतात की, आता पाणी कोठून आणणार ? त्यांना हे माहीत नाही की, लातूरला एक रेल्वेगाडी जवळजवळ पोहोचली आहे. यामुळे सरकारबद्दल लोकांच्या मनात ग्वाही निर्माण झालेली आहे. या 293 अन्वयेच्या प्रस्तावात असे नमूद केले आहे. या सरकारबद्दल लोकांच्या मनात ग्वाही निर्माण झालेली आहे की, सरकार चांगले काम करीत आहे.

अध्यक्ष महोदय, आत्महत्याग्रस्त लोकांचे काय ? कालच केरळमध्ये एका मंदिरात फटाक्यांचा स्फोट होऊन जवळपास 105 लोक मृत्युमुखी पडले. माननीय पंतप्रधानांनी मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येकाच्या कुटुंबीयांना 2 लाख रुपये दिले, तर तेथील मुख्यमंत्र्यांनी प्रत्येकी 10 लाख रुपये दिले. मग आत्महत्या झालेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबाला आपल्या मुख्यमंत्री महोदयांनी आपल्या सरकारने कमीत कमी 5 लाख रुपये द्यावेत, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सिंचनाच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर सिंचनाचे काम वाढविण्यासाठी आपण जलयुक्त शिवार अभियानाची व्याप्ती वाढविली पाहिजे. काही काही भागात पाणलोट क्षेत्रात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. जयप्रकाश मुंदडा ...

गाव आहे, तेथे काम घ्यायचे नाही. परंतु, आता तसे न पाहता एकच पाहिले पाहिजे. प्रॉडक्टिव्हीटी, यातून उत्पन्न काय मिळणार आहे हे पाहू नका तर जेथे पाणी दिसेल तेथे पाणी अडविण्याचे काम आता सरकारने केले पाहिजे. पाणी अडविल्यानंतर आपल्याला त्यातून काय उत्पन्न मिळणार, फायदा काय होणार आहे, पाणलोटामध्ये गाव आहे किंवा नाही हे न पाहता जेथे जेथे पाणी उपलब्ध होईल ते कसे अडविता येईल याचा प्रयत्न आता सरकारने केला पाहिजे. त्यामुळे जलयुक्त शिवार अभियानाची व्याप्ती सरकारने वाढविली पाहिजे, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सौरऊर्जेचा जो विषय आहे, त्या माध्यमातून मला हे सांगावयाचे आहे की, अनेक ठिकाणी केवळ विजेचे बिल भरले नाही, म्हणून नळ योजना बंद आहेत. विजेचे बिल भरावयाचे नसेल तर सौर ऊर्जेच्या माध्यमातून मोटार बसविली तर, बिल भरण्याची कटकट कायमची दूर होईल व त्या नळ योजना चांगल्या प्रकारे सुरु राहतील. नळ योजनेच्या बाबतीत मध्यंतरी आपण हे सांगितले की, 500 कोटी रुपये फक्त नवीन नळ योजनेकरिता दिले.

तालिका सभाध्यक्ष (श्री. सुभाष साबणे) : सन्माननीय सदस्य आपण केवळ मुद्दे मांडावेत.

डॉ. जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, याकरिताच हा प्रस्ताव उद्या ठेवला असता तर बरे झाले असते. मी दोन मिनिटांत माझे म्हणणे मांडतो.

अध्यक्ष महोदय, नवीन नळ योजनेकरिता हे 500 कोटी रुपये पुरणार नाहीत. याकरिता मंत्री महोदयांना विनंती आहे की, हे 500 कोटी रुपये वाढवून आणखी 500 कोटी रुपये दिले तर हजार कोटी रुपयांमध्ये नवीन नळ योजनेची व्यवस्था होणार आहे. पिण्याकरिता पाणी अत्यावश्यक आहे. त्यामुळे पिण्याकरिता द्यावे लागणाऱ्या पाण्याकरिता किती पैसे द्यावे लागतात याचा हिशोब आपल्याला करता येणार नाही. कारण हे अत्यावश्यक आहे. याचे प्रॉडक्शन केल्याने आपल्याला किती उत्पन्न मिळेल याचाही सरकारने विचार करु नये. प्रत्येक माणसाला पिण्याचे पाणी देण्याची जबाबदारी सरकारची आहे. या नळ योजनेसाठी मुख्यमंत्री पेयजल योजनेतून आपण काम सुरु करणार असलात तरी, हा निधी वाढवून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. जयप्रकाश मुंदडा ...

अध्यक्ष महोदय, त्या ठिकाणी मी सांगितले की, पूर्णा नदीवरच्या उच्च पातळीवरील बंधाऱ्याकरिता मंत्री महोदय आपण प्रयत्न करावा. ऊस कारखान्यांच्या बाबतीत सांगितले गेले, यावर्षी त्यांची परिस्थिती फार वाईट आहे. ऊस कारखाने बंद होत आहेत. परंतु, ऊस कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांची परिस्थिती काय होणार आहे, याचा विचार केला पाहिजे. ज्या ज्या ठिकाणी हे ऊस कारखाने आहेत, तेथेच सरकारने छावण्या उघडल्या तर या मजुरांना आणखी कोठे भटकावे लागणार नाही. त्यांना तेथे काम मिळू शकेल, जनावरांना चारा, पाणी मिळू शकेल.

अध्यक्ष महोदय, माझ्या येथे कुरुंदा हे 20 हजार लोकसंख्येचे गाव आहे. तेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नव्हती. त्यामुळे ज्या लोकांकडे स्वत:चे बोअर आहेत, त्यांना आम्ही विनंती केली की, आपापल्या गल्लीत आपण पाणी द्या. त्याप्रमाणे त्यांनी मोफत पाणी देण्यास सुरुवात केली. माझी सरकारला विनंती आहे की, जे जे लोक स्वत:हून पाणी देण्यास तयार आहेत, त्यांना महिन्याला विजेच्या बिलापोटी कमीत कमी पाचशे ते हजार रुपये सानुग्रह अनुदान द्यावेत, अशी नम्र विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

.....

श्री. हेमंत पाटील : अध्यक्ष महोदय, मला एक प्रश्न विचारु द्यावा. या सभागृहात कोरम किती सदस्यांचा असला पाहिजे आणि कोणत्या नियमाने सध्या सभागृहाचे कामकाज सुरु आहे, कृपया याची माहिती मला द्यावी.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य मराठवाड्यामध्ये गंभीर प्रश्न निर्माण झालेले आहेत, त्या विषयावरील चर्चा सभागृहात सुरु आहे. सभागृहात माननीय पाणीपुरवठा व माननीय जलसंपदा असे दोन्ही कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ग.आ. देशमुख (सांगोला) : अध्यक्ष महोदय, विधानसभा नियम 293 अन्वये सत्ताधारी व विरोधी पक्षाने प्रस्ताव मांडलेले आहेत. एक प्रस्ताव मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने मांडलेला आहे. दुसरा प्रस्ताव महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती, आत्महत्या या संबंधीचा आहे. या दोन्ही प्रस्तावांवर या ठिकाणी एकत्रित चर्चा सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, या सभागृहात पहिल्या आठवड्यापासूनच दुष्काळावरील चर्चा सुरु आहे. मी या ठिकाणी एक मुद्दा मांडणार आहे. या राज्यामध्ये 2/3 भाग खरिपाचा आहे व 1/3 भाग रब्बीचा आहे.

XX-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ग. आ. देशमुख.....

खरीपाच्या भागामध्ये सरकारने दुष्काळी गावे जाहीर केलेली आहेत. परंतु या राज्यामध्ये रब्बीचा जो भाग येतो. म्हणजेच जो भाग एक तृतीयांश आहे. रब्बीच्या पेरण्या झाल्यानंतर अजिबात पाऊस पडलेला नाही. रब्बीच्या भागामध्ये सरकारी आकडेवारीप्रमाणे सुद्धा निम्मा पाऊस पडलेला आहे. रब्बीची पिके करपून गेलेली आहेत. असे असताना पैसेवारी जाहीर करण्याच्या प्रचलित पद्धतीप्रमाणे प्रत्येक वर्षाच्या 15 मार्चला रब्बी पिकाची पैसेवारी जाहीर करायला पाहीजे. विशेषत: सोलापूर आणि नगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रब्बीची गावे आहेत. बाकीच्या जिल्ह्यामध्ये काही प्रमाणात रब्बीची गावे आहेत. सांगलीमध्ये, सातारामध्ये, पुण्यामध्ये तसेच मराठवाड्यातील जिल्ह्यामध्ये सुद्धा रब्बीची गावे आहेत. मागणी करुनही रब्बीच्या गावामध्ये दुष्काळी पैसेवारी जाहीर केलेली नाही. ती करण्यात यावी, अशी मी पहिली मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, प्रचलित पैसेवारी जाहीर करण्याचे जे आदेश आहेत, त्यामध्ये दुरुस्ती करुन शासनाने दिनांक 03 नोव्हेंबर 2015 रोजी नवीन आदेश काढला. त्या आदेशाप्रमाणे रब्बीच्या भागामध्ये 31 डिसेंबरला नजर पैसेवारी, 31 जानेवारीला सुधारित पैसेवारी आणि 15 मार्चला अंतिम पैसेवारी जाहीर करावयाची आहे. सोलापूर जिल्ह्यापुरते बोलायचे झाले तर या जिल्ह्यामध्ये 1144 गावे आहेत. अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात माननीय महसूल मंत्री यांनी सोलापूर जिल्ह्यातील 1144 गावांपैकी 650 गावांमध्ये टंचाई सदृष्य परिस्थिती जाहीर केली. नगर जिल्ह्यातील काही गावांमध्ये 50 पैशाच्या आत पैसेवारी जाहीर केली. परंतु इतर जिल्ह्यामधील आणेवारी तेव्हा जाहीर केलेली नव्हती. सोलापूर जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांनी महसूल आयुक्त पुणे विभाग यांच्या मार्फत मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये 1144 गावांपैकी 1034 गावांमध्ये क्रॉप कटींग एक्सपेरिमेंट घेऊन 50 पैशापेक्षा कमी पैसेवारी आहे, अशा पद्धतीचा अहवाल सरकारकडे पाठविला. असे असताना सुद्धा सरकारने या गावामध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर केलेली नाही. या गावांची दुष्काळी परिस्थिती उत्तराच्या भाषणामध्ये जाहीर करावी, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, गेल्या आठवड्यामध्ये चर्चा झाली. अमरावती विभागाची पैसेवारी जाहीर करण्याचा प्रश्न नागपूर येथील उच्च न्यायालयाच्या खंडपीठात गेला आणि उच्च न्यायालयाने

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ग. आ. देशमुख.....

सरकारचे कान उपटले. सरकार कुठल्या झोपेत आहे, असे त्यांनी सांगितले. अमरावती येथील आयुक्तांनी त्या भागामध्ये जवळजवळ 6 हजार गावामध्ये 50 पैशापेक्षा कमी पैसेवारी असताना दुष्काळी परिस्थिती जाहीर केलेली नाही. त्याबाबतीत सरकारने लवकरात लवकर निर्णय घ्यावा. त्यावर शासनाने दुष्काळ जाहीर न करता दुष्काळी गावांना ज्या सवलती मिळतात त्या देण्याचे गेल्या आठवड्यामध्ये जाहीर केले. जर दुष्काळी पैसेवारी किंवा रब्बी हंगामातील पैसेवारी जाहीरच केली नसेल, तर हे सरकार त्याबाबतीत केंद्राकडे केव्हा मदत मागणार आहे, केंद्राची समिती केव्हा येणार आहे आणि या भागातील दुष्काळी जनतेला केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारचे सहाय केव्हा मिळणार आहे. सरकार घोषणा करीत असले तर सरकारचे दुष्काळी भागातील शेतकऱ्यांकडे म्हणजेच तो खरीप पिकाचा भाग असो की, रब्बीचा भाग असो, त्याबाबतीत सरकार किती दुर्लक्ष करीत आहे, याचे हे उदाहरण आहे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी बरीच चर्चा झालेली आहे. तसेच मागणी देखील करण्यात आलेली आहे. दुभती जनावारे आठवड्याच्या बाजारामध्ये निम्म्या किमतीला देखील कोणी घेत नाहीत. नाईलाजाने त्यांची मिळेल त्या भावाने विक्री केली जात आहे. शेतकऱ्याजवळील दुभती जनावरे गेली तर ही जनावरे शेतकऱ्याला पुन्हा घेता येणार नाहीत. दुष्काळी भागामधील जे शेतकरी, शेतमजूर, लहान शेतकरी दुधाच्या धंद्यावर उपजिवीका चालवितात. त्या ठिकाणी जी परिस्थिती निर्माण होणार आहे, त्यामुळे तेथे छावण्या उभारण्याची आवश्यकता आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये आज एकही छावणी उघडण्यात आलेली नाही.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. गणपतराव देशमुख साहेब आपण म.वि.स. नियम 293 वरील चर्चेवर बोलत आहात. आपला विषय आणेवारी संदर्भातील होता.

श्री. ग. आ. देशमुख : मी दुष्काळी भागातील चर्चेवरच बोलत आहे. आपण प्रस्ताव बघावा.

तालिका अध्यक्ष : मी आपल्याला बोलण्यापासून रोखत नाही. मी आपल्या पूर्वी सन्माननीय सदस्य श्री. इम्तियाज़ ज़लील यांना बोलण्याची परवानगी दिली होती. ते आपल्या पाठीमागे बसले असून ते बोलण्यासाठी उभे राहिले होते. आपण उभे राहिल्यामुळे मी आपल्याला संधी दिली.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ग. आ. देशमुख : आपण मला बोलण्यासाठी परवानगी दिलेली आहे. ठीक आहे. मी आता माझे भाषण थोडक्यात संपवितो.

तालिका अध्यक्ष : ठीक आहे. आपण बोलावे.

श्री. ग. आ. देशमुख : अध्यक्ष महोदय, छावण्या उघडण्याचा प्रश्न आहे. दुष्काळच जाहीर केला नाही, तर छावण्या उघडण्याचा प्रश्नच येत नाही. आजच वर्तमानपत्रामध्ये मी बातमी वाचली. जिल्हा प्रशासनाने जाहीर केलेले आहे की, एक महिनाभर पुरेल एवढा चारा सोलापूर जिल्ह्यामध्ये आहे. कदाचित ती बाब खरीही असेल. नदी काठच्या भागामध्ये मोठे शेतकरी, बागायतदार शेतकरी यांच्याकडे चारा असेल. परंतु भूमिहीन शेतकऱ्यांकडे दुधासाठी जनावरे आहेत, लहान शेतकऱ्यांनी शेतात पेरल्यानंतर जिरायती भागात पाऊसच पडला नाही, त्यामुळे त्या शेतकऱ्यांकडे चारा कसा असणार आहे. सरकारची व प्रशासनाची छावण्या उघडण्यामध्ये उदासिनता आहे. यासंदर्भात सभागृहामध्ये किती वेळेस चर्चा करायची. मी परवा दिवशी आमच्या भागात गेलो असता, संपूर्ण सांगोले तालुक्यामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी एकही टँकर नाही. आताच सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अनेक वाड्या, वस्त्यावरील लोकांनी येऊन पिण्याच्या पाण्याच्या टंचाईबाबत अडचणी सांगितल्या.

...YY/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ग.आ.देशमुख.....

तेथील ग्रामस्थांनी पैसे जमवून टँकर सुरु केले आहेत परंतु शासनातर्फे टँकर सुरु करण्यात येत नाही. सांगोला व जत तालुक्यांची परिस्थिती सारखीच असताना जत तालुक्यामध्ये 93 टँकर आहेत. जिल्ह्यातील प्रशासनामुळे व शासनाच्या दुर्लक्षामुळे संपूर्ण सोलापूर जिल्ह्यामध्ये केवळ 14 टँकर सुरु आहेत. पावसाच्या सरकारी आकडेवारीनुसार निम्म्यापेक्षा अधिक पाऊस जिल्ह्यात पडलेला नाही. अक्कलकोट शहरात 15 दिवसाला एकदा पाणी पुरवठा करण्यात येत आहे. दोन दिवसानंतर या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे सत्र संपुष्टात येणार आहे. त्यामुळे अधिवेशन सत्र कालावधी समाप्तीपूर्वी मी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, रोजगार उपलब्ध करुन देण्याकरिता लोकांना काम देण्यासाठी केंद्र सरकारची योजना सुरु आहे व त्याच बरोबर राज्य शासनाची रोजगार हमी योजनाही सुरु आहे. रोजगार हमी योजनेकरिता या राज्यातील जनतेवर विशेषत: पगारदार नोकरांच्या वेतनावर व्यवसाय कर बसविण्यात आला आहे. माझ्याकडे दोन वर्षापूर्वीच्या उपलब्ध असलेल्या माहितीनुसार या व्यवसाय करातून दरवर्षी रोजगार हमी योजनेच्या कामावर खर्च करण्याकरिता 3000 कोटी रुपयांपेक्षा अधिक कर शासनाकडे जमा होतो. ज्यावेळी राज्यात रोजगार हमी योजना सुरु केली त्यावेळी विरोधी पक्षाने व्यवसाय कर, शेतीवरील कर, मोटारवरील कर, नागरी भागातील घरपट्टीवर कर बसविण्याकरिता संमती दिली होती. या करांच्या माध्यमातून जमा होणारी 3 हजार कोटी रुपयापेक्षा अधिक रक्कम रोजगार हमी योजनेच्या कामावर खर्च करण्यात यावी, अशी त्यावेळी व्यवस्था करण्यात आली होती. परंतु रोजगार हमीचा कर आपण जमा करीत आहोत, हे सरकार विसरुन गेले आहे. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून कामे मिळत नाहीत परंतु राज्याच्या रोजगार हमी योजनेमध्ये दुरुस्ती करुन दरवर्षी एप्रिल महिन्यामध्ये सदर योजनेकरिता 1,000 कोटी रुपये ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सदर निधीतून दुष्काळी योजनावर खर्च करण्यात यावा, अशी माझी मागणी आहे.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ग.आ.देशमुख.....

अध्यक्ष महोदय, मराठवाड्यातील लोक स्थलांतराने मुंबईमध्ये येत आहेत. त्यांना त्यांच्या गावामध्ये रोजगार मिळाला तर त्यांना मुंबईमध्ये येण्याची आवश्यकता भासणार नाही. दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी सरकारने प्रयत्न केले असले तरी ते तुटपुंजे आहेत. स्थलांतराने मुंबईत आलेल्या लोकांना तत्काळ शिधापत्रिका देण्यात याव्यात व त्यावर त्यांना 2 रुपये किलो गहू व 3 रुपये किलो तांदूळ या दराने माणसी 5 किलो धान्य देण्यात यावेत, अशी माझी सदनाच्या माध्यमातून मागणी आहे. तसेच, सरकारने राज्यातील 14 जिल्हे दुष्काळग्रस्त जाहीर केले आहेत. या जिल्ह्यातील गावामधील ज्या लोकांचे उत्पन्न 1 लाख रुपयांच्या आत आहे त्यांना 2 रुपये किलो गहू व 3 रुपये किलो तांदूळ या दराप्रमाणे माणसी 5 किलो धान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला तो दुष्काळी भागाला लागू करण्यात यावा, यामुळे लोकांचे स्थलांतर होणार नाही.

अध्यक्ष महोदय, दुष्काळी परिस्थितीत कायम स्वरुपी योजना व तात्पुरत्या दिलासा देणाऱ्या योजना अशा दोन योजना तयार करण्याची आवश्यकता आहे. दुष्काळाचे कायम स्वरुपी निर्मूलन करावयाचे असेल तर त्यावर "जलयुक्त शिवार" हा एक उपाय आहे. परंतु ज्या ठिकाणी 25-30 इंच पाऊन पडतो तेथे सदर योजनेचा चांगल्या प्रकारे उपयोग होणार आहे. सदर योजना चांगली असून ती सुरु राहिली पाहिजे. सिंचनाच्या संदर्भात वित्त मंत्री महोदयांनी सांगितले की आपण शेवटच्या क्रमांकावर आहोत. सरकारने सिंचनाकरिता यावर्षी साडे सात हजार कोटी रुपयांच्या आसपास तरतूद करण्यात आली आहे. परंतु नवीन निर्माण झालेल्या तेलंगणा राज्याने साडे तेवीस हजार कोटी रुपये तरतूद केली आहे. सदरहू निधीची तरतूद त्यांनी आपल्या राज्यातील गोदावरी नदीतून जाणारे पाणी अडवण्यासाठी केली आहे. आपल्या राज्याने मात्र केवळ 7 ते 8 हजार कोटी रुपये तरतूद सिंचनासाठी केली आहे, यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. जोपर्यंत आपण सिंचनाची टक्केवारी वाढवणार नाही तोपर्यंत दुष्काळावर चर्चा होतच राहणार आहेत. पाऊस पडणे न पडणे आपल्या हातात नाही. परंतु दुष्काळ पडला, अवेळी पाऊस पडला, दोन पावसांमध्ये अंतर पडले, गारपीटीमुळे दुष्काळ पडला तर त्यावर "सिंचन" हाच उपाय आहे. हा उपाय करण्यासाठी सरकारने कर्जरोखे काढावे, कर्ज काढावे. राज्यातील मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ग.आ.देशमुख.....

सुरु असलेल्या सिंचन प्रकल्पासाठी साधारणत: 70 ते 75 हजार कोटी रुपयांची आवश्यकता असून तेवढे कर्ज काढले तर ते प्रकल्प पूर्ण होतील.

अध्यक्ष महोदय, पहिल्या कृष्णा पाणी तंटा लवादाने टेंभू व म्हैसाळ येथील प्रकल्पातील प्रत्येकी 18 टीएमसी पाणी आपल्या वाट्याला दिले आहे. सदर पाणी आपण वापरु शकत नाही म्हणून ते आजही कर्नाटक व आंध्र प्रदेश राज्यात जाते. आपल्या राज्यात पिण्यासाठी पाणी नाही, जनावरांना पाणी नाही. परंतु आपल्याला उपलब्ध असलेले पाणी आपण न अडवल्याने खालील भागातील राज्यांना जाते, ही आपली अवस्था आहे.

अध्यक्ष महोदय, टेंभू योजनेतील पाणी 14 महिन्यापूर्वी सांगोला तालुक्यातील काही गावांना आले. पाटाच्या पाण्याने उपसा केले जाते त्यापेक्षा 10 पट अधिक वीजेचे बील आलेले असताना सुध्दा सरकारने ते भरण्याकरिता सांगितले. सांगोला तालुक्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्याने दीड कोटी रुपये वीजेचे बील भरले.

यानंतर ZZ-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ग. अ. देशमुख .....

10 गावांना पाणी येण्यासाठी वीजेचे सर्वच्या सर्व बील भरले. पण वीजेची यंत्रसामग्री होती ती सन 1996-97 सालात खरेदी केलेली होती. ती वारंवार बंद पडते, ती दुरुस्त करण्याची खबरदारी घेतली पाहिजे. तीच परिस्थिती म्हैसाळची आहे. शेतकरी वीजेचे बिल भरण्यास तयार आहेत. जे पाणी सध्या पाटाने वाहणाऱ्या पाण्यापेक्षा दहापट महाग पडते ते सुध्दा अशा दुष्काळी परिस्थितीमध्ये घ्यायला तयार आहेत. पण तेथील यंत्रसामग्री पूर्वीची जुनाट असल्यामुळे वारंवार बंद पडते, खंडीत होते, याचाही या ठिकाणी विचार केला पाहिजे. अधिक न बोलता यापूर्वी देखील चर्चा झालेली होती. त्यामुळे या बाबीचा विचार करुन या बाबतीत त्वरीत उपाययोजना करावी, एवढी विनंती करुन माझे दोन शब्द पूरे करतो.

2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री इम्तियाज जलिल (औरंगाबाद मध्य) : अध्यक्ष महोदय, संविधान ने आर्टीकल 21, "राईट टू लाइफ कहा है. सुप्रीम कोर्ट ने कई फैसले दिए है जिसके तहत राईट टू वॉटर को भी राईट टू लाइफ कहा गया है. क्या वजह है कि आज जीने का अधिकार, पानी के अधिकार से मराठवाड़ा को वंचित रखा गया है. पिछले 50 सालों का इतिहास देखेंगे तो हजारों, करोड़ रुपये नहीं तो हजारो, हजारों करोड़ रुपये मराठवाड़ा के पानी की योजना पर खर्च हुए है. लेकिन यह कितने अफसोस और शर्म की बात है कि आज एक बकेट पानी के लिए मेरी माँ-बहनों को तरसना पड़ रहा है. हम बड़े गर्व के साथ कहते है कि महाराष्ट्र प्रगतीशील राज्य है. हम विकसित राज्य कहते है. बड़े गर्व के साथ हम कहते है कि मेक इन महाराष्ट्र के एक सम्मेलन में हम आठ लाख करोड़ रुपये का इन्वेस्टमेंट इकट्ठा कर सकते है. इसी मराठवाड़ा की सच्चाई यह भी है कि आज एक बकेट पानी के लिए हम तरसते है. यह सच्चाई है. बड़े शर्म की बात है कि आज इतने हजारों, करोड़ रुपये खर्च करने के बाद भी आज हमें इस तरह की स्थिति देखने को मिल रही है. लोगों को प्यासा रखकर किस तरह से पानी का कारोबार किया जाता है, इसकी जिंदा मिसाल मैं औरंगाबाद शहर के बारे में बताना चाहूंगा.

अध्यक्ष महोदय, 20 सालों के लिए औरंगाबाद शहर का पूरे पानी का ठेका, पीने के पानी का हो या औरंगाबाद शहर में कहीं पर भी किसी तरह पानी का इस्तेमाल होगा, इसका ठेका एक प्राईव्हेट कॉन्ट्राक्टर को दे दिया गया है. एमपीएमएल नाम की एक कंपनी है. झी न्यूज चलाने वाले...श्री सुभाष अग्रवाल नाम की इनकी कंपनी है. उन्हें यह ठेका 20 सालों के लिए दे दिया गया है. इस बारे में बहुत विरोध किया गया. लेकिन कंपनी बहुत ताकतवर है. कॉन्ट्राक्टर बहुत ताकतवर है. इतनी ताकत है कि जिसने भी इसका विरोध किया उसे खरीद लिया गया. यह वहीं कंपनी है जो सन 2011 में उत्तर प्रदेश जल निगम ने इसे ब्लॅकलिस्ट किया था. क्या वजह है कि जिस कंपनी को युपी ने ब्लॅकलिस्ट घोषित किया था, उसे महाराष्ट्र सरकार ने कैसे कबूल कर लिया ? आप यह अच्छी तरह से जानते है कि इसे क्यों कबूल किया गया है ? 350 करोड़ रुपये की स्कीम शुरु की गई थी. पेपर पर 350 करोड़ रुपये बताए गए थे. अभी काम पूरा भी नहीं हुआ है और अब यह स्कीम एक हजार करोड़ रुपये से ज्यादा की हो गई है. कैसे हो गई है ? यह

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री इम्तियाज जलिल.....

वैसे ही हुई है जिस तरह से इरीगेशन की कोई स्कीम 5 हजार करोड़ रुपये से शुरु होती थी और 50 हजार करोड़ रुपये तक जाती थी. यह जो घपले होते थे, उसी के तहत यह भी काम किया गया है.

अध्यक्ष महोदय, आपको यह सुनकर बड़ी हैरानी होगी कि औरंगाबाद शहर में ही सरकार का एक विभाग है. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग है. 200 इंजीनियर्स और उनके साथ तमाम अधिकारी और कर्मचारियों ने अनशन किया, आंदोलन किया. उनकी यह मांग थी कि पिछले कई सालों से हमारे पास कुछ काम नहीं है. सरकारी अधिकारी और कर्मचारी कह रहे है कि हमारे पास कोई काम नहीं है. हम सरकार की फुकट में पगार ले रहे है, हमें काम दीजिए. ये लोग पानी के मामले में एक्सपर्ट है. आप उनका इस्तेमाल नहीं करते है और एक प्राईव्हेट कॉन्ट्राक्टर का एक हजार करोड़ रुपये की स्कीम उनको दे देते है. वे फुकट में पगार ले रहे है. सरकार से गुहार लगा रहे है कि हमें कुछ काम दीजिए. इस स्कीम का समांतर नाम है. गहराई से देखेंगे तो आपको पता चलेगा कि इस स्कीम में सिवाय भ्रष्टाचार के कुछ भी नहीं है. श्री सुनील केंद्रकर नाम के एक बहुत ही इन्टेलीजेंट, ईमानदार म्युनिसिपल कमिश्नर औरंगाबाद से गए है. उन्होंने अदालत में एक एफिडेविट दिया है. एफिडेविट में उन्होंने कहा है कि यह स्कीम औरंगाबाद महानगरपालिका ने चलानी चाहिए. यह काम कॉन्ट्राक्टर को नहीं देना चाहिए. लेकिन क्या वजह है कि वहां पर सरकार में बैठे भाजप के या शिवसेना के लोग हो, ये लोग कोई फैसला नहीं कर रहे है. यहाँ से फर्मान जाता है कि नहीं. एक हजार करोड़ रुपये की स्कीम है. औरंगाबाद महानगरपालिका इस पर फैसला ले. आप फैसला क्यों नहीं लेते है ? इसलिए आप फैसला नहीं लेते है क्योंकि इसमें बहुत सारा पैसा इन्वॉल्व है.

अध्यक्ष महोदय, सन 2014 के महाराष्ट्र ॲन्युअल इकॉनॉमिक रिपोर्ट में बताया गया है कि औरंगाबाद जिले में 42 प्रतिशत आबादी स्लम एरिया में रहती है. यदि आप पानी का कॉन्ट्राक्ट किसी एक प्राईव्हेट कॉन्ट्राक्टर को दे देंगे, पूरे पानी की चाबी उसके हाथ में आ जाएगी तो वह किस तरह से अपनी दादागिरी करेगा और वह दिन दूर नहीं जब मराठवाड़ा में, लातुर में सेक्शन 144 लगाने की जरूरत नहीं रहेगी. सिर्फ परभणी में यह सेक्शन लगाने की जरूरत नहीं रहेगी. हर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री इम्तियाज जलिल.....

पानी की टाकी पर पुलिस का पहरा देना पड़ेगा. प्राईव्हेट कॉन्ट्राक्टर ने जो सालाना टैक्स 1800 रुपये होता था उसे बढ़ाकर 3300 रुपये कर दिया. इस बारे में सरकार खामोश है. दिनांक 30 अक्तुबर, 2015 को मानसून वापस चला गया था. मानसून खत्म हो गया था. दिनांक 1 अक्तुबर, 2015 को सरकार को पता था कि आने वाले समय में महाराष्ट्र में और मराठवाड़ा में अकाल की स्थिति बहुत गंभीर रहने वाली है. आप 6 महीने तक खामोश कैसे रहे ? अभी आपकी ट्रेन धीरे धीरे निकलकर मिरज तक पहुंची है. आप उसमें पानी कब भरेंगे ? आप लातुर में कब पानी देंगे ? यह सरकार 6 महीने पहले क्यों तैयारी नहीं कर सकती थी ? केवल सरकार ने ही हमारे साथ नाइन्साफी नहीं की है, कुदरत भी मराठवाड़ा के साथ कुछ न कुछ जरुर नाराज नज़र आ रहा है. इसीलिए मराठवाड़ा एक नेचरल बेल्ट, अकाल के रेंज में आया है. यदि मराठवाड़ा का विकास करना है, कई सालों से यही स्थिति है, हमारे यहाँ अकाल की परिस्थिति उत्पन्न होती रहेगी तो आपको दूसरे उपाय खोजने होंगे. मराठवाड़ा में टूरिजम का बहुत बड़ा पोटेन्शियल है. लेकिन हम उसका एन्कॅश नहीं करना चाह रहे है. इंडस्ट्रीलाइजेशन को जब भी बढ़ावा देने की बात आती है, तो उसको कभी पश्चिम महाराष्ट्र में लेकर जाते है, कभी मुंबई लेकर चले जाते है. मराठवाड़ा में इंडस्ट्रीलाइजेशन को यदि आप बढ़ावा देंगे तो आपने यह करना चाहिए कि हर किसान के एक लड़के को, लड़की को इंडस्ट्री में नौकरी देना कम्पलसरी कीजिए ताकि अकाल की नौबत आए तो कम से कम उसका चुल्हां तो जल सके. इंडस्ट्री के जरिए वह अपनी रोजी-रोटी चालू रख सके. लेकिन आप कुछ नहीं कर रहे है.

अध्यक्ष महोदय, सम्माननीय सदस्य श्री हेमंत पाटील जी ने एक मुद्दा कहा है कि मराठवाड़ा के साथ इन्साफ कभी नहीं हुआ है. आज इस सदन में मराठवाड़ा के गंभीर विषय पर चर्चा हो रही है तो देखिए कि कितने लोग इसमें शामिल है. क्या मराठवाड़ा इस महाराष्ट्र का हिस्सा नहीं है ? क्या मराठवाड़ा के लोगों ने इन्साफ की बात नहीं करनी चाहिए ? जब भी मराठवाड़ा के विषय पर चर्चा होती है तो कोई भी सुनने के लिए तैयार नहीं है. ना आप सुनने के लिए तैयार है और न कुदरत हमारी बात सुनने के लिए तैयार है. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

11-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) ZZ-5

PPD/ AKN/ MMP/ 19:50

श्री. अमित देशमुख (लातूर शहर) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विधानसभा नियम 293 अन्वये प्रस्तावावरील चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठ मी उभा आहे. या ठिकाणी दोन प्रस्तावावर एकत्रित चर्चा होत आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. मराठवाडा, विदर्भ या दोन्ही प्रदेशांच्या मागासलेपणाच्या संदर्भात या सदनामध्ये अनेकवेळा या ठिकाणी चर्चा झालेली आहे.

AAA-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित देशमुख.....

मराठवाडा, विदर्भ तसेच महाराष्ट्रातील अनेक भागातील दुष्काळी परिस्थितीला सारेच तोंड देत आहोत. विशेषत: मराठवाड्यामध्ये धरणातील पाण्याची पातळी नुसती खोलावली नाही तर या धरणांमध्ये आता आपल्याला पाणीच पाहायला मिळत नाही अशा परिस्थितीला आपण सामोरे जात आहोत. गेल्या पाच वर्षापासून दुष्काळाची परिस्थिती मराठवाड्यामध्ये आपण अनुभवत आहोत. लातूर, बीड, उस्मानाबाद या जिल्ह्यांमध्ये सर्वात कमी पर्जन्यमान अलीकडच्या काळामध्ये आपल्याला पाहायला मिळाले. धरणे, नद्या, साठवण तलाव, विहिरी हे सर्व कोरडे पडलेले आहेत. विंधन विहिरींना सुध्दा पाणी उपलब्ध होत नाही. अशा बिकट परिस्थितीमध्ये मराठवाडा जाऊन पोहचलेला आहे. या सगळ्या परिस्थितीमध्ये दुष्काळाला तोंड देण्यासाठी राज्य सरकारकडून सढळ हाताने मदत होणे अपेक्षित होते, त्या सढळ हाताने मदत झाली नाही. अशी खंत मला या चर्चेच्या निमित्ताने व्यक्त करावीशी वाटते. मराठवाड्यामध्ये जवळपास 45 टक्के लागवड क्षेत्र आहे. त्या तुलनेत पाण्याचा वाटा हा फक्त 25 टक्के आहे. मराठवाड्याला उपलब्ध्या आहेत हे या चर्चेमधून नोंदवू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, लातूरच्या पाणी प्रश्नाबाबत खूप चर्चा होत आहे. जगभरातील माध्यमांनी लातूरच्या पाणी पुरवठ्याच्या संदर्भामध्ये नोंद घेतली आहे. यामध्ये प्रसार माध्यमे तसेच सभागृहातील चर्चेच्या माध्यमातून मागच्या सरकारने काय केले असे सुध्दा मुद्दे अलिकडच्या काळात उपस्थित करण्यात आले. या चर्चेत, राजकारणामध्ये न पडता आज आपल्याला काय करण्याची आवश्यकता आहे याकडे लक्ष देण्याची गरज आहे. आज रेल्वेने लातूरला पाणी पोहचते आहे अशी बातमी प्रसिध्द होत आहे. महाराष्ट्र सरकारचे मी लातूरला रेल्वेने पाणी पुरवठा केल्याबद्दल आभार व्यक्त करतो. त्याचबरोबर गेली 15 महिने लातूरच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाबाबत अनेकदा राज्य सरकारचे लक्ष वेधण्याचा आम्ही प्रयत्न केला. पण सरकारच्या वतीने समजा सहा महिन्यापूर्वीच पाण्यासाठी रेल्वे सुरु केली असती तर आज ही वेळ आली नसती. सन्माननीय सदस्य श्री.इम्तियाज जलिल यांनी त्यांच्या भाषणामध्ये हा मुद्दा उपस्थित केला. आता आपण एप्रिलच्या मध्यंतरी आलेलो आहोत. हे फार पूर्वीच व्हायला हवे होते. राज्य सरकारच्या वतीने या उन्हाळ्यामध्ये लातूर शहराचा प्रश्न नाही तर लातूर शहरातील जी हजारो गावे आहेत त्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित देशमुख.....

गावांमध्ये सुध्दा हीच परिस्थिती आहे. उस्मानाबाद, बीड जिल्ह्यामध्ये हीच परिस्थिती आहे. म्हणून राज्य सरकारच्या वतीने विशेषत: लातूर शहराची लोकसंख्या 5-6 लाखाच्या घरात आहे. लातूर महानगरपालिकेने जो पाणीपुरवठा केला त्यावर लातूर शहर महानगरपालिकेला तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना करायच्या होत्या. त्याची मागणी लातूर महानगरपालिकेने राज्य सरकारकडे केली. त्याला परवानगी देण्यात आलेली नाही. डोंगर गावावरून जलवाहिनी लातूर शहरापर्यंत नेणे. माकडी धरणापासून लातूर शहरापर्यंत जलवाहिनी नेणे याला परवानगी त्या काळामध्ये देण्यात आली नाही.

अध्यक्ष महोदय, जिल्हा प्रशासनाने 144 कलम लातूर, परभणीमध्ये लागू केले, जारी केले. जी आवश्यकता नव्हती. ज्या शहरामध्ये 15-15 दिवस महिना-महिना पाणी पुरविले जात नाही. तेथे एखादे टँकर येते म्हटल्यावर नागरिक रांगा लावणार हे साहाजिक आहे. कुठेही अडचणीची परिस्थिती निर्माण झाली आणि कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली. पण जिल्हा प्रशासनाने कलम 144 जारी करणे यासंदर्भात सुध्दा घाई केल्यासारखे दिसत आहे हे सुध्दा या चर्चेमध्ये नमूद करावेसे वाटते. जे नागरिक, ग्रामस्थ पाणी खाजगी टँकरने घेतात त्या खाजगी टँकरचे दर आज काय आहेत याची सुध्दा राज्य सरकारला कल्पना नाही. माननीय पाणी पुरवठा मंत्री याठिकाणी आहेत. आपल्याकडून अपेक्षा होत्या की, जिल्हा प्रशासनाला, जिल्हा परिषद, महानगरपलिकेला सूचना जायला हव्या होत्या आणि टँकरचे दर नियंत्रित ठेवण्यासंदर्भात आपल्या सूचना जाणे आवश्यकत होते. जे 200 ते 300 रुपयांना टँकर उपलब्ध होत होते ते आज 1200 ते 1500 रुपयाला मिळायला लागले. आज 10-15 हजार रुपये महिन्याला शहरातील नागरिक आणि गावातील ग्रामस्थ या पाण्यावर खर्च करीत आहे. त्याच्या समोर दुसरा कुठलाही पर्याय नाही. यासंदर्भामध्ये अजूनही वेळ गेलेली नाही. मंत्री महोदयांकडून अशी अपेक्षा आहे की, तातडीने हे टँकरचे जे दर आहेत, ते शासनाच्या दराप्रमाणे खाजगी टँकर पुरवठादाराने सुध्दा पाणी पुरवठा करावा ही एक विनंती यानिमित्ताने करु इच्छितो.

अध्यक्ष महोदय, दुष्काळी भागामध्ये बाटलीबंद पाणी सर्वत्र उपलब्ध आहे. ड्रिंकिंग वॉटर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित देशमुख.....

पॅकेज उपलब्ध आहे आणि याला आमचा विरोध नाही. राज्य सरकारच्या वतीने त्याच्यावर जे कर आहेत ते कर दुष्काळी भागामध्ये राज्य सरकारला विशेष बाब म्हणून रद्द करता आले तर ते पाणी थोडेसे माफक दरात उपलब्ध होऊ शकेल. यासंदर्भात राज्य सरकारने विचार केला पाहिजे. पाण्याचा वापर, उपयोग कशा पध्दतीने करावा यासंदर्भात सुध्दा खूप चर्चा होते. पिण्यासाठी, शेतीसाठी, उद्योगासाठी जी पाण्याची पध्दत आहे त्या पध्दतीमध्ये सुध्दा बदल आणण्याची आवश्यकता आहे. या चर्चेच्या माध्यमातून सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो, माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. आता पाण्याचा उपयोग ज्या पीकांना पाणी प्रमाणापेक्षा अधिक लागते. त्या पीकांना सुक्ष्म सिंचनाने पाणी पुरवठा देणे हे राज्य सरकारला कायद्याने बंधनकारक करता आले तर मला वाटते ही परिस्थिती पुन्हा कदाचित उद्‌भवणार नाही आणि पाण्याचा शास्त्रीय पध्दतीने उपयोग मराठवाड्यामध्ये नव्हे तर महाराष्ट्रामध्ये झाला पाहिजे. यामध्ये अनेक पीके आहेत. ऊस या पीकाची चर्चा होत आहे. या पीकाला सुध्दा सुक्ष्म सिंचन कायद्याने बंधनकारक करा. केळी, हळद, अद्रक अशी अनेक पीके आहेत. या संदर्भामध्ये सुध्दा सरकारने विचार करावा अशी मी यानिमित्ताने विनंती करणार आहे.

3B-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित देशमुख

साखर कारखाण्याचा उल्लेख झाला. साखर कारखान्यांनी पाणी पळवले अशी सुध्दा चर्चा या महाराष्ट्रामध्ये घडते आहे. साखर कारखाने सुरु करण्याची परवानगी राज्य सरकारने दिली. राज्य सरकारने पहिल्यांदा पिण्यासाठी पाणी राखून ठेवले. दुसऱ्यांदा शेतीला, तिसऱ्यांदा उद्योगाला पाणी दिले गेले ही चर्चा दुर्दैवाने उपस्थित होते आहे. दुष्काळी भागामध्ये साखर कारखाने सुरु करावेत किंवा नाही, हा निणर्य राज्य सरकारने या आधीच घेतला असता तर बरे झाले असते. किमान या अनावश्यक चर्चेमध्ये तरी आपण सहभागी झालो नसतो. येणाऱ्या काळामध्ये कुठल्या जिल्हयांमध्ये किती पाऊस पडतो, तिथल्या किती कारखान्यांना परवानगी द्यायची. यासंदर्भात राज्य सरकारने विचार केला पाहिजे. दुष्काळाची चर्चा फक्त या सभागृहात होत नाही तर सुप्रिम कोर्ट, हाय कोर्टापर्यंत दुष्काळाची चर्चा झालेली आहे. राज्य सरकारवर या कोर्टांनी ताशेरे ओढलेले आहेत. या येणाऱ्या काळामध्ये, येणाऱ्या काही महिन्यांमध्ये जलद उपाययोजना राज्य सरकारच्या वतीने केल्या पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या याचा उच्चांक महाराष्ट्रामध्ये गाठला आहे. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे अशी मागणी लावून धरली. फक्त शेतकऱ्यांना पॅकेज जाहीर करण्यात आले. शेतकऱ्यांचे खऱ्या अर्थाने कर्जमाफ झाले पाहिजे. हे सुध्दा मला या चर्चेच्या निमित्ताने नोंदवावेसे वाटते. मी अनेकवेळा या सभागृहामध्ये हा मुद्दा उपस्थित केला आहे. या दुष्काळामुळे फक्त पिण्याच्या पाण्याची चर्चा होते ती योग्य आहे. त्याच बरोबर अनेक रोजगार बंद पडले आहेत. बेरोजगारी वाढत चालली, व्यवसाय ठप्प झाला आहे. व्यवहार बंद पडले. मराठवाडयातील विदर्भातील दुष्काळी भागाचा आर्थिक कणा मोडला आहे. या सर्व दुष्काळी भागांना पुन्हा आपल्या पायावर उभे करण्यासाठी केंद्र सरकारने अनेक राज्यांना पॅकेजेस् जाहीर केले. बिहारला पॅकेज जाहीर केले. बिहारच्या धर्तीवर मराठवाडयातील दुष्काळी भागाला काही पॅकेज जर राज्य सरकारला आणि केंद्र सरकारला देऊ करता आले तर दुष्काळी भागामध्ये मदत झाल्या सारखे होईल. दुष्काळी कर राज्य सरकारने लावला. हा दुष्काळी कर दुष्काळी भागावरच लावण्यात आला.

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित देशमुख.....

अशा प्रकारचे वेगळेच चित्र राज्य सरकारच्या वतीने पाहायला मिळाले. मराठवाडयाच्या हक्काचे पाणी आदरणीय श्री.विलासराव देशमुख साहेबांनी पिण्याचे 25 टी.एम.सी.पाणी मराठवाडयाला देऊ केले हे आपल्याला माहिती आहे. त्याच बरोबर 14 टी.एम.सी. पाणी गोदावरी खोऱ्यातून तेलंगणाला गेले. ते पाणी पुन्हा गोदावरीच्या खोऱ्यात आणण्याच्या संदर्भात मंत्री महोदयांनी लक्ष घालावे. मराठवाडयाच्या हक्काचे पाणी हे तेलंगणातून महाराष्ट्राला आणि मराठवाडयाला उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात पावले उचलावीत ही मागणी मी नोंदवतो. या चर्चेमध्ये मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभार व्यक्त करतो.

.....

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भीमराव धोंडे (आष्टी) : अध्यक्ष महोदय, मराठवाडयामध्ये नेहमी दुष्काळ पडतो. हा दुष्काळ सातत्याने अनेक स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये 1972, 1982 साली दुष्काळ होता. परंतु आजचा दुष्काळ तो अत्यंत तीव्र आहे. मोठया प्रमाणामध्ये सुखसोयी निर्माण करण्याची अपेक्षा आहे. मी आपल्या माध्यमातून या ठिकाणी सांगू इच्छितो की, मराठवाडयामध्ये एवढा मोठा दुष्काळ असताना मजूरांची संख्या कामावर किती आहे. पहिल्यांदा असे होते आहे की, एवढा मोठा दुष्काळ असताना मजूरांची संख्या काही हजार आहे. बीड जिल्हयामध्ये फक्त 12000 लोक रोजगार हमीच्या कामावर आहेत. अनेक सदस्यांनी मागणी केली की, महाराष्ट्र राज्याची रोजगार हमी योजना ती आपण सुरु करावी, आणि मोठया प्रमाणामध्ये मजूरांना काम देण्याचा प्रयत्न करावा.

अध्यक्ष महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, सभागृहाच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मराठवाडयातील लोक पुण्याला, मुंबईला, नाशिकला, औरंगाबादला, चाकनला स्थलांत्तरीत होत आहेत. माझ्या मतदार संघात जनावरांच्या छावण्या मोठया प्रमाणात आहेत. तेथे 150 छावण्या आहेत. तेथे 250 टँकरने पाणीपुरवठा होतो. परंतु तिथल्या माणसाच्या हाताला काम नाही. या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, 60 वर्षाच्या पुढच्या माणसाला वेतन देणार आहोत असा कायदा केला आहे. एक तर त्याला पैसे द्यावेत किंवा माणसाच्या छावण्या काढण्याची वेळ आली तर ती सुध्दा काढा. पुनर्वसन कॅम्प सुर करावेत. ज्या वेळी आपत्ती येते तेव्हा आपण माणसांचे पुनर्वसन कॅम्प तयार करत असतो. या प्रचंड दुष्काळामध्ये माणसांच्या छावण्या निर्माण करा. त्यांचे पुनर्वसनाचे कॅम्प उजणीच्या बॅक वॉटर जवळ करा, गोदावरीलच्या बॅक वॉटर जवळ करा जेथे कोठे पाणी असेल त्या ठिकाणी हे काम करुन दुष्काळी भागातील माणसांना जगवण्याचे काम शासनाने करावे या निमित्ताने माझी मागणी आहे की, अनेक अनाथ आश्रम आहेत. अनेक दुर्लक्षित लोक आहेत. रोजगार हमी योजनेचे काम नाही अशा वेळी ही योजना करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

.....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भीमराव धोंडे.....

अध्यक्ष महोदय, ऊस कारखाने बंद झालेले आहेत. ऊस तोडणी कामगार बेकार झालेले आहेत. जनावरांच्या छावण्यांमध्ये प्रति जनावर 70 रुपये देण्यात येते. आताच सन्माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख सोलापूरच्या चाऱ्याबाबत बोलले. सर्व छावण्यांना ऊस सोलापूरमधील उजनीच्या बॅक वॉटरच्या पाण्याचा येतो. तिथल्या जिल्हाधिकाऱ्याने तो चारा बंद केलेला आहे. सोलापूरमधील उजनीच्या बॅक वॉटरला किंवा जेथे जनावरांचा चारा उपलब्ध असेल तो छावण्यांवाल्यांना विकत घेता आला पाहिजे. तो कृपया कोणी अडवू नये. अशा प्रकारची विनंती करतो. मोठया जनावरांसाठी जो वाढलेला खर्च आहे. त्यासाठी 100 रुपये आणि छोटया जनावरांसाठी 70 रुपये करावेत. अशा प्रकारची मागणी करतो. महाराष्ट्रात चार बँकाना सरकारने पैसे दिलेले आहेत. दुष्काळी परिस्थितीमध्ये जिल्हा बँकेचे कामकाज बंद आहे. ज्याप्रमाणे इतर बँकांना पैसे दिले त्याप्रमाणे 250 कोटी रुपये हया बँकेलाही द्यावेत.

अध्यक्ष महोदय, वडार समाजाचे लोक 1972 च्या दुष्काळाचा कोणीतरी उल्लेख केला. खडी फोडण्याचे काम सुरु होते. आज वडारी, कैकाडी समाजाला कुठल्याही प्रकारचे काम त्यांच्या हाताला नाही. म्हणून खडी सेंटर मोठयाप्रमाणात सुरु करावेत अशा प्रकारची विनंती आहे. या सर्व गोष्टींवर उपाययोजना म्हणून जेवढे पाझर तलाव असतील लघुसिंचन तलाव असतील, मध्यम तलाव असतील या सर्व तलावातील गाळ काढण्याचे काम या दुष्काळामध्ये व्हावे अशा प्रकारची विनंती करतो. आष्टी तालुक्यामध्ये 65 गावची नळ योजना आहे. त्याला मान्यता द्यावी. त्याच प्रमाणे शिरुर गाव, चाळीस गावच्या नळ योजनेलाही मान्यता द्यावी. या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.देशमुख यांनी म्हटल्याप्रमाणे दुष्काळ हटविण्यासाठी स्वतंत्र मराठवाडयासाठी पॅकेज द्यावे, अशा प्रकारची मी शासनाला विनंती करतो. मराठवाडयातील एकही प्रोजेक्ट पंतप्रधान सिंचन योजनेत घेण्यात आलेला नाही. त्यामध्ये कृष्णा खो-याचा प्रोजेक्ट घेऊन तो पंतप्रधान सिंचन योजनेमध्ये समाविष्ठ करावा. माझ्या जिल्हयाला पिण्यासाठी पाणी नगर जिल्हयातून आणावे लागते. पाणी भरायला कुठे जागा नाही. कुठल्या विहीरीला पाणी नाही.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय भांबळे (जिंतूर) : अध्यक्ष महोदय, नियम 293 अन्वये प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे. मराठवाडयात गेल्या तीन वर्षांपासून पाऊस न पडल्यामुळे सातत्याने दुष्काळाची छाया निर्माण झालेली आहे. पाऊस न पडल्यामुळे माणसांना व जनावरांना पिण्याचे पाणीही मिळत नाही. पाणी टंचाईमुळे परभणी व लातूर जिल्हयात 144 कलम लागू केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, मी शासनाचे काही गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो. मराठवाडयात दुष्काळ पडलेला आहे. सहा महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री महोदय यांनी मराठवाडयातील दुष्काळाची पाहणी केलेली आहे. यामध्ये बीड, उस्मानाबाद, परभणी, हिंगोली या 4-5 जिल्हयाचा मुख्यमंत्री महोदयांनी दौरा केला होता. जिल्हयातील शेतकऱ्यांनी त्यांच्यासमोर व्यथा मांडल्या. लोकांनी सांगितले की, आम्हाला पिण्याचे पाणी मिळत नाही. काही शेतकऱ्यांनी सांगितले की, येथे चारा छावण्या सुरु कराव्यात. काही शेतकऱ्यांनी सांगितले की, एमआरईजीएसच्या माध्यमातून आमच्या हाताला काम द्यावे. काही शेतकऱ्यांनी सांगितले की, आमची कर्जमाफी करावी. अशा अनेक शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. मुख्यमंत्री महोदयांनी नांदेडला एक बैठक घेतली. या बैठकीला आपणसुध्दा उपस्थित होता. तेव्हा सांगण्यात आहे की, आम्ही लवकरात लवकर कॅबिनेटसमोर जाऊन परभणी, नांदेडसारख्या ठिकाणी चारा छावण्या सुरु करण्याचा निर्णय घेऊ. सहा महिन्यापूर्वी परभणी व लातूरमध्ये चारा छावण्या सुरु करण्याचा निर्णय घेतला. परभणी जिल्हयाचे रेकॉर्ड मागवावे, त्यात तुम्हाला असे दिसेल की, तेथे एकही चारा छावणी या सहा महिन्यात सुरु झालेली नाही. माझ्या मतदारसंघात आडगाव नावाचे गाव आहे. तेथे 500 जनावरे, 500 शेतकरी व त्यांची 500 मुले यांनी नांदेड परभणी राज्य महामार्ग चार तास अडविला. जनावरांच्या पोटामध्ये पाणी नाही, चारा नाही. त्यामुळे तेथे एक जनावर दगावले गेले. याची संपूर्ण माहिती जिल्हाधिकारी यांना कळविली. मी सुध्दा जिल्हाधिकारी यांचेशी फोनवर बोललो. आडगाव बाजार येथे आठ दिवसाच्या आत चारा छावणी सुरु करु असे आम्हाला त्यांनी आश्वासन दिले. यानंतर आडगाव येथील रस्त्यांवरुन सर्व शेतकरी बाहेर गेले. आज या रस्ता रोकोला दीड महिना पूर्ण झालेला आहे. आपण जनावरांना पिण्याचे पाणी, चारा देऊ शकत नाही तर ही किती गंभीर बाब आहे. म्हणून मी सरकारला विनंती करतो की, परभणी जिल्हयामध्ये 52 मंडळे आहेत, या 52 मंडळवाईज एक-एक चारा छावणी सुरु करण्यात यावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय भांबळे .....

मराठवाडयात मजूरांच्या स्थलांतराचा अतिशय गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. या गोष्टीचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश मुंदडा यांनी केलेला आहे. आज परभणी, गंगाखेड, पाथरी, जिंतूर, हिंगोली, नांदेड येथे पाहिले तर लक्षात येईल की, तेथील 50 टक्के शेतकरी वर्ग बाहेरगावी कामासाठी गेलेला आहे. मुंबईपासून अहमदनगरपर्यंत विविध कार्यक्रमाच्या व लग्नाच्या निमित्ताने आम्ही फिरतो तेव्हा अनेक लोक भेटतात व ते परभणी, नांदेड, जालना येथील मुळचे असल्याचे सांगतात. म्हणजे 50 टक्के लोक आज मराठवाडा सोडून बाहेरगावी कामाला चालले आहेत. याचे एकच कारण म्हणजे सरकारचे अपयश आहे. स्व.वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना आमचा जन्मही नव्हता. त्यावेळी असा काळ होता की, सर्वसामान्य मजूराने काम मागितल्यास त्याला तत्काळ काम मिळायचे. म्हणून मी सरकारला सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने आग्रहाची विनंती करतो की, राज्याची जुनी रोजगार हमी योजना सुरु करण्यात यावी. आमच्या परभणी जिल्हयामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत या खरीपाच्या अनुदानाचे पैसे जमा झालेले आहेत. एक गावाला अनुदान मिळण्यासाठी 15 दिवस लागत आहेत. आम्ही शेवटच्या गावाचा हिशोब काढला. या शेवटच्या गावाला ऑगस्ट, सप्टेबरमध्ये पैसे मिळणार आहेत. आता एक-दीड महिन्यावर पेरण्या आलेल्या आहेत. जर शेवटच्या गावाला चार महिन्यानंतर पैसे मिळणार असतील तर त्यांनी कोठून पेरण्या करायच्या ? शासनाने निर्णय घ्यावा की, जो पैसा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे दिलेला आहे त्यातील काही पैसा राष्ट्रीयकृत बँकेकडे वर्ग करावा, काही खाजगी बँकेकडे वर्ग करावा. या माध्यमातून अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घ्यावा अशी मी विनंती करतो. अनुदान वाटप करते वेळेस शेतकऱ्याच्या खात्यामध्ये जमा झालेल्या पैशातून प्रत्येकी 1000 रुपये जिल्हा बँक कपात करीत आहे. शेतकऱ्यांचे 1000 रुपये कपात करण्याचा हा कोणता नियम आहे ? म्हणून यामध्ये सरकारने लक्ष घालावे व ही कपात करु देऊ नये अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मागील दीड वर्षांपासून आमच्या जिल्हयातील सिंचनाची सर्व कामे बंद झालेली आहेत. माझ्या मतदारसंघात कर्पुरा व दुधना या दोन नद्या आहेत. या नद्यांवर कोल्हापूर पध्दतीचे बंधारे करावेत म्हणून आम्ही सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. यामध्ये सरकारने निर्णय घेऊन दोन्ही ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे मंजूर करावेत अशी विनंती करतो व थांबतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) : अध्यक्ष महोदय, नियम 293 अन्वये प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी मला आपण अनुमती दिल्याबाबत मी मनापासून आपले आभार मानतो. माझी विनंती आहे की, मला 10 मिनिटे बोलू द्यावे.

अध्यक्ष महोदय, आज मराठवाडयावर चर्चा करीत असताना मला दुर्दैवाने येथे नमूद करावेसे वाटते की, भारत 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र्य झाला. मराठवाडयाला एक वर्ष उशीरा स्वातंत्र्य मिळाले. दिनांक 17 सप्टेबर 1948 रोजी मराठवाडयाला स्वातंत्र्य मिळाले. आम्ही 1 वर्ष उशीरा स्वातंत्र्य झालो. आज सभागृहातील परिस्थिती पाहत असताना मला संत तुकाराम महाराजांच्या किर्तनाची आठवण येते. घोंगडी अडकल्यामुळे त्यांच्या किर्तनाला एक घोंगडीवाला बसला होता तसे आम्ही येथे फक्त मराठवाडयाचे सदस्य आज बसलो आहोत. तशी आमची घोंगडी अडकली आहे म्हणून आम्ही व आपण बसलेलो आहेत. माझी विनंती आहे की, आपण कधी तरी मराठवाडयाला गांभीर्याने घेणार आहात की नाही ?

यानंतर 3D-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत पाटील...

आज सभागृहात महत्त्वाची चर्चा मांडलेली आहे. नागपूर करारामध्ये ज्याप्रमाणे विदर्भाने उप राजधानीचा दर्जा व वर्षभरातील एक तरी अधिवेशन नागपूर येथे घेण्याबाबतची अट टाकलेली आहे. अशा प्रकारची कोणतीही अट मराठवाडयाने संयुक्त महाराष्ट्रात सामील होताना टाकलेली नाही. मराठवाडा संयुक्त महाराष्ट्रामध्ये विनाअट सामील झालेला आहे. पूर्वी संभाजी नगर येथे कमीत कमी एकतरी मंत्रिमंडळाची बैठक होत होती. गेल्या दोन वर्षापासून ती बैठक होत नाही,ती तातडीने व्हावी याची शासनाने गांभीर्याने नोंद घ्यावी. मराठवाडयात सिंचन व कृषी क्षेत्रातील अनुशेष जास्त आहे. या संदर्भातील जोपर्यंत बैठका होणार नाहीत, तोपर्यंत आमच्या मागासलेपणावर शेतक-यांच्या आत्महत्येवर गांभीर्याने चर्चा होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील बाकीच्या प्रदेशांवर इंग्रजांचे राज्य होते, ते सुधारणावादी होते, तेथे मराठीतून शिक्षण दिले जात होते. दुर्दैवाने मराठवाडयावर निजामशाही होती. एमआयएमचे सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये बसलेले आहेत. त्यांचे नेते औवेसी यांचे पुर्वज मराठवाडयात राज्य करीत होते. स्वातंत्र्यापूर्वी मराठवाडयात उर्दू शिक्षण सक्तीचे केले गेले होते. मराठवाडयात कुठेही मराठीत शिक्षण मिळत नव्हते. मागासलेपणाची बीजे ही मराठवाडयातील पूर्वीच्या शिक्षणातूनच रोवली गेलेली आहेत. मराठवाडयावरील चर्चेला उत्तर देत असताना मराठवाडयाच्या सोशिकपणाची नोंद कुठेतरी झाली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मराठवाडा म्हणजे संतांची भूमी आहे. आपेगावचे संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, नरसीचे संत नामदेव, गंगाखेडच्य संत जनाबाई, जांब येथील संत रामदास , नांदेडचे गुरु गोविंदसिंह, शिर्डीच्या साईबाबांचा जन्म देखील पाथरी येथे झाला. बारा ज्योतिर्लिंगांपैकी 03 ज्योतिर्लिंग आमच्या मराठवाडयात आहेत. वेरूळ, नागनाथ येथील औंढा, परळी वैजनाथ येथे ही तीन ज्योतिर्लिंगे आहेत. तुळजाभवानी, माहुरची रेणूका माता, आंबेजोगाईचे योगेश्वरी देवी अशी 3.5 शक्तीपीठापैकी 2.5 शक्तीपीठ मराठवाडयात आहेत. असे असताना दुर्दैवाने रस्त्याचा अनुशेष मराठवाडयात जास्त आहे. नांदेडहून माहुरला जातांना 3-4 तास लागतात. माहुर हे हजारो वर्षापूर्वीचे देवस्थान आहे. रस्त्याची दुरवस्था झालेली आहे. कोणीही त्याच्याकडे लक्ष देण्यास तयार नाही. आमच्या मराठवाडयात रस्त्यांचा अनुशेष आहे. रस्त्यांवरील खड्डे भरून ते रस्ते चांगले करण्यासाठी शासनाने संबंधितांना योग्य ते निर्देश द्यावेत. 2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत पाटील..

अध्यक्ष महोदय, दळणवळणासंदर्भात सांगत असताना संभाजीनगरहून निघालो असता वाटुर फाटयापर्यंत रस्त्यांचे चौपदरीकरण केलेले आहे. वाटुरफाटा - नांदेड हा 100 कि.मी. रस्ता पार करण्याकरिता चार तास लागतात. महाराष्ट्रात अनेक राष्ट्रीय महामार्ग मंजूर झालेले आहेत. वाटुरफाटा-नांदेड या रस्त्याचे चौपदरीकरण होणार आहे की नाही ? याबाबत सांगण्यात यावे. याबाबत अनेकदा पत्रव्यवहार केला पण उपयोग झाला नाही.

अध्यक्ष महोदय, संभाजीनगर येथील विमानतळ सोडले तर मराठवाडयात कुठलेही विमानतळ कार्यरत नाही. नांदेड येथील विमानतळावर दीडशे कोटी रुपये खर्च केल्यानंतरही तेथे विमान येत नाही. तेथे नाईट लॅण्डिंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे. असे असतानाही तेथे विमान येत नसल्यामुळे त्या भागामध्ये कोणत्याही प्रकारचे औद्योगिकरण होत नाही. केवळ जालना आणि संभाजीनगर म्हणजे मराठवाडा नाही. मराठवाडयात उर्वरित जिल्हेही आहेत. दळणवळण आणि सिंचनाची दुर्दशा यामुळे आमच्या भागामध्ये उद्योग यायला तयार नाहीत. यामुळे दुर्दैवाने बेरोजगारांच्या फौजा तयार होत आहेत. सभागृहामध्ये उल्लेख झाला की, मुंबई पुण्याकडे मराठवाडयातील माणसे स्थलांतरित होत आहेत. हे रोखण्याचे काम आता शासनाला करावे लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, जायकवाडीसारखे धरण आमच्या मराठवाडयामध्ये आहे. तेथे आज पाणी उपलब्ध नाही. आज आमच्या नांदेडला पाणीपुरवठा करणारा अंतेश्वर बंधारा आहे. अंतेश्वर बंधा-याला आतापर्यंत 50 कोटी तरतूद करण्यात आली होती. त्यात बंधा-याचे अर्धे काम झाले. यावर्षी एक रुपयाचीही तरतूद करण्यात आली नाही. विष्णूपुरी धरणावर असलेला अंतेश्वर बंधारा अर्ध्यातून बंद पडला तर नांदेडला होणारा पाणीपुरवठा बंद पडेल.

मराठवाडयात 12 ज्योतिर्लिंग व 2.5 शक्तीपीठे आहेत, या सर्व धार्मिक स्थळी धार्मिक पर्यटनाचे सर्किट शासनाने तयार केले पाहिजे. त्याकरिता भाविकांना ये-जा करण्याकरिता चांगले रस्ते तयार झाले पाहिजे जेणेकरुन पर्यटक येतील. 3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत पाटील..

त्यातून व्यापार उदीम वाढेल. मराठवाडयात मोठया प्रमाणात सूर्याचे रेडिएशन चांगले आहे, त्यातून सौरऊर्जा ही मोठया प्रमाणात निर्माण होऊ शकते. माझी शासनाला विनंती आहे की, स्पेशल इन्सेंटिव्ह स्कीम मराठवाडयातील सौर ऊर्जेच्या पार्ककरिता दिली पाहिजे. नांदेड, हिंगोली,परभणी येथे मोठया प्रमाणात कापूस, सोयाबीन पिकतो. जालना येथे मोसंबी पिकत. परंतु यावर प्रक्रिया करणारेछोटे छोटे उद्योग उद्योग अजूनही आमच्याकडे सुरु झालेले नाहीत. निश्चितपणे जोपर्यंत येथे उद्योग सुरु होणार नाहीत. तोपर्यंत या भागाचा विकास होणार नाही.

अध्यक्ष महोदय, मराठवाडयात रोहयोचे कामे बंद पडलेली आहेत. रोजगार हमी योजनेचा बागुलबुवा अधिकारी दाखवितात. 156/3 खाली नोटीस देऊन आमच्यावर गुन्हे दाखल होतात. यामधील खरी गोम अशी आहे की, आता रोहयो मस्टरवील पैसे मजूरांच्या नावावर बँकेच्या खात्यामध्ये जमा होत आहेत, त्यामुळे कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार करण्यास अधिका-यांना वाव मिळत नाही. रोजगार हमी योजना आमच्या भागात बंद पडलेली आहे. या महाराष्ट्रात मेक इन इंडिया असे मोठमोठे कार्यक्रम होत आहेत. परंतु मराठवाडयात विकासासाठी कोणत्याही प्रकारची गुंतवणूक व कारखाने सुरु होत नाहीत.

(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)

अध्यक्ष महोदय, मराठवाडयातील सिंचन रस्ते कृषी शिक्षण या सर्व विभागांचा अनुशेष शिल्लक राहिलेला आहे. मागील दहा वर्षामध्ये मराठवाडयाचा अनुशेष 12,500कोटी रुपयापर्यंत पोहोचलेला आहे. मराठवाडयात 746 प्रकल्प अपूर्ण आहेत. हे अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 10 हजार कोटी रुपयांची गरज लागणार आहे. राज्यात मेक इन इंडिया सारखे मोठमोठे कार्यक्रम होत आहेत. यातून मराठवाडयाला काही मिळणार आहे की नाही ? पूर्वी निजामांच्या राज्यामध्ये ऊरुस भरत होता. त्यामध्ये आमचा फकीर भिक मागत फिरतो, त्यावरुन प्रसिध्द कवी लक्ष्मीकांत तांबोळी यांच्या दोन ओळी मी सादर करीत आहे.

संदल दंगल,ऊरुस मेळा गाव तसा जागता
कुणी सवाली सवाल हाकी है कोई दाता !

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत पाटील..

आमच्या मराठवाडयाला देणारा कोणी दाता आहे की नाही असा सवाल करुन मी दोन शब्द संपवितो.

अध्यक्ष : आपण आता चर्चा अशीच चालू ठेवू. परंतु त्यामध्ये जरा दहा मिनिटांचे एक बिल आहे, ते आधी काढून घेऊ या.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, प्रथम चर्चा पूर्ण होऊ द्यावी.

अध्यक्ष : ठीक आहे.

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली): अध्यक्ष महोदय, नियम 293 अन्वये जी चर्चा सभागृहामध्ये उपस्थित केलेली आहे, त्यावर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मराठवाडयाने राज्याला दूरचे नेतृत्व दिलेले आहे. मराठवाडयाने राज्याला तीन मुख्यमंत्री महोदय दिलेले आहेत. तरीही मराठवाडा कोरडाच राहिलेला आहे. नांदेड व लातूरचे मुख्यमंत्री महोदय महाराष्ट्राला लाभलेले असतानाही मराठवाडयत गेल्या पंधरा वर्षांमध्ये एक थेंब पाणी अडविण्याचे काम झालेले नाही. मराठवाडयातील मुख्यमंत्री महोदयांनी असा काही विचार केला नाही की, आमची मुले हिंगोलीमध्ये गेली तर त्याच्याकडे लोक आदराने पाहून म्हणतील की, " याच्या वडिलांनी आपले पाण्याचे काम केले होते. " आमच्या हिंगोली जिल्हयात केवळ दहा टक्के सिंचन आहे. या राज्याचे माननीय राज्यपाल आणि माननीय जलसंपदा मंत्री यांचे अभिनंदन करतो. त्यांनी एका वर्षत हिंगोली आणि परभणी जिल्हयाच्या सिंचनाचा अनुशेष वेगळा करून 15 हजार हेक्टर सिंचन अनुशेष आहे,अशी घोषणा केली. कयाधू नदीवर महाराष्ट्र जलसंपदा विभागाचे अधिकारी पाठवून सर्व्हे केला. हिंगोली विधानसभा क्षेत्रात जेथे जेथे धरणे होतात, तेथील डीपी प्लान करण्याचे काम जलसंपदा विभागाने केलेले आहे. 25 वर्षापासून त्या भागामध्ये सापळी नावाचे धरण होऊ घातलेले आहे, त्याला लोकांचा विरोध असल्यामुळे ते धरण होत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. तान्हाजी मुटकुळे.....

म्हणून मी सरकारला विनंती करतो की, धरण रद्द करण्याच्या सूचना देण्यात याव्यात आणि कयाधु नदीवर मोठे बॅरेजेस बांधून लोकांना पाण्यासाठी व्यवस्था केली पाहिजे. धरणासाठी आणि बॅरेजसाठी लागणारा निधी अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजूर करावा, अशी मी विनंती करीत आहे. जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून हिंगोली जिल्ह्यात चांगली कामे सुरु आहेत. या माध्यमातून गेल्या वर्षी देखील चांगल्या पध्दतीने पाणी अडविण्यास मदत झालेली होती. त्यामुळे मी शासनाचे हार्दिक अभिनंदन करीत आहे. हिंगोली जिल्ह्यातील 4 लाख हेक्टर जमीन ही पेरणीलायक आहे. यापैकी केवळ 40 हजार जमीन सिंचनाखाली येत आहे. हिंगोली जिल्ह्यातील अधिकाअधिक जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी शासनाने विशेष लक्ष देण्याची गरज आहे. ग्रामीण भागातील 60 टक्के जनता इतर जिल्ह्याच्या ठिकाणी कामासाठी जात आहेत. परिणामी अशा मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, असे म्हटले होते. परंतु, आमच्या भागातील शेतकऱ्यांची मुले दिवाळीपासून पावसाळ्यापर्यंत कामासाठी बाहेरच्या जिल्ह्यात जातात. अशा मुलांच्या शिक्षणासाठी शासनाने विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. त्र्यंबकराव भिसे (लातुर ग्रामीण) : अध्यक्ष महोदय, मराठवाड्यातील अनुशेष आणि दुष्काळी परिस्थितीच्या संदर्भात सभागृहात चर्चा सुरु असून, त्यासंबंधी माझे विचार व्यक्त करण्यासाठी माननीय अध्यक्षांनी मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार व्यक्त करीत आहे.

अध्यक्ष महोदय, आज सरकारला मराठवाड्यातील भीषण दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यास अपयश आलेले आहे. मराठवाड्यातील दुष्काळासंबंधी काय उपाययोजना केल्या पाहिजेत, यावर अनेक सन्माननीय सदस्यांनी मौलिक सूचना केलेल्या आहेत. अशा वेळी काही सन्माननीय सदस्यांनी मागील सरकारने 15 वर्षे काय केले अशी विचारणा केली जात आहे. अशा प्रकारे ते आपल्या अपयशावर पांघरुन घालण्याचे काम करीत असल्याचे दिसून येत आहे. आताच्या सरकारने त्यांच्या दीड वर्षाच्या कार्यकाळात कोणती कामे केलेली आहेत, असा माझा प्रश्न आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी, मजुरांना कामे दिलेली नाहीत. आज राज्यात जवळपास 4 लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. एका शेतकऱ्याने तर मंत्रालयासमोर येऊन आत्महत्या केलेली आहे. शेतकऱ्यांसाठी जलयुक्त शिवार योजना राबविली जात आहे. काही मंत्र्यांनी स्वत: विमानात बसून संबंधित शास्त्रज्ञांना खाली ठेऊन पाऊस पाडण्याचा प्रयोग केलेला आहे. पाऊस पडला नाही. आज आमच्या ग्रामीण भागातील रस्त्यांची अतिशय वाईट अवस्था झालेली आहे. याकडे शासन लक्ष देत नाही. काही जिल्ह्यांमध्ये छावण्या काढलेल्या असून, त्यांना अद्यापपर्यंत पैसे मिळालेले नाहीत. लातुर जिल्ह्यामध्ये जनावरांची संख्या लाखोच्या घरात असताना त्या ठिकाणी केवळ तीन छावण्या उभारलेल्या आहेत. आम्ही चाराडेपो सुरु करण्यासाठी वेळोवेळी मागणी केलेली आहे. पण या बाबतीत शासनाचे कोणतेही लक्ष नाही. अशा प्रकारे शासनाचे काम सुरु आहे. पण अशा वेळी काही सन्माननीय सदस्य मागील 15 वर्षात सरकारने कोणती कामे केली याबाबतची चर्चा करीत आहेत. अशा प्रकारे ते आपल्या सर्व कामांवर पांघरुण घालण्याचे काम करीत आहेत. लातुर जिल्ह्यातील पाण्याच्या संदर्भात चर्चा केली जात आहे. काही सन्माननीय सदस्यांनी लातुर जिल्ह्यातील काही कारखान्यांनी पाणी पळविल्याबाबची माहिती दिलेली आहे. अशा प्रकारे सदनात आणि बाहेर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. त्र्यंबकराव भिसे.....

गैरसमज पसरविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात आहे. मी त्यांचा गैरसमज दूर करण्यासाठी अधिकचा वेळ घेणार आहे. पिण्यासाठी जे पाणी आरक्षित केलेले असते असे पाणी कारखाने घेत नाहीत. धरणात ज्यावेळी जास्त प्रमाणात पाणी असते, अशा वेळी पाटाच्या माध्यमातून ऊसाला पाणी दिले जाते. आमच्या भागात गेल्या 4 ते 5 वर्षापासून पाऊस पडलेला नसल्यामुळे मांजरा धरणात पाणी साठलेले नाही. त्यामुळे पाटाच्या माध्यमातून आमच्या भागातील ऊसाला कधीही पाणी मिळाले नाही. शेतकरी आपल्या विहीरीतून आणि बोअरमधून ऊसाला पाणी देत आहे. लातुर जिल्ह्यातील ऊस कारखाने हे कनार्टक जिल्ह्यातून ऊस आणल्यामुळे सुरु आहेत. लातुर जिल्ह्यातून ऊस मिळत नाही. काही सन्माननीय सदस्य ऊसासाठी पाणी घेतले अशा प्रकारे गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न करीत असून, तो अतिशय चुकीचा आहे. धरणात पाणी नसल्यामुळे बॅरेजेसमध्ये पाणी आले नाही. अशा प्रकारे भीषण पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. पाण्याचा जपून वापर केला पाहिजे, याबद्दल कोणाचेही दुमत नाही. यासाठी आमच्या भागातील अनेक शेतकऱ्यांनी ड्रीप योजनेचा फायदा घेतलेला आहे. ऊस पीक घेण्यासाठी ड्रीप योजनेचा संदर्भात शासनाने कायदा करण्याची आवश्यकता आहे. मराठवाड्यातील गोदावरी आणि रेणा नदीवर मागील काळात बॅरेजेस बांधले होते. रेणा नदीवरील जवळ जवळ सर्व बॅरेजेस पूर्ण होत आलेले असून, सद्य:स्थितीत केवळ 3 बॅरेजेस पूर्ण होण्याचे बाकी आहे. बॅरेजेस पूर्ण करण्यासाठी फक्त 7.50 कोटी रुपयांचा निधी दिला तर ती पूर्ण होणार आहे. काही बॅरेजेससाठी भूमिसंपदानाचे पैसे देण्याचे राहिलेले आहेत. त्यामुळे शेतकरी पूर्ण क्षमतेने पाणी अडविण्यास मदत करीत नाही. या बॅरेजेसच्या माध्यमातून 7 मिटरपर्यंत पाणी अडविले जाणार आहे. परंतु, आज केवळ 4 मिटरपर्यंत पाणी अडविले जात आहे. यासाठी भूसंपादनाचे पैसे देण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. गोदावरी, मांजरा आणि रेणा नदीवर जे बॅरेजेस झालेले आहेत, त्या बॅरेजेसची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी काही मागण्या आहेत. बॅरेजच्या दैनंदीन देखभाल दुरुस्तीसाठी काय नियोजन आहे, देखभाल दुरुस्तीसाठी किती कुशल, अकुशल मनुष्यबळ आहे,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. त्र्यंबकराव भिसे.....

प्रत्येक बॅरेजवर किमान मनुष्यबळ उपलब्ध आहे काय, कंत्राटदाराने करावयाच्या देखभाल दुरुस्तीचा कालावधी संपलेल्या बॅरेजचे यांत्रिकी घटक कामाच्या नियमित व अनुषंगिक दुरुस्तीचे काय नियोजन आहे, बॅरेजच्या दुरुस्तीसाठी निधीची तरतूद किती आहे, कंत्राटदाराने करावयाच्या देखभाल दुरुस्तीचा कालावधी संपल्यानंतर बॅरेजवर दुरुस्तीसाठी झालेला खर्च, बॅरेजमध्ये पाणीसाठा करण्यासाठीच्या परिचलनासाठी कुशल, अकुशल मुनष्यबळासाठी उपलब्धता किती आहे, कुशल, अकुशल मनुष्यबळ नसल्यास त्याचे नियोजन काय आहे, या वर्षी जलसाठा करण्याच्या दृष्टीने बॅरेजच्या वार्षिक देखभाल दुरुस्ती पावसाळ्यापूर्वी करणे आवश्यक असल्याने त्याचे नियोजन काय, यांत्रिकी विभागाकडे वार्षिक देखभाल दुरुस्ती व गेट ऑपरेशनसाठी मनुष्यबळ उपलब्ध आहे काय, नसल्यास त्याचे नियोजन काय आहे वगैरे सर्व प्रश्नांची उत्तरे मंत्री महोदयांनी उत्तरातून आम्हाला द्यावी, अशी माझी विनंती आहे. लातुर जिल्ह्यातील बॅरेजची कामे पूर्ण झालेली असतानासुध्दा किरकोळ निधीअभावी व भूसंपादनाच्या निधीअभावी अवर्षण स्थितीमध्येसुध्दा पाणीसाठा करता येत नाही, याबाबत शासनाचे काय नियोजन आहे, नसल्यास तशा प्रकारच्या तरतुदी कराव्यात अशी विनंती करीत आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : अध्यक्ष महाराज, महाराष्ट्र विधानसभा नियम 293 च्या सत्ताधारी पक्षाच्या वतीने मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. पूर्वी शेतकरी मोठ्या सुखाने आणि समाधानाने आपली शेती कसायचा. आज असे म्हणावेसे वाटते की,

"ये मायभूमि फेडीन पान तुझे सारे
आणीन आरतीला हे चंद्र, सूर्य, तारे "

मनू पाहणारा माझा शेतकरी आत्महत्या करीत आहे. खऱ्या अर्थाने हे महाराष्ट्राचे दुर्भाग्य आहे. मी ज्या भागाचे प्रतिनिधित्व करीत आहे, ज्या मराठवाड्यात राहत आहे, खऱ्या अर्थाने आधीपासूनच आमच्यावर अन्याय झाला की काय, असे म्हणावे वाटते. स्वातंत्र्यात येत असताना एक वर्ष एक महिना दोन दिवस उशिराने आम्हाला स्वातंत्र्य मिळाले म्हणून आम्ही मागासलेल्या भागात जन्माला येऊन पाप झाले की काय, असे वाटते. मी जास्त काही बोलणार नाही. माझ्या आधीचे वक्ते दुष्काळावर बोलले आहेत. मी एकच गोष्ट सातत्याने सांगू इच्छितो की, उस्मानाबाद जिल्ह्याचा खऱ्या अर्थाने विकास करायचा असेल तर स्व.विलासराव देशमुख यांनी मान्य केलेली 25 टीएमसी आमच्या न्याय हक्काची उजनीची पाणी पुरवठा योजना मान्य करावी. माननीय जलसंपदा मंत्री श्री.गिरीष महाजन सभागृहात उपस्थित आहेत. आपण पर्यावरणाची मान्यता नव्हती ती आणलीत, त्याबद्दल आपले मनःपूर्वक आभार मानतो, परंतु एवढे करून भागणार नाही. त्या योजनेसाठी निधी उपलब्ध करून द्यावा लागणार आहे तेव्हा खऱ्या अर्थाने ती योजना झाल्यावर आम्ही मराठवाड्यातील लोक सुखावू. मला खात्री आहे की, आपण डॅशिंग मंत्री महोदय म्हणून ओळखले जातात. आपण भविष्यकाळासाठी तरतूद करावी. स्वातंत्र्याच्या 68 वर्षानंतर पिण्याच्या स्वच्छ पाण्याची व्यवस्था आम्ही आमच्या नागरिकांसाठी करु शकत नाही. हे मागच्या राज्यकर्त्यांचे अपयश आहे की, या राज्यकर्त्यांचे अपयश आहे, या खोलात मी जाणार नाही. प्रत्येकला शुध्द आणि मुबलक पाणी देण्याची व्यवस्था माननीय मंत्री श्री.बबनराव लोणीकर यांनी करावी. माननीय मंत्री माझ्या मतदारसंघात आले होते तेव्हा त्यांनी पाणी पुरवठा योजना देण्याचा निर्णय घेतला होता. मी मंत्री महोदयांकडे पाणी पुरवठ्याच्या योजनेच्या बाबतीत विषय मांडला होता त्यावेळी मंत्री महोदयांनी सांगितले होते की, आम्ही तत्काळ योजना मंजूर करू. आपण युतीच्या काळात लोहारा नवीन तालुका निर्माण केला, परंतु आजही त्या तालुक्यात पिण्याच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ज्ञानराज चौगुले...

पाण्याची व्यवस्था नाही. असे म्हटले जाते की, धरण तळ्याशी आण कोरड घशाशी, या उक्तीप्रमाणे उशाशी धरण आहे, परंतु आमच्या घशाला मात्र कोरड आहे. या योजनेकडे आपण प्रामुख्याने लक्ष द्यावे. लोहारा नगरपंचायत झालेली असून तेथिल निवडणुकीनंतर पाण्याचा प्रश्न मिटवावा, अशी माझी विनंती आहे. टीपीएसडब्ल्यू सारख्या योजनांना किरकोळ स्वरूपाचा निधी लागतो.

अध्यक्ष महाराज, आपण उस्मानाबाद जिल्ह्यात आला होता तेव्हा आपण बैठक घेतली होती. तेथिल जिल्हाधिकाऱ्यांच्या वागण्याचा आपल्यालाही अंदाज आला आहे. टीपीएस योजनेसाठी निधी उपलब्ध करून दिला जात नाही. एकही योजना मंजूर केली जात नाही, हे खऱ्या अर्थाने आमच्या राज्याकर्त्यांचे अपयश आहे की काय, असे म्हणावे लागते.

अध्यक्ष महाराज, आपण जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिले होते की, उस्मानाबाद जिल्ह्यात 250 जनावरांसाठी छावण्या उपलब्ध करून द्याव्यात. अध्यक्ष महाराज, प्रोसिडिंगला तो विषय घ्यायला सांगितला होता, परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी सदरचा विषय प्रोसिडिंगला घेतला नाही. 250 जनावरांच्या छावण्यांना अजूनही मंजुरी दिली नाही. ती मंजुरी कशा पध्दतीने दिली. दिनांक 14/1 ला मान्यता दिली आणि 16/1 ला छावणी चालू केली. त्यानंतर 29 तारखेला 250 जनावरांच्या छावण्यांना मंजुरी दिली. गेल्या दोन वर्षाच्या कालखंडात कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे पैसे कोण अदा करणार आहे? नाहक दोन महिन्यात 17 लाख रुपयांचा खर्च झालेला आहे. आपण जिल्हाधिकाऱ्यांना आदेश द्यावेत की, ज्या दिवसापासून 250 जनावरे छावण्यांमध्ये होती, त्या दिवसापसूनचा निधी देण्याची व्यवस्था करावी.

अध्यक्ष महाराज, जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून आम्ही फार मोठा डंका पिटतो. डंका पिटतो आहे हा शब्द मी मुद्दाम वापरत आहे. ही योजना निश्चितपणाने चांगली आहे, परंतु त्यासठी लागणारा निधी शेतकऱ्याकडून, गावकऱ्यांकडून गोळा केला जातो. सरकारच्या वतीने भरीव स्वरूपात आमदार निधी देण्याची व्यवस्था करून लोकसहभागातून मिळालेला निधी वरची कामे करण्यासाठी आपल्याला उपयोगी पडेल.

अध्यक्ष महाराज, उमरगा नगरपालिकेच्या माध्यमातून नाला सरळीकरण, रुंदीकरण,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ज्ञानराज चौगुले .....

खोलीकरणाचे काम मोठ्या प्रमाणात सुरु आहे, परंतु त्यासाठी निधी उपलब्ध नाही. नाविन्यपूर्ण योजनेच्या माध्यमातून शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा. माननीय श्री.रवीशंकर यांच्या मार्फत आम्हाला मशिन्स उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. जर डिझेलची व्यवस्था झाली तर साडेसहा किलो मीटर अंतराचा नाला सरळीकरण, रुंदीकरणाचे काम करता येईल.

अध्यक्ष महाराज, मागील कालखंडात पाण्याच्या योजनेसाठी जी तळी निर्माण करण्यात आली त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या होत्या. त्या जमिनीचा मावेजा अद्यापही त्या शेतकऱ्यांना दिलेला नाही. ते शेतकरी मंडळी कोर्टात गेली आणि कोर्टाने त्यांच्या बाजूने न्याय दिला, परंतु त्यांचे पैसे दिले जात नाहीत, ही एक शोकांतिका आहे. या दुष्काळग्रस्त परिस्थितीत आपण शेतकऱ्यांचे देणी असलेले पैसे देऊ शकलो तर खऱ्या अर्थाने शेतक-याला न्याय दिल्यासारखे होईल.

अध्यक्ष महाराज, रोजगार हमी योजनेसंदर्भात अनेक सन्माननीय सदस्य बोलले. आपण उस्मानाबाद जिल्ह्यात रोजगार हमी योजनेच्या बैठकीला उपस्थित होतात. आडगावला 60:40 च्या रेश्योमध्ये काम घ्यावे म्हणून सूचना करण्यात आली. या जिल्ह्यात मजुरांची संख्या बघितली तर 1200 ते 1300 असून जिल्हाधिकारी रोजगार हमी योजनेची कामे उपलब्ध करुन देत नसतील तर कशा अर्थाने आपण राज्य चालवितो, हाही एक मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. आपण एकीकडे स्थलांतर होत आहे असे बोलतो, परंतु स्थलांतर का होत आहे, त्याच्या मुळाशी जाणे आवश्यक आहे. मुंबई, पुण्याला नागरीक स्थलांतर करीत आहेत. त्या मजुरांना त्याच ठिकाणी काम मिळाले तर ते स्थलांतर करणार नाहीत. मजुरांचे स्थलांतर रोखायचे असेल तर रोजगार हमी योजनेची कामे मोठ्या प्रमाणात करावी लागणार आहेत. महाराष्ट्र रोजगार हमी योजना ही महाराष्ट्राने देशाला दिली. देशात एक क्रमांकावर असलेले राज्य आता पंचविसाव्या क्रमांकावर आहे की काय, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. केवळ जिल्हाधिकाऱ्यामुळे हा अन्याय झालेला आहे म्हणून आपण जिल्हाधिकाऱ्यांना आदेशित करावे की, रोजगार हमी योजनेची कामे मोठ्या प्रमाणात चालू करावीत. आमच्या उस्मानाबाद जिल्ह्याचे माननीय खासदार श्री. रविंद्रजी गायकवाड आणि लातूर जिल्ह्याचे माननीय खासदार श्री.सुनिल गायकवाड या दोघांच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ज्ञानराज चौगुले ....

प्रयत्नांनी लातूर ते गुलबर्गा रेल्वे जोडणीची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार माननीय केंद्रिय मंत्री श्री.सुरेश प्रभू यांनी 148 किलो मीटर अंतरासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. सर्व्हे करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला असून तत्काळ सर्व्हे करण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांनी पाठपुरावा करावा. सदरचा रेल्वे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाला काही निधी द्यावयाचा असेल तर दोघांच्या संयुक्त विद्यमाने सदरचा प्रोजेक्ट पूर्ण करावा. त्या दोन्ही खासदारांचे मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. या सर्व बाबींचा बारकाईने अभ्यास करावा. दक्षिण भारत आणि उत्तर भारत या दोन्ही भागांना जोडणारा आणि सर्वात कमी अंतर असलेला हा रेल्वे मार्ग पूर्ण करण्यासाठी आपण प्रयत्न करावेत. अध्यक्ष महाराज, आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपले अत्यंत ऋण व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) : अध्यक्ष महाराज, मराठवाडा विकासासाठी समर्थन म्हणून मी या ठिकाणी उभा आहे. सन 2005 ला समन्यायी पाणी वाटपासंदर्भात जो कायदा झाला, त्याची अंमलबजावणी सन 2013 मध्ये झाली. समन्यायी पाण्याचे वाटप झाले पाहिजे, पाणी मिळणे हा सर्वांचा हक्कच आहे, तो मिळालाच पाहिजे. सर्वात पहिल्यांदा पिण्यासाठी पाणी, त्यानंतर शेतीसाठी आणि मग उद्योगांसाठी पाणी मिळणे आवश्यक आहे. समन्यायी पाणी वाटपाचा कायदा विशेष करून आमच्या नगर जिल्ह्यातील माझ्या नेवासा तालुक्याच्या फार मुळावर आलेला आहे. नगर जिल्हा हा मराठवाड्याचाच भाग आहे. नगर जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातील जमीन जायकवाडी धरणासाठी जे नर्वसन झाले त्यातील 75 टक्के जमीन ही नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आहे. आजही त्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन झालेले नाही. शेतकऱ्यांना त्यांचे हक्काचे पैसे मिळालेले नाहीत. त्यांना त्यांच्या हक्काचे पाणी मिळालेले नाही. पाणी वाटपाच्या करारानुसार बारा महिने, त्यानंतर आठ महिने आणि वर्षातून एक महिना पाणी मिळालेले आहे, ही त्या शेतकऱ्यांची शोकांतिका आहे. त्या शेतकऱ्यांना जायकवाडी बॅक वॉटरमधून पाणी उचलण्याची परवानगी नाही. आज त्या शेतकऱ्यांना दोन तास वीज नाही. पिण्यासाठी पाणी नाही तरे खारे पाणी आहे. पाण्याची योजना मंजूर होत नाही अशी परिस्थिती आज त्या धरणग्रस्तांची झालेली आहे. शासनाने पुनर्वसनाच्या माध्यमातून या धरणग्रस्तांकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. हा मराठवाडा, हा विदर्भ, हा कोकण असा पाण्याच्या बाबतीत कसलाही वाद न होता सर्वांना न्याय मिळावा, यासाठी शासनाने काही पर्याय योजिले पाहिजेत. विशेषकरून सह्याद्री घाटमाथ्यावरील पाणी वळविण्यासाठी वानगंगा, दमनगंगा, नार-पार खोरे या प्रकल्पांसाठी तरतूद करणे आवश्यक आहे. आतापर्यंत फक्त यावर चर्चा झाली, परंतु त्याचा सर्व्हे करण्यासाठी तरतूद झालेली नाही. आज सुरुवातच झाली नसेल तर भविष्यात कधी ती योजना साकारील आणि घाटमाथ्यावरील पाणी मराठवाडा आणि विदर्भासाठी मिळेल., असा प्रश्न आम्हाला पडतो. मराठवाड्याचा अनुशेष भरून निघणे गरजेचे आहे, परंतु त्यासाठी इतर कोणावरही अन्याय होऊ नये हीच विनंती आहे.

यानंतर 3G-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. राहूल पाटील (परभणी) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम 293 अन्वयेच्या बोलण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मराठवाड्यात दुष्काळ काही आज पडलेला नाही. गेल्या 10 वर्षांचा विचार केला तर, सतत 3 वर्षांनी आपल्याला दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. अशा वेळेस आपल्याला काही कायमस्वरूपी दीर्घकालीन उपाययोजना कराव्या लागतील. मराठवाड्यातील शेतकऱ्याला आपण शाश्वत पाणी, वीज उपलब्ध करून देऊ शकलो तर, निश्चितच आत्महत्या रोखल्या जातील आणि आपण मराठवाड्याचा अनुशेषही भरून काढू शकू.

अध्यक्ष महोदय, आपल्या शासनाची जशी स्मार्ट सिटीची संकल्पना आहे त्याप्रकारे स्मार्ट व्हिलेजही आपल्याला डेव्हलप करावी लागतील. आपल्याला ग्रामीण भागात लघू उद्योग डेव्हलप करावे लागतील. ज्याप्रमाणे मेक इन इंडिया, मेक इन महाराष्ट्र अभियान आपण मोठ्या प्रमाणावर हातात घेतले आहे त्याप्रमाणे ग्रामीण भागातील युवकांकरिता स्कील डेव्हलपमेंटवर आधारित छोटे उद्योग सुरु करावे लागतील, जेणेकरून मराठवाड्यातील लोकांचे जे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत आहे, ते रोखले जाईल.

आज आपण पाहिले तर पश्चिम महाराष्ट्रातील जनता मुंबई, पुण्याला आल्यानंतर फ्लायओव्हर वरून जाते परंतु, आपल्या मराठवाड्यातील जनता ही फ्लायओव्हरच्या खाली राहण्यास आलेली आहे, अशी परिस्थिती आज मराठवाड्यातील जनतेची झालेली आहे. निश्चितच यामध्ये सुधारणा करावयाची असेल तर मराठवाड्यामध्ये चांगल्याप्रकारच्या इंडस्ट्रीज आल्या पाहिजेत. मराठवाड्यामध्ये फक्त संभाजीनगर नाही तर तेथे परभणी आणि इतर अनेक जिल्हे आहेत. तेथे एमआयडीसीची आज काय परिस्थिती आहे, हे आपल्यालाही माहीत आहे. आज मराठवाड्यामध्ये रेसिडेन्शिअल एमआयडीसी झाल्या आहेत. त्यामुळे चांगल्याप्रकारचे उद्योग आणावयाचे असतील तर चांगल्या प्रकारची सबसिडी त्यांना देणे जरूरीचे आहे. तसेच, चांगल्याप्रकारच्या फूड प्रोसेसिंग इंडस्ट्रीज, फूड पॅकेजिंग इंडस्ट्रीज आपल्याला मराठवाड्यामध्ये आणाव्या लागतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. राहूल पाटील ....

आज आपण पाहतो की, आपल्या ग्रामीण भागामध्ये अजून जवळपास 40 टक्के रस्ते अजून झालेले नाहीत. आज मराठवाड्यामध्ये अशी परिस्थिती आहे की, ग्रामीण भागातील सोनपेठ सारख्या तालुक्यातील जनता रोडसाठी उपोषणाला बसलेली आहे. आपल्याला यावर दीर्घकालीन उपाययोजना करावयाच्या असतील तर, आपण जशाप्रकारे धवलक्रांती, औद्योगिक क्रांती हाती घेतली, तशाप्रकारची वनक्रांती आपल्याला मराठवाड्यामध्ये हाती घेणे फार महत्त्वाचे आहे.

अध्यक्ष महोदय, चांगल्या प्रकारची इंडस्ट्री डेव्हलप झाली पाहिजे, प्रत्येक जिल्ह्यामध्ये चांगल्याप्रकारचे मेडिकल कॉलेज उपलब्ध झाले पाहिजे. आज आपण पाहतो की, लोअर दुधनाचा प्रकल्प जवळपास 36 वर्षांपासून सुरु आहे. आजपर्यंत तो पूर्ण होऊ शकला नाही. हा प्रकल्प आपण किती दिवसांत पूर्ण करणार आहात ? मराठवाड्यात असे बरेचसे प्रकल्प अपूर्ण आहेत. या अपूर्ण प्रकल्पांमध्ये लँड ॲक्विजीशन जवळपास झालेले आहे. परंतु, लँड ॲक्विजीशन होऊनही त्याचे पैसे आजपर्यंत शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत. माननीय पाणी पुरवठा मंत्री श्री. बबनराव लोणीकर परभणीला आले असताना त्यांनी आश्वासित केले होते की, आम्ही यावर निश्चितच चांगल्या प्रकारचा तोडगा काढू. आज जवळपास 26 हजार शेतकरी कोर्टात गेलेले आहेत. कारण लँड ॲक्विजीशन होऊनही त्याचे पैसे आजपर्यंत त्यांना मिळालेले नाहीत. मंत्री महोदयांना मला हे विचारावयाचे आहे की, हे पैसे आपण किती दिवसांमध्ये उपलब्ध करुन देणार आहात ?

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांसाठी चांगल्याप्रकारची पेन्शन योजना लागू केली पाहिजे. शेततळ्याच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर आपण 50 हजार रुपये अनुदान घोषित केलेले आहे. परंतु, त्याला आज काही चांगल्याप्रकारचा प्रतिसाद मिळालेला नाही. हे अनुदान वाढवून 2 लाख रुपयांपर्यंत न्यावे लागेल असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना ही अत्यंत चांगली योजना शासनाने हाती घेतलेली आहे. त्याकरिताही चांगली तरतूद आपल्याला करावी लागेल. दुष्काळ निवारणासाठी आपण स्वतंत्र मंत्रालय स्थापन करु शकलो तर आपल्या सरकारसाठी एक अतिशय चांगली गोष्ट होईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. राहूल पाटील ....

अध्यक्ष महोदय, क्रॉपिंग पॅटर्नबाबत बोलावयाचे झाले तर, आज मराठवाड्यामध्ये ऊसाचे पीक फिजीबल होऊ शकत नाही. त्यामुळे आपल्याला क्रॉपिंग पॅटर्न बदलावी लागेल. परभणीला कृषी विद्यापीठ आहे परंतु, तेथे जवळपास 50 टक्के जागा रिक्त असल्यामुळे तेथे संशोधन होऊ शकले नाही. कृषी विद्यापीठाने कमी पावसावर चांगल्याप्रकारे येणारे वाण विकसित केले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, परभणीचा अनुशेष भरुन काढण्याबाबत बोलताना मला हे सांगावयाचे आहे की, आजपर्यंत परभणीतील जवळपास 20 विभागीय कार्यालये आज परभणीतून हलविण्यात आलेली आहेत. ती विभागीय कार्यालये पुन्हा परभणीमध्ये स्थापन करावीत. परभणीचा अनुशेष दूर करावयाचा असेल तर, कृषी विद्यापीठामध्ये शेकडो एकर जमीन आहे. महाराष्ट्रामध्ये एक नवीन आयुर्वेदिक विद्यापीठ येत आहे, ते विद्यापीठ जर परभणीमध्ये आले तर, निश्चितच ती जमीन त्याच्या उपयोगात येईल.

परभणीमध्ये हॉर्टीकल्चर कॉलेज आहे. त्यामुळे वनऔषधीच्या उपयोगाकरिता हॉर्टीकल्चर कॉलेजही उपयोगात येईल. चांगल्याप्रकारचे व्हेटरेनरी कॉलेजही परभणीला असल्याने तेथे आपण जर चांगल्याप्रकारचे आयुर्वेदिक विद्यापीठ तेथे करु शकलो तर, निश्चितच ही चांगली गोष्ट होणार आहे. तसेच, युवकांमध्ये कृषी विषयक जागरुकता निर्माण झाली पाहिजे. त्याबाबत त्यांना आपुलकी निर्माण
झाली पाहिजे म्हणून कृषी विषय प्राथमिक व माध्यमिक स्तरावर अनिवार्य करावा, अशी माझी या निमित्ताने मागणी असणार आहे.

अध्यक्ष महोदय, मोसंबी प्रक्रिया उद्योगाबाबत मला हे सांगावयाचे आहे की, जालन्यामध्ये मोसंबीचे पीक येत असल्याने तेथे मोसंबी प्रक्रिया उद्योग असला पाहिजे, सीताफळ प्रक्रिया उद्योग असला पाहिजे, तसेच परभणीमध्ये आपण सोयाबीन प्रक्रिया उद्योग स्थापन केला पाहिजे असे मी या निमित्ताने सूचवू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली याकरिता पुन्हा एकदा आपले आभार मानतो व माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. शशिकांत खेडेकर (सिंदखेडराजा) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम 293 अन्वये सत्ताधारी पक्षाने मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्याकरिता मला संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

अध्यक्ष महोदय, माझा सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघ मराठवाड्याला अगदी लागून आहे. जी परिस्थिती मराठवाड्याची आहे, तिच परिस्थिती या सिंदखेडराजा मतदारसंघाचीही आहे. हा मतदारसंघ केवळ नावालाच विदर्भामध्ये आहे असे म्हटले जाते. परंतु, जी संस्कृती मराठवाड्याची आहे, तीच या मतदारसंघाची आहे.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय श्री. गिरीष महाजन यांना विनंती करणार आहे आणि या अगोदरही मी त्यांना विनंती केलेली आहे की, या मतदारसंघात एक महत्त्वाकांक्षी असा खडकपूर्णा प्रकल्प झालेला आहे. या धरणाची जवळपास 24864 हेक्टर इतकी सिंचन क्षमता आहे. या धरणातून कॅनॉलची कामे जवळपास पूर्णत्वास येत आहेत. परंतु, जी गावे या धरणाच्या लाभक्षेत्रापासून खूप जवळ आहेत, ती गावेही वंचित राहिलेली आहेत. त्यासाठी मतदारसंघात आंदोलने सुरु आहेत. डाव्या कालव्यातून वंचित क्षेत्राला लाभ मिळावा यासाठी एक मोठे आंदोलन मतदारसंघामध्ये झाले. आजपासून उजव्या कॅनॉलद्वारे या वंचित गावांना लाभ मिळावा यासाठी तेथील मंडळींनी आमरण उपोषण सुरु केलेले आहे. या प्रकल्पातील हक्काचे पाणी या खडकपूर्णा नदीकाठाच्या गावात, तसेच नदीच्या काठावर कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यामध्ये सोडावे, अशी सतत मागणी होत असते. आम्ही अधिकाऱ्यांना ज्यावेळेस याबाबत विचारतो, तेव्हा अधिकारी असे म्हणतात की, याबाबत मूळ प्रस्तावात तरतूद नाही, म्हणून आम्हाला हे करता येत नाही. या निमित्ताने माननीय श्री. गिरीष महाजन यांना मला एक विनंती करावयाची आहे आणि माझी मागणी आहे की, खडकपूर्णा प्रकल्पात जो जलसाठा आहे, त्याचे आपण एकदा फेरनियोजन करावे. फेरनियोजन केल्यानंतर धरणामध्ये किती पाणी शिल्लक आहे, हे आपल्याला समजू शकेल. धरणात जेवढे पाणी शिल्लक असेल त्याचा लाभ या वंचित गावातील लोकांना, वंचित क्षेत्राला देता येईल. आपण तो द्यावा, अशी मी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. शशिकांत खेडेकर ....

मी या आठवड्यामध्ये आपणास अनेकदा विनंती केली की, या मंडळीची आपण मंत्रालयामध्ये संबंधित अधिकाऱ्यांसमवेत त्वरित एक बैठक लावावी. कारण मतदारसंघामध्ये हे आंदोलन दिवसेंदिवस तीव्र होत आहे. तेव्हा ही बैठक आपण त्वरित लावावी, ही विनंती मी करतो. या खडकपूर्णा नदीवर डिग्रज बुद्रुक हा कोल्हापूर पध्दतीचा बंधारा मंजूर झाला, त्याचे टेंडरही निघाले परंतु, अजून वर्कऑर्डर देण्यात आली नाही. ज्या संबंधित विभागाकडे हे काम करण्याची जबाबदारी होती, तो विभाग बंद होत असल्यामुळे हे काम खडकपूर्णा प्रकल्पाकडे दिले आणि निधी उपलब्ध करून दिला तर निश्चितच या नदीकाठच्या गावांना त्याचा लाभ होईल, एवढे बोलून थांबतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

.....

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(अध्यक्षस्थानी तालिका सभाध्यक्ष श्री. योगेश सागर)

श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम 293 अन्वये सत्ताधारी व विरोधी अशा दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या प्रस्तावावर मी केवळ सूचना करणार आहे.

अध्यक्ष महोदय, या विधिमंडळाच्या अधिवेशनात दुर्दैवाने पहिलीच वेळ अशी आहे की, यावेळेस सभागृहात दुष्काळाच्या बाबतीत दोन वेळा चर्चा उपस्थित करण्यात आली. याचा अर्थ असा आहे की, दुष्काळ व मराठवाड्याच्या प्रश्नांसंदर्भात शासनाने ज्या काही उपाययोजना जाहीर केल्या आहेत, त्यांनी दुर्दैवाने आजही जनतेचे आणि सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले नाही किंवा विश्वासही निर्माण झाला नाही.

अध्यक्ष महोदय, खरे तर पहिल्याच आठवड्यामध्ये ही चर्चा सुरु झाल्यानंतर शासनाने त्यावर उत्तर दिले. त्यानंतर परत ही चर्चा उपस्थित करण्यात येणे, याचाच अर्थ शासनाचे हे अपयश आहे, असे मी समजतो. निदान या चर्चेच्या माध्यमातून का होईना परंतु, न्याय मिळावा एवढीच मी अपेक्षा व्यक्त करतो.

2H-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे.....

या वर्षी पाऊस लवकर येईल असे मागील काही आठवड्याच्या वर्तमानपत्रामध्ये बातम्या छापून आल्यानंतर त्या बातमीवर तरी थोडासा दिलासा मिळत होता. परंतु आज एका राष्ट्रीय वर्तमानपत्रामध्ये एक बातमी आलेली आहे की, या वेळेसचा पाऊस देखील दोन, तीन महिने उशिराने येऊ शकतो. अशी बातमी आल्यामुळे परत चिंतेचे वातावरण निर्माण झालेले आहे...(अडथळा)...मला पेरायला तुम्हीच सांगितले म्हणून मी खरे सांगणार नाही. परंतु ही बातमी आल्यामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झालेले आहे. आता आपण वाघिनीने लातूरला पाणी आणणार आहात. आताच सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, हे नियोजन डिसेंबरमध्येच करायला पाहीजे होते. परंतु ते आपण अजूनपर्यंत केले नाही. ती परवानगी लांबली त्यामुळे आता हे सर्व प्रश्न उपस्थित होत आहेत.

अध्यक्ष महोदय, लातूर केवळ तीन ठिकाणी छावण्या असणे म्हणजे सरकारने कामकाज करण्यासाठी जे कठोर निर्बंध टाकले आहे, त्याचा हा परिणाम आहे, असे मी समजतो. 50 हजार रुपयांमध्ये शेततळे होते किंवा कसे, हे माननीय मंत्र्यांपासून सर्वच सांगू शकतील. परंतु सरकारने हट्ट धरलेला आहे की, शेततळे हे 50 हजार रुपयांमध्येच झाले पाहीजे. म्हणून मागेल त्याला शेततळे आपण देत आहात, परंतु ते होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. अशा अनेक योजना आहेत की, त्या योजनेवर मी पुन्हा चर्चा करणार नाही. परंतु या विषयावर दोन वेळेस चर्चा करावी लागते, म्हणजेच याचा अर्थ ही बाब गंभीर असून ती आपण गांभिर्याने घेऊन त्यासंदर्भातील निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आतापर्यंत केवळ शेतकऱ्यांच्याच आत्महत्त्या झालेल्या आहेत. आता सराफांच्या देखील आत्महत्त्या होऊ लागल्या आहेत. जळगाव येथे सराफांचा मोठा व्यवसाय आहे...(अडथळा)... सुरु केला. तो आपला करिश्मा आहे. महाराष्ट्रातील मोदी आपण आहात, त्यामुळे असा परिणाम होऊ शकतो. सभागृहामध्ये अनेक वर्षापासून चर्चा होत असून आजही चर्चा झाली. जलसंपदा विभागावर मोठी चर्चा होते. किती सिंचन झाले, त्याबाबत शुद्धीपत्रकामध्ये दिलेले नाही. त्याचे स्पष्टीकरण करण्यात यावे. आपले सरकार आल्यापासून किती सिंचन वाढलेले आहे, यासंदर्भातील माहिती द्यावी. काही लोकांचा आवाका किती, परंतु त्यांचा आरोप करण्याचा आवाका

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे.....

पाहिला की, 70 हजार कोटीचा आरोप झाला होता, आता काही लोकांनी 90 हजार कोटी रुपयांचा आरोप केला. मागे वर्तमान पत्रामध्ये एक बातमी आली होती. त्या बातमीमध्ये एका प्रकल्पाची 60 कोटी रुपये असलेली किंमत 750 कोटी रुपये झाली, त्याबद्दलचा आरोप झाला. आपण त्याचे स्पष्टीकरण केले. मी आपल्यावर आरोप करीत नाही. आपण सांगितले की, सुप्रमा मंजूर झाली आणि वाढीव असलेल्या सर्व निकषामुळे या प्रकल्पाचा रेट वाढला. चार वर्षापासून आम्ही हेच सांगत होतो. आम्ही सफेद पत्रिका काढली, आपण काळी पत्रिका काढली. परत आम्ही एक पत्रिका काढली. आपण केवळ दोन उत्तरे द्यावीत. गेल्या दीड, दोन वर्षामध्ये आपल्या विभागाला मिळालेल्या बजेटमधून किती निधी खर्च झाला आहे, त्यामुळे किती टक्के पाणी साचले, याची माहिती द्यावी.

अध्यक्ष महोदय, पर्यावरण खात्याने परवानगी दिल्यामुळे मघाशी आपले अभिनंदन केले. काही बाबी पर्यावरण खात्याने खरोरखर चांगल्या केल्या. केंद्रीय पर्यावरण मंत्री माननीय श्री. प्रकाश जावडे साहेबांनी त्या परवानग्या दिल्या. वन विभागाने देखील परवानग्या दिल्या. ते नाकारता येणार नाही. जे आमच्याकडून झाले नाही, ते तुम्ही केले. तरी देखील आज संशयाचे वातावरण निर्माण होत आहे. ते तुमच्यावर येऊ नये असे वाटत असेल तर किती प्रकल्प करताना आपण परवानगी दिल्या, या प्रकल्पांमध्ये किती पाणी साठले, किती प्रकल्पाला निधी मंजूर होऊन कामे पूर्ण झाली आहे, किंवा निधी शिल्लक आहे याचे स्पष्टीकरण होणे गरजेचे आहे. आम्हाला त्यावर चर्चा करता येईल. जोपर्यंत मराठवाडा विदर्भाचा अनुशेष निघत नाही, तोपर्यंत बाकीच्या ठिकाणी काम करता येणार नाही, असे सुतोवाच करण्यात आले. परंतु काल आमच्या जिल्ह्यामध्ये एक मंत्री महोदय आले होते. काही झाले तरी कुठल्याही परिस्थितीत संबंधित प्रकल्प पूर्ण करणारच असे त्यांनी स्पष्ट केले. परंतु आम्हाला शंका वाटते. आपण सभागृहामध्ये एक सांगता आणि बाहेर एक सांगता. उदाहरणच द्यायचे झाले तर जेकटापूरची योजना सुप्रमामध्ये अडकलेली आहे. सुप्रमामध्ये आपण यावेळी 30 कोटी रुपये मंजूर केले. परंतु त्याकरिता 250 कोटी रुपये लागणार आहे. यावर्षी अत्यल्प निधी मंजूर करण्यात आला. असे असल्यामुळे सदरहू प्रकल्प कधी होणार आहे. राज्य शासनातील माननीय मंत्र्यांमध्ये एकवाक्यता नाही, ही वस्तुस्थिती आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे.....

परंतु त्याचा कधीकधी गैरफायदा घेतला जातो. पश्चिम महाराष्ट्रातील काही भाग विदर्भ, मराठवाड्यासारखाच दुष्काळी असून त्यासंदर्भात काय निर्णय घेणार आहेत, याचे स्पष्टीकरण करण्यात यावे.

अध्यक्ष महोदय, पाणी पुरवठा मंत्री माननीय श्री. बबनराव लोणीकर हे फार साधे आहेत. परंतु काय झाले मला माहीत नाही. त्यांचे वजन आपल्यापेक्षा कमी असेल तर आपण त्यांना मुख्यमंत्री महोदयांकडे घेऊन जावे, अशी आमची विनंती आहे. आपले वजन फार आहे. मला काहीजण सांगतात की, माननीय मुख्यमंत्र्यांकडून काम करायचे असेल किंवा आपले प्रश्न सोडवायचे असेल तर माननीय मंत्री श्री. गिरीष महाजन साहेबांना घेऊन जावे...(अडथळा)...बघा माननीय मंत्री श्री. बबनराव लोणीकर हे देखील होय म्हणाले. पाणी पुरवठा विभागाला केवळ 500 कोटी रुपये देण्यात आले आहेत.

अध्यक्ष महोदय, मी राज्यातील एका प्रकल्पाची माहिती विचारली होती. ती माहिती आपण दिली नाही. राज्यामध्ये पाणी पुरवठा योजनेची राष्ट्रीय पेयजल योजना मंजूर न झाल्यामुळे किती योजनांचे व किती कोटी रुपयांचे प्रस्ताव आपल्याकडे आलेले आहेत. मला वाटते आपण त्या दिवशी साडेतीन, चार हजार कोटी रुपयांचा उल्लेख केला. परंतु तो प्रश्न नाही. आज दुष्काळावर चर्चा आहे. दुष्काळी भागाला पाणी आणण्यासाठी प्रकल्पांच्या दुरुस्तीसाठी देखील पैसे देण्यात आलेले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. आपल्याला बोलता येत नाही, आपली अडचण असून मी समजू शकतो. आपण पाणी पुरवठा योजनेला पैसे उपलब्ध करु शकणार आहात की, नाही. आपल्याला लोक आताच काही म्हणणार नाही. परंतु गेल्या दीड दोन वर्षापासून भारत निर्माण योजना असेल, जलस्वराज्य योजना असेल यांचे काय झाले. त्यावेळी राष्ट्रीय पेयजल योजनेतून मोठ्या प्रमाणात निधी मंजूर होत होता. दुर्दैवाने आज तसे होत नाही. दीड, दोन वर्षामध्ये एकही नवीन प्रकल्प आला नाही. आपण पैसे मागितले. प्रकल्पांकरिता तरतूद कमी केली असून असे सांगितले की, पुढे पैसे लागल्यास दिले जातील. परंतु पुढे लागणारे पैसे मिळत नसतात. माननीय मंत्री श्री. बबनराव लोणीकर यांनी याबाबतचे स्पष्टीकरण करावे. पिण्याच्या पाण्यासंदर्भात उपाययोजना करण्यासाठी पैसे देणार आहात की, नाही याचे देखील स्पष्टीकरण करावे. मुख्यमंत्री जल योजनेमधून किंवा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे.....

ज्या पेयजल योजना अर्धवट आहेत, त्या योजनेसंदर्भात स्पष्ट करण्यात यावे. याकरिता केंद्रातून पैसे येणार आहे काय, नसेल तर अपूर्ण राहिलेल्या पाणी पुरवठा योजनांना राज्यातून निधी दिला जाणार आहे काय, याचा खुलासा करणे गरजेचे आहे. अन्यथा आपल्याला जनता पाणी पाजल्याशिवाय रहाणार नाही. एवढे बोलून माझी रजा घेतो. धन्यवाद.

---*---

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका अध्यक्ष : यासंदर्भातील उत्तर उद्या सकाळी देण्यात येणार आहे.

श्री. जयंत पाटील : या चर्चेमध्ये माझे नाव आहे. त्यामुळे माननीय मंत्र्यांच्या उत्तरापूर्वी मला सकाळी बोलण्याची संधी द्यावी.

तालिका अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आपण बोलण्यास सुरुवात करावी. काही वेळ बोलून झाल्यावर आपण उर्वरित भाषण उद्या सकाळी करावे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम 293 अन्वये वरील दोन्ही प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मराठवाड्यातील आणि महाराष्ट्रातील दुष्काळावर आम्ही एकत्रितपणाने प्रस्ताव दिलेला होता. त्या प्रस्तावाप्रमाणे अवर्षणामुळे संपूर्ण राज्यात भीषण दुष्काळ पडलेला असून भाजीपाला आणि जिवनावश्यक वस्तुंचे दर वाढलेले आहेत. तसेच रोजगार हमी योजनेची कामे कुठेच चालू नाहीत.

तालिका अध्यक्ष : म.वि.स. नियम 293 च्या प्रस्तावावरील चर्चा येथे थांबवून उद्या सकाळी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील हे चर्चेला सुरुवात करतील व त्यानंतर मंत्री महोदय उत्तर देतील.

---*---

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन)
(महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L. A. BILL NO. II OF 2016 (A BILL FURTHER TO AMEND THE CONTRACT LABOUR (REGULATION AND ABOLITION) ACT, 1970, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

.....(चर्चा पुढे सुरु.....

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, विधेयक क्रमांक 2, कंत्राटी कामगार सेवा या विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आज सकाळी आपणच तालिका अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. मी सकाळीच मुद्दा मांडला होता. बिलावरील चर्चा ऑनलेग होती, त्यामुळे याच चर्चेला प्रथम प्राधान्य देणे गरजेचे होते. आपल्याला कल्पना होती. या बिलाच्या संदर्भात बऱ्याच सन्माननीय सदस्यांना बोलायचे होते आणि हे बील मंजूर होण्यापूर्वी कदाचित माझ्या सकट एकूण सन्माननीय सदस्य मिळून किमान 10, 15 तास चर्चा करण्यासाठी तयार होते. त्यामुळे सरकारने कार्यक्रमपत्रिकेमध्ये बदल केला आणि हे बील मागे ठेवून इतर बिले अगोदर घेतली. हे करण्याचे शासनाचे धोरण असले तरी माननीय मंत्री श्री. प्रकाश महेता यांच्यासारखे कामगार मंत्री असल्यामुळे त्यांनी मला सूचना केलेली आहे की, आपण जास्त चर्चा करु नये. याकरिता आपली वेगळी बैठक लावण्यात येईल.

...3l/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे.....

आता कोरम नसतानाही आम्ही मंजूर करुन देणार.

अध्यक्ष महोदय, मी कामगार मंत्री श्री.महेता यांना सांगू इच्छितो की, दोन दिवस बोलण्याची आमची तयारी होती, मला माननीय मंत्री श्री.खडसे यांचा विश्व विक्रम मोडावयाचा होता. परंतु आपल्या सारखा कामगार मंत्री असल्यामुळे..... मंत्री महोदयांनी मला सांगितले आहे, जास्त बोलायचे नाही.

अध्यक्ष महोदय, मी कामगार मंत्री श्री.महेता यांना सांगू इच्छितो की, या विधेयकास सन्माननीय सदस्य श्री.धैर्यशील पाटील व इतर अनेक सन्माननीय सदस्यांना विरोध करावयाचा होता. त्यांचा विरोध मंत्री महोदयास नव्हे तर विधेयकास होता. कारण या विधेयकासंदर्भात आमची भूमिका स्पष्ट होती. मी काल विषय सांगितला होता त्याचे रिपिटेशन करणार नाही. परंतु आजही सांगतो की, त्यासंदर्भातील क्लेरिफिकेशन मंत्री महोदयांनी करणे गरजेचे आहे. मंत्री महोदयांनी मला सांगितले की, 50 कामगारांच्या आत कामगार असले तरी त्यांच्यासंबंधी नियमानुसार कोणतीही सूट दिलेली नाही. माझे म्हणणे या विरोधात आहे. मंत्री महोदयांची काल बैठक झाल्यानंतर मी पुन्हा चौकशी केली, वकिलांशी बोलून माहिती घेतली. त्यावेळी मी वकिलांना सांगितले की, मंत्री महोदयांनी मला सांगितले आहे की कंत्राटी कामगारांच्या कायद्यामध्ये 50 कामगारांपर्यंत संख्या वाढविण्यात येत असली तरी एक कामगार असला तरी त्याच्या बाबतीत कायद्याच्या कोणत्याही नियमातून सूट नाही. परंतु वकिलांचे म्हणणे आहे की, तसे नसून 20 कामगारांचा कायदा होता त्यावेळी 19 कामगार असले तरी त्या कामगारांच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे कायद्याचे बंधन नव्हते. यासंदर्भाती मंत्री महोदयांनी माहिती घ्यावी.

अध्यक्ष महोदय, मी कामगार मंत्री श्री.महेता यांना सांगू इच्छितो की, कामगारांसाठी असलेल्या पूर्वीच्या कायद्यातून पळवाटा काढण्यासाठी 100 कामगार असतील तर 50 कामगारांच्या च्या दोन फर्म दाखविण्यात येत असत, 20 कामगार असतील तर 10 कामगारांच्या दोन फर्म दाखविण्यात येत असत. मंत्री महोदय तुम्ही कामगार पध्दत, ठेकेदार पध्दत करण्याच्या संदर्भातून सगळ्या कामगारांना वेठबिगार करणार का, हा प्रश्न पुढे उभा राहणार आहे. आपण या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे.....

मुद्यासंदर्भात उत्तर देणार आहात. परंतु उदाहरण म्हणून सांगतो की, परवा दिवशी काढण्यात आलेल्या आदेशाबाबत आम्ही "एक दिवसाचा लाक्षणिक बंद" आंदोलन केले. त्याबाबत मंत्री महोदयांनी उद्या बैठक लावलेली आहे. सरकारचा जो आदेश आहे त्याबाबत मंत्री महोदयांनी त्यांच्या विभागाच्या सचिवांना, आयुक्तांना बोर्डाच्या अध्यक्षांना विचारावे. मंत्री महोदयांना विश्वासात न घेता सदरहू आदेश परस्पर बोर्डाकडे गेला आहे. अशाच प्रकारचा 20 ते 25 कंत्राटी कामगारांच्या संदर्भातील आदेश माथाडी बोर्डाकडे गेला होता. माथाडी कायद्यानुसार एक कामगार असेल तरी त्यास नियम लागू होतो. परंतु सदर कायदा करण्यापूर्वी बोर्डाच्या प्रत्येक चेअरमनकडे पत्र पाठवून सदर कायद्याप्रमाणे माथाडी कामगारांना नियमावली लागू करता येईल किंवा नाही यासंदर्भात सूचना करावी, अशा प्रकारे त्यांचे ओपिनियन मागविण्यात आले होते. ही बातमी आम्हाला समजल्यानंतर आम्ही त्याबाबत आवाज उठविला. या कायद्यासंदर्भात सभागृहामध्ये मंत्री महोदयांनीच आम्हाला उत्तर दिले होते. त्यावेळी मंत्री महोदयांनी सांगितले होते की, सदरहू कायदा माथाडी कामगारांना लागू होणार नाही. अशा प्रकारचे उत्तर ठामपणे कामगार मंत्री यांनी सांगितल्याने सदर उत्तर आम्ही त्यांच्या बोर्डाच्या चेअरमनला दिले त्यानंतर सदरहू प्रक्रिया थांबविली गेली.

अध्यक्ष महोदय, एका बाजूला कामगार मंत्री उत्तर देत असताना उद्योग विभाग किंवा कामगार विभागाकडून परस्पर पत्र जाते व बोर्डाकडून ओपिनियन मागविण्यात येते, याचा अर्थ आम्ही काय समजावयाचा ? सदर शंका आमच्या मनात त्यावेळी होती व आजही आहे. परवाच्या करण्यात आलेल्या लाक्षणिक संपाच्या संदर्भात उद्या बैठक आहे. त्योवळी देखील अशाच प्रकारचे पत्र उद्योग खात्याने माहे फेब्रुवारी, 2016 मध्ये प्रत्येक डेप्युटी कमिश्नर, असिस्टंट कमिश्नर व सर्व बोर्डांच्या चेअरमनला देण्यात आले होते. सदर पत्रामध्ये सांगण्यात आले होते की, सदर कायद्याची अंमलबजावणी आपणास करावी लागेल, याचा अर्थ काय आहे ? कामगारांना साडे सात ते आठ हजार रुपये दरमहा पगार मिळतो, तो फार कमी आहे. यासंदर्भात केंद्र सरकारमध्ये चर्चा सुरु आहे. कामगारांना कमीत कमी वेतन 15 हजार रुपये मिळाले पाहिजे. याप्रकरणी कमीत कमी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे.....

राज्य शासनाने तरी सुरुवात करावी. आज जर सूट दिली गेली तर त्याच्याकरिता कोणत्याही प्रकारचा कायदा राहणार नाही, त्यास ग्रॅच्युईटी, पी.एफ., अशा प्रकारच्या कोणत्याही सुविधा मिळणार नाहीत ही वस्तुस्थिती आहे. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना 7 वा वेतन आयोग लागू करावयाचा आहे व तो कर्मचाऱ्यांचा अधिकार आहे. या अधिकाराचा विचार करीत असताना शासन 50 टक्के कर्मचारी भरती कंत्राटी तत्वावर करीत आहे. शासनाकडून एका बाजूला पैसे देत असताना दुसऱ्या बाजूने पैसे वाचविण्याचा धंदा म्हणजे फंडा वापरण्यात येत आहे. हा फंडा आमच्या सत्ता काळात झाला असेल परंतु तो कार्यान्वीत झाल्याचा प्रकार पाहिल्यानंतर काही दिवसांनी कायदाच शिल्लक राहणार नाही, अशा प्रकारची गंभीर परिस्थिती निर्माण होईल. सहाव्या व सातव्या वेतन आयोगासंदर्भात शासकीय क्षेत्रातील चौथ्या श्रेणीतील कर्मचाऱ्यांची कपात करुन तेथे कंत्राटी कर्मचारी नियुक्त करण्याची शिफारस सरकारने केली आहे. सातव्या वेतन आयोगाबाबत म्हटले आहे की, नोकर भरतीवर बंदी आणून मध्यवर्ती सरकार व राज्य सरकार मधील नियमित पदाऐवजी कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येईल. यासंदर्भात आपण या कायद्याच्या बदलानुसार एका बाजूला शासनातील नियमित पदावरील कर्मचारी भरती हळूहळू कंत्राटी तत्वावर करण्यात येत आहे. चतुर्थ श्रेणी, तृतीय श्रेणी किंवा द्वितीय श्रेणी वर्गातील सदरहू कंत्राटी कर्मचारी असेल. आर्थिक डोलारा सांभाळण्याकरिता शासन जी तारेवरची कसरत करीत आहे त्यास आमचा विरोध आहे. कर्मचाऱ्यांचा जो अधिकार आहे तो त्यांना मिळालाच पाहिजे, अशी आमची प्रामाणिक भावना आहे. कंत्राटी कामगार विधेयक मंजूर झाले तरी त्याबाबतीतील सरकारची भूमिका प्रामाणिक आहे परंतु विधेयकामधील भूमिका प्रामाणिक नाही. "मेक इन इंडिया"च्या नावाखाली सदरहू विधेयकाच्या माध्यमातून बऱ्याच लोकांच्या आकांक्षा हे सरकार धुळीला मिळवण्याचा प्रयत्न करीत आहे. आजही कोणत्याही दुकानात गेल्यानंतर रेकॉर्डवर दाखवून द्या..... कित्येक केसेस आपल्याकडे ॲक्ट लागू करण्याच्या संदर्भात प्रलंबित आहेत. इंडस्ट्रीयल कोर्ट, सुप्रीम कोर्ट, हाय कोर्टापर्यंत दावे चालतात तोपर्यंत संबंधित व्यक्ती कोठे गेला हे समजत नाही. कायद्यामध्ये बदल करताना कामगार कायद्यांना संरक्षित बदल झाला असता तर त्याचे आम्ही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे.....

स्वागत केले असते. देशातील सर्व कामगार संघटनांची चळवळ सरकारने मोडीत काढली आहे. केंद्रमधील सरकार बदलल्यानंतर कामगार आंदोलने कोठे होत आहेत, हे दाखवून द्यावे. देशामध्ये एकाही ठिकाणी कामगारांचे आंदोलन होत नाही. परवा आम्ही आंदोलन करण्याचे धाडस केले. परंतु कामगारांचे एकही आंदोलन होऊ दिले जात नाही, त्यावर लगेच पर्याय शोधला जातो. कामगार चळवळीचा देशावर व राज्यावर एक दरारा होता तो सरकारकडे अधिकार असल्याने पूर्णपणे मोडीत काढला आहे. कोणताही मालक किंवा पोलीस यंत्रणा असेल कामगार खात्याचा आधार घेऊन पळवाट काढतात, कामगारांना मोडीत काढून देशोधडीला लावण्यात येत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, मी कामगार मंत्री श्री.महेता यांना एवढीच सूचना करणार आहे की, आज तुमच्या सूचनेनुसार मी थांबतो परंतु तुम्ही कामगारांच्या रोषाला बळी पडू नका. हे विधेयक मंजूर करीत असताना त्यामध्ये कोणती सुधारणा करणे शक्य आहे याचा मंत्री महोदयांनी गांभीर्याने विचार करावा. कामगार सुरक्षित होतील, त्यांना संरक्षण मिळेल, त्यांच्या अधिकारावर गदा येणार नाही, याचा विचार केला तर मी या विधेयकाच्या बाबतीत समाधान व्यक्त करू शकतो. अन्यथा सदर विधेयक कामगारांना पूर्णपणे मोडीत काढणारे असल्याने माझा त्यास विरोध आहे. कशा पध्दतीने सूट दिली तर कामगार सुरक्षित राहील याची खात्री मंत्री महोदयांनी द्यावी. अन्यथा या कायद्यामुळे संपूर्ण कामगार वर्ग नाराज होईल. सरकारवर कोण कोण नाराज आहे हे मी सांगणार नाही परंतु एवढे सांगू इच्छितो की, आज शेतकरी नाराज आहे, सराफ नाराज आहेत.

यानंतर JJJ-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे.....

सगळेच नाराज होत चालले आहेत. यामध्ये अनेक कामगार संघटनांची भर पडली आहे. आता यामध्ये 8-9 कामगार संघटना सहभागी झाल्या आहेत. त्यामध्ये भारतीय जनता पक्षाच्या सुध्दा संघटना आहे. त्यांनी सुध्दा याला विरोध केला आहे. त्यांनी हा विरोध करताना असे सांगितले आहे की, हे आम्हाला मान्य नाही. या बाबतीत काही दिवसांमध्ये फार मोठे आंदोलन केंद्र आणि राज्य सरकारच्या विरोधात या सर्व संघटना करणार आहेत. ही धोक्याची घंटा आहे. मालकांसाठी आपण ज्या पायघड्या घालतो, पण हे मालक कोणाचे नसतात. आपण कायदा केला तरी त्यांच्याकडे यामधून पळवाटा काढणारी यंत्रणा व तज्ज्ञ असतात. मी एवढेच सांगणार आहे की, हा कायदा बदलताना एकही कामगार यापासून वंचित राहता कामा नये. कायदा नसताना सुध्दा कामगार खात्याचा धाक असावा अशा प्रकारचे काम आपल्याकडून व्हावे, अशी मी आपल्याकडून अपेक्षा व्यक्त करतो. म्हणून मी या विधेयकाला विरोध करतो. परंतु मी आपल्याकडून उत्तराची अपेक्षा करतो. सन्माननीय कामगार मंत्री श्री. प्रकाश महेता हे मूळात कामगार नेते नसले तरी ते एका कामगाराचा मुलगा आहेत. त्यांच्याकडे एक वेगळ्या प्रकारे बघण्याचा आमचा दृष्टीकोन आहे. त्यामुळे आपण सांगितले पाहिजे की, माझ्याकडून कोणताही कामगार पोरका होणार नाही. आपला हा संदेश बाहेर गेला तरच तो योग्य होईल. म्हणून मी एवढेच सांगणार आहे की, 7 काय मी 10 तास सुध्दा या विधेयकावर बोलू शकतो. पण महेतासाहेब कितीही बोललो तरी उत्तर आपल्याला द्यावयाचे आहे. आणि म्हणून मला खात्री आहे की, आपण काढलेल्या या पध्दतीमध्ये फेरबदल करावा. माथाडी कायद्याला तर यामध्ये घेऊच नका. पण कामगार कायद्यामध्ये जे काही बदल आपण करणार आहात ते कामगार चळवळ आणि कामगारांचे उच्चाटन करुन वेठबिगारी करायला लावण्याची ही पध्दत आहे. त्यामुळे त्याची किंमत आपल्याला मोजावी लागेल एवढेच सांगतो आणि थांबतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. पराग अळवणी (विलेपार्ले) : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी अत्यंत महत्वाच्या विषयावर ही सुधारणा सूचविली आहे. सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे साहेबांनी ज्याप्रमाणे म्हणाले आहेत की, आता वेळ बराच झाला आहे. पण या क्षेत्रात काम करीत असताना आलेल्या अनुभवाच्या आधारावर काही सूचना करु इच्छितो. या विधेयकामध्ये सूचविण्यात आलेले बदल हे उद्देश व कारणे यामध्ये नमूद आहेत. एक तर सुक्ष्म, लहान आणि मध्यम उद्योगांच्या कारभारामध्ये शासनाचा जो हस्तक्षेप होत आहे. हे करीत असताना परवा माननीय मंत्री महोदयांनी वक्तव्य करताना सांगितले की ज्या पध्दतीने वेगवेगळ्या परवानग्या घेण्यासाठी फिरत रहावे लागते, आणि त्याचा अर्थ आपण असा काढू शकतो की, शासनाचा वेगवेगळ्या पध्दतीचा हस्तक्षेप आणि दुसरी गोष्ट त्यात होणारी दिरंगाई ही कारणे यामध्ये सांगितली आहेत. या सर्वांमधून उद्योगांच करु नये अशा पध्दतीची भावना होते किंवा आपला उद्योग जेवढा आहे तेवढाच ठीक आहे आणि यापेक्षा जास्त वाढविला तर शासनाचा यामध्ये हस्तक्षेप होईल आणि परवानगीमध्ये दिरंगाई येईल आणि त्यामुळे जसे चालले आहे तसेच चालू द्यावे. यापेक्षा जास्त उद्योग वाढवायला नको अशा पध्दतीची भावना निर्माण होते. या सर्वामुळे रोजगार निर्मिती होत नाही. कंत्राटीच्या संदर्भात त्याची त्वरेने अंमलबजावणी होत नाही अशा पध्दतीची कारणे या ठिकाणी दिलेली आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी जसे म्हटले की, शासकीय कर्मचाऱ्यांसाठी 5 वा, 6 वा, 7 वा वेतन आयोग देणे अपेक्षित आहे आणि कंत्राटी कामगारांसाठी काय तर ज्याला फॅलसी किंवा विसंगती म्हणता येईल की, एका बाजूने कायम असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना वेगवेगळ्या वेतन आयोगांमधून वेतनश्रेणी वाढ व अन्य सवलती मिळतात आणि त्याच्याकडूनच होत असलेल्या हस्तक्षेपामुळे आणि दिरंगाईमुळे अशा पध्दतीच्या कायद्यांमध्ये आपल्याला डायल्यूशन आणावे लागेल. अनेक आस्थापनांना हा कायदा लागू होत नाही. त्यामुळे खुर्चीवर ज्यांची पक्की जागा झाली आहे अशा शासकीय कर्मचाऱ्यांच्या गैरकारभारामुळे हे विधेयक आपल्याला आणावे लागत आहे. या सर्व बाबींचा विचार राज्यकर्ते म्हणून आपल्याला आणि या अगोदरच्या राज्यकर्त्यांना करावा लागणार आहे. किंबहूना आत्मचिंतन करावे लागेल की, आपला कारभार आणि प्रशासनातील अधिकारी यांच्यामुळे अशा प्रकारचे नियम करावे लागत आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. पराग अळवणी.....

अध्यक्ष महोदय, या विधेयकाच्या उद्देश व कारणांमध्ये नमूद केले म्हणणे खरे आहे की, उद्योग जर वाढले नाहीत तर त्याचा थेट परिणाम रोजगार निर्मितीवर होतो. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीचा सन 2015-16 चा अहवाल नुकताच सादर झाला आहे. या अहवालानुसार उद्योगांची संख्या वाढलेली असली तरी रोजगार निर्मितीमध्ये 1.7 इतकी घट आहे. म्हणजे एका बाजूने तरुणांच्या संख्येत प्रचंड वाढ होत आहे आणि दुसऱ्या बाजूने रोजगार निर्मितीमध्ये मात्र घट होत आहे. त्यामुळे रोजगार आवश्यक की, कायम रोजगार आवश्यक या दोन्ही बाबींच्या वादामध्ये रोजगार वाढीच्या दृष्टीकोनातून हे विधेयक आणले आहे असे मला वाटते. परंतु एका अर्थाने रोजगार निर्मितीच्या दृष्टीकोनातून हे विधेयक आणले असले तरी याचा परिणाम काय होईल हे पाहणे आवश्यक आहे. त्यामुळे 20 चे 50 आपण केल्यानंतर याची शाश्वती काय राहिल की, 40-40 च्या दोन कंपन्या किंवा आस्थापना बदलल्या जातील. किमान आपण जेव्हा ही संख्या 20 वरुन 50 वर नेत आहोत त्यावेळी उर्वरित आस्थापनेवरील माणसांना हा कायदा लागू राहिल, किमान त्यांना तरी या कायद्याची कडक अंमलबजावणी लागू राहिल या दृष्टीने शासनाने पावले उचलावीत अशी माझी सूचना आहे. अशा पध्दतीने स्प्लीट करुन दोन आस्थापना तयार होतील त्याला आळा कसा घालणार याबद्दलचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मी मघाशी म्हटल्याप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्यांचा हस्तक्षेप, दिरंगाई आणि होणाऱ्या त्रासातून रोजगार निर्मिती होत नाही आणि म्हणून हे विधेयक आणले असेल. या ठिकाणी जी दिरंगाई होते त्याला आजमितीस काय उपाय आहे तर या शासनाने आता अलिकडेच सेवा हमी कायदा आणला आहे. शासनाकडून वेगवेगळ्या पध्दतीच्या मिळणाऱ्या सेवांमध्ये होणारा हस्तक्षेप आणि त्यात होणारी दिरंगाई यावर अंकूश ठेवण्यासाठी आपण आता हा सेवा हमी कायदा आणला आहे. मी आताच सेवा हमी कायद्याच्या वेबसाईटवर माहिती घेतली असता 12,67,160 अर्ज आले असून त्यापैकी एकट्या कामगार विभागामध्ये 2 लाख 63 हजारांपेक्षा जास्त अर्ज आलेले आहेत. म्हणजे शासनाकडे जवळ जवळ 25 टक्के अर्ज हे कामगार विभागामध्ये सेवा हमी कायद्यांतर्गत तक्रारीच्या माध्यमातून आलेल्या आहेत. यावरुन आपल्या लक्षात येईल की, हस्तक्षेप आणि दिरंगाईचा त्रास लोकांना कशा पध्दतीने होत आहे. यामध्ये एखादा हस्तक्षेप किंवा दिरंगाई

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. पराग अळवणी.....

करण्याची कारणे काय आहेत हे आपल्या सर्वांना माहिती आहे. उद्योजकांना ब्लॅकमेल करायचे, त्रास द्यायचा आणि त्यातून काही मिळविण्याचा प्रयत्न करायचा आणि आपले काम करण्यास मी उशिर केला तर आपले किती नुकसान होणार आहे, अशा पध्दतीचा व्यवहार त्या ठिकाणी चालतो. यावर आजमितीस आपल्याकडे सेवा हमी कायद्याव्यतिरिक्त दुसरा कोणताही उपाय नाही. परंतु सेवा हमी कायद्यामध्ये नवीन नवीन सुधारणा करुन दुरुस्ती करण्यास वाव ठेवला आहे. या दुरुस्तीच्या स्कोपमधील मी ही एक सूचना मांडत आहे, जरी हा विषय कामगार विभागाच्या अखत्यारीतील नसला तरी या दिरंगाईस सेवा हमी कायद्यास केवळ 500 रुपये ते 2500 रुपये इतका दंड आहे. परंतु या दिरंगाईमध्ये जर त्यांच्या जास्त अपेक्षा असतील तर त्यांना 500 आणि दीड दोन हजार रुपयांचा दंड भरण्यामध्ये काही भिती वाटणार नाही. त्यामुळे माझी ही सूचना आहे की, सेवा हमी कायद्यामधील दंडाच्या रकमेसंबंधी जी तरतूद आहे त्यासंबंधी एखादी सेवा न दिल्यामुळे त्या लाभार्थीला किती नुकसान होते त्याच्या तुलनेत सेवा हमी कायद्यामधील पेनाल्टी लागू केली तर कदाचित पुढील काळात या आस्थापनांना दिरंगाई आणि हस्तक्षेपाचा त्रास होणार नाही.

3K-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.पराग अळवणी .....

अनेक सोशल्स स्कीम केंद्र सरकारने आणल्या. संघटीत कामगारांसाठी आणल्या. किमान अशा पध्दतीच्या ज्या काही योजना आहेत त्याची तरी चांगल्या पध्दतीने अंमलबजावणी कामगार विभागाने करावी. जेणेकरुन त्याचा लाभ होईल आणि ही एक सूचना आहे की, एखादे महामंडळ ज्याच्या अंतर्गत सर्व योजना ज्या कॅज्युअल लेबरसाठी आहेत. ज्या सूचना रोजगारासाठी आहेत. ज्यांना-ज्यांना कामगार कायद्याचे प्रोटेक्शन नाही. अशा मंडळींसाठी ज्या-ज्या काही योजना आहेत या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी एखादी बॉडी किंवा फॉरम शासन तयार करेल काय अशी माझी सूचना आहे. हस्तक्षेप खरोखर खूप जास्त आहे. असंख्य प्रकारचे रजिस्टार्स कुठल्याही वेळेला येऊन चेकिंग करुन जातात, या सगळ्याचा त्रास होतो आहे. या सर्व रजिस्टर्सना आणखी सोपे कसे करता येईल, ऑनलाईन पध्दतीने कसे करता येईल याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, एखाद्या कंत्राटदाराने योग्य पध्दतीने काम केले नसेल तर त्याचे लायसन्स रद्द करता येते. परंतु ते लायसन रद्द करण्याची कार्यपध्दती आपल्याकडे उपलब्ध नाही. त्यामुळे ज्युडिशिअली हिअरिंग, स्पिकींग ऑर्डर देऊन अशा पध्दतीची कारवाई करता आली तर त्यातील हस्तक्षेप बऱ्यापैकी कमी करता येईल. हा अधिनियम सन 1970 साली जेव्हा आला, त्याचे उद्देश व कारणे जर आपण वाचली तर पहिल्या ओळीतच हा कायदा आणताना याची कल्पना काय आहे हे स्पष्ट होते. या अधिनियमाच्या नावामध्येच विनिमयन आणि उच्चाटन म्हणजे कंत्राटी कामगार खरेतर असूच नयेत. परंतु अगदीच काही अडचण असेल तरच ते असावेत आणि त्याचे विनिमयन असले पाहिजे. या कायद्याच्या स्टेटमेंट ऑफ रिजन्समध्ये पहिले वाक्य वाचले तरी या कायद्यामागची काय भावना आहे हे लक्षात येते. एसओआरमध्ये म्हटलेले आहे की, "The system of employment of contract labour lends itself to various abuses." यामध्ये 'abuses' चा डिक्शनरी अर्थ शिवीगाळ, शाप असा आहे. ज्या-ज्या ठिकाणी कंत्राटी पध्दतीचे उच्चाटन करता येईल त्याठिकाणी हे उच्चाटन करण्याची आवश्यकता आहे. अशा पध्दतीची कल्पना या मूळ कायद्याची आहे. कामगार विभागाच्या माध्यमातून रेग्युलेशन करता येईल काय? अशी माझी सूचना आहे. ज्या-ज्या ठिकाणी उच्चाटन करता येणे शक्य आहे त्याकडे आपण काटेकोरपणे लक्ष

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.पराग अळवणी .....

ठेवू शकतो. मला हे मान्य आहे की, खूप अडचणी आहेत, त्रास होतो आहे, खूप हस्तक्षेप होतो आहे, खूप दिरंगाई होते आहे आणि त्यातून रोजगार निर्मिती होत नाही. म्हणून या कायद्याची क्षमता आपण 20 वरुन 50 वर नेत आहोत. परंतु ज्या ठिकाणी सहज शक्य आहे अशा ठिकाणी तरी कंत्राटी पध्दत दूर करण्याचा प्रयत्न करायला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मी दोन उदाहरणे देणार आहे, त्या माझ्या सूचना आहेत. मुंबई महापालिकेबाबत सतत चर्चा करण्यात येते की, यांचे 58 हजार कोटी रुपये बँकेमध्ये फिक्स डिपॉजिट आहेत. मुंबई महानगरपालिकेमध्ये 16 लॅब टेक्नीशियनची नियुक्ती कंत्राटी पध्दतीने करण्यात आली. पेपरमध्ये जाहिरात देण्यात आली, त्यांची नेमणूक झाली. गेल्या 8-10 वर्षापासून ही लोक कंत्राटी पध्दतीने लॅब टेक्नीशियन म्हणून काम करीत आहेत. आता महानगरपालिकेमध्ये 175 लॅब टेक्नीशियनची भरती चालू आहे. ही अर्धा वर्ष महानगरपालिकेमध्ये काम करणारी मुले आहेत त्यांना अजूनही कंत्राटी पध्दतीने ठेवण्यात आलेले आहे. यांना काढून वेगळी 175 लोक आणायचे अशा ठिकाणी तरी शासनाने लक्ष घालण्याची गरज आहे की, ज्याठिकाणी कंत्राटीवरुन नवीन कायमस्वरुपी पदभरती करीत आहात. आज 15 च्या जागेवर 175 कायम स्वरुपी लॅब टेक्नीशियन घेत आहात, या 175 मध्ये ही 15 पदे सामावून घेता आली नसती काय? माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, अशा पध्दतीचे निर्देश महानगरपालिकेला कामगार विभाग देईल काय की, या मंडळींना 175 मध्ये सामावून घेण्यात यावे. 16 हजार रुपयांमध्ये 10 वर्षे नोकरी केली आणि आता जे नवीन 175 टेक्नीशियन येणार आहेत त्यांना 38 हजार रुपये पगार मिळणार आहे. हा कंत्राटी कामगार कायदा आणतानाच हा ॲब्युज आहे याचे उच्चाटन करायचे आहे.

अध्यक्ष महोदय, याठिकाणी माननीय मंत्री सुध्दा बसलेले आहेत, त्यांच्याकडे कामगार व गृहनिर्माण विभाग सुध्दा आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण असंख्य लोकांचे घरांचे स्वप्न पूर्ण करणारे प्राधिकरण म्हणून याकडे बघितले जाते. या प्राधिकरणामध्ये सुध्दा एकही कायम स्वरुपी कामगार नाही. शासनाला शक्य असेल तेथे कंत्राटी कामगारांचे उच्चाटन करायला काय हरकत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.पराग अळवणी .....

आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये जे कामगार काम करतात, मेहनत करतात. मोठमोठे विकासक त्याठिकाणी आणखी मोठे होतात. मोठे प्रकल्प याठिकाणी होतात, लोकांची घरे बनतात. परंतु हे कामगार त्याठिकाणी कंत्राटी कामगार म्हणून काम करीत आहेत. शासनाची जेवढी प्राधिकरणे आहेत त्यातील सर्व कामगार ही कायम स्वरुपी आहेत. फक्त झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील कामगार हे 100 टक्के कंत्राटी आहेत. या कायद्याचे मूळ उच्चाटन होते. शासनाने कंत्राटी पध्दतीचे उच्चाटन करावे अशी एसआरए संदर्भातील सूचना मी देतो आणि बोलायला दिले त्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो. धन्यवाद.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रामध्ये आपल्या सरकारने कंत्राटी कामगार सेवेमध्ये छोटासा वाटणारा पण महाराष्ट्राच्या दृष्टीने महाराष्ट्राच्या कामगार कायद्यामध्ये अतिशय महत्वाचा बदल करण्याचे ठरविलेले आहे. एवढ्या महत्वाच्या बिलामध्ये कायद्यातील बदल करताना या सभागृहामध्ये विधानसभेचे फक्त 5 सदस्य बसलेले आहेत आणि सरकार अतिशय औसुक्याने सभागृहामध्ये कोरम पूर्ण नसताना हा कायदा मंजूर करून घेण्याचा हट्ट करीत आहे. रात्री उशिरा असे कायदे मंजूर करणे हे समाजाला, देशाला राज्यातील जनतेला अभिप्रेत नसताना सरकारने अशी पावले टाकणे म्हणजे जनतेचा अप्रत्यक्षपणे विश्वासघात आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. म्हणून कोरम फूल असताना असे कायदे मांडले पाहिजेत. कोरम फूल असताना अशा पध्दतीचे कायदे मांडले तर सभागृहातील सभासदांची भावना मंत्री महोदयांना लक्षात आली असती. कदाचित मत परिवर्तन होऊन त्यांनी हा कायदा मागे घेण्याचाही विचार केला असता. एवढा हा कायदा महाराष्ट्रातील कामगारांच्या विरोधातील आहे. खाली बसलेल्या गोष्टी गृहीत धरायच्या नसतात, पण ते अतिशय महत्वाचे बोलले की, तुमची इच्छा आहे. पण सरकार तसे करायची संधी आपल्याला देत नाही. यात काय बदल केलेला आहे तर 20 कामगारांच्या ऐवजी 50 कामगारांना कॉन्ट्रक्ट देण्याची मान्यता दिली. म्हणजे माझ्या साखर कारखान्यामध्ये जर 200 कामगार असतील तर या 200 कामगारांमध्ये 50-50 चे चार कॉन्ट्रॅक्टर नेमले तर मला कायम कामगारांची गरजच लागणार नाही. महाराष्ट्रामध्ये नवीन मेक इन इंडियाचे स्वरुप तयार केलेले आहे. ही नवीन गुंतवणूक मागवतो आहे, निमंत्रित करीत आहोत. जगातून जे गुंतवणूकदार येणार आहेत, ते काही हजारो कामगारांना हात देणारे कारखाने नाहीत. ते कुठे 150, कुठे 200, कुठे 300 असे आहेत. आता एवढे ऑटोमेशन झालेले आहे की, मुळातच कामगारांची गरज उद्योगामध्ये फार कमी लागते. जे उद्योग कामगारांवर अवलंबून आहेत ते जगात फायनांन्सिअली, इकोनॉमिकली व्हायबल होत नाहीत. म्हणून ऑटोमेशनचा एवढ्या मोठ्या प्रमाणात वापर होतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील ...

माझे धाडस खचलेले आहे. त्यामुळे मी फार वेळ बोलत नाही. महाराष्ट्रातल्या कामगारांना आणि उद्योगांना आतापर्यंतचे कायदे केव्हा अडचणीचे वाटले नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.पराग अळवणी यांनी सांगितले त्याप्रमाणे त्यामध्ये किचकटपणा आहे. इन्स्पेक्टर राज आहे. "Ease of doing business" हा नवा विषय महाराष्ट्रात आणि देशात माननीय पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांनी आणलेला आहे. "Ease of doing business" मध्ये उद्योग चालू करणे सहजासहजी व्हावे आणि क्लोजरही सहजासहजी होणे, सध्या महाराष्ट्रामध्ये 100 कामगारांच्या आतला कारखाना असेल क्लोजर करण्यासाठी त्याला कोणाची परवानगी घ्यावी लागत नाही.

अध्यक्ष महोदय, आता हळूहळू आपल्या मनात आहे असे मी ऐकतो की, ही 200 पर्यंत परवानगी न्यायची म्हणजे मनात आहे, ती बाहेर आलेली नाही. माननीय श्री.बापट साहेब आपले संबंध ऐवढे जवळचे आहेत की, आपल्या मनात काय येईल हे मला नाही कळले तर दुस-या कोणाला कळेल. त्यामुळे आपली भूमिका ही महाराष्ट्रातल्या सगळया कारखान्यात ही "Ease of doing business" च्या नावाखाली असे नवे नवे कायदे आणण्याचा आपला प्रयत्न होण्याची शक्यता आहे. त्यातले पहिले पाऊल आज टाकले आहे. या पहिल्या पावलमध्ये 20 च्या ऐवजी 50 ही संख्या वाढविण्याचे कारण काय आहे ? असे कोणाच्या मनात आले. कोणते कारण घडले ? आपल्याला अशा कॉन्ट्रॅक्टवर माणसे नेमण्याचा अधिकार आपण द्यायला लागलो तर महाराष्ट्रामध्ये सामान्य माणसाचे कामगार वर्गाचे सोशन करण्याची सुरुवात करायला लागलो आहोत. 20 ची परवानगी पूर्वी दिलेली होती. कारण अचानक काही कामासाठी गरज लागू शकते. कारखान्यामध्ये तात्पुरती कामे असतातच त्यामुळे तात्पुर्त्या कॉन्ट्रॅक्टवर 20 ते 18 माणसे आणली काम केले तो निघून गेला, विषय संपला. वेगवेगळया सिझनमध्ये 20 पर्यंत ठीक आहे. ज्याअर्थी तुम्हाला 50 पर्यंत कामगारांची गरज लागते. त्याअर्थी ते कायम स्वरुपाचे किंवा मोठया स्वरुपाचे ज्याचा आवाका जास्त आहे असे कामगार लागण्याची आवश्यकता असते. म्हणून अशा कामगारांना कॉन्ट्रॅक्टर नेमले, कॉन्ट्रॅक्टर हया तीन महिन्यात 50 जणांना कामावर घेतात, दुस-या तीन महिन्यात 50 जणांना घेतात, काहीवेळा तर आपल्या बदलाचा वापर इंजिनिअरींग इंडस्ट्रीजमध्ये कदाचित असा होईल की, 100 जणांची इंडस्ट्री असेल पुण्याच्या जवळ अनेक छोटे छोटे इंजिनिअरींग इंडस्ट्रीज

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

ऑटोमोबाईल इंजिनिअरींगच्या सपोर्टला उभी राहिलेली आहे. तेथे कामगार किती आहेत, 25, 30, 40, 50 आहेत, आता त्यांना अधिकार देतो की, तुम्ही सर्व कॉन्ट्रॅक्टवर लावा काही अडचण नाही. आम्ही तुमच्याकडे लक्ष देणार नाही. तुमचा खर्च कमी यावा तुमचे उत्पादन मेक इन इंडियाच्यासाठी जास्त किफायतशिर व्हावे, हा महत्वाचा विचार करून कॉस्ट ऑफ एम्प्लॉईज किंवा कॉस्ट ऑफ प्रॉडक्शन कमी करण्यासाठी एक मागचा मार्ग सर्व उद्योग जगताला निर्माण करून देत आहोत. या उद्योगाच्या निर्णयामुळे उद्योगपती फार चांगले स्वागत करतील. महाराष्ट्रातील जो धनिक वर्ग तुमचे फार मोठे स्वागत करेल.

अध्यक्ष महोदय, भारतीय जनता पक्षाला या सभागृहात निवडून देण्यासाठी, महाराष्ट्रात निवडून देण्यासाठी ज्या धनिकांनी अपेक्षा बाळगल्या तुमच्याकडून त्यांना आज रात्री आनंद होणार आहे. यात माझ्या मनात काही शंका नाही. पण ज्या गरीब माणसाने देखिल तुम्हाला कमळावर मतदान केले. त्या गरीब माणसाची इच्छा होती की, काही तरी ही लोक करतील बदल करतील आपल्या हिताचा, त्या लोकांचा आज रात्री भ्रमनिरास होणार आहे. हे सांगण्यासाठी मी मगाच पासून थांबलो आहे. आज माननीय श्री.बापट साहेब मतदार संघात जाऊन सांगितले की, मी 20 चे 50 केलेले आहेत. तर माननीय श्री.बापट साहेबांच्या मतदार संघात, आजपर्यंत ज्या गरीब माणसाने त्यांना वर्षानुवर्षे निवडून दिलेले आहे. त्यांच्या मतदार संघात उत्तम काम केलेले आहे. वेगवेगळया पध्दतीने विकासाची कामे केलेली आहेत. पण त्या सगळया मताला एक असा मतदारांचा वर्ग आहे जो समजत होता की, माननीय श्री.बापट साहेब समाजाच्या हिताचे काम करतात, पुण्याला जाऊन ते जेव्हा जाहीर करतील की, आम्ही असा बदल केलेला आहे. त्यावेळी संसदीय कार्य मंत्री म्हणून पुण्यातील मतदार विचारेल रात्री 10.00 वाजता असे कायदे मंजूर करण्यासाठी तुम्हाला आम्ही निवडून दिले का ? या प्रश्नाला माननीय श्री.बापट साहेबांना उत्तर देता येणार नाही. कारण 20 चे 50 करणे हा महाराष्ट्रातील कामगार चळवळीला फार मोठा धक्का आहे. म्हणून आमचे सन्माननीय सदस्य श्री.शिंदे साहेब यांनी अतिशय नम्र आणि सभ्य शब्दात सांगितले की, महाराष्ट्रातील संघटीत कामगारांचा जो वर्ग एकत्रित येऊन याला विरोध करेल. पण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

मेक इन इंडियासाठी या देशात, महाराष्ट्रात 30 लाख कामगारांना संधी मिळणार आहे असे माननीय मुंख्यमंत्री सतत सांगता आहेत. 30 लाख राहू देत ते इनप्रॅक्टीकल आहे. पण 10 लाख लोकांना जरी नोकरी लागत असेल त्या 10 लाख लोकांमधील 7 ते 8 लाख लोक हे कंत्राटी कामगारांच्या संख्येमध्ये येणार आहेत. ते काय कायम कामगार नेमणा-या या मेक इन इंडियात येणा-या इन्व्हेस्टमेंटच्या कंपन्या नाहीत. आज याबाबत पेपरला बातमी वाचली असेल. पुण्यामध्ये रामदेव बाबा आले होते. त्यांनी मेक इन इंडियाबद्दल मत व्यक्त केले आहे. ती बातमी वाचली की नाही ? रामदेव बाबा असे म्हणतात की, परदेशी कंपन्यांना तुम्ही आपल्या देशामध्ये आणायला लागला आहात. आपल्या मजूराला वेठबिगार पध्दतीने वापरण्याची त्याला संधी द्यायची. परत त्याने माल तयार करुन परदेशात, जगात नेऊन विकायचा, ईस्ट इंडिया कंपनी पेक्षा वेगळे असे काम करीत नाहीत, ईस्ट इंडिया कंपनीने हेच केले. या देशात ते आले, इथल्या सर्व कच्या मालाचा वापर केला, आपल्या लोकांना राबराब राबविले आणि परदेशात नेऊन तो माल युरोपच्या बाजार पेठेत विकला. आपल्या मेक इन इंडियामध्ये महाराष्ट्रात आणि भारतामध्ये मॅन्युफॅक्चरींग काय करणार आहे ? या स्थानिक विद्वत्तेला किती वापर करणार आहे ? जर स्थानिक विद्वत्तेला भांडवल नसेल आपल्या सरकारने त्यांना भांडवल द्यावे. महाराष्ट्रामध्ये आणि भारतामध्ये स्थानिक विद्वत्तेला कमी नाही. आज भारतातील अनेक माणसे, घाटकोपर मतदार संघातील अनेक माणसे अमेरिकेत राहतात. नासा सारख्या किंवा जेथे डोक्याचे काम असते त्या ठिकाणी काम करतात. त्यामुळे भारतातील विद्वत्तेला जगात मान्यता आहे. आपण फक्त मेक इन इंडियासाठी जगातली माणसे भारतात बोलावतो आहे. उद्योग आले पाहिजेत, वाढले पाहिजेत, हे उद्योग कुठे वाढले पाहिजेत हे मी समजू शकतो, असा कायदा फक्त आपण बुलढाण्यामधील कारखान्यांसाठी केला. गडचिरोलीमध्ये गुंतवणूक करा, हा कायदा करुन तुम्हाला रिलॅक्सेशन देतो म्हटले तर ठीक आहे. तुम्ही पुणे, मुंबई, नाशकात करणार ज्या ठिकाणी इंडस्ट्रीयल ग्रोथ एवढी ईनॉर्मस झालेली आहे की, जेथे गाडया चालत नाहीत, म्हणून फ्लाय ओव्हर ब्रिज करतो, फ्लाय ओव्हरवर गर्दी होते म्हणून मेट्रो करायला लागलो, मेट्रो आता जास्त व्हायला लागली म्हणून एकाचे दोन विमानतळ,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील..

दोनाचे तीन विमानतळ करण्याचा भाषा हळूहळू सुरु व्हायला लागली आहे. मी यासाठी सांगतो आहे की, ज्या ठिकाणी उद्योग आलेले आहेत. तिथेच हा सर्व वर्षाव आहे. विदर्भातील मराठवाडयातील जनतेची भूमिका सर्वांनी ऐकली असेल त्या मराठवाडयामध्ये आपली गुंतवणूक 4, 5 टक्के सुध्दा नाही. विदर्भामध्ये 10 ते 20 टक्के सुध्दा नाही. सर्व मेजॉरिटी इन्व्हेस्टमेंट वेस्टर्न महाराष्ट्रात कोकण आणि नाशिकापर्यंत व्हायला लागली तर तेथे या कायद्याचा दुरुपयोग भयानक होईल. ज्यांना संधी मिळत नाही त्या न मिळणा-या संधीसाठी कदाचित हे उद्योग तिकडे जाण्यासाठी ॲट्रॅक्शन म्हणून ठेवले असते महाराष्ट्रामध्ये झीरो इंडस्ट्री असणारे काही जिल्हे आहेत. नंदूरबार, गडचिरोली, बुलढाण्यासारखा जिल्हा आहे अकोल्यात फक्त राईस मिल आणि डाळ मिल आहेत. त्यापेक्षा तिकडे इंजिनिअरींग इंडस्ट्री जाते आहे. स्पेशियल इन्सेन्टीव्ह म्हणून तेवढयासाठी हा कायदा लागू करतो. असे सांगितले असते कदाचित सर्वांनी याचे स्वागत केले असते. आता वेळ बराच झालेला आहे. मी सरकारची मेक इन महाराष्ट्र आणि मेक इन इंडियाची इच्छा शक्ती आहे. त्यासाठी तुम्हाला दंड देणे मला शोभत नाही. आपण आमचे अनेक वर्षांचे मित्र आहात, त्यामुळे आपल्याला किती वेळ येथे बसवायचे यालाही मी तारतम्यता बाळगणे आवश्यक आहे. मी या विषयावर जास्त बोलत नाही. पण हा भारतीय जनता पक्षाचा कामगारांविरोधी असणारा खरा मुखवटा महाराष्ट्राच्या समोर या बिलातून यायला लागला आहे.

3M-1 .....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

या विधेयकातून या सरकारने खरे चित्र व खरे रंग दाखवायला सुरुवात केलेली आहे. भारतामध्ये जी गुंतवणूक येईल यातून महाराष्ट्रामध्ये येणाऱ्या गुंतवणूकीमुळे 30 लाख कामगार लागणार असतील तर आज आपण येथील बोर्डवर लिहून ठेऊ की, 30 लाखातील 28 लाख कामगार हे या पध्दतीने भरले जातील. 2 लाख कर्मचारी टॉप मॅनेजमेंट, फ्लोअरशॉपमधील इंजिनियर किंवा इनचार्ज हे कदाचित या कायद्याच्या बाहेर भरले जातील. महाराष्ट्रातील कामगारांच्या पाठीमध्ये सुरा खुपसणारे विधेयक असे वर्णन या विधेयकाचे झाल्याशिवाय राहणार नाही एवढेच मी येथे सांगतो.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.गिरीष बापट यांना हसू येत आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, ज्यावेळी सभ्यतेचा अंत होतो, ज्यावेळी साधनसुचिता बाजूला ठेऊन कामकाज व्हायला लागते, जेव्हा रेटारेटीचे काम चालू व्हायला लागते तेव्हा अशा घटना घडतात. आम्ही महात्मा गांधीच्या विचाराने जाणारे आहोत, त्यामुळे मला प्रथम उपोषण करण्यचा मार्ग सुचला आहे. महात्मा गांधीच्या विचारावर श्रध्दा असणाऱ्या व्यक्तींना हे विधेयक आवडणार नाही. माननीय कामगार मंत्री श्री.प्रकाश महेता यांनी काळजीपूर्वक या विधेयकाचा अभ्यास करावा. आमच्या सर्वांच्या भाषणाने आपले मतपरिवर्तन झाले व आपण हे विधेयक विथड्रॉ केले तर माननीय मुख्यमंत्री व संसदीय कार्य मंत्री यांना आम्ही जाऊन सांगू की, या विधेयकाच्या बाबतीत पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. कारण हे विधेयक आपण मान्य केले तर महाराष्ट्रातील कामगार तुमच्या सरकारच्या विरोधात गेल्याशिवाय राहणार नाही. त्याला विरोधात घालण्याचे काम रस्त्यावर उतरून आम्ही सर्वजण केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही एवढे सांगून माझे दोन शब्द संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव): अध्यक्ष महोदय, हे विधेयक मंजूर करण्याचे सरकारने ठरविलेले आहे. आम्ही म्हटले आहे की, संयुक्त समितीकडे विधेयक पाठवा तरी तुम्ही ते पाठविणार नाही. परंतु हे करताना जे पूर्वीपासूनचे कारखाने व उद्योग आहेत त्यांना हे विधेयक लागू होणार आहे का, की नवीन येणाऱ्या उद्योगांना लागू होणार आहे हा एक मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, नोंदणीकृत कामगार संघटनांचे काही अधिकार असतात. या संघटना माथाडी ॲक्टमध्ये नाहीत. यामुळे 50-60 कामगार संघटना तयार झालेल्या आहेत. त्या रस्त्यावर उभ्या राहात आहेत, 4 कामगार असले तरी त्या नोंदणीकृत होत आहेत. त्यामध्ये पाहिजे तो गैरवापर केला जात आहे. त्या टेबल युनीयन आहेत. मी सकाळी एका कंपनीचे आपणास नाव सांगितले आहे. त्या कंपनीमध्ये माथाडी कायदा नाही, माथाडी कामगार नाहीत. कोणी युनीयनसुध्दा केलेली नाही. बाहेरचे दुसरेच लोक येऊन सांगतात की आम्हाला येथे येऊन युनीयन करायची आहे. तेथील कामगारांनी युनीयन करण्याची मागणी केली व तेथे युनीयन झाली तर मी समजू शकतो. परंतु जबरदस्तीने कामगारांची युनीयन स्थापन केली जात आहे. ही प्रवृत्ती वाढल्यामुळे कामगार चळवळ बदनाम व्हायला लागली आहे. म्हणून विनंती आहे की, माथाडी कायद्यामध्ये कामगारांच्या युनीयनमध्ये कामगारांची संख्या 2 ते 5 हजार अशी असावी, किमान 1000 तरी संख्या असावी. असा कायदा केला तर टेबल युनीयन बंद होतील. यातून पळवाट काढताना त्याचा आपण गांभीर्याने विचार करावा अशी मी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता (कामगार मंत्री) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक 2 कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन) (महाराष्ट्र सुधारणा) विधयक 2016 वरील चर्चेत भाग घेतल्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे, ॲड.पराग अळवणी, श्री.जयंत पाटील यांचे मी आभार व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, हे विधेयक एका सिमीत उद्देशासाठी आहे. कंत्राटी कामगारांसाठीचे एकूण वातावरण पाहता सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेली चिंता आपणा सर्वांना आहे त्याबद्दल वाद नाही. याची पार्श्वभूमी अशी आहे की,, 1970 पूर्वी कंत्राटी कामगारांसाठी या देशात कोणताही कामगार कायदा नव्हता. त्या काळात स्टँडर्ड व्हॅक्युम कंपनीच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने कंत्राटी कामगारांच्या रोजगाराचे नियमन करण्याकरिता व त्याच्या कल्याणाकरिता केंद्र सरकारने कायदा करावा असे असे सांगितले. तेव्हाच्या प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनी लोकांना रोजगार मिळावा म्हणून देशभरातील दुष्काळाच्या परिस्थितीत त्यांनी कंत्राटी कामगारांचे धोरण आणले. केंद्र सरकारचा ट्रेड युनीयन कायदा 1926 पासून आहे. संघटनांची नोंदणी या कायद्यांतर्गत होत असते. पण येथे भिती व्यक्त करण्यात येत आहे की, उद्योगपतींसाठी सरकार हा कायदा आणत आहे. मेक इन महाराष्ट्र, मेक इन इंडियासाठी उद्योगांना रेड कार्पेट टाकण्यासाठी हा कायदा आणला जात आहे असे गोड बोलून भासविण्याचा प्रयत्न सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी केला आहे. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी शंका व्यक्त केली की या राज्यातील कामगार चळवळ संपुष्टात येईल. परंतु मी सांगू इच्छितो की, या राज्याची कामगार चळवळ कधीच संपुष्टात येणार नाही. या राज्याने देशाच्या कामगारांना दिशा दिलेली आहे. आपण दोन दिवसांपूर्वी भाषण करताना सांगितले की, जार्ज फर्नांडीस, कॉ.डांगे, राजाभाऊ कुलकर्णी, आर.जे. महेता, स.का.पाटील, शांतीभाई पटेल, दत्ता सामंत पर्यतची चळवळीची परंपरा फार जवळून पाहिलेली आहे. दुर्भाग्य असे की, 1980 मध्ये गिरणी कामगारांचा संप झाला. या संपाने मुंबई व महाराष्ट्रामध्ये कामगार व कामगार संघटनांचे सर्व दोर तोडले गेले. त्यातून उद्योग व कामगारही संपले. आज या राज्यात उद्योग व कामगारांच्या परिस्थितीपैकी कोणाची परिस्थिती चांगली आहे असे म्हणावे, अशी आजची परिस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांनी येथे शंका व्यक्त

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता....

केली की, माथाडीमध्ये हा कायदा लागू होईल. माथाडी कायदा हा राज्याचा कायदा आहे. कंत्राटी कायदा अधिनियम केंद्राचा कायदा आहे. मी परवासुध्दा याबाबत बोललो. मी पुन्हा सांगतो की, या कायद्याचे कलम कोणत्याही परिस्थितीत माथाडी कायद्याला लागू होणार नाही. कारण तो कायदा वेगळा आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी याबाबत चिंता बागळण्याची गरज नाही की हा कायदा माथाडी कामगारांनाही लागू होणार आहे. आपण अनेक मुद्दे मांडत असताना एक मुद्दा मांडला.

यानंतर 3N-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता.....

राजस्थानच्या धर्तीवर राज्याचे कायदे करण्याचे काम चालू आहे. 100 कामगारांचा कायदा या राज्यामध्ये पूर्वीपासून आहे. तो 200 पर्यंत करण्याची चर्चा चालू आहे, असे म्हटले गेले. अशा प्रकारचा 200 कामगारापर्यंतचा कोणताही विषय या राज्यामध्ये होणार नाही, असे मी स्पष्टपणे सांगत आहे. मी रेकॉर्डवर जबाबदारीने व समजून बोलत आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील कामगारांविषयी गोड बोलून खूप चिंतेने बोलत होते. जणु काही कामगारांवर आभाळ कोसळलेले आहे. जणु काही गेल्या पंधरा वर्षांमध्ये कामगारांची रोज दिवाळी होती. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपणही एक उद्योगपती आहात. मी आपले उद्योग, कारखाने जवळून पाहिलेले आहेत. हॉवर्ड युनिव्हर्सिटीतून आपण शिकून आलेला आहात. आपले उद्योग आणि कामगार समन्वय मी जवळून पाहिलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपण राजकीय बोलत आहात. भाजपचे सरकार आहे म्हणून कामगारांच्या हिताचा विचार त्यांच्या पाठीत खंजीर खूपसून करण्यात येईल का ? अशा पध्दतीने टोमण्याने सन्माननीय सदस्य बोलत होते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील एकदा आपण विरोधामध्ये काय बसायला लागलात तर आपला कामगार चळवळीवरील व कामगारांवरील भरवसा उडून गेला का ? आपण कामगारांना विरोधातील समजायला लागलात का ? असे बोलू नका ? राज्याचे हित व कामगारांचे हित असेल तर विरोधी व सत्ताधारी एकत्र असतात. राज्याचे व कामगारांचे अहित होऊ दिले जाणार नाही. प्रत्येक गोष्ट उलट पध्दतीने का घेतली जाते ? 20 चे 50 केल्यावर सगळी 30 लाखांची भरती होणार आहे, त्यापैकी 28 लाख हीच भरती होणार आहे, असे समजले जात आहे. 20 च्या ऐवजी 50 झाल्यावर 30 जणांना अधिक रोजगार मिळणार आहे, असे काम समजले जात नाही ? पूर्वी कायद्यात पळवाट नव्हत्या का ? 20-20 च्या तीन-चार तुकडया कंत्राटदारांच्या भावा-भावांनी केल्या नव्हत्या का? ही परंपरा नाही का महाराष्ट्रात ? 20 चे 50 केल्यावर 30 लोकांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण मिळणार नाही, असे जे समजले जात आहे, ते चुकीचे आहे. संयुक्त कृती समितीच्या निर्णयानुसार किमान वेतन, भविष्य निर्वाह निधी, बोनस, राज्य कामगार विमा योजना, कंत्राटी कामगारांना समान वेतन कायदा, 1976 च्या तरतुदींचा लाभ या 50 कामगारांना मिळणार आहेत. मग तो एक कामगार असो किंवा 50 कामगार असतील या सर्वांना या तरतुदींचा लाभ मिळणार आहे. 2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता.....

यातून एकही कामगार सुटणार नाही. कामगारांबाबत जशी चिंता तुम्हाला आहे, तशीच आम्हालाही आहे. आपल्या सर्वांना कामगारांच्या किमान वेतनाबाबतची चिंता आहे. कामगार मंत्री झाल्यानंतर मी अनेक कारखाने पाहिले. काही कारखान्यांमध्ये केवळ 200 कामगार कायम होते. आणि 7000 कंत्राटी कामगार होते. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांच्यासमवेत अनेक कारखान्यांची बैठक घेत असतांना आम्हाला असे आढळून आले होते की, 200 कुशल कामगार जे काम करीत आहेत, तीच कामे कंत्राटी कामगार 20 वर्षांपासून करीत आहेत. तरीही ते कंत्राटी कामगारच आहेत. यापूर्वी हा विचार करण्याची गरज होती. कंत्राटी कामगारांच्या कामाचा 5-7 वर्षाचा टप्पा झाल्यानंतर त्यांना रेग्यूलर एकाच जागेवर कायम कामगार म्हणून सवलत देण्यासंबंधीचा विचार शासनाने एकत्रपणाने करणे आवश्यक होते.

तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर) : 29 दिवसानंतरच्या ब्रेकचा यामध्ये विचार करणे आवश्यक आहे.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, याबाबत शासन सकारात्मक आहे. काही कामगार एकाच ठिकाणी 20-35 वर्ष कंत्राटी म्हणून काम करीत असतात. 4-5 दिवसांपूर्वी दाभोळ प्रकल्पात काम करणारे 76 कामगार माझ्याकडे आले होते. या प्रकल्पांतर्गत त्यांची जमीन शासनाने घेतली होती. ज्या लोकांना पैसे पाहिजे होते, त्यांना पैसे दिले. ज्यांनी पैसे घेतले नाही, त्यांना नोक-या दिल्या. आज त्यांची परिस्थिती काय आहे ? त्यांना कंत्राटी कामगार म्हणून वागविले जात आहे. 20 वर्षापासून दाभोळ प्रकल्पात ते 76 कामगारच कंत्राटी कामगार म्हणून काम करीत आहेत. याची आता जी कंपनी झाली, त्यामध्ये केंद्राच्या पेट्रोलियम आणि ऊर्जा मंत्रालय आणि राज्याचा 13 टक्के हिस्सा त्यामध्ये आहे. त्या कंपनीतील सर्व अधिका-यांची बैठक बोलाविली. मी केंद्रीय पेट्रोलियम व ऊर्जामंत्री महोदयांना पत्र लिहिले. दाभोळ प्रकल्पातील 76 कामगरांसाठी मी बैठक मागितली आहे. हा अन्याय आहे. अशा पध्दतीने शासनाने या 76 कामगारांची जमीन पण घेतलेली आहे आणि तरीही त्यांना अशा प्रकारे असुरक्षित ठेवणे योग्य नाही. सरकार स्वत: त्या कंपनीत असेल तरीही दुसरा भाग वेगळा आहे. दाभोळ वीज प्रकल्पातून जी वीज उत्पादित होते, ती विकली जात नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता.....

या प्रकल्पातून उत्पादित होणा-या 2000 मेगावॅट विजेपैकी 500 मेगावॅट वीज रेल्वे घेते, त्यामध्ये अनियमितता होते, तो भाग वेगळा आहे. काही विभागांमध्ये कामगार विभागाकडून परस्पर पत्र गेले, याची गंभीर नोंद शासनाने घेतलेली आहे. कामगार विभागाकडून इतर क्षेत्रातील कामगारांमध्ये जर असे पत्र गेले असेल किंवा उद्योग खात्याच्या वतीने पत्र गेले असले तरी याची गंभीर दखल घेऊन मी याबाबत अधिका-यांशी चर्चा करणार आहे. निश्चितपणे या विभागात काही पदे रिक्त आहेत, हाही मुद्दा उपस्थित केला होता. यामध्ये एकूण 82 पदे रिक्त आहेत. त्यातील 19 पदांकरिता सा.प्र.वि.भरतीची प्रक्रिया सुरु आहे. काही दिवसातच ही 19 पदे भरण्यात येतील. याकरिता हळूहळू सुरुवात केलेली आहे. अशा पध्दतीने विभागाला सक्षम करण्यासाठी आवश्यक असलेल्या मानवशक्तीची भरती करण्यात येईल. सन्माननीय सदस्य ॲड.पराग अळवणी यांनी सांगितले की, परमिशन्स घेताना फार विलंब होतो. मी त्यांच्या माहितीसाठी सांगतो की, कामगार विभागात सर्व परवाने सात दिवसत ऑनलाईन देण्याबाबतची कार्यवाही 2.10.2015 पासून व 26.1.2016 पासून सुरु करण्यात आलेली आहे. एकूण 2,93,186 ऑनलाईन अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी 2,81,905 अर्ज निकाली काढलेले आहेत. गेल्या वर्षभराच्या काळामध्ये शासनाने 96 टक्के ऑनलाईन अर्जांना परवानग्या दिलेल्या आहेत. या 20 चे 50 झाल्यावर त्या 30 लोकांच्या भविष्याबाबत विचार केला तर अशा प्रकारे अनेक कंत्राटी कामगार वाढतील. याबाबत दोन्ही सभागृहाचे सन्माननीय सदस्य, कामगार क्षेत्र मालक क्षेत्रातील प्रतिनिधी मिळून एक त्रिस्तरीय सदस्य समिती नेमून या बाबत संपूर्ण लेबल लॉ रिफॉर्म करण्यासंबंधी त्याच्यावर चर्चा करण्यासंबंधी व त्यातून मार्ग काढण्यासंबंधी कंत्राटी कामगारांच्या मिनिमम वेजेसकरिता निश्चित भूमिका घेण्याची आज गरज आहे, असे शासनालाही वाटत आहे. आणि म्हणून एका सकारात्मक भूमिकेतून शासन पुढे जाण्याचा विचार करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश महेता.....

सन्माननीय सदस्य ॲड. पराग अळवणी यांनी 150 लॅब कर्मचारी हे अनेक वर्षापासून कंत्राटी पध्दतीवर काम करीत असल्याची माहिती दिलेली आहे. आता त्यांना कायम करण्याचे काम सुरु केले जात आहे. मी उद्याच्या उद्या त्या बाबतची दखल घेणार आहे. ज्या कर्मचाऱ्यांनी 12 ते 15 वर्षे महानगरपालिकेत लॅबॉरटी पदावर कंत्राटी पध्दतीने कामे केलेली आहेत, अशा संबंधित कर्मचाऱ्यांनी त्यांची जबाबदारी योग्यरित्या पार पाडलेली असेल तर अशा 150 कर्मचाऱ्यांना नियमित करण्याची आवश्यकता आहे. यासाठी मी माझ्या स्तरावर योग्य ते प्रयत्न करणार आहे. तसेच याबाबत आवश्यक ती माहिती मुख्यमंत्री महोदयांना दिली जाणार आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या शंकेबाबत मी समाधान करण्याचा प्रयत्न केलेला आहे. भविष्यकाळात राज्यातील कामगारांना वेठीस धरुन राज्याचा विकास होणार नाही, असे माझे आणि माझ्या शासनाचे ठाम मत आहे, हे मला या ठिकाणी आवर्जून सांगावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, कामगारांसंदर्भात आमच्या पक्षाला देखील कळकळ आहे. आणखी 15 ते 20 वर्षे आम्हाला त्यांच्यासाठी कामे करावयाची आहेत. आम्हाला समाजातील प्रत्येक घटकासंबंधी चिंता व्यक्त करावयाची आहे आणि न्याय द्यावयाचा आहे. गेल्या 30 वर्षापासून समाजातील ज्या घटकांना न्याय मिळालेला नाही, अशा घटकांना आमच्याकडून न्याय देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यासंदर्भात मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांचे मार्गदर्शन घेणार आहे. मागील वेळेस काही अडचणीमुळे त्यांना कामगारांना न्याय देता आला नव्हता. पण आम्ही कोणत्याही परिस्थितीत कामगारांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. महाराष्ट्रातील कामगारांचा हक्क अबाधित राखण्यासाठी मला आपल्या सर्वांचे सहकार्य हवे आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी कमळात सुरा खुपसला काय वगैरे भाषणातून माहिती दिलेली असून, तशा प्रकारचे भाषण करण्याची त्यांची शैली आहे आणि मी त्यांच्या भाषण शैलीवर जाणार नाही. मी त्यांच्या राजकीय भाषणावर जाणार नाही. सन्माननीय सदस्यांनी जे सूचक संकेत दिले आहेत, त्या संकेताला गांभीर्याने घेऊन मी त्यांना श्वावत करणार आहे. सदर कायद्यात 20 कामगारांच्या

.....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश महेता.....

ठेकेदाराला 50 कामगारांपर्यंत सूट दिली जाणार आहे. यामध्ये एक कामगार असेल किंवा 50 कामगार असेल, त्यांना जो कायदा लागू होता, त्यामधून त्यांचा घात होणार नाही. अशा सर्व कामगारांना लाभ मिळणार आहे, अशा प्रकारची मी ग्वाही देता आणि सदर विधेयक मंजूर करावे, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, कायद्यात 20 कामगाराऐवजी 50 कामगार अशी दुरुस्ती केली जात आहे. मंत्री महोदयांकडून एकाही कामगारांवर अन्याय केला जाणार नसल्याचे उत्तर देत आहेत. आपण कॉन्ट्रॅक्टवर कामगार नेमण्याची मुभा कंत्राटदाराला देत आहोत. म्हणजे 49 किंवा 50 कामगारांना कायमस्वरुपी नोकरी देण्याबाबत माझ्यावर बंधन नाही. एक कॉन्ट्रॅक्टरला 20 ऐवजी 50 कामगार कंत्राटी पध्दतीवर नियुक्त करण्याची मुभा मिळणार आहे. मी माझ्या 200 कामगारांपैकी 4 वेगवगेळ कॉन्ट्रॅक्टर ठेऊन 180 कामगार नियुक्त करु शकतो. नवीन कामगार आशेने बघणार आहेत, अशा कामगारांवर अन्याय होणार आहे. चायनामध्ये गावावरुन कामगार येतात आणि बरॅक्समध्ये राहतात. काँग्रेस पक्षाने त्या वाटेने न जाण्याची भूमिका घेतलेली होती. आता तुम्ही त्या वाटेने जाऊ लागला आहात. चायना ज्या मार्गाने जाऊन अडचणीत आलेला होता, तशा प्रकारे आपण मेक इन इंडियाच्या नादाला लागून त्या मार्गाने जाऊ नये, अशी आमची इच्छा आहे.

अध्यक्ष महोदय, आता अदृश्य गॅलरीतील सर्वजण सांगत असल्यामुळे साहेब बस्स करा. म्हणून मी त्यांच्यावतीने मंत्री महोदयांना बस्स करा अशी विनंती करतो.

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांची कामगारांना न्याय देण्याबाबत मनापासून इच्छा आहे. एखादा कर्मचारी किती वर्षे कंत्राटीपध्दतीवर काम करावा, यासंदर्भातील धोरण मंत्री महोदयांनी सदनाला सांगण्याची आवश्यकता आहे. मंत्री महोदय कामगारांना न्याय देण्याबाबत भूमिका मांडत असून, त्याबाबत माझ्या मनात कोणतीही शंका नाही. 20 कामगारानंतर 21वा कामगार कायम होत होता. यासंदर्भात सन्माननीय सदस्य ॲड. पराग अळवणी यांनी 29

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे.....

दिवस झाल्यानंतर कामगाराला ब्रेक देऊन, दोन दिवस गैरहजर ठेऊन आणि त्याला पुन्हा कामावर घेण्याबाबत पळवाट असून, त्याची माहिती दिलेली आहे. आता कंत्रीटी पध्दतीवर 50 कामगार नियुक्त करण्याची मुभा दिलेली आहे. अशा कामगारांना कायम होता येणार नाही. अशी कायद्यात सूट आहे. 20 कामगारांच्या संदर्भातील कायदा केल्यानंतर 10 कामगारांच्या फर्म करण्यासारख्या पळवाटा शोधल्या जाणार आहेत. कामगार कायम होणार होता. अशा कामगारांना सूट दिल्यामुळे कायद्यान्वये त्यांच्यावर गंडातर येणार आहे. कंत्राटी कामगारांनी अमुक वर्षे काम केल्यानंतर तो आपोआप परमंट झालाच पाहिजे, अशा प्रकारचा बदल सदरहू कायद्यात करावा, अशी माझी सूचना असून, ती मंत्री महोदयांनी मान्य करावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, अनेक कंत्राटी कामगार कंपनीमध्ये 25 वर्षापासून कंत्राटी पध्दतीवर काम करीत आहेत. हे आपले दुर्भाग्य आहे. यामधील राजकीय विषय सोडण्याची गरज आहे. कामगारांना मिळणाऱ्या वेतनाच्या संदर्भात आपण सर्वजण चिंतेत आहोत. आमच्या शासनाची सकारात्मक भूमिका आहे. कमिटी केल्यानंतर त्यांच्या बाबतीत सकारात्मक विचार केला जाणार आहे. या दृष्टीकोनातून पुढील पावले उचलली जाणार आहेत. याबाबत माझे शासन आणि मी कंत्राटी कामगारांच्या बाजूने ठामपणे उभे आहोत.

अध्यक्ष महोदय, सन 20106 चे विधानसभा विधेयक क्रमांक-2 कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2016 विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभाध्यक्ष (श्री. योगेश सागर) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्र.2 संमत करण्यात यवे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभाध्यक्ष : सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 2 संमत झाले आहे.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 12 एप्रिल, 2016 रोजी सकाळी 10.00 वाजता पुनः भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रो 10 वाजून 30 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 12 एप्रिल 2016 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION